25-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1



**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सिधुदुर्ग जिल्ह्यातील महाराष्ट्र परिवहन मंडळात काम करणाऱ्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना किमान वेतनाप्रमाणे रोजंदारी मिळण्याबाबत**

**(1) * 30914 श्री.राजन तेली , श्री.अमरनाथ राजूरकर** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एस.टी.चे रोजंदारी सफाई कामगार गेल्या 20 वर्षापासून तुटपुंज्या रोजंदारीवर म्हणजे 22 रुपयांवर काम करीत असल्याचे माहे एप्रिल, 2012 मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या रोजंदारी कर्मचाऱ्यांना किमान वेतनाप्रमाणे रोजंदारी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) सिंधुदुर्ग विभागात 20 वर्षापासून रोजंदारीवर एकही सफाई कामगार काम करीत नाही. या विभागात 12 नियमित सफाई कर्मचारी कार्यरत असून त्यांना कनिष्ठ वेतनश्रेणी व नियमित वेतनश्रेणीनुसार वेतन दिले जाते.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये सिंधुदुर्ग विभागात एकही सफाई कामगार काम करीत नाही असे नमूद केलेले आहे. सध्या तेथे जे कर्मचारी काम करीत आहेत त्यांना नियमित वेतनश्रेणी लागू आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या विभागात 12 कर्मचाऱ्यांपैकी वारसा हक्काने 1, अनुकंपा तत्वावर 3 आणि सरळ सेवेद्वारे 8 कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी 3 अनुकंपा तत्वावरील कर्मचारी कनिष्ठ वेतनश्रेणीतील आहेत. त्यांचा 5 वर्षांचा कालावधी पूर्ण होणे बाकी आहे. बाकीच्या 9 कर्मचारी नियमित वेतनश्रेणीतील आहेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, काही सफाई कामगार कंत्राटी पध्दतीने व अनुकंपा तत्वावर काम करीत आहेत. या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ वेतनश्रेणी दिली जाते. सफाई कामगारांना कोणती नियमित वेतनश्रेणी दिली जाते आणि अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्यांना कनिष्ठ वेतनश्रेणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

NTK/ D/ ST/

ता.प्र.क्र.30914.... श्री.रामनाथ मोते...

दिली जाते म्हणजे किती वेतन दिले जाते, अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे असे यावरुन दिसत आहे. या सफाई कामगारांना, अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्यांना जीवन जगण्याचा अधिकार मिळाला आहे. त्यांना सफाई कर्मचाऱ्यांप्रमाणे किंवा इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी दिली जाणार आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : कनिष्ठ वेतनश्रेणीवरील, अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्यांसाठी पुढील काळात 5 वर्षांचा कालावधी कमी करुन 3 वर्षांचा करीत आहोत. त्यामुळे त्यांना आपोआपच 4180-13675 अशी नियमित वेतनश्रेणी लागू होणार आहे. सफाई कामगारांना कनिष्ठ वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. वारसा हक्काने 1, सरळ सेवेने 8 कर्मचारी कार्यरत आहेत त्यांना 4180-13675 अशी नियमित वेतनश्रेणी लागू आहे व कनिष्ठ वेतनश्रेणीतील सर्व कर्मचाऱ्यांचा करार 2-3 महिन्यामध्ये होणार आहे. हा करार झाल्यानंतर त्यांना नियमित वेतनश्रेणी लागू होणार आहे. या प्रकरणी युनियनचे पदाधिकारी हायकोर्टामध्ये गेलेले आहेत. हायकोर्टाचे निदेश आल्यानंतर करार केला जाणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कनिष्ठ वेतनश्रेणी 2270-3150 अशी आहे.

श्री. रमेश शेंडगे : एस.टी.महामंडळामध्ये वाहक, चालक यांची हजारो पदे रिक्त आहेत. ही पदे कधी भरण्यात येणार आहेत ? एस.टी.महामंडळामध्ये 200 कोटीचा घोटाळा झालेला असून महामंडळाचे अध्यक्ष म्हणतात की घोटाळा झालेला नाही. माननीय मंत्री महोदयांनी एका प्रश्नाच्या संदर्भात हा घोटाळा झालेला आहे असे उत्तर दिले होते. तेव्हा या घोटाळयाबाबत चौकशी केलेली आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर :चालक, वाहक, सहायक आणि इतर कर्मचारी अशा जवळपास 20000 कर्मचा-यांची भरती करावयाची आहे. भरती करण्यासंबंधीची कार्यवाही सुरु केलेली आहे. एमकेसीएल सारखी एजन्सी नेमून शासना मार्फत ही भरती केली जाते. अशा एजन्सीकडून अर्ज मागविलेले आहेत. योग्य त्या एजन्सीची निवड करुन भरती प्रक्रिया ताबडतोबीने सुरु करण्यात येणार आहे. 19769 कर्मचा-यांची भरती करण्यात येणार आहे. घोटाळयाच्या बाबतीत चौकशी चालू आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : प्रश्न असा आहे की, अनुकंपा तत्वावर ज्यांना सेवेमध्ये घेतले जाते त्यांना नियमित वेतनश्रेणीवर घेणे आवश्यक आहे. असे असताना या कर्मचा-यांना कनिष्ठ वेतनश्रेणीवर का घेण्यात आले, या कर्मचा-यांना नियमित वेतनश्रेणी देण्यात येईल काय ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, दोन-तीन महिन्यामध्ये करार करण्यात येणार असून कनिष्ठ वेतनश्रेणी काढून टाकण्यात येणार आहे. ही कनिष्ठ वेतनश्रेणी काढून टाकण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : कनिष्ठ वेतनश्रेणीच्या संदर्भात युनियन कोर्टामध्ये गेलेली आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : युनियन वेतनश्रेणीच्या संदर्भात कोर्टात गेलेली नाही.

श्री. गुलाबराव देवकर : यामध्ये दोन भाग आहेत. युनियनने मोठ्या प्रमाणावर मागण्या केलेल्या आहेत. त्यासंदर्भात विचार सुरु आहे. सर्व खात्याकडून माहिती संकलित करुन दोन-तीन महिन्यामध्ये त्या संबंधातील प्रक्रिया पूर्ण होईल यादृष्टीने आमचा प्रयन सुरु आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये युनियनच्या पदाधिका-यांनी हायकोर्टामध्ये अपील केलेले आहे. त्या प्रकरणाचाही निकाल लागणे आवश्यक आहे. कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी कमी केला पाहिजे हा आमचा विचार आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30914... श्री. गुलाबराव देवकर ..

त्यांना नियमित वेतनश्रेणी देण्याचा आमचा प्रयत्न राहाणार आहे.

श्री. भाई जगताप : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामुळे संभ्रम निर्माण झालेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ते दोन-तीन महिन्यामध्ये वेतनश्रेणीच्या बाबतीत निर्णय घेणार आहेत. त्याच वेळी त्यानी हेही सांगितले की हायकोर्टाचा निकाल लागणे आवश्यक आहे. कोणत्याही कर्मचा-याच्या युनियनचा दावा कोर्टात असला तरी सरकार आपल्या पातळीवर निर्णय घेऊन कोर्टाला तसे सांगू शकते. त्यामुळे शासनाने निर्णय घेण्याला हायकोर्टाच्या निर्णयाचा अडथळा नाही. तेव्हा हायकोर्टाच्या निर्णयाची प्रतीक्षा न करता वेतनश्रेणीबाबतचा घेतलेला निर्णय दोन-तीन महिन्यामध्ये अमलात आणला जाणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : होय.

श्री. संजय पाटील : एस.टी.महामंडळातील जवळपास 20000 कर्मचा-यांची भरती करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. ही रिक्त पदे भरण्यासाठी कुणामुळे विलंब झाला ? या विलंबास जबाबदार असणा-या अधिका-यांची किंवा पदाधिका-यांची चौकशी करण्यात येईल काय ?

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30194..

श्री. संजय पाटील...

माझा दुसरा प्रश्न आहे की, परिवहन विभागामध्ये महाव्यवस्थापक पदासाठी काही अधिकारी पात्र असताना देखील त्यांची जाणीवपूर्वक त्या पदावर नियुक्ती करण्यात येत नाही हे खरे आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, यामध्ये विलंब झालेला आहे. मी त्याबाबत सांगू इच्छितो की, ही प्रक्रिया फार मोठी आहे. यामध्ये चांगल्या एजन्सीची नियुक्ती झाली पाहिजे. मागील काळात थेट नोकर भरती संबंधी अनेक प्रकारच्या तक्रारी आल्या होत्या. तेव्हा चांगल्या एजन्सीमार्फत भरती प्रक्रिया करायची असा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार एजन्सीकडून अर्ज मागविलेले आहेत. त्या अर्जांच्या छाननीचे काम सुरु आहे. कोणत्या एजन्सीची निवड करावी या निष्कर्षाप्रत शासन आले आहे. तेव्हा या बाबत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी झालेल्या विलंबाबाबत चौकशी करण्यात येईल काय असा दुसरा प्रश्न विचारला. तेव्हा या प्रकरणी चौकशी केली जाईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो कारण त्यांनी दोन तीन महिन्यात कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. सर्वात कमी पगार या कामगारांना मिळत आहे. बऱ्याच ठिकाणी शाळेसाठी एस.टी.च्या गाड्या नाहीत कारण एस.टी.कडे वाहनचालकच नाही. माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, आपण सांगितल्याप्रमाणे दोन-तीन महिन्यात ही कार्यवाही पूर्ण होईल काय ? तसेच अन्य भरती प्रक्रिया देखील व्यवस्थितरित्या होईल काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, तीन महिन्यात कनिष्ठ वेतनश्रेणी संदर्भात निर्णय घेण्यात येईल. तसेच भरतीची प्रक्रिया सुध्दा तीन-चार महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

--------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## ठाणे महानगरपालिकेत मंजूर नसलेल्या पदावर मोठया प्रमाणावर नियुक्ती करुन करण्यात आलेला गैरव्यवहार

**(2) * 30396 श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.किरण पावसकर , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , ॲड. उषाताई दराडे , श्री.मोहन जोशी , श्री.उल्हास पवार , श्री. एस. क्यू. ज़मा** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे महानगरपालिकेत मंजूर नसलेल्या पदावर नियुक्त्या करुन गैरव्यवहार केल्याचे माहे मे, 2012 च्या तिसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) तसेच कार्यालयात 9 वर्षे सेवा होवूनही कर्मचाऱ्यांची जात पडताळणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रश्न भाग (1) व (2) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी आढळून आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

**श्री.भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) असे निदर्शनास आले नाही.

(2), (3) व (4) ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गात राखीव प्रवर्गातील पदांवर सरळसेवेने तसेच पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आलेल्या बहुतांश कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत.

ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत त्यांना नोटीसा बजावण्यात आलेल्या असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मुंबई शहराच्या लगतच ठाणे महानगरपालिका ही प्रति मुंबई आहे. ठाणे शहर मोठ्या गतीने विकसित होत आहे. ठाणे महानगरपालिकेच्या गैरकारभारासंबंधीच्या अनेक चर्चा जनतेमध्ये सुरु आहेत. ठाणे महानगरपालिकेतील अनेक गैरव्यवहार उघडकीस आले आहेत. ठाणे महानगरपालिकेमध्ये एक अधिकारी जात बदलून नऊ वर्षे काम करीत आहे. या नऊ वर्षात त्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही. श्री.श्याम थोरबोले असे त्या अधिकाऱ्याचे नाव असून ते "मराठा" म्हणून नोकरीत रुजू झाले. परंतु त्यांनी "धनगर" जात लावून पदोन्नती घेतली. श्री.श्याम थोरबोले यांना पदोन्नती मिळून नऊ वर्षे झालेली आहेत. परंतु त्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30396....

श्री.जयप्रकाश छाजेड..

पदोन्ती मिळाल्यानंतर अमुक दिवसांमध्ये किंवा महिन्यांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल अशा प्रकारचा निर्णय शासन घेणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, ठाणे महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागांमध्ये भ्रष्टाचार सुरु आहे. दारुचे दुकान असेल, सोन्याचे दुकान असेल, त्यांनी ऑक्ट्रॉय भरला नाही म्हणून नोटीस द्यायची आणि त्यानंतर दलालामार्फत मांडवली करायची असे प्रकार सुरु आहेत. तेव्हा अशा प्रकरणांची चौकशी शासन करणार आहे काय ?

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30396....

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी 2003 ते 2012 पर्यंत ज्या अधिकाऱ्यांची या संवर्गामध्ये आणि विविध कॅटेगरीमध्ये नियुक्ती करण्यात आली, त्यांची जात पडताळणी अद्यापपर्यंत करण्यात आली नाही अशा प्रकारचा पहिला प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, ही गोष्ट खरी आहे की, 2003 ते 2012 पर्यंत 99 वेगवेगळया संवर्गातील कर्मचाऱ्यांची ठाणे महानगरपालिकेकडे जात पडताळणी प्रमाणपत्रे उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात 2009 मध्ये शासनाने कायदा केला होता. जात पडताळणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांस त्या पदावर हजर करुन घेऊ नये. त्या नंतर 12 डिसेंबर, 2011 मध्ये शासनाने नवीन परिपत्रक काढून 6 महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र कर्मचाऱ्याने सादर करावे असे बंधन घालून दिलेले आहे. परंतु यामध्ये थोडीशी त्रुटी राहिलेली आहे. सहा महिन्यानंतर काय ? 2009 मध्ये वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यास सेवेत हजर करुन घेऊ नये असे शासनाने सांगितले होते. त्या नंतर 6 महिन्याच्या आत वैधता प्रमाणपत्र कर्मचा-याने सादर करावे असे बंधन शासनाने घालून दिलेले आहे. परंतु सहा महिन्या नंतर काय करावयाचे या संदर्भात स्पष्टपणे खुलासा नसल्यामुळे त्याचा थोडासा फायदा कर्मचारी आणि अधिकारी यांच्याकडून घेतला जातो आहे.

महोदय,या बाबतीत मी एवढेच सांगतो की, ज्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची 2003 पासून 2011 पर्यंत नेमणूक करण्यात आली आहे. त्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात तीन महिने एवढी अंतिम मुदत दिली जाईल, त्या दरम्यान त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर निश्चितपणे कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे, त्या बाबतीत सांगू इच्छितो की, जकात वसूल करणारे अधिकारी दारुच्या दुकानात, सोनाराच्या दुकानात जाऊन तेथे भेट देतात आणि या व्यापाऱ्यांबरोबर आतबट्ट्याचा व्यवहार करुन सेटलमेंट करतात. या बाबतीत सन्माननीय सदस्यांकडे स्पेसिफीक उदाहरणे असतील तर माझ्याकडे सादर करावीत. आपण स्पेसिफीक उदाहरणे दिली नाहीत तरी देखील ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे आपण केलेली सूचना अत्यंत योग्य शब्दामध्ये सूचित केली जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, 1995 मध्ये कर वसुली विभागात पदवीधर लिपिकांची सहा-सहा महिने अशी तात्पुरत्या स्वरुपात भरती केली होती. ठाणे महानगरपालिकेच्या आठ महासभांमध्ये या संदर्भात सर्वपक्षीय एक ठराव होऊनही त्यांना जानेवारी, 2008 ते 2010 या कालावधीत सहा-सहा महिन्यांपर्यत आदेशानुसार ठेवले होते. डिसेंबर, 2010 मध्ये सर्व नियम डावलून महानगरपालिकेने ऑनलाईन भरतीची प्रक्रिया सुरु केली. सदर पदवीधर लिपीक कर वसुली विभागात काम करीत होते. त्यांना कोर्टात जाण्याची वेळ आली. ते कर्मचारी इंडस्ट्रीयल कोर्टात गेले आहेत. इंडस्ट्रीयल कोर्टाने निर्णय दिला होता की, त्या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करावा. या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत घेण्यासंदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करावा या संदर्भात शासन महानगरपालिकेस आदेश देईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. ठाणे महानगरपालिकेने त्या कर्मचाऱ्यांना सहा-सहा महिन्याच्या मुदतीवर 1995 पासून कार्यसेवेत घेतले होते. नंतरच्या काळात त्यांना कायम स्वरुपी नेमणूका दिलेल्या नाहीत. सभागृहाला विदित आहे की, 1993 मधील उमादेवी प्रकरणाचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. तो निर्णय अत्यंत स्पष्ट आहे. तरी देखील इंडस्ट्रीयल कोर्टाने काय निर्णय दिलेला आहे, तो तपासून बघता येईल. त्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना सहानुभूती दाखविता आली तर तशी सहानुभूती दाखविली जाईल.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, त्या संदर्भात ऑर्डरची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे, ती प्रत आपणामार्फत मी माननीय मंत्री महोदयांना सादर करतो. ठाणे महानगरपालिकेत लिपीक संवर्गाची कायम स्वरुपाची आवश्यकता असतानाही कर वसुली आणि पाणी बील हे महत्वाचे विभाग आऊट सोर्सींग केलेले आहेत. त्या माध्यमातून काम चाललेले आहे. त्या संदर्भात शासनाने लक्ष घालावे अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

3...

ता.प्र.क्र.30396....

श्री.भास्कर जाधव : आपल्या मार्फत आलेल्या सदर ऑर्डरचे अवलोकन केले जाईल. महानगरपालिकेने आऊट सोर्सींग केलेले आहे. मला सांगितले पाहिजे की, त्या स्थानिक स्वराज्य संस्थेला विशेष करुन स्टॅन्डींग कमिटीला काही अधिकार आहेत, त्या अधिकाराचा वापर करुन त्यांना अशा प्रकारची सेवा उपलब्ध करुन घेण्याचा अधिकार आहे. पण भरती नियमबाह्य केलेली असेल तर ती तपासून, त्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

या नंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ ST/ पूर्वी श्री.गिते 11:20

ता.प्र.क्र.30396......

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, जातपडताळणी करुन घेण्यासाठी सहा महिन्यांची मुदत दिली जाते असे आता मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. परंतु त्यानंतर काय कार्यवाही केली जाते हे सांगितले नाही.परंतु असा नियम आहे की, सहा महिन्यांच्या आत उमेदवाराने जातपडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही तर ज्या उमेदवारांना जातीच्या प्रमाणपत्राचा आधार घेऊन नोकरीत घेतलेले असते त्यांचा जो मूळ प्रवर्ग आहे त्याच्यामध्ये टाकले जाते किंवा ती जागा रिक्त केली जाते. ज्या प्रवर्गाची जागा त्या अधिकाऱ्याने घेतली असेल म्हणजे धनगर समाजाची जागा असेल तर ती एनटी प्रवर्गात मोडते ती जागा रिक्त करुन एनटी(क) चा अधिकारी नियुक्त करावा लागेल. तसे करणार काय ? रोस्टर तपासून घेण्यासाठी विभागामार्फत अर्ज करावा लागतो. त्यातून कुठल्या प्रवर्गातील जागा भरावयाच्या आहेत हे समजते. तशा प्रकारचे रोस्टर चेकींग आपल्या विभागामार्फत केले आहे काय आणि केले नसेल तर शासन केव्हा करणार आहे ? मंत्रीमहोदयांनी सांगितले की, जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत दिली आहे. तीन महिन्यात प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांच्यावर काय कार्यवाही करणार ?

श्री.भास्कर जाधव :सभापती महोदय, मी पूर्वीच सांगितले आहे की, प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्यांची अंतिम मुदत दिली जाईल. त्यानंतर प्रमाणपत्र सादर केले नाही तर कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, नोकरीमध्ये लागण्यासाठी वेगळी जात आणि पदोन्नती घेण्याकरिता वेगळी जात अशा पध्दतीने कोणी फायदा घेतला आहे. अशा प्रकारचे विशिष्ट प्रकरण जर माननीय सदस्यांनी दाखवून दिले आणि जातीचा दुरुपयोग केला असेल तर कारवाई करण्यात येईल. परंतु 1995 नंतरचा तो कर्मचारी असला पाहिजे. कारण 1995 पूर्वीचे जे कर्मचारी आहेत त्यांना शासनाने नियमित केलेले आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ठाणे महापालिकेमध्ये भरतीच्या वेळी खोटे दाखले दाखवून जर कर्मचाऱ्यांची भरती केली असेल तर त्यांना कमी करण्यात येईल काय?भरतीच्या वेळी जातपडताळणी समितीकडून जर प्रमाणपत्राची वैधता ठरली नाही तर त्याच्यावर कारवाई करणार काय ? म्हणजे भविष्यात अशी खोटी प्रमाणपत्र दिली तर भरती होता कामा नये यादृष्टीने शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....2

ता.प्र.क्र.30396....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी यापूर्वीच स्पष्टपणे 1995 चे उदाहरण दिलेले आहे. 2009 चा शासनाचा कायदा आणि 2011 चा शासनाचा कायदा स्पष्ट आहे. ठाणे महानगरपालिकेमध्ये 2003 साली ही 75 पदे आरोग्य विभागामध्ये भरण्यात आली होती. आरोग्य विभाग पूर्णपणे बंद पडतो की काय अशी परिस्थिती उद्‌भवली होती म्हणून भरती करण्यात आली होती. एका विशिष्ट परिस्थितीमध्ये आकृतीबंधाच्या पलिकडे जाऊन ही पदे भरण्यात आली होती. त्यानंतर या पदांना शासनाची मान्यता घ्यायला हवी होती. ती उणीव राहिलेली आहे. पण गरज, व्यवहार आणि त्यामध्ये उणीव राहिली असेल तर अशा तीनही गोष्टींची सांगड शासनाकडून घातली जाईल.

-------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील महापालिकांच्या शाळांचा दर्जा सुधारावा याकरिता पालिकांनी खाजगी संस्थांची मदत घेतल्याच्या निर्णयाबाबत

**(३) * ३०३०६ श्री.किरण पावसकर , ॲड. उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महापालिका शाळांचा दर्जा सुधारावा याकरिता पालिकांनी खाजगी संस्थांची मदत घेण्याचा निर्णय माहे मे, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी व्हावी म्हणून शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भास्कर जाधव,श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) व (२) मुंबई व पुणे महानगरपालिका वगळता राज्यातील इतर महानगरपालिकांनी त्यांच्या शाळांचा दर्जा सुधारावा याबाबत खाजगी संस्थांची मदत घेण्याचा निर्णय मे, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान घेतलेला नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या शाळांच्या संचलन व व्यवस्थापनाकरिता खाजगी संस्थांच्या सहभाग/भागीदारीबाबतच्या धोरणास शिक्षण समितीच्या दि. २७/६/२०१२ रोजीच्या सभेत मंजुरी प्राप्त झाली असून शिक्षण समितीमार्फत सदर धोरण महानगरपालिकेच्या स्थायी समितीस सादर करण्यात आले आहे. सदर धोरणास स्थायी समिती व महानगरपालिकेची मंजूरी प्रतिक्षाधीन आहे.

पुणे महानगरपालिकेने दि. ३०/५/२०१२ रोजी वर्तमानपत्रात "गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रकल्प २०१२-२०१३" अशी जाहिरात देवून प्रस्ताव मागिवले होते आणि पुण्यातील नामांकित संस्थांनाही संपर्क केला होता. त्यानुसार आतापर्यंत केवळ चार संस्थांचे प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झाले असून आणखी नामांकित संस्था सहभागी होण्यासाठी अधिकाऱ्यांमार्फत सकारात्मक प्रतिसादासाठी सदर संस्थांना प्रत्यक्ष संपर्क सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, हा प्रश्न राज्यातील महानगरपालिकांच्या शाळांचा दर्जा सुधारण्याकरिता शासनाने खाजगी संस्थांची मदत घेण्याचा निर्णय झाला त्याबद्दलचा आहे. शाळांचा दर्जा राखण्यासाठी महानगरपालिका अपयशी ठरलेल्या असल्यामुळे खाजगी संस्थांची मदत घेण्याचा जो निर्णय घेतलेला आहे. यामधून स्पष्ट दिसत आहे की, या शाळांचे खाजगीकरण करावयाचे आहे. पालिका शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी मा. उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार माननीय न्यायमूर्ती श्री. डी.आर.धानुका यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाली. या समितीने टायटल चांगले दिलेले आहे. शब्दरचना चांगली केलेली आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता व शाळांचा दर्जा वाढविणे, शाळेचे व्यवस्थापन संस्थांच्या हातात असणार आहे हे शब्द ऐकण्यासाठी चांगले आहेत.

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु महापालिकेच्या या शाळा आहेत त्यांचे खाजगीकरण करण्याचे हे काम आहे. पुणे आणि मुंबईच्या ठिकाणी जागांच्या किंमती महाग असताना शाळांचे खाजगीकरण करुन काही प्रायव्हेट जागा एजन्सीना दिली जाणार आहे हे खरे आहे काय ? शाळांचा दुरुपयोग झाला आहे अशी पुष्कळ उदाहरणे आहेत. काही शाळांमध्ये काही पक्षांची कार्यालये आहेत. दादरची महानगरपालिकेची एक शाळा आहे तेथे सर्व पक्षांची कार्यालये आहेत. असा घाट घातला जात असेल तर मोक्याच्या जागा शासन फुकट घालविणार आहे काय ? दादर टी.टी.चे राजा शिवाजी हायस्कूल आहे तेथे लग्न आणि मुंजीचे कार्यक्रम करुन फी घेतली जाते. विद्यार्थ्यांकडून फी घेणार नाही असे त्यांनी सांगितले आहे. म्हणजे हा शाळांच्या खाजगीकरणाचा घाट घातला जात आहे.महानगरपालिका हॉस्पीटलचे खाजगीकरण करीत आहे आणि आता शाळांचे देखील खाजगीकरण करण्याचा घाट घातला जात आहे त्यामुळे येणारा विद्यार्थी बीओटी बेसिसवरचा बाहेर पडेल. खाजगीकरणाचा घाट घातला जात असेल तर दुसरीकडे विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा प्रश्न आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30306.......... श्री.किरण पावसकर.....

शिक्षकांचे जर खाजगीकरण झाले तर शिक्षकांना पगार कोण देणार? शिक्षकांना पगार देऊन या शाळा शासन चालविणार आहे का?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भातील धोरणाबद्दल सभागृहाला अवगत करणे महत्वाचे आहे असे मला वाटते. प्रश्नाच्या अनुषंगाने गैरसमज होणे स्वाभाविक आहे. परंतु या मागील भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व महापालिकांमध्ये अशा प्रकारचे धोरण ठरविले जात आहे का? असा प्रश्न होता. अशा प्रकारचे धोरण ठरविण्याचा निर्णय मुंबई आणि पुणे महापालिकेने स्वत: घेतला आहे. या मागील भावना अत्यंत स्पष्ट आहे.

सभापती महोदय, 2001 मध्ये श्री.यशवंत रामजी मेस्त्री यांच्याकडून महापालिकांच्या शाळातील शैक्षणिक दर्जा घसरत आहे याबद्दल एक पी.आय.एल. दाखल करण्यात आली होती. सेवानिवृत्त तत्कालीन शिक्षण सचिव श्रीमती कुमुद बन्सल यांच्या अध्यक्षतेखाली 2009 मध्ये एक समिती स्थापन केली होती. 2010 मध्ये त्या समितीने अहवाल सादर केला. त्या नंतर स्थायी समिती आणि शिक्षण क्षेत्रातील वेगवेगळ्या लोकांच्या चार-पाच बैठका झाल्या. दिनांक 30 एप्रिल, 2012 रोजी या संदर्भातील अंतिम धोरण निश्चित करण्यात आले. त्यानुसार कोणत्याही परिस्थितीत स्वत:च्या शाळा द्यायच्या नाहीत, इमारती द्यायच्या नाहीत, जागा द्यायची नाही, खाजगी शाळांना महापालिका जसे अनुदान देते तशा पध्दतीने काही अटी व शर्तीनुसार अनुदान द्यायचे असा निर्णय मुंबई आणि पुणे महापालिकेने घेतला. महापालिकांचे या संदर्भात नियंत्रण राहून अशा प्रकारच्या शैक्षणिक पध्दतीचा अवलंब करायला हरकत नाही असा निर्णय झाला. 2007 मध्ये अशा प्रकारे 4 शाळा पुणे महापालिका चालवित होती. आता यात आणखी दोन महापालिकांना शाळा चालविण्यास देण्यासाठी टेंडर कॉल केले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अत्यंत प्रभावीपणे उत्तर देत असताना चुकीच्या गोष्टीचे समर्थन इतक्या चांगल्याप्रकारे करु नये अशी माझी इच्छा आहे. खाजगी संस्थांचा सहभाग घ्यायला कोणाची ना नाही. महापालिकांकडे अतिशय चांगली यंत्रणा, चांगले शिक्षक असतानाही विद्यार्थी फिरकत नाहीत. याची कारणे वेगवेगळी आहेत. खाजगी संस्थांना शाळा चालविण्यास देण्याचा जो निर्णय मुंबई महापालिकेने घेतला त्यामध्ये प्रती शिक्षक 500 रुपये दररोज भत्ता दिला जाणार आहे. शाळा तुम्हीच चालवा, शिक्षक तुम्हीच नेमा असे ते





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30306.......... श्री.कपिल पाटील.....

धोरण आहे. त्यामुळे महापालिकेच्या सेवेतील शिक्षकांना निवृत्त केले जाऊन यापुढे कंत्राटी पध्दतीने शिक्षकांची भरती केली जाणार आहे. आज मुंबई महापालिकेच्या अनेक शाळा खाजगी संस्थांनी ताब्यात घेतल्या आहेत. अन एडेड कॉलेज खाजगी संस्था चालवित आहेत. महापालिकेच्या इमारती गरीब मुलांसाठी शाळा चालविण्यास अनुदानित तत्वावर दिल्या पाहिजेत. असे असताना विनाअनुदानित तत्वावर इमारती शाळा चालविण्यास दिल्या जात आहेत. फक्त मेन्टेनन्स महापालिका देणार आहे हे धोरण चुकीचे आहे. शिक्षकांवर महापालिकेचे नियंत्रण असले पाहिजे व व्यवस्थापन खाजगी संस्थांचे असले पाहिजे. यासाठी राज्य सरकार हस्तक्षेप करणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, काही शाळा खाजगी संस्थांना चालविण्यास दिल्या आहेत. महापालिकेच्या शाळेकडे विद्यार्थी फिरकत नाहीत, खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेतात हे स्वत: माननीय सदस्यांनी म्हटले आहे. खाजगी संस्थांकडे शाळा सोपविल्यानंतर महापालिकांच्या शाळा दर्जेदार होतील असा विश्वास आहे. माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, महापालिकेच्या सेवेतील शिक्षकांचे काय करणार? त्या शिक्षकांना महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात येईल, त्यांना निवृत्त केले जाणार नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मुंबई महापालिकेने यापूर्वीच आपल्या स्तरावर निर्णय घेऊन शाळा व कॉलेज खाजगी संस्थांना चालविण्यास दिलेल्या आहेत हे खरे आहे काय? या संदर्भात करार करताना कॉलेज चालविणाऱ्या खाजगी संस्थांनी लिहून दिले आहे की, मुंबई महापालिकेच्या शाळांमधून जी मुले दहावी उत्तीर्ण होतील, त्यांच्याकडून डोनेशन न घेता त्यांना कॉलेजमध्ये प्रवेश दिला जाईल.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ......... ता. प्र. क्र. 30306........

पण असे असताना एकाही मुलाला डोनेशन न घेता प्रवेश दिला जात नाही, याची माहिती शासनाला आहे काय, असल्यास त्यावर काय उपाययोजना करणार आहात ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, आज या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे डोनेशन घेतले जाणार नाही ही अट आहे व ज्याप्रमाणे महापालिकांच्या शाळांमध्ये शिक्षण दिले जाते त्यानुसार काही ठिकाणी अनुदान, काही ठिकाणी मुलांना गणवेश तर काही ठिकाणी आहार व कोणत्याही प्रकारचे डोनेशन न घेता प्रवेश अशीच पध्दत राहणार आहे, फक्त शाळेचे व्यवस्थापन बदलणार आहे.

--------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भारतीय संघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी इंदू मिलची जागा देण्याबाबत**

**(4) *30765 श्री.सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती अलका देसाई, श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामदास कदम, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्रीमती उषाताई दराडे, श्री.अरुण गुजराथी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.माणिकराव ठाकरे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई येथे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी दादरच्या इंदू मिलची जमीन देण्याबाबत दिनांक 25 एप्रिल, 2012 रोजी वा त्या सुमारास उच्च समितीची मुंबई येथे बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर बैठकीत इंदू मिलची जमीन लवकरात लवकर मिळण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय, असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(3) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) इंदू मिल नं.6 गिरणीची साडेबारा एकर जमीन डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी उपलब्ध करुन घेण्याच्या अनुषंगाने वस्त्रोद्योग विभाग, भारत सरकार यांनी दि.2/1/2012 रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये स्थापन केलेल्या उच्च स्तरीय समितीची बैठक नवी दिल्ली येथे दि.25/4/2012 रोजी संपन्न झाली आहे.

(2) होय.
इंदू मिलची जमीन लवकरात लवकर मिळण्याबाबत महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित स्मारकाच्या बांधकामाचे संकल्प नकाशे सादर करावेत, तसेच राज्य शासनाने व वस्त्रोद्योग विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने आणि विधी व न्याय मंत्रालयाने अभिप्राय सादर करावेत असे निर्णयाचे स्वरुप आहे.

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याबाबतचा प्रश्न गेल्या चार पाच वर्षांपासून सुरु आहे. लोकशाही आघाडी शासन सत्तेवर आल्यानंतर संयुक्त जाहीरनाम्यात सांगितले होते की, कोणत्याही परिस्थितीत हा प्रश्न उचलून धरला जाईल. पण या प्रश्नाला मात्र इंदू मिलची जागा स्मारकाला देण्याबाबत विचित्र स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. त्यात म्हटले आहे की, यासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन मंत्रालयाने व विधि व न्याय मंत्रालयाने अभिप्राय सादर करावेत असे म्हटले आहे. या माध्यमातून माझे स्पेसिफिक तीन प्रश्न आहेत. ते म्हणजे

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30765......... श्री.सुभाष चव्हाण........

आजपासून किती दिवसात शासन भारत सरकारकडून इंदू मिलची प्रस्तावित जागा ताब्यात घेणार आहे, या जागेच्या बदल्यात शासन केंद्र शासनाला कोणत्या स्वरुपात मोबदला देणार आहे आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यासंबंधी पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ व कार्यक्षम आयएएस अधिकारी, जो विभागीय आयुक्ताच्या दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी इंदू मिलची 12 एकर जागा वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून केंद्र शासन राज्य सरकारच्या ताब्यात देईल काय ? व त्यासाठी मोबदला काय देणार आहे ? असा प्रश्न विचारला. त्या अनुषंगाने मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, पहिल्यांदा ही जागा डी.सी.रुलमधील नोंदीनुसार सध्या आय-3 म्हणजेच इंडस्ट्रीअल झोनमध्ये दाखविलेली आहे ते झोन बदलण्यासाठी नियम 37 प्रमाणे प्रस्ताव तयार करावा लागेल. त्यानंतर त्याचे आरक्षण देता येईल व त्यासाठी डी.सी.रुल 91 लागू करावा लागेल, हे सर्व करण्यास शासन तयार आहे, महापालिका सुध्दा तयार आहे, कारण यासंबंधीचा ठराव सभागृहातच एकमुखाने पारित झालेला आहे. या जागेच्या मोबदल्यात आपल्याला टीडीआर द्यावा लागेल, त्यासाठी पहिल्यांदा झोन बदलण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल व असे झोन बदलल्यानंतर मात्र पुढील प्रश्न आपोआपच निकाली निघतील. या स्मारकाच्या जागेवर एकूण 25 टक्के एवढ्या क्षेत्रावर बांधकाम करावयाचे असून 75 टक्के जागा खुली ठेवावयाची आहे. त्याचबरोबर यासंदर्भात केंद्र शासनाने एक समिती नियुक्त केली असून त्या समितीच्या वतीनेच या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात येत आहे. या स्मारकाच्या संदर्भात शासनाच्या वतीने विविध व्यक्ती, विविध संघटना, विविध राजकीय पक्षांशी चर्चा केली जाईल व नंतर निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 30765.....

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य राष्ट्रीय स्मारक इंदू मिलच्या जागेमध्ये उभारण्यात यावे यासाठी सार्वभौम सभागृहाने निर्णय घेतलेला आहे व व्यासपीठावरून या निर्णयाला आपणही मान्यता दिलेली आहे त्यामुळे मी सभागृहाचे आणि आपलेही अभिनंदन करतो.

या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनीही पक्ष विरहित भूमिका घेतली होती. हा विषय केंद्रीय वस्त्रोद्योग खात्याच्या अखत्यारीतील असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पुढाकार घेऊन माननीय पंतप्रधानांसमवेत एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीमध्ये माननीय पंतप्रधान, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, वस्त्रोद्योग मंत्री, माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे, माननीय श्री. मुकुल वासनीक, माननीय गृहमंत्री, तसेच मी स्वत: या बैठकीला हजर होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक इंदू मिलमध्ये उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता एक महिन्याच्या आत पूर्ण करावी असा माननीय पंतप्रधांनानी निर्णय दिला होता. या बैठकीत असेही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक 30x30 फूटाच्या जागेमध्ये आहे. काही ठिकाणची स्मारके 50-50 एकरांमध्ये उभारण्यात आलेली आहेत परंतु त्या ठिकाणी वर्षाला 100 माणसे देखील जात नाहीत. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दर्शनासाठी लाखो पददलित समाज येत असतो. त्यामुळे इंदू मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी द्यावी व यासंदर्भातील कागदपत्रांची पूर्तता एक महिन्यात करावी असा माननीय पंतप्रधानांनी निर्णय घेतला असतांनाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी विलंब का लागतो आहे ?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जमीन देवाण घेवाणीच्या संदर्भात शासनाने अगोदरच निर्णय घेतलेला आहे. इंदूमिल मधील एफएसआय साऊथ मुंबईला वापरण्याच्या संदर्भात देखील निर्णय झालेला आहे. जागतिक दर्जाच्या आर्किटेक्ट कडून सदर आराखडा तयार करुन तो माननीय मुख्यमंत्र्यांना सादर केला होता. आराखडयात केवळ 5 टक्के जागा वापरली जाणार असून 95 टक्के जागा रिकामी ठेवली जाणार आहे हे पाहून माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा आश्चर्य व्यक्त केले होते. सर्व गोष्टी शासनाच्या नॉर्म्समध्ये बसत असतांना सुध्दा स्मारकाचा निर्णय जाणीवपूर्वक पुढे ढकलला जातो आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 30765.....

श्री. राम पंडागळे .....

दि. 14 एप्रिलला म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या दिवशी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री व आपल्या सर्वांच्या नेतृत्वाखाली इंदू मिलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भव्य स्मारक बनविण्याचा निर्णय घेतलेला असतांना सुध्दा हा निर्णय पुढे पुढे ढकलला जात आहे त्यामध्ये राजकारण आहे की, जाणीवपूर्वक हा निर्णय पुढे ढकलला जात आहे याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी विनंती करतो.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझ्या अगोदरच्या उत्तराकडे लक्ष दिले असते तर त्यांच्यावर हा प्रश्न उपस्थित करण्याची वेळ आली नसती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक इंदू मिलमध्ये उभारण्यासाठी जागा देण्याचा आता कोणताही मुद्दा राहिलेला नाही. यासंदर्भात माननीय पंतप्रधानांनी सांगितले असले तरी शेवटी नियमाप्रमाणे आपल्याला कागदपत्रांची पूर्तता करावी लागत असते. नियमांची पूर्तता करुन कागदपत्रे तयार केली जात असतात. या विषयाच्या संदर्भात केंद्र सरकारने एक समिती गठीत केली असून त्या समितीच्या दोन बैठकाही झालेल्या आहेत.

या विषयाच्या संदर्भातील कोणतीही बाब मी सभागृहापासून लपवलेली नाही. स्मारक उभे करण्यासाठी ज्या काही फॉर्मेलिटीज असतात त्या पूर्ण कराव्या लागतील हे मी सभागृहाला सांगितले आहे. हा विषय अत्यंत सेन्सेटीव्ह आहे. हा विषय भावनिक असला तरी संपूर्ण देशाचा आदराचा आहे. एवढे सांगूनही माझ्या उत्तराने सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नसेल तर आपण हा प्रश्न राखून ठेवला व माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून उत्तर घेतले तर त्याला माझी हरकत असण्याचे कारण राहणार नाही. स्मारकासंदर्भात शासन चालढकल करीत नसून गांभीर्याने, लवकरात लवकर निर्णय घेणार आहे. माझ्या माहिती प्रमाणे यामध्ये 1150 कोटी रुपयांचा विषय असून त्यामध्ये टीडीआरचा सुध्दा विषय आहे त्यामुळे हा विषय योग्य त्या पध्दतीमध्ये बसविण्याची कार्यवाही जलदगतीने सुरु असून एकदा स्ट्रक्चर ठरले तर त्याला गती देता येते एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30765....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे म्हणाले ते खरे आहे. यात राजकारण आहे. या राजकीय व्यवस्थेतील दुर्दैव हे आहे की, राजकीय इच्छाशक्ती असताना सुद्धा नोकरशहा कसा खो घालतात त्याचे मूर्तीमंत उदाहरण हे आहे. या सर्व बैठकांना मी विरोधी पक्ष नेता या नात्याने उपस्थित होतो. वस्त्रोद्योग सचिव व अन्य विभागाच्या सचिवांना माननीय पंतप्रधानांनी या विषयात दहा मिनिटांमध्ये क्लॅरिटी दिली. त्यांनतर राज्य शासनाने आपली मानसिकता दाखविली. ही जागा सीआरझेड मध्ये येत असल्यामुळे केंद्रीय वस्त्रोद्योग विभागला या जागेचा फायदा शून्य आहे. असे असताना आपण त्यांना 1150 कोटी रूपयांचा टीडीआर देऊन मेहरबानी करत आहोत. खरे म्हणजे पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी त्यांनी असे करता कामा नये. त्यांनी फुकटात जागा दिली पाहिजे. कारण एनटीसीने मुंबईतून खूप लूट केली आहे. तरी देखील आपण त्यांना हे स्मारक व्हावे म्हणून निधी देत आहोत. असे असताना राज्य शासन तेथे काय बांधणार ? अमुक उंचीचे बांधकाम करणार नाही, याचे स्पष्टीकरण राज्य सरकारने केंद्र शासनाच्या सचिवांना द्यायचे हा जो अविश्वास आहे तो या राज्याचा अवमान करणार आहे. आम्हाला पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे यांचे स्मारक बांधायचे आहे या विषयामध्ये सरकारने ठोस भूमिका घेतली पाहिजे. त्यासाठी आवश्यक त्या किमान गोष्टींची पूर्तता सरकार कधी करणारा आहे, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. परवाच आम्ही शिष्टमंडळ घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो त्यावेळी हे लगेच करू असे आश्वासन देण्यात आले होते. यात लोकांच्या भावना जुळल्या आहेत. त्यामुळे 15 दिवसात त्यांनी मागितलेला आराखडा आम्ही सादर करू असे शासनाने सांगितले पाहिजे. हे स्मारक झाल्यानंतर ही संपूर्ण जागा राज्य शासनाच्या ताब्यात राहणार आहे की, ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या ताब्यात राहणार आहे की, श्री.आनंद आंबेडकर, श्री.रामदास आठवले यांच्या ताब्यात असणार आहे ? यासंबंधीचा खुलासा देखील राज्य शासनाने करावा अशी मी विनंती करीत आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30765....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सुरूवातीला या स्मारकाचे बांधकाम एमएमआरडीने करावे असे ठरले होते. त्यानंतर पी.डब्ल्यू.डी.ने प्लॅन करावा असे ठरले. त्यानुसार पी.डब्ल्यू.डी.ने प्लॅन तयार केला आहे. त्यामध्ये इगतपुरी आणि गोराईच्या धर्तीवर विपश्यना हॉल, अभ्यासिका, ग्रंथालय, निवासी हॉस्टेल बांधायचे आहे, आच्छादित बैठका बांधायच्या आहेत. अशा प्रकारे वेगवेळे 12 युनिटस् तयार करायचे आहेत. तसेच तळघरामध्ये वाहन व्यवस्था करायची आहे. अशा प्रकारे प्राथमिक व्यवस्था असलेले ड्राईंग व प्लॅन तयार करण्यात आले आहे. या स्मारकासाठी शासन अनुकूल आहे. हे स्मारक ॲड.प्रकाश आंबेडकर, श्री.आनंद आंबेडकर, श्री.रामदास आठवले व शासन यापैकी कोणाकडे राहणार अशी विचारणा केली आहे. मला या संबंधी सांगावयाचे आहे की, घटनाकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारका बाबत आपण असे राजकारण करू नये. हे स्मारक झाले पाहिजे. हा विषय तापत ठेवायचा की निकालात काढायचा आहे ? या प्रश्नाला दोन्ही सभागृहाने मान्यता दिलेली असल्यामुळे त्यावर राजकारण करण्याची आवश्यकता नाही. शासनाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल आदर असल्यामुळे हे स्मारक लवकर उभे करायचे आहे.

......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती महानगरपालिकेच्या अभिन्यासाची प्रकरणे गैरकायदेशीर पध्दतीने मंजूर केल्यासंदर्भात करावयाची कारवाई**

**(5) * 30727 डॉ.रणजित पाटील , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.विनोद तावडे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) अमरावती महापालिका हद्दीतील 36 अभिन्यास प्रकरणे विकासकांनी गैरकायदेशीररित्या मंजूर करुन घेतली, त्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्तांनी नगरविकास विभागास माहे एप्रिल, 2012 मध्ये वा त्या दरम्यान सादर केला, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/विकासकांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(3) अद्याप, कारवाई केली नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरित** : (1), (2) व (3), पोलीस आयुक्त, अमरावती यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी व शफीक राजा मो.याकूब यांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करून प्रकरण नगरविकास विभागाशी संबंधित असल्याने या विभागाकडे रितसर फिर्याद देण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास्तव व विभागाचे मत कळविण्यास्तव चौकशी अहवालासह शासनास विनंती केली आहे. सदरच्या चौकशी करिता शासनाने दि.23/4/2012 च्या आदेशान्वये श्री.यु.पी.एस. मदान, उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांना चौकशी करण्यास्तव नियुक्त केले असून त्यांनी त्यांचा चौकशी अहवाल शासनास दि.12/7/2012 रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालाचे परिक्षण करण्यात येत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न प्रतिकात्मक आहे. 10 टक्के खुली जागा ही सार्वजनिक उपभोगासाठी असते. ती विकासकाने व संबंधित समुचित अधिकाऱ्याने संगनमताने कायद्याचा गैरफायदा घेत लाटली. त्यानंतर सदर जागा विकासकाने विकली आहे. असा अहवाल पोलीस आयुक्तांनी या विभागाकडे दिला आहे. तेव्हा अशा समुचित अधिकाऱ्यांवर शासन कठोर कारवाई करणार आहे काय ? या कायद्याचा गैरफायदा घेऊ नये म्हणून या कायद्यात शासन काही बदल करणार आहे काय ? मध्यमवर्गीयांनी आपली संगळी पुंजी लावून विकासकांकडून प्लॉट घेतले आहे. त्या प्लॉटच्या खरेदी विक्रीवर शासनाने बंदी घातली आहे. ती आपण उठविणार आहात काय ?

..3

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हे प्रकरण तिथल्या पोलीस अधीक्षकांच्या अहवालावरील नाही. यापूर्वीच एका लोकप्रतिनिधीने तक्रार केली होती. त्यानुसार माननीय मुख्यमंत्री महोदयांनी तेथील झालेल्या व्यवहाराला स्टे दिला व त्याची चौकशी संचालकांना करण्यास सांगितले. संचालकानी 4 ADTP ची नेमणूक केली. त्यांनी शासनाला अहवाल दिला. त्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे पुन्हा मदान समिती नेमण्यात आली. त्यांनी काही निष्कर्ष काढले आहेत. यासंबंधातील अंतिम अहवाल शासनाकडे आलेला आहे. भविष्यात अशा प्रकारे कोणत्याही प्रकारची कायद्यामधील पळवाट काढून चूक करू नये यासाठी कायद्यातील तरतुदीमध्ये स्पष्टता आणली जाईल.  ज्यांनी कोणी चूक केली असेल त्यांना जबाबदार धरले जाईल. यात जे कोणी नाहक अडकले आहेत त्यांची देखील यातून लवकर मुक्ता करण्याच्या दृष्टीने निर्णय घेतले जातील.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. अमरावती महानगरपालिका आयुक्तांनी 36 अभिन्यास नव्हे तर त्या पेक्षा जास्त अनधिकृत अभिन्यास मंजूर केले आहेत. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम आहे की, 40 गुंठ्याच्या आतील अभिन्यास मंजूर केला तर त्यासाठी ओपन स्पेस ॲमिनिटीज्‌साठी सोडावी लागत नाही. येथे एकेका विकासकाने 15-15 एकरचे लेआऊट पास केले आहेत. त्याला 16 डिव्हिजन पाडले व त्यामध्ये 10 टक्के ओपन स्पेस गिळंकृत केली. याबाबत अनेक लोकांनी तक्रार केल्यानंतर माननीय पोलीस आयुक्तांनी निवाडा दिला आहे की, यामध्ये गैरप्रकार झालेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टे दिल्यानंतर देखील हे प्रकरण जैसे थे आहे. या प्रकरणी अनेक तक्रारकर्ते हायकोर्टात गेले. The High Court has finally decided that the Amravati Municipal Corporation has done irregularities. After finding all the irregularities done by the Amravati Municipal Corporation, the Hon. High Court has also appointed one High Power Committee and ordered that the action should be taken against the Commissioner.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30727 ...

श्री.गोपीकिसन बाजोरिया...

सभापती महोदय, माझे दोनच प्रश्न माननीय मंत्रिमहोदयांना आहेत की, ते 36 अभिन्यास कोणाचे आहेत व ते आयुक्तांनी कोणत्या कायद्याखाली मंजूर केले आहेत ? श्री.यु.पी.एस.मदान यांनी सदरहू प्रकरणात कोणता अहवाल दिला व तो आयुक्तांच्या विरोधात असेल तर आपण आयुक्तांच्या विरूद्ध कारवाई करणार आहात काय ?

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/ST पूर्वी श्री.ओटवणेकर . . . . 11:45

ता.प्र.क्र.30727

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पहिली गोष्ट म्हणजे याठिकाणी केवळ 356 अभिन्यास नाही तर 182 अभिन्यास आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे संबंधित बिल्डर कोण-कोण आहेत असा प्रश्न विचारलेला आहे.श्री.प्रवीण मालू,श्री.सुभाष तलडा, श्री.गोपाळ पानलिया आणि श्री.अशोक सोहोनी हे संबंधित बिल्डर्स आहेत. आपण सांगितल्याप्रमाणे यु.पी.एस.मदान हे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक आहेत. त्यांच्या कमिटीने जी फायडींग्ज काढलेली आहेत, त्या अनुषंगाने जर यामध्ये कमिशनर दोषी असतील तर त्यांना जबाबदार धरणार काय असा प्रश्न विचारलेला आहे.त्यांची जी फायडींग्ज आहेत ती मी येथे सगळी सांगत नाही. परंतु त्यांची जी फायडींग्ज आहेत,त्यामध्ये खालच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरलेले आहे.माझ्या मतानुसार आणखी काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे.म्हणून या संदर्भातील निर्णय अंतिम टप्प्यामध्ये आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, जे अभिन्यास मंजूर झाले आहेत आणि त्यामध्ये ज्यांनी प्लॉट घेतले आहेत ते सर्वसाधारण लोकांचे प्लॉटस् आहेत. काही लोकांना घरे बांधावयाची आहेत तर काही लोकांना मुलींची लग्ने करण्यासाठी प्लॉटस् विकावयाचे आहेत तर काही जणांना मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्लॉटस् विकावयाचे आहेत. अशा लोकांना यासाठी परवानगी देणार आहात काय? जर अशा प्रकारची परवानगी दिली जाणार असेल तर ती कधी देणार? शासना मार्फत जी चौकशी सुरु आहे, ती होऊ द्या त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. परंतु यामुळे ज्या लोकांची अडचण होत आहे त्यातून लोकांना मोकळे करण्यात यावे. माझा प्रश्न असा आहे की, सदरहू प्लॉटस्च्या विक्रीसाठी कधी परवानगी देणार आहात ? याबाबतीत सब-रजिस्टार, नोंदणी कार्यालय यांना कधी कळविणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, कोणताही कायदा कोणाची अडचण, कोणाचे लग्न किंवा व्यक्ती डोळ्यासमोर ठेऊन तयार केला जात नाही. तरी देखील मी मघाशी सांगितल्याप्रमाणे संबंधितांतना लवकरच मोकळे करण्याच्या दृष्टीने यासंबंधातील निर्णय अंतिम टप्प्यामध्ये आहे.

-----

. . . .जे-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नाशिक येथे चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(६) *३१२५९ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांची जन्मभूमी त्र्यबंकेश्वर तर कर्मभूमी नाशिक येथे असल्याने फाळके यांचे स्मारक कोठे उभारण्यात येणार आहे,

(२) तसेच, त्यांचा जन्म त्र्यंबकेश्वर येथील पाच आळी भागात झाल्याने तेथेच त्यांचे स्मारक उभारावे अशी तेथील रहिवाश्यांची कित्येक वर्षापासूनची मागणी असून दर सहा महिन्यांनी नगरपालिकेकडे तशा प्रकारची विनंती तेथील सामाजिक संस्था करीत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दादासाहेब फाळके यांचे राष्ट्रीय स्मारक कोठे उभारण्याचा निर्णय घेतला आहे,

(४) तसेच त्या कामास केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (१), (२), (३), व (४) चित्रमहर्षी कै.दादासाहेब फाळके यांचा जन्म त्र्यंबकेश्वर येथे झालेला असल्याने त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तेथे भव्य स्मारक उभारण्याबाबत तेथील नागरिकांची जुनी मागणी नगरपरिषदेकडे आहे.त्यामुळे त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेच्या हद्दीतील गट क्र.३३८ या एकूण ४५ गुंठे क्षेत्रफळाच्या शासकीय जागेवर वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत कै.दादासाहेब फाळके यांचे स्मारक उभारण्यासाठीचा ठराव नगरपरिषदेने मंजूर केली असून सदर जागा नगरपरिषदेस मंजूर केला असून सदर जागा नगरपरिषदेस उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.

नाशिक महानगरपालिकेने नाशिक येथील त्रिरश्मी लेण्यांच्या पायथ्याशी असलेल्या पाथर्डी शिवारातील सर्वे. नं.286 व 287 मधील सुमारे 30 एकर जागेत कै.दादासाहेब फाळके यांचे भव्य स्मारक उभारले आहे.

शासन स्तरावरुन कै.दादासाहेब फाळके यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा निर्णय व्हावयाचा आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एका अर्थाने सगळया स्मारकांच्या बाबतीत जे प्रश्न असता, त्यामध्ये स्मारक कुठे आणि कसे करावे याबरोबरच त्याचे व्यवस्थापन कसे होणार या संदर्भात देखील प्रश्न निर्माण होतो.

यानंतर श्री.बरवड . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31259...... डॉ. नीलम गोऱ्हे....

यामध्ये आपण सकारात्मक उत्तर दिलेले आहे परंतु त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेने जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव कधी दिला आणि त्या प्रस्तावास इतका विलंब का लागला ? उत्तरात सांगितल्याप्रमाणे नाशिक महानगरपालिकेने जे स्मारक उभारले आहे त्याची आजची परिस्थिती पाहिली तर त्याचे व्यवस्थापन केवळ महानगरपालिकेच्या ताब्यात असणार आहे हे जसे खरे आहे तसेच ज्यांना या विषयात आस्था आहे, ज्यांना हे विषय समजून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी वेळ देणे शक्य आहे अशा समित्या नेमण्यासाठी महानगरपालिकेला प्रोत्साहित केले पाहिजे. नाशिक महानगरपालिकेचे हे जे स्मारक आहे त्या ठिकाणी मिनी थियेटरमध्ये सुविधा नाहीत. ओपन थियेटर बंद आहे. कला दालनामध्ये स्थानिक कलावंतांना वाव मिळत नाही अशा स्वरुपाच्या तक्रारी आहेत. नाशिकचे जे स्मारक आहे त्याचे योग्य पध्दतीने व्यवस्थापन व्हावे या दृष्टीने शासन काय कृतिशील पावले उचलणार आहे ?

सभापती महोदय, दादासाहेब फाळके यांचे स्मारक त्र्यंबकेश्वरमध्ये, नाशिकमध्ये आहे. मुंबईमध्ये चित्रनगरी आहे आणि मुंबई हे चित्रपट क्षेत्राचे केंद्र आहे. म्हणून चित्रनगरीमध्ये दादासाहेब फाळके यांचे स्मारक म्युझियमच्या रुपात उभारण्याच्या संदर्भात शासनाने काही निर्णय घेतला आहे का ? उत्तराच्या शेवटी असे म्हटले आहे की, शासन स्तरावरुन कै. दादासाहेब फाळके यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा निर्णय व्हावयाचा आहे. तो निर्णय करुन त्याचे स्वरुप चित्रनगरीशी संलग्न असेल अशा पध्दतीचा कार्यक्रम शासन हातामध्ये घेणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, यामध्ये दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. एक प्रश्न त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या संदर्भात आहे आणि दुसरा प्रश्न नाशिक महानगरपालिकेच्या संदर्भात आहे. त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचा या संदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे 4 मे, 2012 रोजी आला. 4 मे 2012 रोजी प्रस्ताव आल्यानंतर तो प्रस्ताव छाननीच्या पातळीवर आहे. त्याची लवकर छाननी करुन त्या संदर्भात अंतिम निर्णय घेतला जाईल.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न नाशिकमध्ये कै. दादासाहेब फाळके यांचे जे स्मारक आहे त्या संदर्भात विचारला. बऱ्याच वेळा आपण राष्ट्रपुरुषांची स्मारके उभी करतो आणि नंतरच्या काळामध्ये त्यांची जी देखरेख व्हावयास पाहिजे त्यामध्ये खूप हेळसांड होते अशाही काही गोष्टी

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षामध्ये आलेल्या आहेत. मुळातच तेथील महानगरपालिकेने हे स्मारक उभारले असल्यामुळे त्याला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा प्राप्त झालेला नाही. कारण ज्यावेळेला अशा प्रकारचे एखादे स्मारक राज्य शासन उभे करते त्या वेळेला त्याला तो दर्जा प्राप्त होतो. पण तो दर्जा कोणता आहे यावरुन त्याचे महत्व कमी होत नाही. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्याची देखभाल करणारी एक चांगल्या प्रकारची व्यवस्थापन समिती नेमावयाची का या संदर्भामध्ये या सदनाच्या सदस्यांना बोलवून किंवा त्या जिल्ह्यातील सदस्यांना तसेच महापालिकेच्या लोकांना बोलावून पीपीपी तत्वावर या संदर्भामध्ये व्यवस्थापन करता येईल का याचीही चौकशी केली जाईल. शासन स्तरावरुन कै. दादासाहेब फाळके यांचे स्मारक करण्याचा निर्णय अद्याप व्हावयाचा आहे. याचे कारण असे आहे की तशा प्रकारचे राष्ट्रीय स्मारक होण्याकरिता जो प्रस्ताव मूव्ह व्हावयास पाहिजे तो झालेला नाही. पण मला असे वाटते की, त्याच बैठकीमध्ये या संदर्भातील चर्चा सुध्दा करता येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, चित्रमहर्षी दादासाहेब फाळके हे आमच्या गावाचे म्हणजे नाशिकचे होते. चित्रपटसृष्टीची आता 100 वर्षे पूर्ण होत आहेत आणि त्या संदर्भातील कार्यक्रम सांस्कृतिक संचालनालयातर्फे मोठ्या प्रमाणावर घेण्याचे ठरविले आहे. दादासाहेब फाळके यांचे स्मारक ज्या पध्दतीने व्हावयास पाहिजे त्या पध्दतीबद्दल शासनाने गांभीर्याने काहीही विचार केलेला नाही हेच आपल्या या सर्व कृतीमधून स्पष्ट होते. महानगरपालिकेने नाशिकला त्रिरश्मीच्या पायथ्याशी दादासाहेब फाळके यांचे जे स्मारक उभे केले आहे त्यामध्ये दादासाहेब फाळके कोठे आहेत असा प्रश्न पडावा अशी त्या स्मारकाची अवस्था झालेली आहे. आपण त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या स्मारकाच्या बाबतीत सांगितले. त्र्यंबकेश्वर नगरपालिकेने जी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे ती फार छोटीशी आहे. मुळातच एखाद्या राष्ट्रीय स्मारकाचा विचार करताना त्या व्यक्तीच्या जन्मस्थानाच्या ठिकाणच्या स्मारकाच्या रचनेबद्दलचा काही मूलभूत विचार शासन करीत आहे असे कोठेही जाणवत नाही. आपण सत्तेवर असताना ज्या काही चांगल्या गोष्टी करतो, दीर्घकाळ टिकणाऱ्या, दीर्घकाळ स्मरणात राहणाऱ्या तसेच आमच्या सरकारने हे केले असे सांगण्यासारख्या ज्या गोष्टी असतात त्यामध्ये दादासाहेब फाळके स्मारक सर्वात महत्वाची गोष्ट आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31259... श्री.हेमंत टकले.....

हा शासन दिरंगाईचा प्रकार आहे. व्यवस्थापन समितीपुरता हा मर्यादित विषय नाही. म्हणून मूळ संकल्पनेचा पुनर्विचार करुन लोकांच्या दीर्घकालीन स्मरणात राहील व दादासाहेब फाळकेंचे स्मरण होईल अशा सर्व गोष्टींकडे बघून त्याची फेररचना करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेने केवळ 45 गुंठे जागा या स्मारकासाठी सुचविली आहे ती अतिशय अल्प आहे, हे खरे आहे. त्यामुळेच त्या स्तरावर प्रस्तावाची प्रक्रिया सुरु आहे. या स्मारकाची फेररचना करण्यासाठी मी मघाशीच असे उत्तर दिलेले आहे की, प्रश्नकर्त्यांसह त्या जिल्ह्यातील सदस्यांची बैठक बोलविली जाईल आणि त्यावेळी आपल्या मनातील जो काही प्रस्ताव असेल तो तडीस नेण्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या मनातील सुंदर स्मारक उभे करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.जयप्रकाश छाजेड : दादासाहेब फाळके यांचा जन्म त्र्यंबकेश्वर येथे झाला आणि नाशिक ही त्यांची कर्मभूमी आहे. मुंबईत चित्रनगरी उभी करण्यात आलेली आहे. सरकारने यापूर्वी दादासाहेब फाळके यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभे करणे गरजेचे होते. त्यामुळे यानंतरच्या काळात नाशिक व त्र्यंबकेश्वरच्या मध्ये एखादा आंतरराष्ट्रीय स्टुडिओ उभारुन दादासाहेब फाळके यांचे स्मारक उभे केले जाईल काय ?

श्री.भास्कर जाधव : मी मघाशी म्हटल्या प्रमाणे या संदर्भात जी बैठक होईल त्यावेळी सर्व प्रस्तावांवर एकत्रित चर्चा करुन सर्वानुमते निर्णय घेण्यात येईल.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ ST/ D/ D/

**दक्षिण मुंबई व दक्षिण-मध्य मुंबईतील जुन्या इमारतींवर दुप्पट मालमत्ता कर आकारल्याबाबत**

**(7) * 30148 श्रीमती विद्या चव्हाण , श्री.किरण पावसकर , ॲड. उषा दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.अरुण गुजराथी** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई महानगरपालिकेने मालमत्ता करात केलेली प्रचंड वाढ, दक्षिण मुंबई व दक्षिण मध्य मुंबईतील जुन्या इमारतींवर दुप्पट मालमत्ता कर लावण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, याठिकाणी सर्वसामान्य कुटुंबे मोठ्या प्रमाणात राहत असल्यामुळे व त्यांना ही कर वाढ झेपत नसल्यामुळे ही कर वाढ कमी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1), (2) व (3) बृहन्मुंबई महानगरपालिकेने भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता करप्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला असून नवीन करप्रणालीत कायद्यातील तरतुदीनुसार 500 चौ. फुट पर्यंत चटईक्षेत्र असलेल्या अस्तित्वातील निवासी मालमत्तांवरील मालमत्ता करात कोणतीही वाढ होणार नाही व सध्या देय असलेल्या मालमत्ता करा एवढाच कर पुढील पाच वर्षाकरिता राहणार आहे. तसेच 500 चौ.फुटांवरील निवासी मालमत्तांवरील कर नवीन प्रणालीत दुपटीहून अधिक होणार नाही. नवीन करप्रणालीत जुन्या मालमत्तांच्या मालमत्तेवरील वरीलप्रमाणे वाढ होत असली तरी कराची रक्कम नव्याने बांधण्यात आलेल्या समतुल्य मालमत्तांवरील करापेक्षा कमीच असणार आहे. मात्र दिनांक 01.04.2010 नंतर नव्याने बांधण्यात आलेल्या वा पुनर्विकसित झालेल्या रहिवासी इमारतीच्या बाबतीत नवीन कर प्रणालीत जी मालमत्ता कर आकारणी होणार आहे ती, जर जुनी कर पध्दत सुरु राहिली असती तर जो कर आकारला गेला असता त्यापेक्षा कमी कर आकारणी होणार आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "नवीन करप्रणालीत कायद्यातील तरतुदीनुसार 500 चौ.फूट पर्यंत चटईक्षेत्र असलेल्या अस्तित्वातील निवासी मालमत्तांवरील मालमत्ता करात कोणतीही वाढ होणार नाही. या करवाढीमुळे आमच्यासमोर अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता करामध्ये ही करवाढ होणार आहे. पण शेजारील नवी मुंबई शहर तसेच चेन्नई, कलकत्ता या शहरांपेक्षा ही करवाढ 25 टक्के अधिक आहे. मुंबईत अनेक

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यमवर्गीय लोक राहतात.  मुंबईत 500 चौ.फुटापासून 1500 चौ.फुटापर्यंत घरे आहेत. प्रत्येक सोसायटीला स्वतंत्र वॉचमन ठेवावा लागतो, त्यांना लिफ्टचा, साफसफाई कर्मचाऱ्यांचा खर्च असतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहरातील मध्यमवर्गीय रहिवाशांवर या करवाढीमुळे खूप मोठा आर्थिक बोजा पडणार आहे. मुंबई महानगरपालिकेतील अनेक नगरसेवकांनी या करवाढीला विरोध केलेला आहे.  त्यामुळे शासन यात हस्तक्षेप करुन ही करवाढ कमी करील काय, ही करवाढ प्रचंड असून मध्यमवर्गीयांवर अन्याय करणारी आहे. तसेच व्यवसायिक जागांबाबत तिपटीने करवाढ करण्यात आली आहे.  महानगरपालिकेच्या तिजोरीत पैसा कसा जमा होईल एवढेच पाहिले जाते. या करवाढीच्या माध्यमातून मध्यमवर्गीयांना ओरबडण्याचे काम चालू आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विद्याताई चव्हाण यांना मी विचारु इच्छितो की, आपल्याला प्रश्न विचारावयाचा नाही असे मी समजू का ?

श्रीमती विद्या चव्हाण : ही करवाढ रद्द करण्यासाठी शासन हस्तक्षेप करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, शासनाने यामध्ये हस्तक्षेप करण्याची काही आवश्यकता नाही. याचे कारण असे आहे की, या परिसरात 500 चौ.फुटाच्या आतील मालमत्तांवर कोणतीही करवाढ होणार नाही. ही करवाढ झाली तरी ती दुपटीपेक्षा अधिक असणार नाही. या परिसरात 500 चौ.फुटाच्या आतील 54 टक्के घरे आहेत. तेथील इमारतींचा दर्जा 19 टक्के आहे. म्हणजे 19 टक्के लोकांच्या घराच्या मालमत्ता करात वाढ होणार आहे आणि 27 टक्के मालमत्तांवरील कर कमी होणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

ता.प्र.क्र. 30148 श्री. भास्कर जाधव...

आपल्या विधान भवन इमारतीच्या बाजूला असलेल्या मेकर चेंबर्स या इमारतीला प्रति चौ.फू.47 पैसे कर आहे. तो कर 94 पैसे होणार आहे. नवीन इमारतींसाठी पूर्वी प्रति. चौ.फू. 12 ते 13 रु.या प्रमाणे कर घेतला जात होता तो आता 8 ते 9 रुपयापर्यन्त कमी घेतला जाणार आहे. 47 पैसे कर 94 पैसे झाला तर त्यामध्ये फार मोठी वाढ झाली अशातला भाग नाही. नवीन इमारतींना प्रति चौ.फू.जो 12 ते 13 रु. कर भरावा लागत होता तो 8 ते 9 रु. भरावा लागणार आहे. त्यामुळे सामान्य माणसावर कोणताही बोजा पडत नाही आणि तिजोरी भरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. किरण पावसकर : कराद्वारे महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये वाढ झाली पाहिजे याबद्दल दुमत नाही. काही विकासकांनी 1996 पासून महापालिकेचे 655 कोटी रुपये थकविलेले आहेत. विकास करताना विकासकाला 10 टक्के विकास शुल्क भरावे लागते. ओ.सी. मिळण्याच्या वेळी 90 टक्के रक्कम भरावी लागते. ज्या विकासकांनी 1996 पासून विकास शुल्क भरलेले नाही अशा विकासकांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे, तसेच त्यांच्याकडून 655 कोटी रुपये वसूल करण्यात येणार आहेत काय, विकास शुल्क न भरल्यामुळे त्यांच्या अन्य प्रकल्पांची मान्यता रद्द करण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : हा "मालमत्ता" कर आहे. विकासक "विकास" कर भरतात. 655 कोटी रु. थकलेले आहेत ही गोष्ट खरी आहे. विधानसभेमध्ये या संदर्भात चर्चा झालेली आहे. हे पैसे वसूल करण्याच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्यात येतील, अशा विकासकांना काळया यादीमध्ये देखील टाकण्याची कारवाई नगरविकास विभागामार्फत केली जाईल.

श्री. अरुण गुजराथी : 1.4.2010 नंतर ज्या इमारती पुनर्विकसित होतील त्या इमारतींना वाढीव कर लागणार नाही. नव्याने बांधकाम झालेल्या इमारतींच्या बाबतीत मालमत्ता कर मोठ्या प्रमाणात वाढणार आहे हे मंत्री महोदयांना माहीत आहे काय ? एनजीओ, चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संदर्भात महानगरपालिकेने सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. तसा विचार शासन करणार आहे काय ?

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

ता.प्र.क्र. 30148

श्री. भास्कर जाधव : नवीन इमारतींचा कर मोठया प्रमाणात वाढेल असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या संदर्भातील विधेयकाच्या बाबतीत संयुक्त समितीमध्ये क्लॉज बाय क्लॉज चर्चा झालेली आहे. या कराच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर गैरसमज आहेत. विधेयक अत्यंत पारदर्शी आहे. माझ्या घराला, सन्माननीय सदस्यांच्या घराला किती कर लागेल हे इमारतीचा दर्जा, वयोमान आणि झोन पाहून येथे बसून सांगता येईल एवढी पारदर्शकता हा कर लावण्याच्या संदर्भात ठेवलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे कोणतेही विधान अनुभवाशिवाय करणार नाहीत. मी त्यांच्याकडून समजून घेऊन तसे काही घडले असेल तर त्यामध्ये आपल्याला सुधारणा करता येईल.

श्री. दिवाकर रावते : दिनांक 1.4.2010नंतर नव्याने बांधण्यात आलेल्या वा पुनर्विकसित झालेल्या रहिवासी इमारतीच्या बाबतीत नवीन कर प्रणालीत जी मालमत्ता कर आकारणी होणार आहे ती जर जुनी कर पद्धत सुरु राहिली असती तर जो कर आकारला गेला असता त्यापेक्षा कमी कर आकारणी होणार आहे, असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. म्हाडाच्या बहुतेक इमारती ह्या 1.4.2010 पूर्वी बांधलेल्या आहेत आणि त्यांचे हस्तांतरण मात्र 1.4.2010नंतर झालेले आहे. तेव्हा 1.4.2010पूर्वी बांधलेल्या इमारतींच्या संदर्भात सवलत देण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यांच्या बुद्धीचातुर्याने मला अडचणीत टाकणारा प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, इमारत 1.4.2010 पूर्वी बांधलेली असेल आणि ती 1.4.2010 नंतर ट्रान्सफर झालेली असेल तर अशा इमारतीबाबत काय करणार ? तर ही बाब तपासून निर्णय घेतला जाईल.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30148...

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या संदर्भातील विधेयक चांगले होते. हे विधयेक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. त्या संयुक्त समितीमध्ये चर्चा झाल्यानंतर पुन्हा मी या ठिकाणी वक्तव्य करणे योग्य होणार नाही. परंतु त्यावेळीही समितीमध्ये चर्चा झाली होती की, पाच वर्षानंतर वाढ होणार आहे ती दुप्पटीपेक्षा जास्त नसावी. आपल्या डी.सी.रुलमध्ये बदल होत असतात. आपण आजचा विचार करतो. आपण पुढील 25 वर्षाचा विचार कुठे गेला आहे ? तेव्हा माझा प्रश्न आहे की, पाच वर्षाची मर्यादा दहा वर्षे करण्याबाबत सरकार धोरणात्मक निर्णय घेईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, दर पाच वर्षानी 40 टक्केपेक्षा जास्त वाढ नसेल अशी विधेयकात तरतूद आहे. या विधेयकामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांचे स्वत:चे कर कमी जास्त करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनी येथे समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत. त्यांनी आपल्या उत्तरामध्ये पारदर्शकता असा शब्द वापरला. 500 फुटाच्या आतील सदनिकांना कोणताही कर लागू होणार नाही असे त्यांनी येथे सांगितले. बिल्डर लोक कसे चातुर्याने काम करतात ते मी सांगतो. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर तसेच सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप उपस्थित आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा कोणताही बिल्डरचा व्यवसाय नाही.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, मी चांगल्या अर्थाने आपला उल्लेख केलेला आहे. आपणास या गोष्टींचा चांगला अनुभव आहे. 500 फुटाच्या आतील सदनिकांचे रजिस्ट्रेशन करताना पत्नीच्या नावे खरेदी दाखविली जाते तर त्याच्या बाजूची सदनिका पतीच्या नावे असते. म्हणजे एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींच्या नावे वेगवेगळी सदनिका दाखवून कर बुडविण्याचे प्रकार सुरु आहेत. अशा गोष्टींवर अंकुश ठेवण्यासाठी शासन कारवाई करणार आहे काय ? ज्या ज्या बिल्डर्सनी असे प्रकार केले आहेत त्यांच्याकडून हा कर वसूल केला जाणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30148...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, 500 फुटाच्या आतील सदनिकांवर कर आकारला जाणार नाही असे मी म्हटलेले नाही तर त्यांचा कर वाढणार नाही असे मी म्हटले आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन्माननीय सदस्यांसाठी प्रशिक्षण वर्ग घेण्याबाबत**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज पावसाळी अधिवेशन संस्थगित होत आहे. हिवाळी अधिवेशन सुरु होण्यापूर्वी सन्माननीय सदस्यांसाठी एक प्रशिक्षण वर्ग घ्यावा अशी माझी मागणी आहे. या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचनांवरील प्रश्न नेमक्या स्वरुपात कसे विचारावेत याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. आपण प्रश्न विचारण्या संदर्भात काही नियम बनविले पाहिजेत. तेव्हा माझ्या मागणीचा विचार व्हावा अशी आपणास विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**एकाच प्रश्नाची दोन वेगवेगळी उत्तरे दिल्यासंबधी पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. त्यांनी तो मांडावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक तीन वरील प्रश्न क्रमांक 30306 मध्ये लेखी उत्तरात ".. शाळांचा दर्जा सुधारावा या बाबत खाजगी संस्थांची मदत घेण्याच्या विचारात आाहोत."असे म्हटलेले आहे. तर याच प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 38 वरील प्रश्न क्रमांक 32027 या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, "सर्व शिक्षा अभियानांतर्गत विविध सोयी-सुविधा पुरविण्याकरिता महानगरपालिकांना देण्यात येणाऱ्या अनुदानातून तसेच महानगरपालिकांच्या स्वत:च्या निधीतून महानगरपालिकेच्या शाळेमध्ये आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे." एकीकडे शासन खाजगीकरणाबाबत विचार सुरु आहे असे सांगत आहे तर दुसरीकडे शासन आपल्या अनुदानातून सोयी-सुविधा देत आहे असे सांगत आहे. ही दोन्ही उत्तरे वेगवेगळी आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वाचून दाखविलेले उत्तर आणि मी दिलेले उत्तर यामध्ये विसंगती नाही. कारण सर्व शिक्षा अभियानांतर्गत येणारा निधी हा शाळांचा दर्जा सुधारावा यासाठी आहे. तसेच सर्व शाळांचे खाजगीकरण किंवा त्या खाजगी संस्थांकडे दिलेल्या नाहीत. तेव्हा त्या शाळांच्या दुरुस्तीची कामे महानगरपालिकेला करावी लागणार आहेत.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

त्याचे सगळे मेन्टेनन्सचे काम महानगरपालिकेकडे रहाणार आहे. फक्त व्यवस्थापन बदलणार आहे. व्यवस्थापन आणि सर्व शिक्षा अभियानातून आलेला निधी याचा दुरान्वयाने संबंध नाही.

-------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नवनिर्वाचित माननीय राष्ट्रपतींचे अभिनंदन**

पृ.शी.: श्री.प्रणव मुखर्जी यांची देशाच्या राष्ट्रपती पदी झालेली निवड याबाबत त्यांचे अभिनंदन

मु.शी.: श्री.प्रणव मुखर्जी यांची देशाच्या राष्ट्रपती पदी झालेली निवड यासंबंधी अभिनंदनाचा प्रस्ताव

**सभापती** : मी पुढील प्रस्ताव मांडतो.

"महामहिम श्री. प्रणव मुखर्जी यांची देशाच्या राष्ट्रपती पदी निवड झाल्याबद्दल हे सभागृह त्यांचे एकमताने अभिनंदन करीत आहे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री.राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " दिनांक 1 एप्रिल, 2011 ते 31 मार्च, 2012 या कालावधीत शासनाच्या वेगवेगळया विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेले कर्ज, कर्जरोखे व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

----------

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित),मुंबई यांचा सन 2002-2003 या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------------

श्री. राजेंद्र मुळक ( जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून ) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने वर्ष 2011-2012 मधील वितरित करण्यात आलेला निधी व मार्च, 2012 अखेर झालेल्या खर्चाबाबतचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** खर्चाबाबतचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

--------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,मुंबई यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,मुंबई यांचा सन 2010-2011 या वर्षाचा अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,मुंबई यांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षाचे जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे अहवाल एकत्र केले तर सिंचनासंबंधीची श्वेतपत्रिका तयार होते. हे अहवाल एकत्रित ठेवले तर श्वेतपत्रिका तयार होते. ते एका दिवसाचे काम आहे. सदर अहवाल रेकॉर्डवर आलेले आहेत. सदर अहवालात कोणत्याही प्रकारचे बदल आपल्याला करावयाचे नाहीत. माझी सूचना अशी आहे की, शासनाला श्वेतपत्रिका काढण्यास अतिशय सोपा मार्ग आहे. गेल्या दहा वर्षाचे अहवाल एकत्र करुन श्वेतपत्रिका काढावी.

**सभापती** : श्वेतपत्रिका सादर करण्याच्या अनुषंगाने काही पध्दती घालून दिलेल्या आहेत, त्याचे अवलोकन शासनाने करावे. त्याचे अवलोकन करीत असतान सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जी सूचना केली आहे, त्याचा सुध्दा विचार करावा.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, श्वेतपत्रिका काढण्यासंदर्भात शासन अत्यंत कटीबध्द आहे. माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांनी या संदर्भात स्वीकृती दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जी सूचना केली आहे, त्या सूचनेची दखल श्वेतपत्रिका तयार करीत असताना घेण्यात येईल.

**सभापती** : लेखा परीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------------

5..

श्रीमती फौजिया खान (महिला व बालविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन 2010-2011 या वर्षाचा छत्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----------

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: शासकीय ठरावावरील चर्चेत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे**

डॉ.विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 13 डिसेंबर, 2010 रोजी सभागृहात म.वि.प.नियम 106 अन्वये शासकीय ठराव संमत करतेवेळी झालेल्या चर्चेस उत्तर देताना मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

-----------

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ KTG/ 12:15

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : विधानपरिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची यादी सह सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : विधानपरिषदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

1) सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 14 - महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2011

2) सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती(सुधारणा) विधेयक, 2012

3) सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 10 - मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा)विधेयक,2012

4) सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 11 - महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक, 2012.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे**

**सभापती** : नियम 93 अन्वये सूचनांची 16 निवेदने आलेली आहेत ही 16 निवेदने मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली निवेदने येथे छापावीत )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत**

**सभापती** :आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी 5 व्या क्रमांकावरील त्यांनी दिलेली लक्षवेधी सूचना प्रथमत: चर्चेला घ्यावी अशी मला विनंती केली असल्यामुळे डॉ.दीपक सावंत यांची लक्षवेधी सूचना प्रथम घेण्यात येईल.

-----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : खाजगी शाळांमध्ये आर्थिकदृष्टया कमकुवत व दुर्बल घटकातील मुलांना 25 टक्के प्रवेशाचे बंधन न पाळणे

**मु. शी.** : खाजगी संस्थांच्या शाळांमध्ये आर्थिकदृष्टया कमकुवत व दुर्बल घटकातील मुलांना 25 टक्के प्रवेशाचे बंधन न पाळण्याबाबत डॉ.दीपक सावंत, सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे,भगवान साळुंखे,नागो पुंडलिक गाणार,भाई जगताप,सुभाष चव्हाण ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शिक्षण हक्क विधेयक २००९ मधील तरतुदीनुसार आर्थिकदृष्टया कमकुवत व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये प्रवेशासाठी २५ टक्के आरक्षण ठेवणे बंधनकारक असणे, यामुळे राज्यातील सुमारे ९५,००० ते ९८,००० हजार विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे अपेक्षित असताना खाजगी संस्थांनी शासन आदेश धुडकावून प्रवेशप्रक्रिया पूर्ण करणे, वेळोवेळी मुदत वाढवूनही खाजगी संस्थांनी २५ टक्के प्रवेशाचे बंधन न पाळणे, खाजगी संस्थांवर शासनाचा कोणताही अंकुश नसणे, गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय होणे, दोषी संस्थांविरुध्द शासनाने कोणतीही कारवाई न करणे, २५ टक्के आरक्षणाचा केवळ देखावा करणे, कायद्याची व शासननिर्णयाची अंमलबजावणी न होणे, परिणामी पालकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

श्रीमती फौजिया खान( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, शिक्षण हक्क विधेयक,2009 हे 2011 मध्ये प्रसिध्द झ
ााले. 25 मे रोजी कोर्टाच्या निर्णयानुसार अधिसूचना काढण्यात आली. या अधिसूचनेप्रमाणे 25 टक्के गरीब विद्यार्थ्यांना सर्व शाळांमध्ये प्रवेश राखून ठेवावा असे आदेश असताना त्याची अंमलबजावणी नीटपणाने झालेली नाही हे या लक्षवेधी सूचनेवरुन दिसत आहे. राज्यात सुमारे 95 ते 98 हजार विद्यार्थ्यांना या शाळांमधून प्रवेश अपेक्षित होता. परंतु तो तसा दिला गेला नाही. कारण या विद्यार्थ्यांपर्यंत अधिसूचनेची कॉपी पोहोचली नव्हती, शाळांच्या प्राचार्यांना माहीत नव्हते. वृत्तवाहिनीवर बातमी पाहिल्यानंतर पालक संबंधित ॲथॉरिटीकडे मुलांना प्रवेश घेण्यासाठी जात होते. परंतु त्यांना प्रवेश दिला जात नव्हता. कारण प्राचार्याना नेमका प्रवेश कोण देणार हे माहीत नव्हते. 67306 इतक्या विद्यार्थ्यांना प्रवेश उपलब्ध आहेत. महाराष्ट्रात एकूण ज्या शाळा आहेत त्यात खाजगी, अनुदानित, विनाअनुदानित, आयसीएसई, सीबीएसई, आयबी अशा प्रकारच्या जेवढया शाळात आहेत या सर्व शाळांमधून 25 टक्केप्रमाणे किती विद्यार्थ्यांना प्रवेश उपलब्ध होणार आहे ? याची आकडेवारी शासनाकडून मिळेल काय ? शासनाने जे परिपत्रक काढले होते ते लोकांपर्यंत पोहोचले नाही. ज्या अधिकाऱ्यावर ही जबाबदारी होती त्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार ? तसेच ज्या शाळांनी शासनाच्या नियमानुसार बालकांना प्रवेश दिला नाही त्या शाळांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5.........

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, राज्यात एकूण पात्र शाळांची संख्या 8487 असून प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची संख्या 2,09,111 इतकी आहे. त्यापैकी 67,306 विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला आहे. सुप्रीम कोर्टाचा एप्रिल, 2012 मध्ये जो निर्णय आला त्यानुसार वंचित घटक आणि दुर्बल घटक हे नोटिफिकेशन केल्यानंतर साधारणपणे प्रवेश संपलेले होते. आपल्याला फक्त पहिलीमध्ये प्रवेश द्यायचा आहे. या वर्षी याच्या संख्येमध्ये काही कमतरता दिसत असली तरी या वर्षानंतर मात्र काटेकोरपणे याची अंमलबजावणी करण्याचे काम होईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मोठ्या महानगरांमध्ये विविध बोर्डाच्या शाळा आहेत, त्या शाळा गरीब विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी 25 टक्के आरक्षण देण्याची सुतराम शक्यता नाही. त्यांनी पळवाटा शोधल्या आहेत. मुंबईमध्ये ज्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली, त्या धर्तीवर मोठया शहरामध्ये किंवा त्या त्या जिल्हयांमध्ये गरीब विद्यार्थ्यांचे शाळा प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याची जबाबदारी शासन स्वीकारणार आहे काय, याबाबत शासन हस्तक्षेप करणार आहे काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही सर्व प्रक्रिया कशी इम्प्रूव्ह करता येईल याबाबत शासन लक्ष घालेल. जे नियम केलेले आहेत त्यांचा अंमल सुरु केलेला आहे. माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे काटेकोरपणे ह्युमन पर्सन इण्डिपेण्डन्ट सिस्टीम करणे गरजेचे आहे. प्रत्येक शाळेमध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी लॉटरी काढण्यात येते त्यावेळी शासनाचे प्रतिनिधी उपस्थित राहतील आणि सर्टिफिकेशन मिळाल्यानंतर रिईम्बर्समेंट करण्याची प्रक्रिया होईल. या पध्दतीने शासन विचार करेल.

**सभापती** : ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची आहे. विशेषत: गोरगरीब, सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने हा विषय अतिशय महत्वाचा आहे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे या प्रश्नाबाबत चर्चा करण्याकरिता अधिक वेळ देणे शक्य होणार नाही. या प्रश्नाबाबत माननीय शिक्षणमंत्री यांच्या समवेत माझ्या दालनामध्ये एक बैठक घेण्याचे मी निश्चित केले आहे. माननीय सदस्यांच्या मनामध्ये या विषयाबाबत जे काही प्रश्न असतील त्या संदर्भात त्या बैठकीमध्ये सांगोपांग चर्चा करण्यात येईल. त्या बैठकीला माननीय शिक्षणमंत्री, माननीय शिक्षण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....... लक्षवेधी सूचना क्र.5.....

राज्यमंत्री आणि संबंधित सन्माननीय सदस्यांना बोलावण्यात येईल. गोरगरीब विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असून त्यांच्यावर अन्याय होता कामा नये अशी माझी भावना आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई शहरातील म्हाडाचे भूखंड राजकीय नेत्यांना नाममात्र दराने वाटप केल्याचे उघडकीस येणे

मु.शी.: मुंबई शहरातील म्हाडाचे भूखंड राजकीय नेत्यांना नाममात्र दराने वाटप केल्याचे उघडकीस येणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईत सर्वसामान्यांसाठी घरे बांधण्यासाठी मोठी जबाबदारी असलेल्या म्हाडाकडे घर बांधणीसाठी किरकोळ जमीन उरलेली असताना सन १९९९ ते २००२ या कालावधीत म्हाडाचे तब्बल ६७ भूखंड राजकीय नेते वा त्यांच्या सगेसोयऱ्यांच्या संस्थांना नाममात्र दरात वाटप केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, या भूखंड वाटपामुळे "म्हाडा" ला सुमारे २० हेक्टर जागेवर पाणी सोडावे लागणे, या प्रकरणी २००४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने देखील सदर भूखंड वाटप चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले असणे, सध्या म्हाडाकडे केवळ २०,००० स्क्वे.मिटर जागा उपलब्ध असणे, सर्वसामान्यांसाठी रास्त दरात घरे बांधण्याचा उद्देश साध्य करण्यासाठी अतिरिक्त भूखंडाची आवश्यकता असल्याने म्हाडा बाजारभावाने खाजगी जमीनी विकत घेत असल्याचे उघडकीस येणे, म्हाडाच्या सदनिकांचा दर वाढून म्हाडाची स्थापना करण्यामागचा उद्देश पराभूत होणे, परिणामी सर्वसामान्य मुंबईकरांमध्ये शासनाविषयी तीव्र संताप व चीड पसरणे, या भूखंड वाटपाची न्यायालयीन चौकशी करण्याची आवश्यकता, या सर्व भूखंडांचे वाटप रद्द करुन ते ताब्यात घेऊन त्याठिकाणी सामान्य माणसांसाठी घरे बांधण्याची नितांत आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1......

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रीमंडळाच्या उपसमितीच्या माध्यमातून म्हाडाचे भूखंड खिरापतीप्रमाणे वाटण्यात आले हे वास्तव आहे. ज्यावेळी आम्ही म्हाडाच्या पुनर्विकासाचा विषय सभागृहात उपस्थित केला आणि घर बांधणीबाबत जो नवीन कायदा अस्तित्वात आला त्यानंतर अधिकाऱ्यांच्या लक्षात आले की, घरबांधणी करण्यासाठी म्हाडाकडे भूखंड शिल्लक नाहीत. त्यामुळे जे भूखंड वाटले गेले ते विकासकांकडून परत घेतले पाहिजेत असा निर्णय घेण्यात आला. स्वत:कडे भूखंड नसल्यामुळे म्हाडा घरबांधणी कुठे करणार? वास्तविक उपलब्ध असलेल्या भूखंडांपैकी 2 टक्क्यापेक्षा जास्त भूखंड वाटता येत नाहीत असे बंधन असताना मागील काळात खिरापतीप्रमाणे भूखंडांचे वाटप करण्यात आले हे खरे आहे. निवेदनामध्ये मंत्री महोदयांनी 'असे दिसते' 'असे समजते' असे म्हटले आहे. म्हणजे मंत्री महोदयांना देखील खात्रीशीर वाटत नाही. गरीब लोकांसाठी स्वस्त दरातील किंवा परवडणारी घरे बांधावीत अशी सरकारची प्रामाणिक इच्छा आहे का?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ D/ पूर्वी श्री. भोगले....... 12:25

लक्षवेधी सूचना क्र. 1........ श्री. विनोद तावडे......

प्रश्न क्र. 2 ला दिलेल्या उत्तरात म्हटले आहे की, "सन 1989 ते 2003 या कालावधीत विहित प्रयोजनार्थ आरक्षित मुंबईतील 107 भूखंड संबंधित संस्था/लाभार्थींना वितरित करण्यात आल्याचे उपलब्ध दस्तऐवजावरुन दिसते", असे उत्तर दिले आहे. खरोखरच याबाबतीत "नरो वा-कुंज रोवा" अशी परिस्थिती आहे काय, म्हणून माझा प्रश्न आहे की, असे भूखंड ज्यांना दिले आणि त्यांनी ते बांधले असतील व त्याचा वापर योग्य प्रकारे होत असेल तर त्यांच्याकडून जी रक्कम म्हाडाकडे येणे आवश्यक असते ती घेणार आहे काय, इतर ज्यांनी भूखंड घेतले असतील व अजून ते कोणत्या तरी प्रकारे निगोशिएट करीत असतील भाड्यावर असतील असे भूखंड परत घ्यावेत कारण म्हाडाकडे आता भूखंडच शिल्लक नाही असे आपणच उत्तरात म्हटले आहे. दुसरीकडे मात्र लोक अक्षरशः चार चार वर्षांपासून भाड्याच्या घरात राहत आहेत आणि आपले स्वतःचे घर मिळेल असे स्वप्न पाहत आहेत, ते आपणच थांबवून ठेवले आहे. तसेच खालच्या सभागृहात आपण आताच उत्तर दिले की, यासंदर्भात जुलै महिन्यात बैठक घेण्यात येईल. वास्तविक अशा भूखंडांचे वाटप मंत्र्यांच्या बगलबच्च्यांना मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. मला कोणाचेही नावे घ्यावयाचे नाही पण मंत्री महोदयांनी त्यासंबंधीची यादी पटलावर जरुर ठेवावी. अशा प्रकारे खिरापतीसारखे वाटप केलेले भूखंड म्हाडा परत घेणार काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत मी आवर्जून सांगू इच्छितो की, मंत्रिमंडळाच्या उपसमितीने आपल्या अधिकारामध्ये असे भूखंड नियम 16 अन्वये वाटप करण्याचे काम केले व हे धोरण सन 1990 पासून आपण अंमल करीत आहोत. सन 1989 ते 2004 पर्यंत आपण याच धोरणाच अवलंब करीत होतो. कलम 16 खाली असे भूखंड वाटप करण्याचे काम केले पण माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे 1 टक्केच्या व्यतिरिक्त कोणतेही भूखंड वाटले गेले नाही अशी माझी माहिती आहे. त्याच्या व्यतिरिक्त शासनाच्या उप समितीकडे असे प्रस्ताव आले असतील तर निश्चितपणे ती बाब तपासून घेता येईल पण नियमाच्या व्यतिरिक्त भूखडांचे वाटप केलेले नाही ही बाब खरी आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, मंत्री महोदयांनी ज्या ठामपणे उत्तर दिले त्याचा अर्थ म्हाडाकडे भूखंड शिल्लक आहेत असा होतो. मग म्हाडाकडे जमीन शिल्लक नाही हे उत्तर खरे आहे की 2 टक्के भूखंडांचे वाटप झाले हे उत्तर खरे आहे ?

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : महोदय, हे 2 टक्क्याचे प्लॉट ॲक्युम्युलेटेड होतात. सन 1990 ते 2004 पर्यंत जेवढे भूखंड होते त्याच्या 2 टक्के प्लॉट ॲक्युम्युलेट होऊन त्यांचे वाटप केले आहे. सन 2004 नंतर मात्र कोणत्याही प्लॉटचे वाटप केलेले नाही. याचे कारण म्हणजे शासनाची मानसिकता आहे कलम 16 अन्वये शासन अधिक पारदर्शकपणे राहून पुढील काळात हे वितरण व्हावे यादृष्टीने ही बाब थांबविण्याचे काम केले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे काही लोकांना निश्चितपणे असे भूखंड वाटप करण्याचे काम केले पण त्यामागे शासनाचा केवळ सामाजिक दृष्ट्या उद्देश एवढाच होता पण त्यांच्याकडे काही थकित रक्कम असेल तर ती त्यांनी भरलीच पाहिजे, अन्यथा शासन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यास सक्षम आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, म्हाडाचे भूखंड दोन टक्क्यात किती संस्थांना दिले, त्या संस्थांची नावे काय आहेत, तसेच वैयक्तिक स्वरुपात किती लोकांना अशा भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे व त्यांच्याकडून किती रक्कम घेण्यात आली आहे ?

श्री. सचिन अहिर : महोदय, लक्षवेधी सूचनेच्या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांनी माहिती मागितलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे एकूण 107 भूखंडांचे वाटप आपण केले असून त्यातील 66 भूखंड निवासी, वाणिज्यिक स्वरुपासाठी 17 भूखंड आणि सुविधांच्या स्वरुपात उदा. शाळा, खेळाची मैदाने किंवा दवाखाने अशा कामांसाठी 13 असे हे 107 भूखंड ज्या संस्थांना दिले आहेत त्यांच्याशी चर्चा केली. त्यांची माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. तसेच या 107 भूखंडांची यादी व त्यातील संस्थांची नावे सुध्दा पटलावर ठेवण्यात येतील.

--------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KTG/ प्रथम श्री. खर्चे... 12:30

**पृ. शी.** :खेड-शिवापूर(जि.पुणे) येथील टोलनाक्यावर धमकी देऊन टोल वसूल करणे

**मु. शी.** : खेड-शिवापूर(जि.पुणे) येथील टोलनाक्यावर धमकी देऊन टोल वसूल करणे यासंबंधी सर्वश्री सर्वश्री. संजय पाटील, रमेश शेंडगे, विनायकराव मेटे, प्रकाश बिनसाळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण, हेमंत टकले, विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, ॲड. उषाताई दराडे, सर्वश्री राम पंडागळे, कपिल पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्ह्यातील खेड शिवापूरच्या टोल नाक्यावर टोल नाक्याचे मालक, व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांकडून अरेरावीने, धाकदपटशा करुन टोल वसुली करण्यात येणे, शासनाशी केलेल्या कराराप्रमाणे बंधनकारक असलेल्या सोई-सुविधा प्रवाशांना न मिळणे, सदर टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांकडून लोकप्रतिनिधींचा सुध्दा अवमान करण्यात येणे, टोल नाक्यावरील कर्मचारी स्वत:कडे घातक प्रकारची हत्यारे ठेवणे, ड्रेस न घालणे आणि टोल देताना खूप विलंब लावणे, त्यामुळे त्या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मनामध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, प्रसंगी तिथे होणारी हाणामारी, परिसरात अशांतता पसरण्याचा निर्माण झालेला धोका व दहशतीचे वातावरण, सदर टोल नाका रद्द करण्याची होत असलेली मागणी, तसेच सदरहू टोल नाक्यावर तसेच एकूणच राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत ज्यादा दराने टोल वसूल करण्यात येत असल्यामुळे त्याला आळा घालणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---

..2..

25-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) S-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, सभागृहातील माझ्या सारख्या सदस्याला मारहाण होऊन सुध्दा टोलनाक्यावरील गुंडगिरी थांबली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. अवैध पध्दतीने होणाऱ्या टोलमुळे जनतेला होत असलेला त्रास याविषयाच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना दिली असून या लक्षवेधी संबंधी शासनांकडून जे निवेदन आलेले आहे त्यामध्ये माझ्यावर जो प्रसंग घडला त्याबाबतीत काहीही उल्लेख दिसत नाही.

सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यासाठी येत असतांना खेड, शिवापूर या टोल नाक्यावर माझ्या गाडीच्या पुढे तेथील कर्मचारी आला व त्याने माझी गाडी थांबवली. माझ्या ड्रायव्हरने त्या कर्मचाऱ्याला सांगितले की, गाडीमध्ये आमदार साहेब बसलेले आहेत. परंतु तेथील कर्मचाऱ्याने माझ्या ड्रायव्हरशी अतिशय चुकीच्या पध्दतीने वर्तन केले, माझ्या ड्रायव्हरला मारहाण केली. ड्रायव्हरला मारहाण होत आहे हे पाहिल्यामुळे मी सुध्दा गाडीच्या खाली उतरलो परंतु मलाही मारहाण करण्यात आली. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये रेकॉर्ड झालेली आहे तसेच यासंदर्भात मोबाईलवर सुध्दा रेकॉर्डींग करण्यात आलेले आहे. सीसीटीव्हीवर सर्व रेकॉर्डींग असतांना सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न या विभागाकडून करण्यात येत असल्याचे दिसून येते. या सरकारची प्रतिमा मोठया उद्योगपतीच्या कंपनीशी असल्याचे दिसून येते. अवैध टोलमुळे सामान्य माणसांना त्रास होऊ नये यासाठी मी सदर लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. मला जी मारहाण झाली त्याबाबत मी संबंधित एस.पी. यांच्याशी 3 वेळा मोबाईलवरुन बोलल्यानंतर 25-30 मिनिटांनतर त्या ठिकाणी एक कॉन्स्टेबल पाठविला गेला, साधी फिर्याद नोंदवली गेली. माझ्या विरुध्द टोलनाक्यावरील कंत्राटदाराने दिलेली फिर्याद चार साडेचार वाजता फाडण्यात आली. टोल कंत्राटदाराने माझ्या विरुध्द कलम 147,148 ची फिर्याद नोंदवली होती. पोलीस खात्याचे ॲडिशनल एस.पी. श्री. पोकळे व त्या विभागाचे डीवायएसपी येऊन पोलीस इन्स्पेक्टरकडून फिर्याद लिहून घेतात व माझ्या कार्यकर्त्यांवर 307, 353, 323, 147, 148, 149 अशी कलमे लावली गेली. माझी आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या सभागृहातील सदस्याला मारहाण होऊन सुध्दा जर पोलीस विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग अशा पध्दतीने वागणार असेल तर ते योग्य राहणार नाही. त्यामुळे या प्रकरणामध्ये जे अधिकारी



अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. संजय पाटील....

गुंतले होते त्यांना सस्पेंड करण्यात यावे व सामान्य माणसांना दिलासा द्यावा व या सर्व प्रकरणाची चौकशी करुन पोलीस इन्स्पेक्टरवर कारवाई करावी अशी मी या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मागणी करतो.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना ही टोलच्या संदर्भात आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी गृह विभागाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सदर घटना ही पुणे-सातारा रस्त्यावरील खेड शिवापूरच्या टोल नाक्यावर घडली आहे. नॅशनल हायवे ॲथोरीटी ऑफ इंडिया हा केंद्र शासनाच्या अखत्यारीतील टोल नाका आहे. या टोलनाक्याच्या संदर्भातील सर्व अधिकार केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहेत. या रस्त्यावरील टोलचे काम रिलायन्स कंपनीला देण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांना त्या ठिकाणी मारहाण झाली ही वस्तुस्थिती आहे. या प्रकरणामध्ये पोलीस इन्स्पेक्टरने संबंधित 7 लोकांवर कलम 147, 148, 324, 504, 506, 447 अशी कलमे लावली होती. सन्माननीय सदस्यांना मारहाण झाल्यामुळे वातावरण तीव्र झाल्यामुळे कार्यकर्त्यांनी टोलनाक्याची तोडफोड केली.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे...

मारहाण झाल्यानंतर पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या लोकांवर केसेस दाखल केल्या आहेत. कोणत्याही आमदाराला मारहाण करता कामा नये. ही फार चुकीची गोष्ट आहे. सन्माननीय सदस्यांच्या कार्यकर्त्यांनी टोलनाक्यावर तोडफोड केल्यामुळे त्यांच्या विरूद्ध देखील कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे पोलिसांनी दोन्ही बाजूंकडील लोकांवर केसेस दाखल केल्या आहेत. यात पोलीस अधिकाऱ्यांची काहीही चूक नाही.

(दोन्ही बाजू कडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, हे उत्तर चुकीचे आहे. माननीय आमदारांना मारहाण कशी काय होऊ शकते ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांना ज्या दिवशी मारहाण झाली त्या दिवशीच संध्याकाळी सर्व प्रकरणाची माहिती मी तेथून जात असताना घेतली. ही लक्षवेधी सूचना सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना या सदनाची आहे. सदर लक्षवेधी सूचना आल्यानंतर सरकारने ती गांभीर्याने घेतली पाहिजे. माननीय मंत्री लक्षवेधी सूचना कोणत्या विभागाशी संबंधित आहे हे सांगत आहेत. या टोलनाक्यावरील अधिकृत कर्मचारी हे साधे असतात. तसेच ज्यांचे क्रिमिनल रेकॉर्ड आहे अशी माणसे टोलनाक्यावर दमबाजी करण्यासाठी असतात हे देखील वास्तव आहे. एवढेच नव्हे तर काही टोल नाके हे त्यांना हप्ते देत असतात. सामान्य माणसाने वारंवार तक्रार केल्यानंतर सुद्धा सरकारे त्याकडे डोळेझाक करते. याबाबत सरकार लाईटली का घेत आहे ? त्यामुळे या लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी माननीय गृह मंत्र्यांना ताबडतोब बोलवावे अशी मागणी या निमित्ताने आम्ही करीत आहोत. त्यांच्या समोरच ही लक्षवेधी सूचना चर्चेला गेली पाहिजे. ते जो पर्यंत येत नाही तो पर्यंत आम्ही ही लक्षवेधी सूचना होऊ देणार नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ...

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या महाविद्यालयांमध्ये पदांना मान्यता दिली त्यांना 2010 चा जो निकष लावला त्यावेळी जी काही पदे कार्यरत असतील आणि ज्या पदांना मंजुरी असेल त्या पदांना अनुदानासाठी आग्रह धरणार का ? 2010 चा विद्यार्थी संख्येचा निकष लावलेला आहे. या महाविद्यालयांमध्ये 154 पदे आहेत. त्या महाविद्यालयामध्ये त्यावेळी जे शिक्षक कार्यरत होते आणि जी पदे आपल्या सहसंचालकांनी मान्य केलेली आहे त्या पदांनाही शासन अनुदान देणार का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी जबाबदारीने सांगतो की, कोणताही कामचुकारपणा झालेला नाही. 154 महाविद्यालयांना मान्यता दिली आणि 261 पदांना मान्यता दिलेली आहे. कॅबिनेटने स्पेसिफिक 154 महाविद्यालयांना आणि 261 पदांना ऑक्टोबर, 2010 च्या विद्यार्थी संख्येनुसार ही मान्यता देण्यात आलेली आहे. मी माहिती सांगू इच्छितो की, एकूण 261 पैकी 24 ठिकाणी जी काही पदे भरलेली आहेत ती क्वालिफाईड आहेत. बाकी सर्व अनक्वॉलिफाईड आहेत. म्हणजे 237 अनक्वालिफाईड टिचर्स त्या ठिकाणी काम करतात. फक्त 24 टिचर्स क्वालिफाईड असल्यामुळे ते पात्र राहू शकतील. जर ती पदे विहित मार्गाने भरली गेली असतील तर या 24 टिचर्सनी तशा पध्दतीचे पुरावे त्यांनी सहसंचालकांकडे दाखल करावेत. त्यांना अॅप्रूव्हल देण्याचे काम सहसंचालकांच्या पातळीवर होऊ शकेल. सभापती महोदय, ज्या ठिकाणी नवीन पदे भरावयाची असतील त्याचे एनओसी घेणे अपेक्षित असते. 3 ठिकाणी संचालकांकडून एनओसी देण्यात आलेली आहे. उर्वरित ठिकाणी सुध्दा जेवढ्या काही एनओसीज देणे अपेक्षित असेल ती देण्यामध्ये शासनाची कोणतीही हरकत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला की, 2010 च्या विद्यार्थी संख्येवर जे शिक्षक काम करीत आहेत त्यांनाच अनुदान देणार का ? जे शिक्षक अटी आणि शर्तीमध्ये बसतात त्यांना अनुदान देणार. ते क्वॉलिफाईड असले पाहिजेत आणि विहित मार्गाने त्यांचे सिलेक्शन झाले असले पाहिजे. या दोन अटी आणि शर्ती जर ते पूर्ण करीत असतील तर त्यांना अनुदान देण्यामध्ये अजिबात अडचण नाही.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक सहा (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या 1 ते 264 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबड जोडलेली क्रमांक 1 ते 264 ही निवेदने कृपया छापावीत)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3....

RDB/ D/ KTG

**पृ.शी./मु.शी.** : लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. पद्‌माकर वळवी ( क्रीडा व युवक कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गुरुवार, दिनांक 12 जुलै, 2012 रोजी "राज्यातील क्रीडा संकुलांच्या देखभाल व दुरुस्ती" संदर्भातील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार 'महाराष्ट्रातील तालुका क्रीडा संकुलांबाबतची माहिती' सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक

**मु.शी.**: सन 2012 चे वि. प. वि. क्र. 7- महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7-स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासह विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके ठरविणे, दाननिधी निर्माण करणे यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी योग्य त्या तरतुदी करण्याकरिता विधेयक यावर विचार करण्यासाठी दिनांक 18 एप्रिल, 2012 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधान परिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त समितीकडे आहे आणि या अधिवेशनात हे विधेयक सभागृहासमोर आणावयाचे होते पण मंत्रालयाला आग लागल्यामुळे काही बैठका होऊ शकल्या नाहीत. पुढे काही बैठका घेण्याची आवश्यकता आहे त्यामुळे ही मुदत वाढवून द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करते.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : खेड-शिवापूर (जि.पुणे) येथील टोल नाक्यावर धमकी देऊन टोल वसुली करणे

**मु. शी.** : खेड-शिवापूर (जि.पुणे) येथील टोल नाक्यावर धमकी देऊन टोल वसुली करणे यासंबंधी सर्वश्री संजय पाटील रमेश शेंडगे, विनायकराव मेटे, प्रकाश बिनसाळे, अशोक उर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण, हेमंत टकले, विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, ॲड.उषा दराडे, सर्वश्री राम पंडागळे, कपिल पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( चर्चा पुढे सुरु... )

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर क्रमांक 2 वर दर्शविलेल्या लक्षवेधी सूचनेचा गृह विभागाशीही संबंध असल्यामुळे सन्माननीय गृह मंत्री सभागृहात येईपर्यंत सदरील लक्षवेधी सूचना मी मघाशी राखून ठेवली होती. आता सन्माननीय गृह मंत्री सभागृहात आलेले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेबाबत प्रश्न विचारावेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील सभागृहात उपस्थित आहेत. त्या दिवशी त्या टोल नाक्यावर जी घटना घडली होती त्यावेळी मी दुष्काळाच्या संदर्भात दौऱ्यावर होतो. मी त्या घटनेची स्वत: पाहणी केलेली आहे. हे जे टोल नाके आहेत तेथे काही लोक मुद्दाम टोल चुकवून जात असतात. त्यांना अडवून त्यांच्याकडून टोल वसूल करणे हे त्या कर्मचाऱ्यांचे काम असते. परंतु बऱ्याच टोल नाक्यांवर अधिकृत कर्मचारी नेमलेले नाहीत. त्याऐवजी गुंडांची टोळी हे काम करीत आहे. ते लोक टोल नाक्यावर गाडी आल्यावर गाडीवर आदळआपट करतात, लोकांना काठीने मारहाण करतात, गाडीतील महिलांना शिव्या देतात. सर्वसामान्य लोकांच्या बाबतीत हे सर्व प्रकार तेथे नेहमीच घडत आहेत. परंतु आता विधिमंडळाच्या एका सन्माननीय सदस्यांच्या बाबतीतही असे घडलेले आहे. ही घटना घडल्यानंतर शासनाने ही बाब गांभीर्याने घेतलेली नाही असे सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मत झाल्यामुळे सर्वांनी मिळून ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. सामान्य लोकांना हा अनुभव

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.विनोद तावडे....

येत आहेच, परंतु आता विधानपरिषदेच्या एका सन्माननीय सदस्यांनाही या अनुभवाला सामोरे जावे लागले आहे. ही वास्तविकता पाहिल्यानंतर गृह विभागाने ज्या गोष्टी करणे अपेक्षित होते त्या केल्याचे दिसत नाही. त्या ठिकाणी जी घटना घडली आहे त्याची जी प्रतिक्रिया उमटली आहे ती कायद्याला धरुन नसेल. त्यासाठी संबंधितांना शिक्षा झाली पाहिजे. सत्यासाठी त्यांनी आग्रह धरला आहे ते खरे आहे. परंतु टोल वसुलीसाठी गुंड ठेवण्यात आलेले आहेत. त्यांच्यावर मामुली स्वरुपाची कारवाई केल्याचे दिसत आहे. त्या टोलवरील गुंड लोकांना मारहाण करतात, आमदारांना मारहाण करतात. त्यांच्यावर कोणती सक्त कारवाई केली जाणार आहे आणि तेथील अधिकृत कर्मचारी वगळता जे गुंड टोल वसूल करीत आहेत, त्यांची गुन्हेगारी स्वरुपाची पार्श्वभूमी आहे असे रेकॉर्ड आहे. अशा लोकांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये जे टोल नाके आहेत त्यासाठी त्यांचे करार करणे, ते चालविण्यासाठी देणे, यासाठी आतापर्यंत गृह विभागाकडून कोणतीही हरकत घेतलेली नाही. हे टोल नाके सार्वजनिक बांधकाम विभागार्फत दिले जातात. सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांना जो अनुभव आला तशा प्रकारचे अनुभव अनेक टोल नाक्यांवर सर्वसामान्य माणसांना येत आहेत. आपल्या या मताशी मी 100 टक्के सहमत आहे. रस्त्यावरुन जाणारा सर्वसामान्य माणूस किंवा लोकप्रतिनिधी हे काही गुन्हेगार नाहीत. परंतु ते गुन्हेगार आहेत अशा आविर्भावात त्यांच्याशी वागणे, काठी हातात घेऊन अडविणे, गाडीतील एखाद्या माणसाला धमकावणे, गाडीत एखादी महिला किंवा मुलगी असेल तर गाडी अधिक वेळ थांबविली जाते अशाही तक्रारी काही कंत्राटदारांच्या संदर्भात आलेल्या आहेत. पण यासंबंधी तक्रार करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. या तक्रारींची मलाही माहिती आहे. पुढील काळासाठी राज्यात ज्यांना टोल नाके दिलेले आहेत. त्यांनी ज्यांच्यावर गुन्हेगारीच्या केसेस दाखल झालेल्या आहेत, अशा लोकांना कामावर घेऊ नये. कामावर ठेवताना व्हेरिफिकेशन करुन घ्यावे. गुन्हेगार नसलेल्या लोकांना कामावर घ्यावे, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना त्यांनी कामावर ठेवू नये आणि गुन्हेगार प्रवृत्तीचे जे लोक टोल वसूल करीत आहेत त्यांना तेथून कमी करण्यात यावे. अशा लोकांना त्यांनी कमी केले पाहिजे.

एमएमआरडीए किंवा अन्य टोल नाके असतील.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

सर्वच टोल नाके हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाहीत. एमएसआरडीसी असेल किंवा केन्द्र शासनाच्या एजन्सी असतील, त्यांना या संदर्भात सूचना दिल्या जातील. कुणी गुन्हेगारी केली, कुणी धाकदपटशा दाखविला तर अशा प्रकारे सामान्य माणसाला, लोकप्रतिनिधींना टोल नाक्यावर धमकावले जाणार नाही, धाकदपटशा दाखवला जाणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिका-यांना एक पत्रक काढून दिल्या जातील. सन्माननीय सदस्य श्री. संजय पाटील यांच्या बाबतीत जी घटना झाली त्याची चौकशी करण्यात येईल. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांवर केसेस दाखल झालेल्या आहेत. या प्रकरणी लावलेली कलमे योग्य लावलेली होती का, ती पुन्हा का कमी करण्यात आली याची चौकशी सीआयडी मधील आयजी लेव्हलच्या अधिका-याकडून करण्यात येईल. ती एक रिॲक्शन होती. विनाकारण कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झ ालेले असतील तर त्याची चौकशी करुन त्यासंबंधीचा रिपोर्ट आल्यानंतर त्यांच्यावरील गुन्हे परत घेण्याचा विचार शासन निश्चितपणे करील.

सभापती महोदय, अनेक टोल नाक्यावरचा अनुभव लोकांमध्ये नाराजी पसरविणारा आहे, राग आणणारा आहे. लोकप्रतिनिधींचा देखील मान ठेवला जात नाही. ज्यांच्यावर गुन्हे नोंद झालेले आहेत त्यांच्यावरील गुन्हे परत घेण्याची भूमिका घेतलेली नाही. या दाखल केलेल्या केसेस योग्य होत्या का ? टोल नाक्याचा मालकाला खूष करण्यासाठी केसेस दाखल केलेल्या होत्या का याचा तपास करण्यात येईल आणि त्यामध्ये जर अधिकारी दोषी आढळले तर त्यांच्यावर देखील, मग ते कोणत्याही स्तरावरचे अधिकारी असले तरी, कारवाई करण्याची भूमिका घेण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : माननीय मंत्री महोदयांनी अतिशय समर्पक शब्दामध्ये या प्रश्नाची दखल घेतलेली आहे. या बाबतीत निश्चितपणे कारवाई होईल असा मला विश्वास वाटतो. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती आणि वास्तवता पाहिली तर त्यांच्यावर पोलीस यंत्रणेला किती नियंत्रण ठेवता येणे शक्य आहे यासंबंधी देखील प्रश्नचिन्ह निर्माण होते. आजही त्या टोल नाक्यावर जे वातावरण असते त्याची चौकशी करुन त्या बाबतीत सन्माननीय मंत्री महोदय कारवाई करतील. परिस्थिती अशी आहे की, टोल नाक्यावर पाळया विकल्या जातात. जवळपासच्या कोणत्याही मुलांना तेथे कामासाठी ठेवले जाते आणि त्यांना एवढेच सांगितले जाते की टोल घेतल्या शिवाय गाडी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

सोडायची नाही. त्यामुळे त्यांच्या बाबतीत धड काही बोलता येत नाही आणि काही करता येत नाही. यामध्ये तेथील पोलीस यंत्रणा सामील झालेली आहे काय असा संशय काही वेळा येतो. तेव्हा ज्या भागामध्ये हे टोल नाके येतात त्या ठिकाणच्या संबंधित पोलीस अधिका-यांना, त्यांचे जे राऊंड घ्यायचे असतात त्यामध्ये या टोल नाक्यांचा समावेश करुन तेथे देखील राऊंड घेऊन तेथील परिस्थितीचा अहवाल वरिष्ठांना देण्यास सांगितले तर टोल नाक्यावर पोलिसांची देखरेख राहिल्यामुळे अशा गोष्टींना आळा बसू शकेल. तेव्हा या दृष्टीने मंत्री महोदयांना काही करता येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : टोल नाक्यावर जे नोकर नेमलेले असतात, जे कर्मचारी असतात त्यांची फोटोसह यादी ज्या विभागाने टेंडर दिलेले असेल त्या विभागाकडे असते. तशा प्रकारची एक यादी पोलिसांकडेही देण्याच्या सूचना देता येतील. टोल नाक्यावर जे कर्मचारी असतील त्यांचे व्हेरिफिकेशन करुन घ्यावे, ते गुन्हेगारी प्रवृत्तीचे होते का हे तपासून पहावे, या खेरीज दिलेल्या फोटो आणि यादी पेक्षा वेगळे कर्मचारी टोल नाक्यावर आले तर अशा लोकांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्यात येतील.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ ST/ D/ पूर्वी श्री.शिगम.. 13:00

श्री.आर.आर.पाटील...

टोल नाक्यांवर गुन्हेगारी प्रवृत्तींच्या लोकांना नेमता कामा नये.

सभापती महोदय, टोल नाक्यांच्या संदर्भात जसा प्रश्न आहे तसाच प्रश्न जकात नाक्यांच्या संदर्भात देखील आहे. जकात नाक्यांच्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये खूप गंभीर स्वरुपाच्या तक्रारी दाखल झालेल्या आहेत. फोनवर आलेल्या तक्रारी पोलिसांना कोर्टापर्यंत नेता येत नाहीत ही त्यांची अडचण आहे. आपल्यामागे पोलिसांचा ससेमिरा लागू नये म्हणून लोक अन्याय सहन करण्याची भूमिका घेतात. एखाद्याच ठिकाणी विचारणा होते. लोकसुध्दा अमुक एका टोल नाक्यावर अमुक अमुक प्रकार होत आहे असा फोन करुन निघून जातात. त्यामुळे पोलिसांना आवश्यक असणारी मदत आणि सहकार्य मिळत नाही. या पुढील काळात ज्या टोल नाक्याच्या संदर्भात फोनवरुन तक्रार येईल त्या बाबत तपासणी करण्यात येईल. स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांचे तेथे संबंध निर्माण झाले असल्याचे नाकारता येत नाही तेव्हा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात येईल. टोल नाक्यांवर गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक आहेत किंवा कसे, दिलेल्या यादीपेक्षा वेगळी माणसे आहेत काय याची अधून मधून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, टोल नाक्यावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तणूक होते आणि मग त्यांच्या बाबतीत तक्रारी येतात. बहुतांश टोल नाक्यावर सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावलेले आहेत. तेव्हा पोलिसांकडे एखादी तक्रार आली तर त्या वेळचे फुटेज पाहून पोलिसांना वस्तुस्थिती समजू शकते. तेव्हा अशा तक्रारींची दखल घेतल्यास सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चितपणे अवलंब करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी येथे सांगितले की, टोल नाक्यावर आजूबाजूच्या गावातील मुले असतात. मी प्रत्येक टोल नाक्यावर थांबून तेथे काम करणारे कर्मचारी कोणत्या भागातील आहेत अशी विचारणा करतो. ते कर्मचारी आजूबाजूच्या गावातील नसतील तर मग मी त्या ठेकेदाराशी भांडतो. महाराष्ट्रात निर्माण झालेला

..2..

श्री.दिवाकर रावते.....

रोजगार महाराष्ट्रातील लोकांना प्रथम मिळाला पाहिजे असा माझा आग्रह असतो. काही ठेकेदार आपल्या राज्यातील लोकांची वर्णी लावतात. त्यामुळे माझे त्यांच्याशी भांडण होते. तेव्हा माझी मागणी आहे की, टोल नाक्याचे ठेके देताना ठेकेदारांवर बंधन घातले पाहिजे की, त्यांनी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील उमेदवारांचीच नियुक्ती करावी. फक्त त्यांचा मॅनेजर त्यांनी आपल्या मर्जीतील ठेवावा. प्रत्येक जिल्ह्यांमध्ये बेरोजगारांची संख्या खूप मोठी आहे. तेव्हा त्या उमेदवारांना रोजगार मिळेल अशी माझी अपेक्षा आहे. या कामासाठी फार मोठ्या स्कीलची आवश्यकता नाही. फक्त पैसे घ्यायचे आणि द्यायचे एवढेच काम आहे आणि हे काम मराठी उमेदवारांना जमणार नाही असे मला वाटत नाही. वाटल्यास आपण त्यांना प्रशिक्षण द्यावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना ही माझ्या स्कोप बाहेरील आहे. या संदर्भातील निर्णय पोलीस विभाग किंवा गृह विभाग घेऊ शकत नाही. परंतु सन्माननीय सदस्यांच्या भावना संबंधितांना कळविण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, माझ्या स्कोपच्या बाहेरील विषय आहे. कोणतीही गोष्ट अंगाशी आली की सामुहिक जबाबदारी असे म्हणायचे नाही तर मग आमची जबाबदारी नाही असे सांगायचे. अशी दोन पक्षांची तू तू मै मै चालू आहे. मघाशी माननीय मंत्री महोदय म्हणाले की, कोणत्याही विभागाचा विषय असू दे आम्ही तो पाहू. ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार मिळावा अशी मी आपणास एक चांगली सूचना केली. तेव्हा आपण सांगितले की, मी हे करुन घेईन. सर्वांची बैठक घेईन...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी बैठक घेईन असे म्हटलेले नाही. आपण रेकॉर्ड काढून पहावा. संबंधित विभागाशी चर्चा केल्याशिवाय मला त्या बाबत उत्तर देणे शक्य नाही, ते माझ्या स्कोपच्या बाहेरचे आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना संबंधित विभागाला कळविण्यात येतील असे मी सांगितले आहे. उत्तराला हरकत घेताना पूर्ण उत्तर ऐकून हरकत घेतली पाहिजे. एखादा शब्द पाहून हरकत घेऊ नये.

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, टोल नाक्यावर गुंडगिरी करणाऱ्यांना थांबू देणार नाही. तसे आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. माझी अशी माहिती आहे रिलायन्स कंपनीने या कामाचा ठेका घेतला असून त्या कंपनीने सब-लीज दिली आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ D/ ST/ ST/ प्रथम श्री.अजित 13:05

श्री.संजय पाटील...

सातारा येथील श्री.मोझर नावाचे गुंड आहेत, त्यांच्यावर खुनाचे गुन्हे आहेत. अशा माणसाला ते दिलेले आहे. अशा माणसाचे सबलीज कॅन्सल करण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, कोणी कॉन्ट्रक्ट घेतला होता, कोणी सबलीज केले यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. चांगल्या कंपनीने सबलीज देऊन दुसऱ्या कंपनीला कॉन्ट्रक्ट दिला व त्याने गुंडगिरी केली तर त्या बाबतीत मूळ कंपनीची जबाबदारी संपत नाही अथवा कमी होत नाही. घडलेल्या प्रसंगाबाबतची माहिती संबंधित विभागास कळविण्यात येईल आणि त्या दृष्टीने कार्यवाही करावी असे देखील कळविण्यात येईल.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या टोल नाक्यावर जी मुले असतात, ती सेवायोजन कार्यालयातून घेतलेली असली पाहिजे अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी केली व त्या संदर्भात संबंधित विभागाला कळविण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. संबंधित विभागाला कळविल्यानंतर त्या विभागास काही अडचणी असू शकतात. मला या निमित्ताने मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, टोल नाक्यावर क्रिमिनल लोक ठेवून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. कंपनीकडून टोल नाक्यांवर कर्मचारी ठेवताना ते कर्मचारी क्रिमिनल नाहीत, त्याच्या विरुध्द कोणत्याही प्रकारच्या केसेस नाहीत, एवढी तरी माहिती घेतली जाईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, टोल नाके आणि राज्यातील शहरांमधील जकात नाके या दोन्ही ठिकाणी जे कर्मचारी ठेवलेले आहेत, तर त्या बाबतची माहिती घेण्याबाबत संबंधित विभागास कळविले जाईल व या दोन्ही ठिकाणी गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक ठेवू नयेत अशा सूचना देणे संदर्भात देखील संबंधित विभागास कळविण्यात येईल.

------------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई,मुलुंड येथील वनक्षेत्रातील रहिवाशांचे अडचणीच्या ठिकाणी करण्यात येणारे पुनर्वसन

**मु. शी.** : मुंबई,मुलुंड येथील वनक्षेत्रातील रहिवाशांचे अडचणीच्या ठिकाणी करण्यात येणारे पुनर्वसन यासंबंधी श्री.चरणसिंग सप्रा ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चरणसिंग सप्रा ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई, मुलुंड येथील वनक्षेत्र प्राधिकरणानुसार (संजय गांधी) उद्यानाचा उपभाग म्हणून घोषीत केलेल्या हनुमान पाडा-१, हनुमान पाडा-२, पंचशीलनगर, गणेशपाडा, राहुल नगर, शंकर टेकडी या भागातील रहिवाश्याचे या ठिकाणी ४० ते ३५ वर्षापासून वास्तव्य असून, या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकास कामासाठी बऱ्याच प्रकारचे निर्माण झालेले अडथळे, सदर विभागात शासनाकडून जारी करण्यात आलेली पुनर्वसन / हस्तांतरणाची नोटीस लावण्यात आलेली असणे, येथील रहिवाशांचे दूर अंतरावर पुनर्वसन करण्यात येणार असल्याने त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा व उपजीविकेच्या साधनावर विपरीत परिणाम होणार असणे, नवीन भागात स्थलांतर केल्याने वास्तव्याचा दाखला, रेशनकार्ड, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र इत्यादी सरकारी पुरावे बदलावे लागणार असून त्याचा बराच मन:स्ताप होणार असणे, सन १९९५ च्या पूर्वीचे वास्तव्याचे पुरावे असूनही ते गमावण्याची भीती निर्माण होणे, सन १९९५ नंतर खरेदी केलेल्या सदनिकाधारकांना वनक्षेत्र प्राधिकरणामध्ये मूल्यजमा करता न आल्याने त्यांना मूल्य भरण्यासाठी मुदतवाढ मिळण्याची आवश्यकता असणे, सदर वसाहतीतून १९७६ पासून केलेक्टर मार्फत कर वसूल होत असणे, सदरील रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मुलुंडमध्ये पब्लीक हाऊसिंगचे आरक्षण असलेल्या मोकळ्या भूखंडावर / जागेवरच पुनर्वसन करण्यात यावे अशी येथील रहिवाश्यांची आणि लोकप्रतिनिधीची शासनाकडे सतत होत असलेली मागणी, जनमानसात पसरलेली असंतोषाची भावना, त्यामुळे सदर रहिवाश्यांचे पुनर्वसन नियम ३३(१०) अंतर्गत मुलुंडमध्येच करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया".



ABG/ D/ D/ ST/ ST/ प्रथम श्री.अजित 13:05

श्री. भास्कर जाधव ( वने राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला शासनाकडून जे उत्तर देण्यात आलेले आहे अपूर्ण आहे ते असमाधानकारक आहे असे मला वाटते. मुलुंडमध्ये 3 हजारापेक्षा जास्त झोपडया वन खात्याच्या जमिनीवर आहेत. या 3 हजार झोपडीधारकांनी 7 हजार रुपये भरावयाचे होते, त्यातील 1500 झोपडीधारकांनी ते पैसे भरलेले आहेत. या ठिकाणी वन विभागाने काहीही डिमार्केशन केलेले नाही. सदर प्रकरण कोर्टात 1997 पासून चाललेले आहे. त्या ठिकाणी 10 एकर जागा डिसफॉरेस्ट झालेली आहे. त्या जागेचा देखील उल्लेख उत्तरात केलेला नाही. मुलुंडमध्ये अनेक जागा पब्लिक हाऊसिंग किंवा आयलॅन्ड सिटीची शिल्लक आहे. त्या ठिकाणी डी.सी.रुलच्या 33(10) च्या अनुषंगाने या रहिवाशांचे पुनर्वसन शासन करील काय या बाबतचे उत्तर आलेले नाही. या ठिकाणी राहणारे लोक खूप गरीब आहेत. ते बी.पी.एल.खालील आहेत. या ठिकाणच्या 3 हजार रहिवाशांपैकी 1500 रहिवाशांनी 7 हजार रुपये भरले आहेत, 1500 रहिवाशांनी अजून ते पैसे भरलेले नाहीत. उर्वरित 1500 रहिवाशांना पैसे भरण्यासंदर्भात मुदतवाढ देणार काय, या जागेवर वन विभागाने डिमार्केशन केलेले नाही. या बाबतीत वन विभागाची ड्रॉईंग घेऊन डिमार्केशनचे काम शासन महसूल विभागाकडून करुन घेण्यात येईल काय, या ठिकाणी 10 एकर जमीन डिफॉरेस्ट आहे. त्याचा सी.टी.एस.नंबर 1-बी असा आहे. या 10 एकर जागेमध्ये शासन एस.आर.ए.स्कीमच्या माध्यमातून या रहिवाशांचे पुनर्वसन करील काय, मुलुंडमध्ये पब्लिक हाऊसिंगची आणि ऑयलॅन्ड सिटीची जागा आहे, त्या ठिकाणी 33(10) अंतर्गत सदर 3 हजार रहिवाशांचे पुनर्वसन मुलुंड येथे शासन करील काय ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ ST/ 13:10

लक्षवेधी सूचना क्र.3.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात जानेवारी,1995 पूर्वीपासून ज्या अनधिकृत झोपडया बांधलेल्या आहेत त्यातील जानेवारी 1995 पर्यंतच्या झोपडया कायम करण्यात आलेल्याआहेत. पुनर्वसनप्राप्त झोपडीधारक आहेत त्यांच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आलेली आहे. संजय गांधी नॅशनल पार्कला अनन्यसाधारण महत्व आहे. येथील झोपडीधारकांना निष्कासित केल्यानंतर प्रकरण वेगवेगळया स्तरावर गेले. अगदी सुप्रीम कोर्टापर्यंत प्रकरण जाऊन आले. सुप्रीम कोर्टात गेल्यानंतर 2000 साली ज्यांची नोंद झाली अशापात्र झोपडीधारकांचा म्हणजे 12000 झोपडीधारकांचा सर्व्हे करण्यात आला. 2008 मध्ये 13350 झ ोपडीधारकांचा सर्व्हे करण्यात आला. अशा पध्दतीने एकूण 25000 पात्र झ ोपडीधारकांपैकी 3900 झोपडीधारकांना घरे दिलेली आहेत. आता 1700 घरे तयार आहेत. 1100 लोकांना घरे मिळणार आहेत.उर्वरित झोपडीधारकांना घरे देणे क्रमप्राप्त आहे. 10 एकर जागा ही वनविभागाची नाही तर त्याठिकाणी या झोपडीधारकांचे पुनर्वसन करणार काय असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे. याच भागामध्ये 1500 झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यासंदर्भातील विषय 33(10) अंतर्गत होणाऱ्या एसआरए योजनेतून खास बाब म्हणून शासन वेगळी जागा उपलब्ध करुन देते. झोपडीधारकांना झोपडपट्टीच्या जागेवरच 33(10) अंतर्गत त्याठिकाणी घरे दिली जातात. नॅशनल पार्क असल्यामुळे या संदर्भात पुनर्वसन केले जात नाही. परंतु या झोपडीधारकांचे याचठिकाणी पुनर्वसन व्हावे अशा प्रकारची भावना माननीय सदस्यांनी याठिकाणी व्यक्त केली आहे ती संबंधित विभागाला कळविली जाईल.

------

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, अधिवेशन सुरु असताना मला मेसेज आला आणि त्यात असे म्हटले आहे की,2055 साली पूरग्रस्तांसाठी 300 क्विंटल गहू आला होता तो गेवराई येथील गोदामात पडून आहे. अशा पध्दतीने गहू पडून असेल तर त्याची चौकशी करण्यात यावी या गव्हाची कशा प्रकारे विल्हेवाट लावायची ते शासनाने ठरवावे आणि त्यावर उपाययोजना करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करते.

-----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या पाच मोक्याच्या महामंडळावर गेल्या तीन वर्षापासून अनधिकृतरित्या असलेल्या अध्यक्षांच्या नियुक्त्या माननीय मुख्यमंत्री यांनी नुकत्याच रद्द केल्या आहेत. या सर्व महामंडळाचा कारभार कंपनी कायद्यानुसार चालतो. त्यानुसार अध्यक्षांचा कालावधी तीन वर्षाचा असतो. हा कालावधी संपल्यानंतर अध्यक्षांच्या नियुक्तीचा फेरविचार करता येतो. परंतु मुदतवाढ देता येत नाही. सामाजिक न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यांवर या महामंडळाच्या बेकायदा नियुक्त्या रद्द कराव्यात अशी मी आग्रही मागणी केली होती व या महामंडळ अध्यक्षांच्या बेकायदा नियुक्त्या रद्द केल्या आहेत त्याबद्दल मी शासनाचा आभारी आहे. 1. महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ 2) चर्मोद्योग विकास महामंडळ 3) विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ 4) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळ (ओबीसी) 5) अपंग विकास महामंडळ.

आपण सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प नियमित सादर करतो. सामाजिक समता वर्ष साजरे करीत आहोत. सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या या महामंडळाच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या त्वरित नियुक्त्या करुन पक्ष पदाधिकाऱ्यांना योग्य ती संधी द्यावी अशी कळकळीची विनंती मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

------

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 13:15

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, बेळगाव तरुण भारतच्या संपादकांना कर्नाटक विधानसभा अध्यक्षांनी त्या वृत्तपत्रावर बंदी घालण्याचे सूचित केले आहे, या घटनेची सभागृहाने दखल घ्यावी अशी मी विनंती करतो. बेळगाव तरुण भारत या वृत्तपत्राची मान्यता रद्द करावी, अशी शिफारस प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाकडे करण्याचा निर्णय कर्नाटक विधानसभेने घेतला आहे. अशा प्रकारे वृत्तपत्राच्या स्वातंत्र्याची गळचेपी होता कामा नये. याचा कन्सर्न सभागृहाने व्यक्त करावा, अशी विनंती आहे.

**सभापती** : सभागृहामध्ये माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उपस्थित आहेत. सभापती या नात्याने मी त्यांना सांगू इच्छितो की, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडल्या आहेत. विशेषत: कर्नाटक राज्याच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी ज्या काही सूचना दिलेल्या आहेत त्या संदर्भात गांभीर्याने विचार करुन योग्य व उचित कार्यवाही कशी करता येईल या दृष्टीने ही बाब तपासून घ्यावी.

श्री.राजेश टोपे : होय.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली भागात लेप्टोसदृश तापाने रविवार दिनांक 22 जुलै, 2012 रोजी फणसगांव येथील जयश्री जयवंत नारकर व तोंडवली येथील उत्तम श्रीधर मये या दोघांचा मृत्यू झाला असून गेली दहा वर्षापासून लेप्टोसदृश आजाराने अंदाजे 50 हून अधिक लोकांचे प्राण गेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयात लेप्टोसदृश आजारावर ताबा मिळविणे, आरोग्य विभाग निष्प्रभ ठरत असल्याने यावर आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना राबविणे अशक्य आहे. यासाठी चांगल्या प्रकारचे औषधोपचार, अत्याधुनिक साधनसामुगी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. लेप्टोसदृश आजार बळावू नये यासाठी सर्वतोपरी कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आरोग्यमंत्र्यांनी चांगले प्रयत्न केले. परंतु कणकवली ग्रामीण रुग्णालय आणि सामान्य रुग्णालय येथे डॉक्टरांच्या 14 पैकी 10 जागा रिक्त आहेत. 4 डॉक्टर नव्याने नेमले आहेत. इतर उपकरणांचा पुरवठा करणे गरजेचे आहे. गेल्या वर्षी 26 लोकांचा या आजाराने मृत्यू झाला होता. शासनाने याची दखल घेऊन रुग्णसंख्या वाढणार नाही याची दक्षता घ्यावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील सहागाव कोळी कृती समिती, अलिबाग मुरुड, ता.अलिबाग येथील 750 कुटुंबीयांकडून श्री.मंगेश भगत व सौ.पवित्रा भगत, रा.अलिबाग कस्टम बंदर हे सुकी मासळी खरेदी करुन व्यापार करीत होते.

श्री.मंगेश भगत यांनी खरेदी केलेली सुकी मासळी मुंबई येथील सीमनानी ड्रायफिश कंपनीचे मालक उस्मान बैदा व अशरफी ड्रायफिश कंपनीचे मालक सलीम बैदा यांना काही कमिशनवर विक्री करीत होते. या दोन्ही कंपनीच्या मालकांनी विकत घेतलेल्या मासळीची रक्कम श्री.मंगेश भगत यांना देण्याचे नाकारले आहे. विक्री केलेल्या सुक्या मासळीची जवळजवळ 3.50 कोटी रुपयांची रक्कम उस्मान बैदा व सलीम बैदा या मालकांनी देण्याचे नाकारल्यामुळे व मंगेश भगत यांना दमदाटी केल्यामुळे त्यांनी दिनांक 11.8.2010 रोजी विष प्राशन केल्याने त्यांचे दिनांक 17.8.2010 रोजी निधन झाले. सुक्या मासळीची रक्कम देण्याचे नाकारल्यामुळे या कोळी बांधवांवर उपासमारीची पाळी आलेली आहे. मी स्वत: आमदार या नात्याने दोन तीन वेळा संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली. या प्रकरणाचा तपास संथ गतीने सुरु आहे. या तपासाच्या कामाला गती यावी या दृष्टीने पोलिसांनी तातडीने कारवाई करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

------------

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, दि. 2 मे, 2012 च्या शासन निर्णयानुसार शासनाने पट पडताळणीच्या अनुषंगाने संबंधित शाळा, शिक्षक, व्यवस्थापक मंडळ यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा निर्णय घेणे, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल होणे, माननीय न्यायालयाने दि. 2 मे, 2012 रोजीच्या शासन निर्णयानुसार कारवाई करण्यास मनाई करुन स्थगिती देणे, शासनाने 4 जुलै, 2012 च्या शासन निर्णयानुसार पुन्हा कारवाई करण्याचे निर्देश देणे, माननीय न्यायालयाने पुन्हा दि. 4 जुलै, 2012 च्या आदेशास स्थगिती देणे, दरम्यान शिक्षक भरतीवर बंदी घालणे, हजारो पदे रिक्त असणे, शाळा सुरु असल्याने तूर्त 1 वर्षे अतिरिक्त ठरण्याची शक्यता नसणे, शिक्षक भरतीवरील बंदी रद्द करण्याची नितांत आवश्यकता असणे, शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे नुकसान होणे, शासनाने शिक्षकेतर भरतीवरील बंदी रद्द करुनही भरतीस परवानगी न मिळणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही.

--------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, महाराष्ट्र परीक्षा परिषद व शालेय शिक्षण विभागाच्या विशेष मोहिमेचा परिणाम म्हणून राज्यातील लाखो विद्यार्थी प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांना बसतात, त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारीही लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या संख्येत ही खुपच वाढ झाली आहे. शिक्षक वर्ग ही या कामी सातत्याने अतिरिक्त परिश्रमही घेत आहे. पालकांचा उत्साहही विलक्षण आहे असे असताना अनेक जिल्ह्यांमध्ये या शिष्यवृत्ती धारकांना अनुज्ञ ेय असलेली शिष्यवृत्ती 2-2 वर्षे पूर्ण झाले तरी अद्याप मिळालेली नसणे, त्यामुळे या शिष्यवृत्ती धारकांच्या मनात नैराश्याची भावना निर्माण होत असणे, काही ठिकाणी या रकमेचे अपहार झाल्याचे दिसून येणे, सारांश या औचित्याच्या मुद्दयाच्या आधारे मी शासनास अशी विनंती करतो की, शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेला निधी वेळेवर उपलब्ध करुन देणे, सदर रक्कम संबंधित लाभार्थ्यांपर्यंत पारदर्शक व तत्परतेने वितरित होणे, यासाठी आवश्यक ती उपाययोजना तातडीने करण्याची गरज आहे.

--------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मुंबई शहरात दरवर्षी रस्त्यांची कामे करण्यासाठी करोडे रुपये खर्च केले जात असून या खर्चात दरवर्षी वाढ होत आहे. सन 2010-11 मध्ये रु. 502 करोड, सन 2011-12 मध्ये रु.713 करोड आणि 2012-13 मध्ये रु. 1466 करोड यापैकी 980 कोटीच्या निविदा मागविण्यात येणार आहेत, परंतु जनतेचा एवढा पैसा खर्च करुन कामे निकृष्ट दर्जाची होत आहेत. यावर नियंत्रण ठेवून उत्तम दर्जाची कामे व्हावीत यासाठी महापालिका प्रशासनाच्या नियमामाध्ये महत्वपूर्ण बदल करण्याची आवश्यकता आहे. कंत्राटदाराकडून अतिरिक्त सुरक्षा ठेव अंदाज पत्रकीय किमतीच्या 10 टक्के घेण्यात येत होती, ती वाढवून किमान 20 टक्के करण्यात यावी. महापालिकेच्या रस्ते विभागात, रस्ते तपासणी करणारा कर्मचारी वर्ग अपुरा आहे तो कर्मचारी वर्ग वाढविण्यात यावा, डांबर रस्त्याच्या कामात दोष आढळल्यास कंत्राटदाराची जबाबदारी 3 वर्षांची आहे ती किमान 5 वर्षे करण्यात यावी. तसेच कॉंक्रीट रस्त्याची मर्यादा 5 वर्षाची आहे ती 10 वर्षे करण्यात यावी. मागील वर्षी ज्या कंत्राटदारांना कामे देण्यात आली आहेत त्यांच्या कामाच्या दर्जाचा फेरआढावा घेऊन दोषी कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करुन त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे. हा विषय अतिशय महत्वाचा व गंभीर असल्याने सदर विषय मी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहात उपस्थित करीत आहे.

----------

........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, गेली जवळपास दोन वर्षे शिक्षण हक्क समन्वय समिती आणि मराठी अभ्यास केंद्राच्या वतीने मराठी शाळांच्या मान्यतेच्या प्रश्नावर वारंवार आंदोलने चालू आहेत. दि. 16.7.2012 रोजीपासून पुण्यात शिक्षण संचालकांच्या कार्यालयापुढे सत्याग्रही बैठकीचे आयोजन केले आहे. 2005 आणि 2008 साली ज्या शाळांचे प्रस्ताव पाठविण्यात आले व आज ज्या शाळा चांगल्या स्थितीत चालू आहेत अशा जवळपास 100 शाळातील 12 हजाराहून अधिक विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे. इंग्रजी माध्यमातल्या शाळांच्या दुकानदारीला शासन सरसकट प्रोत्साहन देत असताना प्रामाणिकपणे मराठी शाळा चालविणाऱ्यांना धमक्यांची पत्रे पाठविणे, तुरुंगवास घडविणे असे प्रकार सुरु असणे, याबाबत शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा यांनी एप्रिल, 2011 मध्ये उपोषणाच्या वेळी 19 जून, 2010 च्या अन्याय परिपत्रकांमुळे या शाळांवर कारवाई होत आहे ती स्थगित करण्यात येईल, बृहत आराखडा तयार करताना मान्यतेच्या प्रतिक्षेत असलेल्या या शाळांपैकी जास्तीत शाळांचा समावेश केला जाईल. तसेच स्वयं अर्थसहाय्यित शाळांसाठीचे एक विधेयक विधिमंडळाकडे मांडले जाईल, असे आश्वासन देऊनही कोणतीच कार्यवाही अद्यापपर्यंत झालेली नाही. केवळ मराठी शाळांवरच नाही तर राज्यात मराठी भाषेचीही गळचेपी शासन करीत आहे. उदा. राज्य मराठी विकास संस्था या संस्थेत संचालक पद रिक्त असून गेल्या तीन वर्षांपासून प्रभारी संचालक कारभार सांभाळत असल्याने कोणतेही उल्लेखनीय कार्य झाले नाही. तसेच भाषा संचालनालयामध्ये भाषा संचालक पद रिक्त असून सदरहू पद हे एमपीएससी तर्फे भरण्यात येत असून त्यांची प्रक्रिया अत्यंत मंद गतीने असल्याने सदरहू पद अद्यापपर्यंत भरण्यात आले नाही. त्याचबरोबर मराठी विश्वकोष यांचा कारभार डॉ. विजया वाड पाहत असून त्यांची दुसरी टर्म चालू असून त्यांच्या जागी नवीन व्यक्ती नियुक्त करण्याकरिता शासनाकडे तत्सम शिक्षणाची कोणीही व्यक्ती नाही. या सर्व बाबींचा विचार केला असता राज्य शासनाकडून मराठी भाषेची चाललेली अवहेलना सर्वसामान्य जनतेच्या लक्षात येत असून मराठी भाषिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. याकरिता शासनाने एकूणच मराठी भाषेबाबत आस्था दाखविण्याची आवश्यकता असल्याने हा मुद्दा मी औचित्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे.

-----

...5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बोगस दाखला देणारी टोळी सक्रिय असून या टोळीने हजारो बोगस दाखल्यांचे वाटप केले आहे. बंडगार्डन पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणी दोन एजंटना चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. आरोपींनी गुन्ह्याची कबुलीही दिली आहे, परंतु महसूल विभागाने या प्रकरणी फिर्यादच दिली नसल्यामुळे पुढे काहीही कारवाई झालेली नाही. पोलिसांनी महसूल यंत्रणेला माहिती देऊन फिर्याद दाखल करण्यास सांगूनही महसूल यंत्रणेने अद्याप फिर्याद दाखल केलेली नाही. महसूल यंत्रणेने पोलिसांना लेखी पत्र मागितले त्यानुसार एका फौजदाराने स्वत: जाऊन तसे पत्र देऊनही तहसीलदारांकडून पोलिसांना पत्र टपालाने पाठविण्यास सांगण्यात येणे, नागरी सुविधा केंद्रामध्ये अनागोंदी पसरलेली आहे. मागील वर्षी एस.एम. कॉम्प्युटर एजन्सीला दिलेले काम यावेळी नवीन एजन्सीला दिले असले तरी कर्मचारी तेच असल्यामुळे बोगस दाखले देणाऱ्या टोळीचा शोध घेणे सोपे असूनही अद्यापपर्यंत मागील दोन वर्षांपासून सक्रिय असलेल्या बोगस दाखले देणाऱ्या टोळीवर पोलिसांनी महसूल विभागाने कारवाई केलेली नाही. ती लवकर करावी अशी मागणी मी या औचित्याच्या सूचनेद्वारे करीत आहे.

---------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. मुंबईतील इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स या संस्थेला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळालेली आहे. ही अतिशय महत्वाची संस्था आहे. परंतु या संस्थेचे भवितव्य धोक्यात असल्याचे उघडकीस आलेले आहे. या संस्थेचा वापर मंत्रालयासाठीही करण्याचा विचार सुरु झालेला आहे असे ऐकण्यात आलेले असून ही अतिशय धक्कादायक बाब आहे. गेल्या कित्येक दशकांपासून या संस्थेत मूलभूत विज्ञानाच्या संशोधनाचे काम सुरु आहे. परंतु याकडे शासनच दुर्लक्ष करीत आहे. सन 1985 मध्ये येथील पदवी शिक्षण बंद करण्यात आले. पदव्युत्तर शिक्षणक्रम सुरु ठेवतांना शिंक्षकांची संख्याही कमी करण्यात आली. 1977 पासून संस्था स्वायत्त करावी म्हणून संचालकानी शासनाला वारंवार विनंती केली होती. या विज्ञान संस्थेतूनच आयसीटी, टीआयएफआर, बीएआरसी या संस्था उदयास आलेल्या आहेत. कर्नाटक मध्ये इन्स्टिटयूट ऑफ सायन्सला स्वायत्त दर्जा देण्यात आलेला आहे. एकूणच शासनाच्या उदासीनतेमुळे या संस्थेचा दुर्दैवी शेवट होणार आहे की, काय ? असा गंभीर प्रश्न समोर आलेला आहे. त्यामुळे शासनाने या बाबतीत विनाविलंब योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असा मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

--------------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, महत्वाच्या विषयावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. केंद्र सरकारने मानव विकास संशोधन मंत्री श्री. कपिल सिब्बल साहेबांनी तसेच मंत्री मंडळाने केंद्रातील शिक्षकांची सेवा निवृत्तीच्या वयाची मर्यादा 65 वर्षे केलेली आहे. त्यामुळे राज्यातील शिक्षकांची कार्यक्षमता लक्षात घेता त्यांचेही सेवानिवृत्तीचे वय 65 वर्षे करावे अशा प्रकारची विनंती मी औचित्याच्या मुद्यामार्फत करीत आहे.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु.शी.** :अकरावी व बारावीच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण मिळण्याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यातील दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अकरावी बारावीचे शिक्षण इंग्रजी भाषेतून घ्यावे लागते. त्यामुळे मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेची अडचण नेहमी भासत असते. उर्दू आणि हिंदी भाषीक शाळेतून दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या सोईसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने अशा विद्यार्थ्यांची अकरावी व बारावीची परीक्षा देखील उर्दू आणि हिंदी भाषेतून देण्याची व्यवस्था केली आहे. तथापि मराठी भाषिक शाळांतील विद्यार्थ्यांना अशी सोय उपलब्ध नाही. अकरावी बारावीसाठी गणित, रसायन(केमिस्ट्री) भौतिक शास्त्र (फिजिक्स), जीवशास्त्र(बॉटनी) इत्यादी विषयांची मराठी भाषेतील काही पुस्तके सध्या बाजारात उपलब्ध आहेत.

मराठी भाषेतून हे विषय शिकविण्याची व्यवस्था करण्याबाबत मी महाराष्ट्र राज्यातील सुमारे तीन साडेतीन हजार शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्रे लिहून विनंती केलेली आहे. तथापि, यासाठी महाराष्ट्र शासनाने शासन स्तरावरुन प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तशी व्यवस्था शिक्षण विभागाने करण्याची आवश्यकता आहे.

या सूचनेला शासनाकडून एक महिन्याच्या आत उत्तर येणे आवश्यक असल्यामुळे मी या विशेष उल्लेखाचा आग्रह धरला होता. मागील वेळेस माननीय शिक्षण मंत्र्यांच्या निदर्शनास मी आणून दिले होते की, दहावी नंतर विज्ञानाच्या अकरावी व बारावीच्या सर्व परीक्षा मराठी भाषेतून देता येतात व त्या प्रकारचा प्रचार संपूर्ण महाराष्ट्रातून करण्यात यावा असे सांगितले होते. महाराष्ट्रातील विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे इंग्रजी कच्चे आहे त्यांना मराठीतून परीक्षा देता येतील. त्यावेळेस मंत्री महोदयांनी मला यांसदर्भात "होय" सांगितले होते. परंतु नंतर तशा प्रकारचा कोणताही प्रचार निर्णयानंतर शासनाने केलेला नाही. या विषयाच्या संदर्भात पुण्यामध्ये पत्रकार परिषद झाली होती त्यामध्ये सचिव महोदय फक्त एक वाक्य बोलले होते.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्यामुळे यासंदर्भातील शासनाची उदासीनता लक्षात घेऊन मी स्वत: विज्ञानाच्या अकरावी व बारावीच्या विषयाचे संच पुण्यामध्ये उपलब्ध आहेत व त्या पुस्तकानुसार विद्यार्थ्यांना शिकवता येते यासाठी महाराष्ट्रातील 3 हजार शाळांना पत्र लिहून मला परवडेल त्या प्रमाणे नमुन्या दाखल पुस्तके सर्व शाळांना पाठविली असून व विज्ञानाच्या अकरावी व बारावीची मराठी भाषेतील पुस्तके उपलब्ध आहेत अशी माहिती त्या शाळांना कळवली आहे. "ग्रामीण भागात या पध्दतीने प्रचार करण्यात येईल" असा शब्द या सभागृहात माननीय मंत्री महोदयांनी दिलेला असल्यामुळे त्यांनी तो पाळला पाहिजे. विद्यार्थ्यांना मराठीतून शिकण्याची व उत्तीर्ण होण्याची संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

उर्दू व हिंदी भाषेतून विज्ञानाच्या परीक्षा देऊन ते विद्यार्थी लाभ घेत आहेत त्यामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांनाही मराठी भाषेतून संधी मिळाली पाहिजे अशी माझी आग्रही भूमिका आहे. यासंदर्भात मी स्वत: माझ्या पातळीवर प्रयत्न केले असून ते प्रयत्न खरे म्हणजे शासनाने करावयास पाहिजे होते. त्यामुळे शासनाने याबाबतीत अजून एक पाऊल पुढे टाकून ग्रामीण भागापर्यंत सतत प्रचार केला पाहिजे. येणाऱ्या मराठी भावी पिढीला विज्ञानाच्या अकरावी व बारावीची परीक्षा मातृभाषेतून देता यावी यासाठी शासनाने प्रयत्न करावा व यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे याची माहिती मला कळवली तर मी शासनास धन्यवाद देईन.

-----------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथील प्रांताधिकाऱ्यांनी शेतीचे दाखले देण्याचे व फेरफार उतारे देण्याचे काम अचानक बंद करणे याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथील प्रांताधिकाऱ्यांनी शेतीचे दाखल देण्याचे तसेच फेरफार उतारे देण्याचे काम अचानक बंद करणे, राज्यात प्रत्येक ठिकाणी हे काम सुरु असणे, ठाणे जिल्ह्यात सुध्दा इतर तालुक्यात हे दाखले देण्याचे काम सुरु असणे, फक्त उल्हासनगर येथील प्रांताधिकाऱ्यांनी हे दाखले देण्याचे काम बंद केल्यामुळे तेथील शेतकऱ्यांत व नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, हे दाखले मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे व नागरिकांचे होत असलेले हाल व त्यांची खेळंबून रहात असलेली कामे, उल्हासनगर येथील फेरफार उतारे पूर्ववत देण्यात यावे, अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास शिफारस करीत आहे."

-----

. . . .2 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या योजनांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, राज्यामध्ये ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला निधी देऊन गावांमार्फत योजना राबविल्या जात असणे, या पाणीपुरवठा योजनांमध्ये राज्यात विशेषत: नाशिक जिल्ह्यात संबंधित समितीचे अध्यक्ष, सचिव, तांत्रिक सेवा पुरवठादार किंवा यंत्रणेचे अधिकारी यांच्या संगनमताने बहुतांश योजनांमध्ये भ्रष्टाचाराची प्रकरणे घडत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सदर कामे मुदतीत पूर्ण न होण्याचे वाढलेले प्रमाण, भ्रष्टाचार व गैरप्रकार करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन गुन्हे दाखल करण्याबाबत प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याचे नाशिकसह बहुतांश जिल्ह्यामध्ये दिसून येणे, परिणामी भ्रष्टाचारास चालना मिळून पाणीपुरवठा योजनेची रखडलेली कामे, या अपूर्ण, अर्धवट व रखडलेल्या कामांमुळे राज्यात दुष्काळाची वाढलेली दाहकता, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, अपहार झालेल्या योजनांमधील वसूलपात्र रक्कम संबंधितांकडून वसूल करुन गुन्हे दाखल करण्याबाबत होत असलेली मागणी तसेच गैरव्यवहार व अनियमिततेवर उपाययोजना करण्याकरिता ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचा निधी पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला न देता जिल्हा परिषद स्तरावर निविदा मागवून ही कामे करण्याची आवश्यकता, यावर शासन स्तरावर विचार करुन कार्यवाही केली जावी अशी मागणी मी विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे करीत आहे.

-----

2 ई-3

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी/मु.शी**.: बुलढाणा जिल्ह्यातील माळेगांव (वडजी) ता.मोताळा येथील शेत शिवारात रानडुकरे व हरणांचा सुळसुळाट झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"बुलढाणा जिल्ह्यातील माळेगांव (वडजी) ता.मोताळा शिवारात शेतकऱ्यांच्या शेत शिवारात रानडुकरे व हरणांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट सुरु असल्याने शेतकऱ्यांचे सदर परिसरातील पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, सदर भागातील भुईमूग व मक्याची लागवड केल्यानंतरशेती संपूर्ण उकरुन बियाण्यांची नासधूस करुन बियाणे खाऊन टाकली जाणे, सदर परिसरात गेल्या दहा वर्षापासून 30-40 प्राण्यांचे घोळकेच्या घोळके येत असल्याने शेतकऱ्यांचे त्यात मोठे नुकसान होणे, त्यामुळे शेतकऱ्यांना रात्रपाळी करुन राखण करावी लागणे, त्यातही रानडुकरांनी शेतकऱ्यांवर हल्ला केल्याने माळेगाव येथील एका शेतकऱ्यास प्राण गमवावे लागणे तर एक महिला जखमी होणे, परंतु त्यांना कोणतीही आर्थिक मदत न मिळणे, पिकाच्या नुकसानाबाबत संबंधित वन अधिकारी यांना गावकऱ्यांनी वारंवार निवेदन देऊनही प्राण्यांचा बंदोबस्त न होणे, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे दरवर्षी होणारे नुकसान, शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची अत्यंत आवश्यकता, वन विभागाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर करावयाची कारवाई."

. . . .2 ई-4



**पृ.शी./मु.शी**. : दिनांक 5-6-2010 च्या शासन निणर्यान्वये गट क

व गट ड ची पदे भरण्याबाबत निर्बंध घालण्यात येणे याबाबत ॲड.उषा दराडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.उषा दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"श्री.सु.ना.रणखांबे उप सचिव महाराष्ट्र शासन, यांनी दिनांक 30-11-2012 रोजी सामान्य प्रशासन विभागामधून अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांना मंत्रालयीन विभाग, नागपूरला पत्र दिले. विधान परिषदेतील तारांकित प्रश्न क्रमांक 9282 या संबंधातील माहिती मागविली व त्यास उत्तर दिले की, कार्यवाही सुरु आहे. वित्त विभागाने दि.5-6-2010 च्या शासन निर्णयान्वये गट क व गट ड ची पदे भरण्यासंबंधी निर्बंध घातले आहेत. ती पदे खेरीज करुन अन्य पदे भरण्याची कारवाई करण्यात येत आहे. याबाबत शासनाने कार्यवाही न करणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांत निर्माण झालेली असंतोषाची भावना व त्यावर करावयाची तातडीची उपाय योजना.

या अत्यंत सामाजिक महत्वाच्या व तातडीच्या प्रश्नावर शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना यासाठी सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या विकास योजनांसाठी जाहीर केलेला निधी न मिळणे याबाबत श्री. भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दिनांक 18 नोव्हेंबर, 2011 पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रवेश केला असून आता वर्ष पूर्ण होण्यास केवळ तीन महिन्यांचा कालावधी उरलेला आहे. राज्य शासनाने शिवाजी विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या विकासाच्या योजनांसाठी रक्कम रु. 50 कोटी तरतूद मार्च, 2011 च्या अर्थसंकल्पात केली आहे. तसेच या सुवर्ण महोत्सवी वर्षारंभाच्या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमामध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, माननीय ग्रामीण विकास मंत्री व माननीय वनमंत्री महोदय उपस्थित होते. त्यावेळी माननीय कुलगुरु यांनी भाषणामध्ये उपस्थित केलेल्या विविध अध्यासनासाठी आवश्यक तरतुदीकडे लक्ष वेधले होते. तरी त्यांनी आणखी सुमारे 20 कोटी रुपयांची घोषणा केली असणे, एकूण सुमारे 70 कोटी रुपयांची घोषणा होऊनही अद्याप विद्यापीठास अल्पांशाने सुध्दा निधी प्राप्त झालेला नाही असे दिसून येते. सारांश, या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनास अशी विनंती करतो की, शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या अंतिम टप्प्यात तरी सदरचा निधी तातडीने उपलब्ध करुन द्यावा."

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पाणी पुरवठ्यासंबंधीच्या विशेष उल्लेखासंबंधी**

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय पाणीपुरवठा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आताच सन्माननीय सदस्यांनी पाणीपुरवठ्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय उपस्थित असल्यामुळे त्या प्रश्नाची तड लागेल.

**सभापती** : माननीय मंत्री महोदय लेखी उत्तर सुध्दा देऊ शकतील. आज आपल्या सभागृहासमोर भरपूर कामकाज आहे. कृपया आपण खाली बसावे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय,...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांना सांगू इच्छितो की, आपली काळजी सातत्याने सर्वजण घेतात त्यात मीही आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सोलापूर जिल्हा डाळींब उत्पादक शेतकरी संघाच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्या याबाबत श्री. दीपकराव साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. दीपकराव साळुंखे ( सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्य शासनाने जाहीर केलेल्या टंचाईग्रस्त गावातील शेती कर्जावरील एक वर्षाचे व्याज माफ करावे अशी मागणी सोलापूर जिल्हा डाळींब उत्पादक शेतकरी संघाच्या वतीने केंद्रीय कृषी मंत्री यांच्याकडे व राज्य शासनाकडे माहे जून, 2012 मध्ये वा त्या सुमारास केलेली असून सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी सध्या 75 टक्के अनुदान देण्यात येते. या अनुदानाची रक्कम 90 टक्के करावी व जळालेल्या बागांसाठी हेक्टरी 25 हजार रुपये अनुदान द्यावे, टंचाईग्रस्त गावातील शेती कर्जाची वसुली थांबविण्यात यावी, याबाबतच्या मागण्या तेथील संघाने राज्य शासनाकडे पाठविणे, परंतु शासनाने त्यावर कोणतीही कार्यवाही न करणे, शासनाने सदर प्रकरणाची तातडीने अंमलबजावणी करावी यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे."

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मौजे सुस (मुळशी,जि.पुणे) येथील मे. गायकवाड असोसिएशन यांच्या मालकीची जमीन हडप करण्याचा होत असेला प्रयत्न याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"गाव मौजे सुस ( मुळशी, जि. पुणे) स.नं.30/2 हे.00.65 आर, 30/1 हे.00.36 आर, 31 हे.00.17 आर, 30/1/1 हे.00.31.5 आर अशा एकूण 1.49.5 पैकी दक्षिणेकडील 1 एकर क्षेत्र मे. गायकवाड असोसिएशनच्या ताब्यात गेल्या 25 वर्षापासून आहे. स.नं. 30/2 हे.00.65 आर पैकी पूर्वेकडील 3 आर क्षेत्र मे. गायकवाड असोसिएशन तर्फे श्री. गायकवाड व सौ. गवारे यांनी दि. 28.12.2006 रोजी श्री. अनिल नामदेव पाटील यांचेकडून विकसन करार व कुलमुखत्यार पत्राने घेऊन दि. 22.8.2008 रोजी खरेदी खताने खरेदी करुन 7/12 उताऱ्यास त्यांच्या नावाच्या नोंदी करण्यात आल्या असतानाही सन 2007 ते 2010 मध्ये पार्थ डेव्हलपर्स तर्फे महेंद्र येवले यांनी वेगवेगळ्या शेतकऱ्यांकडून वरील क्षेत्र विकसनास घेतल्याचे नगररचना विभाग, पुणे यांचेकडून समजले आहे. संपूर्ण क्षेत्र विकसन कराराने खरेदी खताने दिनांक 19 जून, 2010 रोजी महेंद्र येवले यांनी ओकवूड सहकारी गृहरचना संस्थेस देण्यात आले असून उपरोक्त स.नं. 30/2 पैकी क्षेत्र 3230 चौरस फूट म्हणजेच 3 आर हे. मे. गायकवाड असोसिएशन यांचे मालकीची असताना महेंद्र येवले व ओकवूड गृहरचना संस्थने 1 एकर क्षेत्र हडप करुन फसवणूक केलेली आहे. महेंद्र येवले यांनी खोट्या मोजणीच्या आधारे सदर मिळकतीचा अकृषिक वापर व इमारत बांधकाम नकाशे मंजुरीसाठी नगररचना विभाग यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. मे. गायकवाड असोसिएशन यांची 30/2 पैकी क्षेत्र 3230 चौरस फूट जागा हडप करण्याच्या हेतूने जाणूनबुजून प्रस्ताव सादर करण्यात आला असून, सदर प्रस्ताव दाखल करताना बनावट हमीपत्र व खोटा मोजणी रिपोर्ट दाखल करण्यात आला आहे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

माननीय जिल्हाधिकारी, आयपीएस श्री. अमिताभ गुप्ता, आयएएस श्री. आनंद कुलकर्णी, आयएएस श्री. राधेश्याम मोपलवार, विभा रॉय, श्याम नारायण लाल यांचा कोणताही संबंध नसताना या प्रकरणात हस्तक्षेप केलेला आहे. या संदर्भात कोथरुड पोलीस स्टेशनमध्ये भा.द.वि. कलम 420, 468, 471 व 34 अन्वये गुन्हा नोंदविण्यात येऊनही अद्याप दोषींवर कोणतीही कारवाई झालेली नाही. या प्रकरणाची संपूर्ण सखोल चौकशी होईपर्यंत सद्यस्थितीमध्ये सुरु असलेले बांधकाम तत्काळ थांबविण्याकरिता व या प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, मौजे सुस (मुळशी, जि. पुणे) या ठिकाणी श्री. गायकवाड त्यांच्या ताब्यात असणारी 3230 चौरस फूट जमीन त्यांच्या मालकीची असताना महेंद्र येवले आणि ओकवूड गृहरचना संस्थेने 1 एकर क्षेत्र हडप करुन फसवणूक केलेली आहे. महेंद्र येवले यांनी खोट्या मोजणीच्या आधारे सदर मिळकतीचा अकृषिक वापर इमारत बांधकाम नकाशे मंजुरीसाठी नगररचना विभाग यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे. मे. गायकवाड असोसिएशन यांची 30/2 पैकी क्षेत्र 3230 चौरस फूट जागा हडप करण्याच्या हेतूने जाणुनबूजून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव दाखल करताना बनावट हमीपत्र आणि खोटा मोजणी रिपोर्ट दाखल करण्यात आलेला आहे. कोथरुड पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड विधान कलम 420, 468, 471 व 34 अन्वये गुन्हा नोंदविण्यात येऊनही अद्याप दोषींवर कोणतीही कारवाई झालेली नाही. ओकवूड गृहरचना संस्थेमध्ये अनेक आयपीएस अधिकारी, आयएएस अधिकारी यांचे फ्लॅट्स आहेत. त्यामुळे नगरविकास विभागावर दबाव येत आहे. म्हणून या प्रकरणाची चौकशी सीआयडीतर्फे करावी आणि सद्यस्थितीत सुरु असलेले बांधकाम तत्काळ थांबविण्यात यावे याकडे मी या विशेष उल्लेखाव्दारे लक्ष वेधत आहे.

----

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु.शी.** :बेकायदा गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टरांची नोंदणी रद्द करणे याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"बेकायदा गर्भलिंग निदान करुन आर्थिक मलिदा कमविणाऱ्या राज्यातील 49 डॉक्टरांच्या वैद्यकीय व्यवसायाची नोंदणी रद्द करण्याची शिफारस आरोग्य विभागाने राज्य सरकारकडे करुन 4 महिने झाले तरी राज्य सरकारकडून याबाबत काहीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे धक्कादायक बाब जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, या 49 डॉक्टरांपैकी 15 डॉक्टर पुणे शहरातील असणे, गर्भलिंग निदान करुन स्त्री-भ्रूण हत्या घडवून आणणाऱ्या राज्यातील 49 डॉक्टरांची यादीच शासनाच्या आरोग्य विभागाने तयार केली असून यातील 36 डॉक्टर दोषी आढळून आल्याने त्यांना न्यायालयाकडून शिक्षा ठोठाविण्यात आलेली असणे, तर उर्वरित डॉक्टरांवर चार्जशीट दाखल केलेले असणे, या डॉक्टरांची व्यवसाय नोंदणी रद्द करण्याची शिफारस असून देखील हे डॉक्टर राजरोसपणे व्यवसाय करीत आहेत, परिणामी राज्यातील 'बेटी बचाव' चळवळीस बसलेली चपराक याबाबत शासनाने तत्काळ कारवाई करुन या 49 डॉक्टरांची नोंदणी रद्द करण्यात यावी अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी. / मु.शी.** :सुवर्णदुर्ग किल्ल्याची दुरुस्ती करुन लोकांना पर्यटनातून रोजगार उपलब्ध करुन देणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दापोली तालुक्यातील एकमेव जलदुर्ग सुवर्णदुर्ग किल्ल्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. सन 1760 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला व सरखेल कान्होजी आंग्रेची स्मृती जागविणारा संपूर्ण किल्ला जवळजवळ नष्ट होत आहे. संबंधित विभागाचे या किल्ल्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे या किल्ल्याची दुरवस्था झाल्याचे आढळून येणे, सरखेल कान्होजी आंग्रेची स्मृती जागृत ठेवण्यासाठी या किल्ल्याची त्वरित दुरुस्ती करण्याकरिता व या किल्ल्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागावर कडक कारवाई करण्याबाबत कार्यवाही व्हावी. या महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी. / मु.शी.** :आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निवडणुकीच्या पात्रतेसाठी शोध निबंध प्रसिध्द करण्याची घातलेली अट याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निवडणुका होणार आहेत. उमेदवार पात्रतेसाठी शासनाने शोध निबंध प्रसिध्द करण्याची अट घातली आहे. कमी अवधी व पुरेसे संशोधन न करताच दोघा-तिघांनी मिळून व काही वेळा नावात किरकोळ फेरफार करुन प्रसिध्दीचा धडाका लावला आहे. आयुर्वेद पत्रिका ह्या राष्ट्रीय मासिकात अशा गैरप्रकारांबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे. झाल्या प्रकाराची शासनाने कुलपतींना चौकशी करण्यास निर्देश द्यावेत व ह्या अनिष्ट प्रथांना पायबंद घालावा, अशी शिफारस ह्या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे."

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी. / मु.शी.** :लातूर जिल्ह्यात व्यवसायिक व तंत्र शिक्षण अंतर्गत सह संचालकांचे कार्यालय सुरु करणे याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"लातूर जिल्हा हा मराठवाड्यातील शिक्षणाचे मुख्य केंद्र बनला आहे, लातूर येथे शिक्षण विभागातील उपसंचालकांचे कार्यालय आहे. लातूर उपविभागीय कार्यालयाला लातूर, उस्मानाबाद, नांदेड हे तीन जिल्हे जोडलेले आहेत. परंतु व्यवसायिक व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या जवळपास 2000 ते 2200 संस्था या तीन जिल्ह्यात चालतात. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या काळात लातूर, उस्मानाबाद व नांदेड या तीन जिल्ह्यासाठी व्यवसायिक व तंत्र शिक्षण अंतर्गत सहसंचालकांचे कार्यालय सुरु केले जाईल अशी घोषणा करण्यात आली होती. तेव्हा हे कार्यालय शासनाने त्वरित सुरु करावे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे."

-------

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2 वाजून 10 मिनिटांनी पुन्हा भरेल.

( दुपारी 1.42 ते 2.10 पर्यंत मध्यंतर )

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि विरोधी पक्षाचे अन्य सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटे तहकूब करीत आहे.

(दुपारी 2.10 ते 2.20 वाजेपर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

----

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी.**: मुंबईमध्ये लीजवर दिलेल्या शासकीय भूखंडाचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग करुनही 50टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे

**मु.शी.**: मुंबईमध्ये लीजवर दिलेल्या शासकीय भूखंडाचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग करुनही 50टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, डॉ. रणजित पाटील व श्री. नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये पुढील अंतिम आठवडा प्रस्ताव मांडतो.

"मुंबईतील शासकीय जागा विविध समाज उपयोगी कार्यासाठी कमी दरात लीजवर दिलेल्या असताना त्या संस्थांनी ह्या जागेचा वापर व्यावसायिक कारणासाठी करणे, सदर भूखंडाचा उपयोग व्यावसायिक कारणांसाठी होऊन देखील संबंधित संस्थांनी 50 टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे, नगरविकास विभागाच्या सतत बदलत्या धोरणामुळे गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न बिकट होणे, म्हाडाकडून होणाऱ्या भूखंड वाटपात मोठया प्रमाणात गैरव्यवहार होणे, नवी मुंबई सिडको मधील भूखंड घोटाळ्याप्रकरणी शंकरन समितीने अहवाल सादर करुन देखील, ह्या अहवालावर कारवाई न होणे, पुणे शहराजवळ सुस गावामध्ये ओकवुड गृहनिर्माण संस्थेने केलेल्या भूखंड घोटाळ्यासह अनेक भूखंड घोटाळे झाल्याचे उघडकीस येणे, महापालिका हद्दीबाहेर व

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

एम.एम.आर.क्षेत्रामध्ये उभी राहिलेली अनधिकृत गोदामे, अनधिकृत बांधकामे वाढलेली असताना व याबाबत तक्रारी करुन देखील गृह विभागाकडून कोणतीही कारवाई न होणे, विजय पालांडे, लैला खान इत्यादीच्या प्रकरणात तपासामध्ये गृह विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होणे, मुंबई शहरामध्ये सी.सी.टी.व्ही.यंत्रणा बसविण्याचा निर्णय होऊनही शासनाने त्याबाबत चालढकलीचे धोरण स्वीकारणे, गृह विभागातील भ्रष्टाचारामुळे जनतेचा पोलीस दलावरील विश्वास डळमळीत होणे, नगरविकास, गृहनिर्माण व गृह या महत्वाच्या खात्यात असणाऱ्या भ्रष्टाचारामुळे अब्जावधी रुपयाचे शासनाचे झालेले नुकसान व त्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यावधी जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, आम्ही दिलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये नगर विकास विभाग, महसूल विभाग आणि गृह विभाग या तीन विभागांचे विषय आहेत. या ठिकाणी माननीय गृह मंत्री उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, याठिकाणी माननीय गृह मंत्री उपस्थित होते. पाच-दहा मिनिटांमध्ये ते येतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये गृह विभाग, नगर विकास विभाग आणि महसूल विभागातील गैरकारभाराबाबत टीका करावी एवढ्याच उद्देशाने हा प्रस्ताव आणलेला नाही तर या विभागांच्या कारभारामध्ये कोणत्या त्रुटी आहेत, काही गोष्टी करण्यासाठी कोणकोणते निर्णय चुकीचे निर्णय घेत आहोत, त्याचे दुष्परिणाम काम आहेत यावर या चर्चेच्या माध्यमातून सभागृहात चर्चा करावी हा हेतू आहे. सरकारकडून ज्या काही चुका झाल्या असतील त्या त्यांनी प्रामाणिकपणे मान्य करुन त्यामध्ये दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी सुरुवातीला गृह विभागावर बोलणार आहे. अबु जुंदालचा विषय आहे. आपल्या एटीएसने अबु जुंदाल सौदी अरेबियामध्ये असल्याचे मार्क केले. त्याच्याकडे पाकिस्तानचा पासपोर्ट होता. मग त्याला भारताच्या ताब्यात का द्यावे असा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा त्याची





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

डी.एन.ए.चाचणी करुन त्याला भारताच्या ताब्यात देण्यात येईल असे सांगण्यात आले. मग पोलीस अधिकाऱ्यांनी गेवराई येथे राहणाऱ्या अबु जुंदालच्या वडिलांचे केस मिळविले आणि ते चाचणीसाठी पाठविले. डी.एन.ए.चाचणी ते केस मॅच झाले. मग अबु जुंदालच्या वकिलाने सांगितले की, "ते केस त्याच्या वडिलांचे नाहीत, ते केस माझे आहेत". त्यानंतर पुन्हा पोलिसांनी गेवराई येथे रक्तदान शिबीर घेऊन आणि अन्य वेगळ्या माध्यमातून त्याच्या वडिलांचे अधिकृत रक्त मिळविले आणि ते सौदी अरेबियामध्ये प्रूव्ह केले. मग त्याला दिल्ली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. आपल्या अेटीएसने अबु जुंदालला पकडण्यासाठी प्रयत्न केले असताना त्याला दिल्ली पोलिसांच्या ताब्यात का देण्यात आले याचा आपण प्रेस्टीज इश्यू केला पाहिजे होता. पण आपल्या राज्यकर्त्यांनी तसा प्रेस्टीज इश्यू केलेला नाही.

सभापती महोदय, कोणत्या पक्षात काय भानगड सुरु आहे, कशावरुन सुरु आहे, को-ऑर्डीनेशन कमिटी वगैरे बाबीमध्ये मला जायचे नाही.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आपल्या पोलिसांनी जीवावर उदार होऊन, सर्व प्रकारची शक्कल लढवून, सर्व प्रकारची कार्यक्षमता दाखवून तो गुन्हेगार आहे असे सिध्द केल्यानंतर सुध्दा त्याला ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करीत नाहीत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे वाईट वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम तत्कालिन पोलीस आयुक्त श्री.हसन गफुर यांच्यावर टीका केली, ती टीका योग्य होती. परंतु श्री. गफुर साहेबांनी म्हटले होते की, 26/11 च्या घटनेत लोकल कनेक्शन्स आहेत. ही बाब सभागृहात माननीय गृहमंत्र्यांनी फेटाळून लावली होती. केंद्रीय गृहमंत्र्यांनी श्री.गफुर याना त्यांचे स्टेटमेंट मागे घ्यावयास लावले होते. आज अबु जुंदालच्या माध्यमातून हे सिध्द होते की, लोकल कनेक्शन्स होते. शासन यासंबंधी सारवासारव कशासाठी करीत आहे याचा खुलासा या ठिकाणी होणे गरजेचे आहे. मी परवा माननीय गृहमंत्र्यांचे स्टेटमेंट ऐकले. दूरदर्शनवरील मुलाखतीमध्ये त्यांनी म्हटले होते की, अबु जुंदाल आमदार निवासामध्ये राहिलाच नव्हता. माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री प्रा.फौजिया खान या देशद्राही आहेत असे मला अजिबात म्हणावयाचे नाही. परंतु त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याचा अबु जुंदाल हा नातेवाईक आहे, त्याचा फायदा घेऊन अबु जुंदाल आमदार निवासामध्ये दोन दिवस राहिला. त्याला तेथे वेपन्सचे वितरण होणार होते. परंतु ते वितरण ऐन वेळी रद्द झाले. ती वेपन्स मालेगाव येथे देण्याचे ठरले. मुंबई येथून तो मालेगाव येथे गेला. सभापती महोदय, दहशतवादाचे नेटवर्क मंत्रालयातील कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचले आहे या गोष्टीची मला चिंता वाटते आहे. त्या कर्मचाऱ्यांला अबु जुंदाल याच्या बाबतीत माहिती होती किंवा नाही याची मला कल्पना नाही. त्या कर्मचाऱ्याचे नाव मला माहिती आहे. परंतु ते नाव मी या ठिकाणी जाहीर करु इच्छित नाही. मी या ठिकाणी जी चिंता व्यक्त केली आहे, त्या बाबतीत शासन काळजी घेणार आहे की नाही याबाबतचा देखील खुलासा माननीय गृहमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, राज्याच्या एटीएसकडून त्याच्या बाबतीतील सर्व माहिती कोर्टात सादर केली जाईल. तो गेवराई येथून मुंबईत आला, मुंबईत दोन दिवस आमदार निवासामध्ये राहिला आणि त्यानंतर तो मालेगाव येथे गेला. आता अबु जुंदालचे वकील म्हणतील की, गृहमंत्र्यांनी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

म्हटल्याप्रमाणे अबु जुंदाल आमदार निवासात राहिलाच नाही. आपण कोणासाठी व कशासाठी कोणाला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहात या गोष्टीचा खुलासा होणे गरजेचे आहे. माननीय प्रा.फौजिया खान देशद्रोही आहेत, त्या अतिरेक्यांना सामील आहेत असे आम्ही कुठेही म्हटलेले नाही. मंत्रालयातील कर्मचाऱ्यांपर्यंत देशद्रोह्यांचे नेटवर्क पोहोचले आहे याची आम्हा सदस्यांना चिंता वाटते आहे. राजकीय सारवासारव करण्यासाठी शासनातील मंत्री अशा प्रकारची वक्तव्ये करीत असतील तर ती वक्तव्ये पुढे दहशतवाद्यांना उपयोगी पडतात या गोष्टीची आम्हाला काळजी वाटते. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली सांगत आहेत की, संपूर्ण मराठवाडा आणि पश्चिम विदर्भ हा दशहतवादांनी पोखरुन टाकला आहे. मागे बुलढाणा येथे दहशतवादी सापडले. यांची ही मोडस् ऑपरेंडी आहे. एटीएस, रॉ च्या अधिकाऱ्यांना माहिती आहे की, संपूर्ण मराठवाडा, विदर्भ हा दहशतवाद्यांनी पूर्णपणे पोखरुन टाकला आहे. "Abu Jundal case is the tip of ice berg." पुढच्या पाच ते सात वर्षात तुम्हाला भयानक गोष्टी पहावयास मिळतील असे सांगितले जाते. मतांचे राजकारण बाजूला ठेवून जे चूक आहे ते चूक सांगा आणि जे बरोबर आहे ते बरोबर आहे असे सांगा.

सभापती महोदय, काल सभागृहात अल्पसंख्यांक आयोगासंबंधीचा मुद्दा चर्चेला आला होता. त्या समाजाला विश्वास देणारी काही पाऊले टाकत असताना समाजात काही चुकीचे होत असेल तर बिनतोडपणे सांगण्याची हिंमत शासनाने दाखविली पाहिजे. परंतु तशी हिंमत शासन दाखवित नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मला असे आग्रहाने म्हणावयाचे आहे की, अबु जुंदाल निमित्ताने लोकल नेटवर्क कसे कार्यरत होते ही गोष्ट उघड झाली आहे. सभागृहाला जी माहिती सांगितली ती कशी चुकीची होती ही गोष्ट मला या निमित्ताने निदर्शनास आणावयाची आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 14:30

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, उघडपणे जाहिराती दिल्या जात आहेत. जाहिरातींमध्ये काय छापून येत आहे ते मी याठिकाणी वाचून दाखवितो " Jammait-e-ulema, Maharashtra is providing legal help to innocent Muslim Youths who have been arrested on false charges. Several of them have been acquitted. The Jammait has spent Rs. 5 crores 55 lakhs on these cases and for providing higher education to Muslim Youths." माझे म्हणणे असे आहे की, एखाद्या गुन्हेगाराला जर त्याचा वकील द्यावयाचा असेल तर त्याला शासनाचे नियम आहेत. त्यासाठी विशिष्ट रचना आहे. ही माणसे कशासाठी फंडींग करीत आहेत आणि काय फंडींग करीत आहेत याचा विचार केला तर गुन्हेगारांचा आत्मविश्वास बळावतो आणि तुम्ही हे करा आम्ही फंडींग करतो. अशा प्रकारचे काम करणाऱ्यांना वेगळया प्रकारे पाठिंबा देत असतो आणि येत्या काळामध्ये दहशतवादाच्या मुद्यांचा सामना कसा केला जाणार आहे याचे उत्तर शासनाकडून अपेक्षित आहे.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न आहे तो जिग्ना व्होरा नावाच्या महिला पत्रकाराला पत्रकार डे यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आली.इतके दिवस अटक होऊन सुध्दा तिच्यावर आरोप काय आहे तर ती छोटा राजनशी बोलत होती. मला माहीत आहे की, 10-12 सिनियर क्राईम रिपोर्टर दुबई आणि गँगस्टरबरोबर कसे बोलतात आणि कशा बातम्या येतात आणि. कोण पोलीस अधिकारी सहज बोलतात त्यातून माहिती मिळते. आपण 36 म्हटले आणि कोर्टात तीनच कॉल सादर केले जिग्ना वोराच्या अटक प्रकरणानंतर इतके दिवस झाले जे पुरावे फॉरेन्सिक लॅबने दिले पाहिजेत ते अजून दिलेले नाहीत. काल तर त्यांनी सांगितले की, त्यांनी सांगितले आम्ही देऊ शकत नाही इरेझ केलेले आहेत. म्हणजे सभापती महोदय, त्याच्या आधीचे जे मेसेजेस आहेत की ज्याच्यावरुन जिग्ना व्होराने डे ला असे म्हटले होते की, तु काय स्वत:ला शहाणा समजतोस काय ? यावरुन दोघांची दुष्मनी आहे असे सिध्द करुन तिला मोक्कामध्ये आत टाकले. तिला आत टाकल्यानंतर हिने छोटा राजनला बाईकचा नंबर आणि मेक कळविला होता. छोटा राजनला माहिती देण्यासाठी जिग्ना व्होरा लागते की त्याचे मुंबईभर नेटवर्क पसरले आहे. गृहमंत्र्यांनी याबाबतीत खुलासा करावा.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

जिग्ना व्होराने जे.डे ची कोणती मोटरसायकल होती तिचा नंबर काय याची माहिती दिली की तिच्याकडून माहिती आल्यानंतर ही कारवाई करणार. या सगळया गोष्टी अतिशय हास्यास्पद आहेत. फॉरेन्सिक लॅबचा रिपोर्ट 6-8 महिने झाले तरी आलेला नाही. हा रिपोर्ट येत नसताना असे म्हंटले जाते की, "She is a member of Organized crime. She had professional rivalry with J. Day, Reporter. She had made 36 calls to gangsters; only 3 calls were substantiated in the court. She had send photograph, address and bike number of J.Day to the gangsters. She left Mumbai 2 days prior to the assassination." तिकीटे दोन महिने आधी बुक झाली होती.

सभापती महोदय, माझे या विषयावर ठाम मत आहे की, मृत डे या पत्रकाराकडे आयपीएल च्या बुकींजमधील सर्व माहिती आली होती. मॅचफिक्सींगची सगळी माहिती डे हा पत्रकार उघड करणार होता. ती त्याने उघड करु नये म्हणून त्याची हत्या करण्यात आली त्या हत्येनंतर पत्रकारांचा प्रचंड मोर्चा मंत्रालयाच्या आवारात शिरला. पत्रकारांचे हे रुप आता आपल्या अंगावर शेकेल असे वाटल्यामुळे पत्रकारांमधील एका महिला पत्रकाराला कोणत्याही प्रकारचे ठोस पुरावे नसताना, हास्यास्पद पुरावे असताना तिला यामध्ये गोवले आणि पत्रकारांचे आंदोलन थांबले .इतके महिने झाल्यानंतर सुध्दा गुन्हा सिध्द करु शकत नाहीत एका वेगळया प्रकारे पत्रकारांची मुस्कटदाबी करण्याचा सरकारकडून प्रयत्न केला असा माझा आरोप आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

हे तुम्हाला का शक्य नाही? चार्जशीट मी वाचली आहे. चार्जशीटमध्ये स्काईपचा उल्लेख आहे. आय विटनेसचा उल्लेख आहे. आय विटनेस जबानी देतो. जिग्नाला सांगितली अशी कोणतीही माहिती नाही. आय.पी.एल.मॅच फिक्सिंगमध्ये सामील असलेल्या बुकींचे सर्व व्यवहार बाहेर येऊ नयेत म्हणूनच जे.डे या पत्रकाराची हत्या झाली. ही हत्या छोटा राजनने केली की दाऊदने केली याचा शोध घेतला तर हत्या कोणी करायला लावली त्याचे नाव बाहेर येऊ शकते.

सभापती महोदय, या घटनेतील फॉरेन्सिक रिपोर्ट अद्याप का प्राप्त झाले नाहीत? जिग्नाला जे.डे या पत्रकाराला मारण्याचा हेतू काय? केवळ स्वत:ला शहाणा समजतो या एकाच गोष्टीसाठी कोणी कोणाची हत्या करतो का? मकोका कायद्यातील कलमे लावल्यानंतर अगोदर तुम्ही तुमचे निर्दोषत्व सिध्द करा असे म्हणणे म्हणजे एकप्रकारे मीडियाची झालेली गळचेपी आहे. या प्रकरणातील वास्तव आम्हाला जाणून घ्यायचे आहे.

सभापती महोदय, विजय पालांडेच्या घटनेबाबत मी दररोज वृत्तपत्रातील बातम्या वाचत होतो. बातम्या वाचून मी स्वत: कन्फ्युज झालो. विधिमंडळाच्या कामकाजाला कव्हरेज जास्त न मिळता लैला खान प्रकरणाला अधिक कव्हरेज मिळते. त्या बातम्या वाचून काही कळत नाही. प्रश्न एवढाच आहे की, विजय पालांडे याला पॅरोलवर सोडण्याची शिफारस कोणी केली होती? 2006 मध्ये बनावट पासपोर्ट आणि डबल मर्डरचा चार्ज लावलेला असताना त्याला जामीन कोणी दिला? न्यायालयात शासनाची बाजू मांडणारे वकील कोण होते त्यांची नावे सभागृहाला कळली पाहिजेत. विजय पालांडे याने पोलीस उपनिरीक्षक शिंदे याच्या मदतीने गुन्हा केल्याचे सिध्द होऊनही सिमरन सूद आणि शिंदे यांच्यावर गुन्हा का नोंदविला नाही? गुन्हा नोंदविल्यास मोठ्या अधिकाऱ्याचे नाव बाहेर येऊ शकते असे होते का? पॅरोलवर सुटणारे गुन्हेगार आणखी किती गुन्हे करतात आणि त्याची काय अवस्था आहे याबाबत नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो यांनी तपशील जाहीर केला आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 1441 आरोपी पॅरोलवर सुटलेले असून त्यापैकी 310 वगळता इतर सर्व फरार आहेत. ही केंद्र सरकारची आकडेवारी आहे. पॅरोलवर सोडणे म्हणजे वेगळ्या अर्थाने बनावट पासपोर्टच्या आधारे पळून जाण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते, हे त्यातील वास्तव नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या माध्यमातून बाहेर आले आहे. महाराष्ट्राचा त्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

पहिला क्रमांक आहे. माननीय गृहराज्यमंत्र्यांनी याबद्दल स्वत:ची पाठ थोपटून घ्यावी. कारण कुठेतरी त्यांच्या विभागाचा पहिला क्रमांक आला आहे. विजय पालांडे केसच्या संदर्भात मी अधिक बोलणार नाही. कारण माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे त्या विषयावर अधिक बोलणार आहेत. त्यांच्याकडे या प्रकरणातील फोटोग्राफ उपलब्ध आहेत. काश्मीरच्या पोलिसांनी या घटनेची माहिती दिली होती. आय.एस.आय.शी, गुप्तहेरांशी, लष्करच्या प्रतिनिधींशी पालांडेच्या मैत्रीणीचे कसे संबंध होते या सगळ्या गोष्टी बाहेर आलेल्या आहेत.

सभापती महोदय, क्राईम ब्रँचचे काम कसे चालले आहे? सभागृहामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाबाबत चर्चा होत असताना मी पोलीस अधिकाऱ्यांच्या नावाचा उल्लेख करण्याचे शक्यतो टाळतो. कारण तो सिस्टीमचा भाग असतो. पोलीस अधिकाऱ्यांचे नाव घेऊन त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

पण ज्या गोष्टींविषयी माझी खात्री झालेली असते, त्या गोष्टींमध्ये मला मात्र नावे घेतल्याशिवाय राहवत नाही.

या निमित्ताने मी शासनाला सांगू इच्छितो की, क्राईम ब्रँचमध्ये गेल्या दहा वर्षांपासून एकाच ठिकाणी काम करणारे पोलीस निरीक्षक श्री. अलकनूर, सुधीर दळवी, संजय धुमाळ व सतीश मयेकर तेथे कसे टिकून आहेत, त्यांच्या बदल्या होतात पण पुन्हा त्या रद्द केल्या जातात आणि हे लोक मनिष मार्केटमध्ये गेल्यानंतर दाऊदच्या कोणत्या माणसाला भेटतात हे सीसीटीव्हीच्या माध्यमातून आपण जरुर पहावे. त्यांच्या भेटी कशा व कोठे कोठे होतात तसेच या लोकांची कोणकोणत्या ठिकाणी बेनामी प्रॉपर्टी आहे याची चौकशी करुन शासन हे दुष्टचक्र थांबविणार आहे काय हा माझा सवाल आहे. फारुख, असीम लंगडा, मेहूर खान, हरुन भाई अशा लोकांना हे पोलीस अधिकारी भेटत असतात हे सांगता येईल. त्यांच्या संबंधीची माहिती देणारे सुध्दा आहेत. त्यांच्याकडून समजते की या पोलीस अधिकाऱ्यांनी बेनामी प्रॉपर्टी कोठे कोठे केली व दाऊदच्या माणसांशी त्यांचा संबंध कसा येतो ? त्याचबरोबर हरुण भाई हा मोहम्मद डोसाचा भाऊ आहे त्याची चर्चा क्रिकेट बुकी सावलाकडे केली जाते. म्हणून मी सांगू इच्छितो की, कोणत्याही अधिकाऱ्याचे नाव घेण्यापूर्वी मी चारपाच वेळा कन्फर्म करुन घेतो की, ही गोष्ट खरी की खोटी हे पाहतो व नंतरच जबाबदारीने बोलतो. अशा प्रकारे क्राईम ब्रँचच्या माध्यमातूनच असे प्रकार होत असतील तर क्राईम आटोक्यात कसे येतील असाही माझा सवाल आहे.

महोदय, खालच्या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस आणि मी या सभागृहात गेल्या दोन दिवसापूर्वी विषय उपस्थित केला होता की राज्यातील डान्स बार बंद केले असे शासन सांगत असले तरी डान्स बार चालू आहेत. सी.डी.च्या माध्यमातून आम्ही दाखवून दिले. त्याला शासनाकडून उत्तर मिळते की आपण दाखविलेली सी.डी. जुनी आहे. पण मी शासनाचे लक्ष "टी.व्ही - 9" या वाहिनीकडे वेधू इच्छितो. या चॅनेलने दि. 2, 3 व 4 जुलै तसेच 30 जून रोजी टी.व्ही. स्क्रीनच्या माध्यमातून डान्स बार चालू असल्याचे प्रत्यक्ष चित्रणच दाखविले, ते चॅनेल तर जुने नाहीत अशी माझी धारणा आहे. याचा अर्थ इतकाच आहे की, डान्स बार शासनाने बंद केले असले तरी त्याची अंमल बजावणी करणाऱ्या पोलिसांशी कशा प्रकारे निपटायचे हे डान्स बार मालकांना कळले आहे. त्याप्रमाणे ते "तो मी नव्हेच" या नाटकातील फिरत्या रंगमंचाप्रमाणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

कोणता पोलीस अधिकारी आल्यानंतर कोणती बेल दाबावयाची अशा प्रकारची कृती करीत असतो. या सर्व गोष्टींची माहिती गृह विभागाला नाही असे न समजण्या इतपत मी भाबडा तर नक्कीच नाही. सर्वांना सर्वच गोष्टी माहीत असतात. माझ्या माहितीप्रमाणे राज्यात आजही 50-60 टक्क्याच्या वर डान्स बार छुप्या पध्दतीने चालू आहेत. ढोबळेसारखा कर्तबगार अधिकारी असून देखील हे डान्स बार चालू आहेत. शासनाने खरोखरच अशा कर्तबगार अधिकाऱ्याच्या मदतीने रात्रीचे डान्स बार बंद करावेत, असे केले तर मी शासनाला धन्यवाद देईन.

महोदय, माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांची पध्दत "पुढचे पाठ आणि मागचे सपाट" अशी असते. त्याचे कारण डान्स बार प्रथम बंद केले पण ते पुन्हा चालू झाले. त्याचप्रमाणे कोपरापासून ढोपरापर्यंत शब्दप्रयोग त्यांच्या बाबतीत रुढ झाला होता पण त्याचाही अंमल कमी झालेला दिसतो. कारण आजच सकाळी बोरिवली येथे एका रिक्षावाल्याची पठाणाने हत्या केली. त्यामागील कारण एवढेच की त्या पठाणाकडून रिक्षावाल्याने कर्ज घेतले होते. रिक्षावाल्या बँकेकडून कर्ज मिळत नव्हते म्हणून त्याने पठाणाकडून कर्ज घेतले होते पण ते वेळेवर भरु शकला नाही म्हणून त्याला ठार मारण्यात आले अशी परिस्थिती आज राज्यात सर्वत्रच आहे. शासनाने सावकारी प्रतिबंधक कायदा राज्यात पास केला पण तीन तीन वेळा हा कायदा केंद्र शासनाकडून परत येतो. यामागे शासनाने मालाफाईड मिस्टेक केली की बोनाफाईड मिस्टेक केली असा प्रश्न विचारला तर कोणीही सांगेन की हे जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न आहेत. कालच सभागृहात मराठी भाषेसंबंधीचे विधेयक चर्चेला आले होते. त्यात गुजरात राज्याची उल्लेख झाल्यामुळे आपल्या राज्याचा अवमान होतो असा उल्लेख आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

अशा चुका जर होणार असतील तर त्या चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा. खरे म्हणजे अशा चुकांवर दुर्लक्ष करणाऱ्या राजकीय नेतृत्वावर कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, सावकारी कायदा असेल, कोपरापासून ढोपरापर्यंत सोलण्याची घोषणा असेल, मालेगावचा बॉम्बस्फोटानंतर जे कोणी बॉम्बस्फोट करतील त्यांचे हात मुळापासून उखडून काढू अशी घोषणा करण्यात आली. परंतु मालेगावच्या बॉम्बस्फोटानंतर आपल्याकडे किती तरी बॉम्बस्फोट झाले. केवळ घोषणा करण्याचे काम गृहमंत्री करीत असतात. परंतु यांच्या घोषणा टीव्हीवर पाहण्यासाठी बरे वाटते. राजकीय नेतृत्व अशा घोषणा करते परंतु प्रत्यक्षात काहीच करीत नसल्यामुळे जनतेचा राजकीय व्यवस्थेवरील विश्वास उडण्याचे हेच मुख्य कारण आहे. शासनाने सांगितले पाहिजे की, हे हे चॅलेंज आम्ही स्वीकरतो व ते पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करु. परंतु यांचे उत्तर असे येते की, आमच्याकडे एवढेच कर्मचारी आहेत, एवढेच दंडुके आहेत, मी काय करणार, माझा पोलीस असाच आहे, त्याला राहायला घर नाही, त्याच्या घराचे छप्पर पडते आहे. परवा नवाकाळ वर्तमानपत्रात वाचले की, कफ परेड येथील हवालादारांच्या क्वार्टर मध्ये एक पोलीस इन्स्पेक्टर राहतो, तेथील हवालदारांच्या बायकांना मारतो परंतु त्याच्यावर काहीही ॲक्शन घेतली जात नाही. परवा जॉईंट कमिशनरामुळे या प्रकरणात काही तरी हालचाल झाल्याचे दिसते. पोलीस शिपायाला पोलीस इन्स्पेक्टर दादागिरी करतो. हवालदारांच्या बायकांनी तक्रार केल्यानंतर सुध्दा आपला अधिकारी कारवाई करीत नसेल तर तुम्ही लोकांना काय सांगणार ? या राज्यात खरेच कायद्याचे राज्य सुरु आहे काय ?

सभापती महोदय, जुहू येथे उषा दांडेकर नावाच्या एक ज्येष्ठ विधवा राहतात. त्यांनी आपले घर 11 महिन्याच्या लिव्ह लायसन्सवर एक भाडेकरुला दिले व त्याची नोंद रजिस्ट्रारकडेही केली होती. 11 महिने पूर्ण झाल्यानंतर घर खाली करावयास सांगितले असता या भाडेकरुने घर खाली न केल्यामुळे या विधवा महिलेने जुहू पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली. पोलीस स्टेशनमध्ये या ज्येष्ठ महिलेलाच पोलिसांनी भाषण दिले की, "तुम्ही कशाला अशा भानगडी करीत बसता, आम्हाला बाकी काही कामे नाहीत काय ?" त्यानंतर त्या माझ्याकडे आल्यानंतर, "या प्रकरणात काही तरी करा" असे मी जुहू पोलीस स्टेशनच्या इन्चार्जला सांगितले. परंतु तरीही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

काही झाले नाही. 15 दिवसांनी डीसीपी श्री. दिघावकरांशी बोललो तरीही काही झाले नाही. ॲडीशनल कमिशनर श्री. नांगरे पाटील यांच्याशी बोललो. परंतु तरीही काही झाले नाही. या राज्यातील एक वयोवृध्द महिला तुमच्याकडे न्याय मागत आहे परंतु तिच्याकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. हात भट्टीवाल्यांवर आपण कशी कारवाई करता ? हात भट्टीवाल्यांना तुम्ही पोलिसी खाक्या कसा दाखवता ? एका गरीब महिलेला आपण न्याय का देऊ शकत नाहीत ? भाडेकरुवर ट्रेस पासिंगचा गुन्हा दाखल करुन त्याला घरातून बाहेर काढणे एवढे अवघड आहे का ? परंतु भाडेकरु म्हणतो की, "पोलीस माझे काय बिघडवणार आहेत." भाडेकरु जे काही बोलला ते मला येथे सांगता येत नाही. एक तर या भाडेकरुची हिंमत असली पाहिजे किंवा त्याची कुणाशी तरी मिलीभगत असली पाहिजे. या भाडेकरुला बाहेर काढण्याचे चॅलेंज माननीय गृह राज्यमंत्री घेऊ शकतात काय ? या महिलेला उद्या घर ताब्यात देण्याची ताकद तुमच्यामध्ये आहे काय ? तुमचे कौशल्य मला एकदा बघावयाचे आहे.

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी घटना सांगितलेली आहे त्याबाबतीत मी माननीय गृह राज्यमंत्री महोदयांना निदेश देतो की, ॲडीशनल सीपी यांना याबाबत तातडीने कारवाई करावयास सांगावे व सभागृह संपण्याच्या अगोदर कोणती कारवाई करण्यात आली त्याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : होय, सभापती महोदय.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण जो बाणा दाखवला त्याबाबतीत हे सभागृह एकमताने असे म्हणेन की, सन्माननीय डावखरे साहेबांना या राज्याचे गृहमंत्री केले पाहिजे. माननीय डावखरे साहेबांना गृहमंत्री केले तर ते सर्व गुन्हेगारांना त्वरित पकडू शकतील. त्यामुळे मी माननीय उप सभापती महोदयांचे अभिनंदन करतो.

**उप सभापती** : आम्हाला सांगितले तर आम्ही एक तासात घर खाली करुन देऊ. मी आपल्याला सांगू इच्छितो की, ठाण्याच्या आमदार श्रीमती विमलताई रांगणेकरांनी त्यांचे घर शिवाजी फ्लोअर मिलच्या मॅनेजरला भाडयाने दिले होते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती ....

तो घर खाली करून देत नव्हता. त्या शेवटी हैराण झाल्या. त्यांना स्वत:ला रहायला जायचे होते. पण तो काही केल्या ऐकत नव्हता. मी आपल्याला खरी कथा सांगत आहे. तो 15 ऑगस्टचा दिवस होता. पोलीस स्टेशन मधील अधिकारी व कर्मचारी झेंडा वंदनाला गेले असल्यामुळे त्याचे सामान आताच काढायचे असे ठरले. सकाळी 8.00 वाजता उठून तो सोफ्यावर बसला होता. त्याला सोफ्या सकट उचलून खाली आणला. त्याच्या घरातील सर्व सामान आम्हीच बाहेर काढले . श्रीमती विमल रांगणेकर यांच्या नावाची पाटी लावली आणि त्यांना घरात आणून सोडले. हे सगळे एका तासात घडले. असे काही तरी करायला सांगा.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (बसून) : सभापती महोदय, हे रेकॉर्डवरून काढून टाकावे.

**उप सभापती** : हे रेकॉर्डवर राहू द्यावे. आम्ही माजी माननीय आमदार श्रीमती विमलताई रांगणेकर यांच्यासाठी त्याचे घर खाली होते. हे रेकॉर्डवर ठेवण्यास माझी काही हरकत नाही. कारण पुढे पोलीस तक्रार झालीच नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. मागच्या अधिवेशनात मी श्रीमती चित्रा साळुंके यांचा विषय मांडला होता. ह्युमन राईट कमिशनच्या चेअरमन श्रीमती पुनियाजी आहेत. त्यांनी श्री चिदंबरम यांना पाठविलेल्या पत्रात असे म्हंटले आहे की, ".....I am inclined to comment that, while looking into the matters of Atrocity pertaining to Scheduled Castes, the Mumbai Police, not only showed scant respect of law, but also harassed the lady victim. This was done in violation of the State Women Commission and Human Rights Commission directives. In fact in the instant case, as cited in the judgement, senior officers of the Mumbai police protected their colleagues in league with each others. They did not even give appropriate reply to this National Commission, inspite of repeated requests for over a period of 2 years. I am sure this is not an isolated case which was happening only in Mumbai." सर्व 11 आयपीएस अधिकारी वाईट आहेत असे मला म्हणायचे नाही. आपल्याला या राज्यामध्ये संरक्षण आहे, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला दाद दिली जाते हे लोकांना वाटले पाहिजे. त्याचे म्हणणे ऐकून त्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सोडवून केली जाते असे वाटले पाहिजे. श्रीमती चित्रा साळुंके ह्या गेल्या अनेक वर्षापासून न्यायाची अपेक्षा करीत आहेत. पण त्यांना न्याय मिळताना दिसत नाही.

मी आता गृहनिर्माण विभागावर बोलणार आहे. आजच म्हाडाची लक्षवेधी सूचना सभागृहा समोर आली होती. त्यावर माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. कुठल्या वर्षी किती एरिया वाटला गेला या संबंधातील माहिती माझ्याकडे आहे. मी त्या उत्तराची वाटच बघत होतो. आपल्याच सभागृहाचे सदस्य त्यात असल्यामुळे मी काही बोललो नाही. हे प्रकरण कोर्टात सुरू आहे. या प्रकरणी मला जनहित याचिका कोर्टात दाखल करायची आहे. त्यातून मला सर्व बाहेर काढायचे आहे. त्याद्वारे मला म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहारावर प्रकाश टाकायचा आहे.

बोरिवली पूर्व येथे मागाठाणे येथे नगर भूरचना क्रमांक 212 खाली 3 एकर 11 गुंठे जमिनीचा निवडा 1970 मध्ये घोषित करण्यात आला. त्याचा ताबा दिनांक 4.8.1070 रोजी म्हाडाकडे दिला. ही केस आपल्या अधिकाऱ्यांना पाठ असेल. कारण या केसच्या चौकशीत बरेच अधिकारी दोषी सापडले आहेत.

सन 1982-83 मध्ये 7/12 च्या उताऱ्यावर श्रीमती पुरीबाई देवराज खंबाला या बाईचे नाव आले. त्यानंतर इतर दोघांचा हक्कांमध्ये समावेश झाला. ही पुरीबाई 1977 मध्ये वारली. तिचे नाव यामध्ये आले होते. हे प्रकरण न्यायालयामध्ये गेले होते. न्यायालयाने 60:40 पद्धतीने जागेचा उपयोग करावा असे म्हटले आहे. या सूत्रा नुसार काय केले ? आरक्षणात आलेला सगळा भाग म्हाडाला दिला आणि खुला आहे तो संबंधितांनी घेतला. 60:40 या तत्त्वावर तडजोड करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. त्याचवेळी या जमिनीवरील सर्व आरक्षणे व अतिक्रमणे याच प्रमाणामध्ये विभागण्यात यावी असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार म्हाडाला 1981 चौ.मी व संबंधितांना 1321 चौ.मी.जमीन मिळणार होती. परंतु, म्हाडा अधिकाऱ्यांनी प्राप्त होणाऱ्या 1981 चौ.मी.जमिनीचे खोडीयारमाता, विठ्ठलनगर, रबारी देवराजभाई झोपडपट्टयांना पुनर्वसन योजनांसाठी एसआरएची मान्यता दिली होती. अशा प्रकारे म्हाडाला मिळणारी 60 टक्के जमीन म्हाडाच्या योजनेसाठी शिल्लक राहिली नाही. त्यामुळे या संदर्भात याचिका दाखल झाली असता माननीय न्यायालयाने एससी सूट क्र.2128/08 या प्रकरणी दिनांक 4.11.2009 रोजी दिलेल्या

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

अंतरिम निकालामध्ये तडजोडनाम्या संदर्भात म्हाडावर ताशेरे ओढले आहेत. यात सारांशाने तडजोडकरार करणाऱ्यांनी फसवणूक केली असल्याचे दर्शविले आहे. यामध्ये प्रामुख्याने प्राधिकरणा समोर सादर केलेल्या टिप्पणीत सर्व वस्तुस्थिती निदर्शनास आणण्यात आलेली नाही. एवढेच नव्हे तर प्राधिकरणापुढे घ्यावयाच्या प्रस्तावाची काळजीपूर्वक तपासणी न करणे किंवा वस्तुस्थिती दडवून ठेवणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KTG/ST पूर्वी श्री.ओटवणेकर . . . . 14:55

श्री.विनोद तावडे . . . .

सभापती महोदय, म्हाडाच्या 60 टक्के जमिनीच्या लगत असलेल्या सीटीएस क्रमांकाच्या जमिनीवर खोडीयार माता, विठ्ठल नगर, रबरी देवराजभाई या झोपडपट्टी पुर्नयोजनेच्या परिशिष्ट-2 व जमीन क्षेत्राच्या प्रमाणपत्राबद्दल जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले ही बाब संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने व हेतू पुरस्सर पूर्ण करण्याचा प्रस्ताव हाताळण्यात आलेला दिसतो. त्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर याची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्या बाबत उपाध्यक्ष, म्हाडा यांना निर्देश देतो असे म्हटले आहे. श्यामसुंदर शिंदे, सुभाष सोनावणे, बिपीनकुमार श्रीमाळी, होनाजी जावळे या सर्व अधिकाऱ्यांनी मिळून केल्याचे त्यामध्ये सिध्द झाले असा आक्षेप चौकशी अहवालामध्ये ठेवण्यात आला आहे. असे असताना या अधिकाऱ्यांवर अद्याप दोषारोपपत्र देखील बजावले नाही म्हणजे एक प्रकारे लूट करा, मनमानी करा अशी अधिकाऱ्यांना मोकळीक दिल्यासारखे आहे. एस.आर.ए.चे अधिकारी पुढे कसे बिल्डर झाले याची सर्वांना माहिती आहे आणि त्यांच्यावर गुन्हा सिध्द होऊनही आपण दोषारोपपत्र दाखल करीत नसाल तर मुंबईतील या लूटीच्या प्रकारामध्ये अधिकारी सामील असताना त्याला राजकीय नेतृत्व संरक्षण देत आहेत म्हणजे तेही यामध्ये समाविष्ट आहेत असा मी त्याचा अर्थ काढतो.

सभापती महोदय, नगरविकासाच्या बाबतीत सांगावयाचे तर नवीन पनवेल येथील सेक्टर-21 मधील 53,799.99 चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन माझगाव डॉक लिमिटेडला हस्तांतरण शुल्क आकारुन कर्मचाऱ्यांसाठी निवासी इमारती बांधण्याकरिता वाटप केली. कंपनीने स्वत: या जागेवर इमारती बांधाव्यात असे अपेक्षित होते. परंतु त्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी स्थापन केलेल्या 15 सहकार गृहनिर्माण संस्थांना माझगाव डॉक लिमिटेडने जमीन हस्तांतरीत केली. यामध्ये सिडकोची भूमिका काय होती? यामध्ये सिडकोने भूमिका का बदलली? कंपनीने स्वत: निवासी इमारती न बांधता सदरच्या जमिनीचा ताबा घेऊन ही जमीन या 15 सहकारी गृहनिर्माण संस्थाना वाटप करण्याचे ठरविले असते तर सहकारी गृहनिर्माण संस्थांना नवीन पनवेल येथे भूखंड वाटप करण्या साठी त्यावेळी प्रचलित असलेल्या दराने म्हणजेच रु.4000/- प्रती चौ.मी.या दराने सदरची जमीन वाटप करावी लागली असती. सिडकोच्या अधिकाऱ्यांनी जी चूक केली त्या चुकीवर पडदा टाकण्या- साठी प्रयत्न केला गेला. सिडकोने रु. 3920 प्रती चौ.मी.या दराने होणारी भाडेपट्टयाच्या फरकाच्या रकमेचा भरणा करण्यास या संस्थांना कळविले होते. तथापि केवळ स्वप्नपूर्ती संस्था वगळता इतर कोणत्याही संस्थेने फरकाची रक्कम भरली नाही. स्वप्नपूर्ती संस्थेने केवळ 40 लाख



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

रुपये भरले. अशा वेळी झालेल्या चुकीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न करुन देखील सोसायट्यांनी भाडेपट्टयाचा फरकाची रक्कम न भरल्याने सिडकोच्या अधिकाऱ्यांनी भाडेपट्टयाची रक्कम भरण्यास पुन्हा एकदा संधी मिळावी म्हणून या 15 संस्थांना फरकाची भाडेपट्टयाची रक्कम भरण्यास ठराविक अटीवर परवानगी देण्याचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या दिनांक 5-01-2010 रोजी झालेल्या बैठकी पुढे मांडण्यात आला. तथापि त्यावेळी सिडकोने तो प्रस्ताव फेटाळला. मग तोडपाणी झाली आणि पुढील बैठकीमध्ये प्रस्ताव पास झाला.

सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्क्याचा लाभ देण्याकरिता उदासीन असणाऱ्या सिडको अधिकाऱ्यांनी या संस्थांना (विकासकांना) पुन्हा एकदा संधी दिली. परंतु भारताचे महालखाकार, वाणिज्य लेखापरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी या जमिनीच्या अनियमित हस्तांतरणामुळे वित्तीय नुकसान झाले असल्याचे स्पेसिफीक म्हटलेले आहे. त्यामुळे या भूखंडाचे हस्तांतरण माझगांव डॉक लिमिटेडच्या कर्मचाऱ्यांच्या निवासी वसाहतीसाठी असताना ते हस्तांतरण संस्थांना कोणाच्या आर्शिवादाने झाले, कोणाच्या देवाणघेवणीतून झाले हा मुद्दा आहे. यामुळे सिडकोचे जे नुकसान झाले त्याची माहिती सदनाला दिली तर बरे होईल.

सभापती महोदय, मंत्रालयाला आग लागल्यानंतर त्याठिकाणी असलेली कार्यालये वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या दृष्टीने डेप्युटी सेक्रेटरीच्या लेव्हलचे अधिकारी तेथील कार्यालयात बसण्यासाठी गेले. परंतु त्यांना तेथे प्रवेश नाकारण्यात आला. त्यांना असे सांगण्यात आले की, अगोदर जागेच्या भाड्याची रक्कम करा आणि मग प्रवेश करा. पण त्या अधिकाऱ्यांना ज्या पध्दतीने बाहेर काढण्यात आले ती वस्तुस्थिती त्यांनी मला सांगितली. ते ऐकल्या नंतर माझ्या जिव्हारी लागले. याबाबत आम्ही सदनामध्ये विषय उपस्थित केला.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनायक मेटे)**

श्री. विनोद तावडे .....

वर्ल्ड ट्रेड सेंटर काय आहे, कोणाचे आहे आणि त्यांना कशासाठी जमीन दिली याची सगळी माहिती मी काढावयास लावली. त्यानंतर असे लक्षात आले की, 16 ऑक्टोबर, 1970 रोजी एम. विश्वश्वरय्या इंडस्ट्रिअल रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर यांना 71,071 चौरस मीटर जागा देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने करार केला. हा करार करताना एम. विश्वश्वरय्या इंडस्ट्रिअल रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर यांनी निव्वळ मिळकतीच्या 50 टक्के मिळकत शासनाला द्यावी, असे नमूद करण्यात आले. तसेच जमिनीचा वापर हा औद्योगिक सुविधांकरिता तसेच प्रदर्शन भरविण्याकरिता करण्यात यावा असे अटीमध्ये नमूद करण्यात आले. या जमिनीवर कोणतेही हॉटेल उभारण्यात येऊ नये असे देखील नमूद करण्यात आले. यापैकी कुठल्याही अटीचा भंग झाल्यास शासन जागा ताब्यात घेईल असे देखील आवर्जून नमूद करण्यात आले. या जमिनीवर कोणतेही हॉटेल उभारण्यात येऊ नये असे नमूद करुन देखील 1986 मध्ये 13,326 चौरस मीटरचा जो प्लॉट वापरात नव्हता त्यावर हॉटेल बांधण्याची परवानगी आपण दिली. आपण कोणावर खूश होता, का खूश होता, कोणाचा आशीर्वाद होता हे माहीत नाही.

त्यावेळी या हॉटेलला आपण 50 टक्के अधिक एफएसआय दिला. या करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे निव्वळ उत्पन्नाच्या 50 टक्के उत्पन्न अद्यापपर्यंत एम. विश्वेश्वरय्या इंडस्ट्रिअल रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटरने भरलेले आहे असे मला वाटत नाही. आपण ते मागितले असेही दिसत नाही. हॉटेलकरिता वापरलेल्या भूखंडाच्या भाडेपट्टयाच्या दराचे 15 वर्षांनी नूतनीकरण करावे अशी अट टाकून देखील नूतनीकरण झालेच नाही. आता ते दरमहा 285 रुपये प्रति स्क्वेअर फूट दराने ही जागा आज भाड्याने देत आहेत आणि सरकारला मात्र 20 रुपये प्रती चौरस फूट प्रमाणे भाडे देत आहेत. असे असताना हे माजलेले लोक आपल्याला बाहेर काढत आहेत. ज्यावेळी अडचण आहे, मंत्रालय जळलेले आहे त्यावेळी लोक स्वत: पुढे येतात. पण यांना राजकीय आश्रय असा मिळाला आहे की ज्यामुळे त्यांना अशी माजोरी सुचते. 71 हजार स्क्वेअर मीटर म्हणजेच 7 लाख 10 हजार स्क्वेअर फूट एवढ्या जागेचे 285 रुपये प्रति चौरस फूट या दराने 20 कोटी 23

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

लाख 50 हजार रुपये एवढ्या रकमेचे एम. विश्वश्वरय्या इंडस्ट्रिअल रिसर्च अँड डेव्हपमेंट सेंटर आज भाडे स्वीकारत आहे. वर्षाकाठी ही रक्कम 240 कोटी रुपयांपर्यंत जाते. यातील 100 ते 125 कोटी रुपये दरमहा राज्य शासनाला मिळाले असते. दुष्काळाकरिता देण्यासाठी पैसे नाहीत असे आपण म्हणतो त्याकरिता यातील पैसे देता आले असते. त्यामुळे अटींचे पालन न केल्यामुळे झालेल्या नुकसानीच्या बाबतीत कोणत्या अधिकाऱ्याची जबाबदारी आहे, कोणत्या मंत्र्यांची जबाबदारी आहे याचेही उत्तर या ठिकाणी मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, फक्त वर्ल्ड ट्रेड सेंटरच कशासाठी म्हणून मी आणखी काही जागांची माहिती घेतली. रोज इकडे येताना आपल्याला अमुक जिमखाना, तमुक जिमखाना असे अनेक जिमखाने दिसतात. तिकडे लग्न होतात, पार्ट्या होतात. त्या संदर्भातील कायदेकानून वाचायला मी सुरुवात केली. या जागा देताना प्रामुख्याने क्रीडा व इतर अनुषंगिक कारणांसाठी देण्यात आल्या. त्या ठिकाणी किती क्रीडा स्पर्धा होतात ? नंतर वापराच्या संदर्भात पुन्हा दुरुस्ती करण्यात आली. क्रीडा व्यतिरिक्त इतर कारणांसाठी जागा द्यावयाची असेल तर त्याचे जे काही पैसे असतील त्यातील अमुक पैसे भरले पाहिजेत असा नियम केला. त्यामध्ये सुध्दा कशा पळवाटा निघतात हे दिसून येते. 2006 मध्ये त्या ठिकाणी विवाह समारंभ घेण्याकरिता कायदेशीर परवानगी देण्यात आली. त्यामध्ये अशा अटी घातल्या की, पहिल्या दिवसासाठी 50 हजार रुपये व त्याच कार्यक्रमासाठी पुढील प्रत्येक दिवसासाठी 25 हजार रुपये भूईभाडे आगावू जमा करावे.

सभापती महोदय, हे जिमखाने आपल्याला मेंबरशीप देत नाहीत. कारण त्यांना लाल दिवेवाल्यांचा सपोर्ट असतो. विरोधी पक्षाच्या नाही तर सत्ताधारी पक्षाच्या लाल दिवेवाल्यांचा सपोर्ट असतो. त्यामुळे ते कसे माजतात हे लक्षात आले आहे. आपण प्रत्येक अधिवेशनांमध्ये मागणी केलेली आहे. एकाच दिवशी एकापेक्षा जास्त कार्यक्रम आयोजित केल्यास अशा प्रत्येक कार्यक्रमासाठी वरीलप्रमाणे भूईभाडे जमा होते. जिमखान्यांवर क्रीडेतर कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घ्यावयाची असते आणि भाडे दुप्पट असते. त्या ठिकाणी अशी जी लग्ने होतात त्यासाठी दीड-दीड कोटी रुपये आकारले जातात. सगळ्या मोनोपोलीज

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ ST/

श्री. विनोद तावडे .....

असतात. अशा प्रकारे जर सर्व मोनोपोलीज असतील, त्या ठिकाणी अशा पध्दतीने पैशाची लूट होत असेल तर त्याचा विचार केला पाहिजे. कायद्याने परवानगी दिली असताना 50 टक्के रक्कम सरकारकडे यावयास पाहिजे. या निमित्ताने माझे तर असे म्हणणे आहे की, मुंबईमध्ये ज्यांना सरकारी जमीन दिली त्या कायद्यानुसार त्या सगळ्यांचे ऑडिट केले पाहिजे. हल्ली श्वेतपत्रिका म्हटले की सगळे घाबरतात म्हणून मी त्याला ऑडिट म्हणतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 15:05

श्री.विनोद तावडे....

म्हणून मी माननीय महसूल मंत्र्यांना अशी विनंती करतो की, मुंबई, पुणे, नागपूर अशा मोठ्या शहरांमध्ये शासकीय जमिनींवर सामाजिक संस्था उभ्या राहिलेल्या आहेत त्यांचा वापर कसा होत आहे व राज्य सरकारकडे त्याद्वारे किती पैसा जमा झाला पाहिजे याचे ऑडिट करुन त्याची माहिती नागपूरच्या अधिवेशनामध्ये सभागृहाला सादर करावी.

सभापती महोदय, राज्यात पर्यावरण कायद्याचे उल्लंघन कशा प्रकारे होत आहे ते मी यापूर्वीही सांगितलेले आहे. जे.पी.मरीयट, आयसीसी रियलर्टस, पंचशील रियलर्टस, या पुण्यातील हॉटेल व विकासकांनी पर्यावरणाचे उल्लंघन करुन 50 टक्के बांधकाम पूर्ण केलेले आहे. त्या ठिकाणी एम.पी.सी.बी.फिरकलेले नाही. पण त्यांचे काम चालू आहे. त्याचप्रमाणे सेंटर वन, इनॉर्बिट, रहेजा, हिरानंदानी या सर्व विकासकांचे निवासी प्रकल्प सुरु आहेत. त्याच्याकडे एम.पी.सी.बी.चे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणांची जाहीर लोकहित सुनावणी करण्यात यावी. त्यांनी पर्यावरण कायद्याचे निकष पाळले आहेत का, नाही. हे विकासक कोर्टाच्या निर्णयाचा आधार घेत आहेत. आकृती निर्माण समूह अंतर्गत माहिम येथे हॉटेल बांधण्यासाठी 7.62 इतका एफएसआय दिला गेला. ही केस सुप्रीम कोर्टापर्यंत गेली होती.

गोवानी बिल्डर्सच्या नेपियन्सी रोडवरील हॉटेलच्या बांधकामास 8 पेक्षा जास्त एफएसआय देण्याला शासनाने मान्यता दिली आहे. डी.बी.रियल्टी, चर्नी रोड या पंचतारांकित हॉटेलसाठी 6.29 एफएसआय देण्यात आला. या पंचतारांकित हॉटेल्सना भरमसाठ एफएसआय देताना सीआरझेडमध्ये बसत आहे असे दाखविले गेले. परंतु सर्वोच्च न्यायालयाने दि.14.12.2007 च्या निकालामध्ये पंचतारांकित हॉटेल्सना वाढीव एफएसआय देण्यासंबंधी कोणतेही भाष्य केलेले नाही. पण या लोकांनी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून एक पत्र आणले. यापूर्वी आदर्श सोसायटीसाठी सुध्दा असेच पत्र आणले होते. त्या पत्राच्या आधारावर सुप्रीम कोर्टाकडून निर्णय घेतला की, 1967 मधील कलम लागू करा. 1967 सालातील कलमाचा आधार घेऊन एका ठिकाणी परवानगी दिल्यानंतर पंचतारांकित हॉटेलसाठी एफएसआय देण्याचा स्वेच्छाधिकार असल्याचे सांगून याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य शासनाला दिला. त्यांना द्या असे सांगितलेले नाही, अधिकार वापरावेत, सीआरझेडच्या तरतुदी बघ्याव्या, नियम बघा त्यानंतर परवानगी द्यावी असे सांगितले होते. त्यानुसार शासनाने हिल्टर टॉवरला 1.95, ऑबेरॉय हॉटेलला 1.00, हॉटेल प्रसिडेन्टला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.विनोद तावडे....

0.82, ताजमहाल हॉटेलला 2.28 इतका अतिरिक्त एफएसआय दिला. परंतु नवीन विकासकांना 7 एफएसआय, 8 एफएसआय कसा काय देण्यात आला ? असा प्रश्न मुंबईकर म्हणून सामान्य माणसाला पडतो. त्यामुळे आकृती, गोवानी, डी.बी.रियल्टी असेल या सर्वांना सीआरझेडचा कायदा लागू असताना त्यांना परवानगी कशी दिली ? या प्रश्नांची उत्तरे आम्हाला अपेक्षित आहेत.

सभापती महोदय, या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात असे म्हटले आहे की, "The discretion vested under Rule 10(2) of the D.C. Rules, 1967 cannot be exercised arbitrarily or capriciously or as per the whims of the Authority concerned. The exercise of the discretion must be in consonance with the principles incorporated in Article 14 of the Constitution." घटनेच्या अनुच्छेद 14 नुसार यापूर्वी कमी एफएसआय देण्यात आला होता. परंतु नंतरच्या लोकांना वाढीव एफएसआय का देण्यात आला ? समान कायद्याचे तत्व येथे पाळले गेले आहे का ?

सभापती महोदय, आम्ही नाशिकला जात असताना भुजबळ सिटी, नॉलेज सिटी दिसते. मधल्या रस्त्यामध्ये भिवंडी येथे गोदामे दिसतात. ही सर्व गोदामे अनधिकृत आहेत. या गोदामाचा विषय उपस्थित करण्यात आल्यानंतर ती तोडण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु त्या आदेशांचे पालन अद्यापपर्यंत झालेले नाही. ती गोदामे कोणत्याही नियमाला अनुसरुन बांधण्यात आलेली नाहीत. त्यापैकी 90 टक्के गोदामे शासकीय व खाजगी जमिनीवर अतिक्रमण करुन उभी राहिलेली आहेत. त्यातील बरीच गोदामे विदेशी कंपन्यांची आहेत. तेथे फायर सेफ्टी नॉर्मस पाळलेले नाहीत. सिडको व एमएमआरडीएने याबाबतची माहिती दिली पाहिजे असे त्यांना सांगितलेले आहे. त्यानंतर एमएमआरडीएने 190 गोदाम मालकांना व विकासकांना नोटिसा दिलेल्या आहेत. त्यांना नोटिसा दिल्यानंतरही त्यांनी आजपर्यंत कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही. ही त्यातील वस्तुस्थिती आहे. गोदाम मालकांनी फायरब्रिगेडकडून एनओसी घेतलेली नाही. स्पेशल प्लॅनिंग ॲथोरिटी म्हणून एमएमआरडीएने फायरब्रिगेडची व्यवस्था पुरविण्याचे काम करणे
आवश्यक होते, परंतु त्यांनी ते काम केले नाही. जर पुन्हा एकदा आगीचा प्रसंग ओढवला तर अनर्थ घडू शकतो. या बेकायदेशीर गोदामांना कोण संरक्षण देत आहे ?

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:10

श्री. विनोद तावडे....

या बेकायदेशीर गोडाऊनमागे कुणी तरी एक मोठा गुंड आहे असे बोलले जाते. त्याला कुणाचा पाठिंबा आहे ? उद्या त्या ठिकाणी आग लागली, मोठे अग्नीकांड घडले तर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली बदनामी झाल्या शिवाय राहाणार नाही. म्हणून या ज्या काही बेकायदेशीर गोष्टी सुरु आहेत त्या कोठे तरी थांबल्या पाहिजेत.

सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये नमूद केलेल्या नगरविकास आणि महसूल खात्याच्या प्रकरणांचा या सरकारने पाठपुरावा केला तर आपले राज्य सरकार दुष्काळग्रस्त शेतक-यांना 10 हजार कोटी रुपयाचे पॅकेज निश्चितच देऊ शकेल एवढा महसूल त्यामधून जमा होईल. गृहखात्याच्या संदर्भात मी सांगितले की, जिग्ना व्होरा सारख्या पत्रकाराला जाणीवपूर्वक फसवून पत्रकारांचे तोंड बंद करण्याचा केलेला प्रयत्न आणि ख-या मारेक-या पर्यंत न पोहोचण्यासाठी दारे बंद करण्याचा केलेला प्रयत्न या सर्व प्रश्नांच्या बाबतीत या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी काही फार मोठे भाषण करणार नाही. मी फक्त दोन-तीन मुद्दे या ठिकाणी मांडणार आहे. गृह खात्याच्या संदर्भातील मुद्दे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी मांडले. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे देखील विविध मुद्दे या ठिकाणी मांडतील. आता दूरदर्शनवरील वाहिन्यांच्या माध्यमातून अबु जुंदालच्या बाबतीत जी बातमी दाखविण्यात आली त्यावरुन मला 'मेरे मेहबूब' या जुन्या सिनेमाची आठवण झाली. आम्ही तेव्हा कॉलेजमध्ये जात होतो. साधारणत: 1961-62 या काळातील तो सिनेमा होता. त्या सिनेमामध्ये नायक नायिकेच्या बुरख्यातून दिसलेल्या डोळयांवर प्रेम करतो. परंतु प्रत्यक्ष नायिका कोण हे त्या नायकाला समजत नाही. त्याप्रमाणे जेव्हा अबु जुंदालला पकडण्यात आले त्यावेळी बीड मधून एक बुरखा घातलेली महिला दूरदर्शनवर आली. त्या महिलने दूरदर्शन समोर सांगितले की, हा अबु जुंदाल नाही, हा माझा मुलगा अबु जुंदाल नाही. ती बुरख्यातील महिला दूरदर्शनवरुन जेव्हा हे सांगत होती त्यावेळी त्या महिलेचे फक्त डोळे दिसत होते. ती बुरखा घातलेली महिला अबु जुंदालची आई असल्याचे दूरदर्शनवरुन सांगत असताना खरेच ती अबु जुंदालची आई आहे हे कसे समजणार. एखादी दुसरी महिला अबु जुंदालची आई म्हणून कशावरुन आणली गेली नसेल ? त्यामुळेच कधी कधी पोलिसांना गुन्हेगार शोधण्यास कठीण जात असावे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.शिगम.. 15:15

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यातील पोलिसांच्या भरती संदर्भातील विषय मी येथे मांडणार आहे. पोलीस विभागाचा कारभार विक्षिप्तपणाचा असू शकतो याचे ते एक उत्तम उदाहरण आहे. दिनांक 17 डिसेंबर 2011 रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून 420 पदांची जाहिरात देण्यात आली. ज्यांची परीक्षेत निवड झाली त्यांची वैद्यकीय चाचणी करुन त्यांना नोकरीत सामावून घेण्यात आले. त्यानंतर लगेचच दोन-तीन दिवसांनी समांतर आरक्षणाचा मुद्दा काढून त्यातील 106 जणांना कामावरुन कमी करण्यात आले. शासन चालविण्याची ही पध्दत आहे का हे मला कळत नाही. माननीय उच्च न्यायालयाच्या एका निर्णयावरुन त्यांना काढून टाकण्यात आले असे सांगण्यात आले. न्यायालयाचा निर्णय त्याच दिवशी लागलेला नाही. तो निर्णय अगोदर लागला असेल. त्याच प्रमाणे पोलिसांच्या नियुक्तीचे आदेश एका दिवसांत काढण्यात आले नाहीत. शासनाच्या अशा कारभाराबाबत मला आश्चर्य वाटते. प्रशासनाने त्या 106 कुटुंबाना उद्ध्वस्त केलेले आहे,बरबाद केलेले आहे. प्रशासनाने समांतर आरक्षण पाळावे. परंतु जे 106 जण आपली अगोदरची नोकरी सोडून पोलीसमध्ये भरती झाले आहेत. तेव्हा या 106 जणांच्या बाबतीत शासन कोणता निर्णय घेणार आहे याचा येथे खुलासा झाला पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी श्री.वसंत ढोबळेंचे प्रकरण उपस्थित करण्यात आले. ढोबळे वाईट आहेत की चांगले आहेत या बाबत बरीच मतमतांतरे आहेत. जो वाईट असतो त्याला चांगलेच ठोकले पाहिजे असे समाजामध्ये सर्वसाधारण मत आहे. पोलीस त्यांना कोणत्या पध्दतीने ठोकते त्याचे त्यांना देणेघेणे नाही. मला येथे सांगायचे आहे की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर आहे. या ठिकाणी कितीही ढोबळे आले तरी बऱ्या वाईट गोष्टी चालत राहणार आहेत. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी डान्स बार बंद करणार अशा कितीही वल्गना केल्या तरी डान्सबार चालूच राहणार आणि आबांची निंदा होतच राहणार. एका पोलीस अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, "आपणास हे थांबविता येत नाही. हे सर्व थांबावे असे वाटत असेल तर आपणास करमणुकीसाठी एक वेगळा विभाग करावा लागेल. त्या विभागामध्ये वेश्या व्यवसाय आणि रेव्हपार्टी सोडून दारु ते नाचाच्या कार्यक्रमापर्यंत परवानगी द्यावी. आपण असा विभाग केल्यास तो विभाग सोडून अन्य विभागामध्ये तसे प्रकार होणार नाहीत व मुंबईतील नागरिक सुखाने जगतील." आपण असे केल्यास ढोबळेंच्या नावाने जी ओरड सुरु आहे ती देखील थांबेल असे मी येथे सुचवितो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, नगर विकास विभागाचा मुद्दा अतिशय गंभीर आहे. श्री.प्रताब आसबे, पत्रकार यांचा वर्तमानपत्रात एक लेख आला आहे. तो मी जशाच्या तसा वाचून दाखवितो कारण त्यांच्या शब्दांमध्ये योग्य भाव आलेले आहेत. पाप कोणाचे ताप कोणाला अशी परिस्थिती आहे. श्री.रामानंद तिवारींनी केलेले पाप दुसऱ्या सचिवाला भोगावे लागत असेल तर ती बाब अतिशय गंभीर आहे. शासन त्या सचिवाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणार की नाही हा प्रश्न आहे. केवळ ते त्या पदावर आहेत म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे ही फार गंभीर बाब आहे. सभापती महोदय, श्री.प्रताप आसबे यांनी त्याच्या लेखात म्हटले आहे की, "हिरानंदानी यांनी अटींचे उल्लंघन केल्याने त्यांच्या विरोधात काही लोक हायकोर्टात गेले होते. या प्रकरणी गुन्हेगारी स्वरुपाची कारवाई व्हावी असे अर्जदारांचे म्हणणे असल्याने, तुम्हाला योग्य वाटत असेल तर, खासगी क्रिमिनल कम्प्लेंट करा, असे हायकोर्टाने सांगितले. त्या आधारे काही लोक हिरानंदानी आणि बेंजामीन यांच्या विरोधात सत्र न्यायालयात गेले. त्या न्यायालयाने एसीबीला एफआयआर दाखल करण्याचा आदेश दिला. असा एकंदर इतिहास आहे. यात हिरानंदानी यांच्यावर कारवाई व्हायलाच हवी. श्री.विलासराव देशमुख व श्री.अशोक चव्हाण यांनी चुका केल्या असतील तर त्याची फळे ते भोगतीलच. पण या प्रकरणात दोघे माजी मुख्यमंत्री, बेंजामीन यांच्यासह कोणीही बिल्डरची पाठराखण केल्याचे दिसत नाही. उलट, कठोर दंडात्मक कारवाई केली. दंड कमी असणार नाही आणि अवाजवीही असणार नाही याची काळजी घेतली. फसवणुकीमुळे विलासरावांनी हिरानंदानी यांना भेटीसाठी वेळही दिला नाही. बेंजामीन हे सचोटीने वागणारे अधिकारी आहेत. त्यांच्या कारभारामुळे अनेक दुखावले आहेत. नौदलाच्या आक्षेपामुळे "हरसिध्दी" इमारतीची ओसी मागे घेणे, हेही त्यातले एक उदाहरण सांगितले जाते. पण, आजच्या गढूळ वातावरणात या बाबींकडे कोणी लक्ष देणार नाही. एफआयआर नोंदविले गेले आहेत. त्या चौकशीला त्यांना सामोरे जावेच लागेल. चुका केलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. पण, सचोटीच्या अधिकाऱ्यांवर विनाकारण कारवाई झाली तर प्रशासनाचे नीतिधैर्य खच्ची होते."

सभापती महोदय, श्री.बेंजामीनच्या संदर्भात मी हा विषय मांडलेला आहे. श्री. बेंजामीन यांना मी मागील 15-20 वर्षापासून ओळखत आहे. आयुष्यात निस्पृह, सचोटीने व कठोरतेने काम करणारा अधिकारी कोणाच्या तरी चुकीमुळे, त्या जागेवर आहे म्हणून पापाचा धनी होत असेल तर शासनाने त्यांची खंबीरपणे पाठराखण केली पाहिजे. यानंतर श्री.गिते..

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

तर शासनाने अशा अधिकाऱ्यांच्या पाठिमागे खंबीरपणे पाठराखण केली पाहिजे. श्री.प्रताप आसबे यांनी लिखाणामध्ये जे मत व्यक्त केले आहे, त्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. आपण प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या पाठीमागे अशा प्रकारचा ससेमिरा लावला तर शासनाच्या सेवेत प्रामाणिक अधिकारी राहणार नाहीत. श्री.रामानंद तिवारी यांचे पाप श्री.बेंजामीन यांच्या माथ्यावर मारु नका.

सभापती महोदय, मी आता माझ्या मुख्य विषयाच्या बाबतीत बोलणार आहे. माझा मुख्य विषय गिरणी कामगारासंबंधीचा आहे. या प्रस्तावामध्ये नगरविकासाच्या सततच्या बदलत्या धोरणामुळे गिरणी कामगारांचा प्रश्न बिकट झाला असा एका ओळीचा उल्लेख केलेला आहे. गिरणी कामगारांच्या प्रश्नावर अनेक वेळा या सभागृहात चर्चा झालेली आहे. शासनाने 2000 साली एक-तृतियांश, एक तृतियांश, एक तृतियांश असा कायदा केला होता. शासनाने तो कायदा आता बदललेला आहे. त्या कायद्यामुळे गिरणी कामगारांची उध्वस्तता निर्माण झाली, त्यामुळे गिरणी कामगारांचा प्रश्न निर्माण झाला. या सभागृहात माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिनभाऊ अहिर सभागृहात नाही. मला त्यांचे अभिनंदन करावयाचे आहे. कामगारांची एकजूट फोडून ते वेगवेगळे गट निर्माण करण्यामध्ये ते यशस्वी झाले. त्याला कसब लागते. गिरणी कामगार हे एकजुटीत होते त्यावेळी माननीय मुख्यमंत्री सुध्दा झुकत होते. जो पर्यंत गिरणी कामगारांमध्ये एकजूट होती, तो पर्यंत सर्व पक्षाचे कामगार नेते त्यांचा आदर करीत होते. या गिरणी कामगारांनी काय इतिहास घडविला आहे हा सर्वांना माहिती आहे.

महोदय,गिरणी कामगारांच्या बलिदानातून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. गिरणी कामगारांना घरे मिळावीत म्हणून सर्व गिरणी कामगार एकत्र आले. माननीय श्री.उध्दव ठाकरे यांनी जिजामाता उद्यान ते आझाद मैदानापर्यंत गिरणी कामगारांचे नेतृत्व केले. ती एकजूट बघून सरकारने गिरणी कामगारांकडून अर्ज मागविले, त्या अर्जाची छाननी केली, 1 लाख 49 हजार 652 अर्ज आले. कोणत्या वर्षापर्यंतचे घ्यावयाचे यासंबंधी वाद होता. ते पण सरकारने मान्य केले. सर्व गिरणी कामगारांना घरे दिली पाहिजेत अशा प्रकारची भूमिका सरकारने घेतली. या मागे कामगारांची एक वज्रमुठ होती. गिरणी कामगारांसाठी 6000 घरे तयार होती, त्या घरांची लॉटरी काढण्यात आली. या सभागृहात मुंबईत वास्तव्य असलेले अनेक सन्माननीय सदस्य आहेत. 225

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

चौरस फुटाचे 32 व्या माळयावर गिरणी कामगाराला घर उपलब्ध करुन दिले तर तो गिरणी कामगार तेथे कसा काय राहू शकतो. त्याच्या घरातील शौचालयाचा पाईप फुटला तर उभी हयात तो गिरणी कामगार त्या पाईपची दुरुस्ती करु शकणार नाही एवढा खर्च त्या दुरुस्तीला येईल. हे कोणाच्या कल्पनेतून आले आहे. गिरणी कामगारांना 32, 33 व्या माळयावर घरे दिली तर लिफ्टचा खर्च, पाण्याचा खर्च या गिरणी कामगारांना परवडेल काय? शासनाकडून सांगितले जाते की, आम्ही गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन देत आहोत. माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सचिन अहिर यांच्या बुध्दीमत्तेला दाद दिली पाहिजे. त्यांना त्यांच्या खात्याने सांगितले म्हणून केले की त्यांना वाटले म्हणून केले.

महोदय,म्हाडाचा असा नियम आहे की, तुम्हाला दिलेले घर पाच वर्षे भाडयाने देता येत नाही. तसेच ते घर विकता येत नाही. माननीय श्री. सचिन अहिर यांनी जाहीर केले की, गिरणी कामगारांनी चिंता करु नये. तुम्ही घरासाठी 7.50 लाख रुपये बँकेकडून कर्ज घ्या आणि ते घर आपल्या ताब्यात घेतल्या नंतर ते घर भाडयाने द्यावे. तुम्हाला जे भाडे मिळेल त्यातून तुमचे हप्ते फेडले जातील. गिरणी कामगार पुन्हा रस्त्यावर राहिला तरी चालेल. आपण गिरणी कामगारास राहण्यासाठी घरे देत आहात. भाडयाने घरे देऊ शकता अशी अधिकृत घोषणा माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री यांनी केली ही गोष्ट बरोबर नाही. याचा अर्थ माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांकडे भाडेकरु सुध्दा उपलब्ध आहेत. गिरणी कामगारांची शासनाकडून क्रूर थट्टा चाललेली आहे ही बाब अतिशय गंभीर आहे. 1लाख 49 हजार 652 गिरणी कामगारांना घरे कशी काय देणार आहात या गोष्टीचा सरकारने वास्तवतेच्या दृष्टीने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, काल गिरणी कामगारांचा विधानसभेवर मोर्चा आला होता. आम्हाला मुंबईत एमएमआरएडीनी बांधलेली घरे देण्यात यावीत, मुंबईत शासनाच्या जागा आहेत, त्या जागेवर 3 हजार घरे बांधून देण्यात यावीत, 1लाख 50 हजार गिरणी कामगारांचा प्रश्न सुटत नाही. गिरणी कामगारांना घरे कशा प्रकारे उपलब्ध करुन देता येतील याचा मी सातत्याने विचार करीत असतो. मी या ठिकाणी मत मांडतो आहे ते पक्षाचे मत नाही. मी कोणत्याही कामगार संघटनेच्या नेत्यांशी चर्चा केलेली नाही. परंतु मी या प्रश्नाचा वर्षानुवर्षे पाठपुरावा करीत आहे.

3...



ABG/ D/ ST/ प्रथम श्री.अजित 15:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

प्रत्येक गिरणी कामगाराला घर मिळाले पाहिजे अशी सर्वांची भूमिका असली पाहिजे. सरकारला कोंडीत न पकडता हा तिढा सोडवावयाचा असेल तर शासनानेच सक्षम पर्यायांचा विचार केला पाहिजे. मी प्रत्येक अधिवेशनात गिरणी कामगारांच्या घरासंदर्भात बोलत असतो....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, म्हाडाने जी घरांची लॉटरी काढली आहे त्यासंदर्भात मी बोलणार आहे. गिरणी कामगारांच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. माझे काही मोजकेच महत्वाचे मुद्दे मी मांडणार आहे. दीड लाख गिरणी कामगारांच्या हिताचा विषय आहे....

**तालिका सभापती** (श्री.विनायक मेटे) : या विषयावरील चर्चा आपल्याला 4.20 वाजेपर्यंत माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह पूर्ण करावयाची आहे. सदर चर्चा अडीच तासांची आहे. तेव्हा माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले विचार व्यक्त करावेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खालच्या सदनामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर जवळजवळ तीन तास चर्चा झाली होती. मागील अधिवेशनात आमचे दोन्ही प्रस्ताव प्रलंबित राहिले होते. मी महत्वाच्या मुद्यांवर बोलणार आहे.

सभापती महोदय, म्हाडाने लॉटरी काढली त्यामध्ये घोळ झाला. घाईघाईने घरांची लॉटरी काढण्यात आली. प्रकरण उच्च न्यायालयात गेले आणि आता घरांची काढलेली लॉटरी रद्द होण्याची शक्यता आहे. त्यांच्यामध्ये भांडणे निर्माण झाली. सभापती महोदय, घरांसाठी जमीन किती उपलब्ध होणार आहे हा माझा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. ते कोणी देत नाही. गिरणी कामगारांना फुकट घरे दिली पाहिजेत असा उध्दवजींचा आग्रह आहे. संघटनेचा आग्रह आहे की फुकट घरे द्या. काही मंडळी म्हणतात की थोडेसे पैसे घ्या. सर्वांना घरे फुकट की माफक दरात आणि ती कशी मिळणार आहेत याचा विचार करणे अत्यंत महत्वाचे आहे. जमीन किती उपलब्ध होणार आहे हे सुध्दा पाहिले पाहिजे. दोन दिवसापूर्वी म्हाडाच्या जुन्या प्रॉपर्टीचा पुनर्विकास कसा करावयाचा याविषयी चर्चा झाली. पुनर्विकास करावयाचा झाला तरी प्रिमियम म्हणून अतिरिक्त एफएसआय देणार नाही.असे सांगण्यात आले. मी त्यावेळी उठून सांगितले की, तसा देऊ नका म्हाडाच्या पुनर्विकासातून गिरणी कामगारांसाठी 25 टक्के अतिरिक्त घरे निर्माण केली तर 5 ते 10 हजार गिरणी कामगारांचा घरांचा प्रश्न 100 टक्के सुटू शकतो.

सभापती महोदय, म्हाडाने 5 लाख भाडयाची घरे देण्यास तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यातील किमान 1 लाख घरे गिरणी कामगारांसाठी द्यावीत. कामगारांना ती परवडतील आणि तो विषय नक्कीच मार्गी लागू शकतो. एसआरए योजनेमधून मुंबईमध्ये 10 लाख घरे निर्माण होणार

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहेत. त्यातील 1 ते 2 लाख घरे झाली असतील. पुढच्या प्रत्येक एसआरए योजनेमध्ये .001 इतका एफएसआय वाढवून दिला तरी गिरणी कामगारांना घरे उपलब्ध होतील. एसआरए योजनेमधून घरे बांधताना रिक्रिएशन ग्राऊंड, बालवाडी या क्षेत्राच्या बाहेर जाऊन परवानगी दिली तर 50 हजार घरे एसआरए योजनेमधून गिरणी कामगारांना मिळू शकतील. या अगोदर ज्या योजना झाल्या असतील त्या योजनेच्या प्रवर्तकांनी संक्रमण शिबिरामध्ये घर द्यावे. यातून घराची हमी मिळू शकेल.

सभापती महोदय, या संपूर्ण योजनेचा विचार करीत असताना नुकतेच आदरणीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, गिरणी कामगार जेथें गावाला राहतात तेथे जमीन वगैरे आहे काय याचा विचार करा. जिल्हाधिका-यांना आदेश दिले की, गावात जमीन आहे काय बघा म्हणजे जमीन देऊन गिरणी कामगारांना तुमची तुम्ही घरे बांधा असे सांगण्याचा सरकारचा विचार दिसतो आहे. ठाण्याच्या शेजारी नवे ठाणे उभारणार अशी घोषणा झाली आणि त्याला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली. ठाणे खाडी किनारा विकास प्रकल्पाला आज मुख्यमंत्र्यांनी हिरवा कंदील दिला. या प्रकल्पांतर्गत ठाणे खाडीचे सुशोभिकरण, संवर्धन, खाडीच्या पूर्वेला 30 कि.मि. लांबीचा रस्ता बनविणे आणि खाडी किना-याच्या पूर्वेला 100 चौ.कि.परिसरामध्ये नवीन शहर बसविणे असे सांगितले आहे. तेथे जरी उपलब्धी केली तरी 25 किंवा 30 हजार चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा एखादा प्लॉट मुंबईच्या शेजारी गिरणी कामगारांसाठी उपलब्ध होऊ शकतो. बी.जी.शिर्के किंवा शशी प्रभू अशा नावाजलेल्या कंपन्यांकडून आराखडा घेण्याचा प्रयत्न केला तर सर्व सुविधांसहित 25 हजार घरे बांधण्याकरिता 3000 कोटी खर्च येईल. 15 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढावे लागेल आणि मुंबईत ज्या गिरण्यांच्या जमिनी उपलब्ध आहेत त्याची किंमत जास्त आहे म्हणून हा प्रकल्प व्हायेबल करुन गिरणी कामगारांना येत्या पाच वर्षात 100 टक्के घरे या ठिकाणी मिळतील अशी उपलब्धी त्यांना करुन द्या.

नंतर श्री.भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

त्यांच्या संघटनेच्या प्रतिनिधींना बोलवा, त्यांच्याशी चर्चा करा आणि त्यांना कायमस्वरुपी घरे मिळण्याची व्यवस्था करा. ती व्यवस्था शासनाला करावीच लागेल. अन्यथा त्यांच्या न्याय हक्क मागण्यांसाठी आम्ही लढा देण्याकरिता बाहेर रस्त्यावर आणि सरकार आतमध्ये असा प्रकार सतत चालणार आहे. म्हणून शासनाने एकदा राजकीय इच्छाशक्ती दाखवून दीड लाख गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न धसास लावावा.

सभापती महोदय, आता मिलच्या जागेवर आणखी घरे उपलब्ध होणे शक्य नाही याची गिरणी कामगारांना देखील कल्पना आहे. शक्य असेल त्या ठिकाणी जरुर घरे उपलब्ध करुन द्यावीत. मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन केले आहे. त्यांनी गिरणी कामगारांच्या संघटनांना कसे मोहित केले माहिती नाही. त्यांचे दोन मोर्चे काढण्यात येणार आहेत. एक मोर्चा काल येऊन गेला आणि दुसरा मोर्चा 15 दिवसांनी निघणार आहे. दीड लाख गिरणी कामगारांना घरे कशी देता येतील या बाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुंबई पोलीस दलाबाबत दोन-तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यातील एक प्रकरण चित्रा अनंत साळुंके यांचे आहे. मागील अधिवेशनात चित्रा साळुंके प्रकरणाची माहिती मी पटलावर ठेवली होती. पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, या विषयाबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले काय मत मांडले यापेक्षा फॅक्ट सभागृहासमोर येणे हा उद्देश आहे. जेव्हा कॅमेऱ्यासमोर गेल्यानंतर आपण सर्वजण म्हणतो की, कायद्याला आम्ही मानतो, कोर्ट जो काही निर्णय देईल तो आमच्यासाठी महत्वाचा असेल. या केसमध्ये कोर्टाने वेगवेगळे निर्णय दिलेले आहेत. न्या.गोवेकर, न्या.एस.के.शहा, मुंबई उच्च न्यायालय, न्या.धर्माधिकारी, मुंबई उच्च न्यायालय, प्रिन्सिपल जज्ज स्वप्ना जोशी, जज्ज श्रीमती बाम यांनी निर्णय दिलेले आहेत.

सभापती महोदय, आज मुंबई पोलीस दलामध्ये खरोखर कर्तबगार अधिकारी कार्यरत आहेत. राकेश मारिया, विश्वास नांगरे-पाटील, मोहन राठोड, नवल बजाज यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. अशा कर्तबगार अधिकाऱ्यांच्या मागे ससेमिरा लावायचा, त्यांना नाहक चौकशी प्रकरणात गुंतवायचे, 2002 पासून 2012 पर्यंत अशी प्रकरणे सुरु ठेवायची. एल.एल.बी परीक्षेला पेपर दिलेले होते की नाही अशा प्रकरणाची चौकशी यांच्याकडे द्यायची, शहराच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासाठी कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना गुंतवून त्यांची स्टेटमेंट द्यायची. वेगवेगळ्या कोर्टांनी दिलेले निर्णय लक्षात घेऊन आतापर्यंत 11 गुन्हयांची नोंद झाली. त्यापैकी 10 गुन्हे आझाद मैदान पोलीस ठाणे आणि 1 गुन्हा वाकोला पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात पेपर तपासण्याची गरज आहे. खऱ्या अर्थाने नामवंत अधिकाऱ्यांना त्यामधून न्याय मिळू शकेल. कोणत्या तरी एका अधिकाऱ्याची व्यवस्थित चौकशी झाली नाही म्हणून प्रत्येकाला त्यात गुंतवायचे असा हा प्रकार आहे. असे प्रकार करुन अधिकाऱ्यांचे खच्चीकरण होता कामा नये. त्यांचे मनोधैर्य वाढविले पाहिजे, ही आमची इच्छा आहे.

सभापती महोदय, जिग्ना व्होरा केसच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. एका पत्रकार महिलेला अटक झाल्यानंतर पत्रकार महिलेवर अन्याय होता कामा नये असे त्यांनी सांगितले. मी मुद्दाम सांगू इच्छितो की, आतापर्यंत 164 लोकांची स्टेटमेंट रेकॉर्ड झाली आहेत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ 15:30

श्री.किरण पावसकर...............

जिग्ना व्होरा केसमध्ये काही पत्रकारांनीच तिच्याविरुध्द साक्ष दिलेली आहे. फक्त साक्ष नव्हे तर इलेक्ट्रॉनिक पुरावे देखील उपलब्ध आहेत. ते मुद्दे विचारात घेऊन एन.सी.ओ.कोर्टाने मागील आठ महिन्यात दोन वेळा बेल रद्द केल्यानंतर पुन्हा कॅमेऱ्यासमोर येऊन सांगणार की, कोर्टाने दिलेले आदेश आम्ही पाळतो. दोन वेळा बेल रद्द झालेली आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ........

यात एकूण 11 आरोपी आहेत. पत्रकार जे.डे. याची हत्या झाल्यानंतर मीडियाच्या प्रेशरखाली की कोणत्या मानसिकतेतून तपास करण्यात आला ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. यात एक महिला पत्रकार आठ महिन्यांपासून आत आहे त्याचा विचार करुन शासनाने या प्रकरणाची खरी माहिती घ्यावी. तसेच त्यांचे सहकारी पत्रकार यांनी दिलेली साक्ष व इलेक्ट्रॉनिक पुरावे, स्टेटमेंट व रेकॉर्डिंग तपासून पहावे व यात क्राईम ब्रँचची चूक आहे असे म्हणणार नाही, कारण आपण अशा प्रकारे संशय घ्यायला लागलो तर हेच अधिकारी पुढे कोणत्या पध्दतीने काम करतील याचाही विचार करावा लागेल.

महोदय, दि. 26 नोव्हेंबरच्या हल्ल्यानंतर पोलिसांना आवश्यक ती शस्त्रास्त्रे, वाहने, साधन सामुग्री, प्रशिक्षण, सराव, बॉम्बशोध पथक व इतर बाबींसाठी शासनाने 425 कोटी रुपये मंजूर केले. यातून आतापर्यंत किती खर्च झाला हे शासनाने सांगितले पाहिजे. पण त्याचबरोबर मी असेही निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, खरोखरच लॉ अँड ऑर्डरसाठी आपण एवढा खर्च करतो व त्यात पोलीस दल कसे काम करते हे दुसऱ्या बाजूने पाहणे आवश्यक आहे. त्यात सन 1993 च्या दंगलीमध्ये पोलिसांनी केलेले काम व तपास ज्या पध्दतीने केला त्यामुळेच त्यातील आरोपी समोर येऊ शकले. त्यानंतर सन 2003 मध्ये झवेरी बाजार, गेट-वे ऑफ इंडिया येथे वेगवेगळे बॉम्बस्फोट झाले त्यांचा तपास देखील आपल्या गुन्हे अन्वेषण शाखेने योग्य प्रकारे केला नसता तर एवढे सर्व आरोपी समोर आले नसते. एवढेच नव्हे तर इंडियन मुजाहिद्दीनच्या आरोपींना हैद्राबाद पोलीस पकडू शकले नाहीत, दिल्ली पोलिसांना ते आरोपी मिळू शकेले नाहीत, बंगलोर पोलिसांना त्यांची बातमी मिळाली नाही, सुरत व अहमदाबाद मध्ये बॉम्बस्फोट झाले तरी देखील ते आरोपी मिळाले नाहीत. पण मुंबई पोलिसांनी, मुंबई क्राईम ब्रँचने या आरोपींना पकडले म्हणून त्यांना श्रेय द्यावे लागेल. सन्माननीय सदस्यांनी आरोप केल्याप्रमाणे 2 टक्के पोलीस अधिकारी संशय घेण्यासारखे असतील पण 98 टक्के पोलीस अधिकाऱ्यांना त्याचा दोष देता येणार नाही. असे असते तर सन 1993 पासून 2008 पर्यंतची जीवाची बाजी लावून ज्या अधिकाऱ्यांनी काम केले त्यांना शासन काय बक्षिस देणार आहे, हा खरा प्रश्न आहे. हे अधिकारी जीवाची बाजी लावून काम करीत नसते तर भटकल व रियाज सारखे गुन्हेगार पकडले गेले नसते, याचा उल्लेख मात्र माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केला नाही, याची खंत वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

महोदय, आज आपल्या पोलीस दलात अशी परिस्थिती आहे की, एखाद्या डीसीपीची बदली जर एटीएस मध्ये झाली तर ती बदली फिरवून घेण्यासाठी हे लोक कोणा-कोणाला भेटतात, त्यांसाठी कोण कोण पुढे आले असतील त्यांची नावे येथे सांगणे योग्य नाही. त्यांची डाळ मात्र अशा प्रकारे बदली रद्द करुन घेण्यासाठी शिजली नाही. अशा प्रकारे एटीएस सारख्या शाखेत काम नको म्हणून प्रयत्न करणे हे योग्य नाही. त्या उलट एटीएस मध्येच बदली पाहिजे म्हणून मागणी करणारे लोक सुध्दा आहेत. इतर पोलिसांनी मात्र आपल्या प्राणाची आहुती देण्यासाठी एटीएस मध्ये काम करावयाचे काय हा प्रश्न निर्माण होतो. माझे म्हणणे आहे की, हेमंत करकरे सारखे कर्तव्यदक्ष अधिकारी एटीएस मधून गेले, शहीद झाले म्हणजे सगळे संपले काय, पण असे होत नाही. उलट राकेश मारियासारख्या अधिकाऱ्यांनी हे काम करण्यास सुरुवात केली अशा अधिकाऱ्यांच्या अभिनंदनाचा ठराव मला सभागृहात आणावा लागेल. अशा प्रकारे एटीएसमध्ये बदली झाल्यानंतर ती फिरविण्यासाठी प्रयत्न करणे हे योग्य नाही.

अध्यक्ष महोदय, दुसऱ्या बाजूला मात्र एटीएसमध्ये बदली देण्यात यावी अशी मागणी करणारे अरुण जाधव सारखे अधिकारी मला दोन दिवसांपूर्वी येऊन भेटला. बाबतीत मुंबई मिरर दैनिकात संपूर्ण पानभर लिहिले होते. माननीय गृह मंत्र्यांनी विचारपूस केली तेव्हा त्यांच्या डोळ्यात पाणी तरळले होते. त्यांना वाटले की माझी विचारपूस खुद्द माननीय गृह मंत्र्यांनी केली. माननीय गृह मंत्र्यांनी त्यांना विचारले की, कोणत्या शाखेत काम करणार, त्यावेळेस ज्या माणसाला, ज्या अरुण जाधव सारख्या अधिकाऱ्यांना पाच गोळ्या लागण्याचा प्रसंग ओढवला ते अधिकारी गृह मंत्र्यांना सांगतात की, माझी बदली एटीएसमध्येच करावी. खरे तर अशी विचारणा खुद्द गृह मंत्र्यांनी केली असती तर एखाद्या अधिकाऱ्याने आर्थिक गुन्हे शाखेत बदली करा अशी मागणी केली असती.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ...

परंतु त्यांनी गृह मंत्र्यांना सांगितले की, मला एटीएसमध्ये पाठवा. पाच गोळया लागल्यानंतरही कॉन्स्टेबल सांगतो की, होय मला एटीएसमध्येच पाठवा. परंतु येथे क्राईम ब्रँच आणि जिग्ना व्होराची माहिती न घेता बोलले जाते व एका डीसीपीची एटीएसला ट्रान्सफर झालेली असतांना त्याला दुसरीकडे पाठवा म्हणून सांगितले जाते ते बरोबर नाही. अशा प्रकारे आपण अधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण करीत आहात असे म्हणावे लागेल. कॉन्स्टेबल श्री. अरुण जाधव पुन्हा एटीएसमध्ये धैर्याने कामावर गेल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो तसेच माननीय गृह मंत्र्यांनी त्यांना एटीएस मध्ये काम करण्याची संधी दिल्याबद्दल मी माननीय गृहमंत्र्याचे सुध्दा आभार मानतो.

सभापती महोदय, अतिरेक्यांनी मुंबईवर केलेल्या हल्ल्यानंतर पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी 425 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. परंतु मुंबईतील रस्त्यावर खड्डे बुजवण्यासाठी 800 कोटी रुपये व मिठी नदीचा गाळ काढण्यासाठी 1600 कोटी रुपये दिले जातात परंतु पोलीस दलाचे नीतिधैर्य वाढविण्यासाठी, आधुनिकीकरण करण्यासाठी केवळ 425 कोटी रुपये दिले जातात व त्यामधूनही हाताच्या बोटावर मोजता येईल अशा पोलीस अधिकाऱ्यांनी चुका केल्या असतील तर त्यासंदर्भात येथे तावातावाने बोलले जाते.

सभापती महोदय, मुंबईच्या सुरक्षिततेच्या कारणासाठी 5 हजार सीसीटीव्ही कॅमेरे लावले जाणार असून त्यासाठी मंत्री महोदयांनी परदेशात जाऊन अभ्याही केलेला आहे. मुंबईमध्ये अगोदर जे सीसीटीव्ही कॅमेरे लावले गेले होते त्याची रेंज 3.1 होती. परंतु आता मुंबईत जे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत त्याची रेंज 4.0 असणार आहे. मुंबईमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवीत असतांना मुंबई शहराची लोकसंख्या किती आहे व त्यासाठी आपण जे 5 हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसवित आहात ते पुरेसे आहेत काय ? इतर देशातील शहरामध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तुलना केली तर असे दिसून येईल की, बँकाक मध्ये 2 लक्ष सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, दुबई एअर पोर्टवर 10 हजार कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. न्यूयॉर्क, लंडन या ठिकाणी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे किती आहेत याची संख्या माझ्याकडे आहे परंतु त्यांच्याकडे लाँगरेज, फोकस, 360 डिग्रीतून फिरणारे कॅमेरे आहेत. पोलीस दलाचे आधुनिकीकरण करीत असतांना त्यांना फंड

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ...

किती देत आहोत व त्यातून किती अपेक्षा करीत आहोत ? त्यामुळे पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी जास्त फंडाची गरज आहे जे पोलीस फोर्ससाठी आपला जीव ओवाळून टाकण्यास तयार आहेत, पोलीस फोर्ससाठी लढावयास तयार आहेत त्यांच्या आधुनिकीकरणासाठी केवळ 425 कोटी रुपये देऊन चालणार नाही तर जसा आपण मिठी नदीतील गाळ काढण्यासाठी 1600 कोटी रुपये खर्च करीत आहात तेवढेच 1600 कोटी रुपये पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी खर्च केले तर पोलीस दलाला कोठे तरी न्याय मिळू शकेल असे मला वाटते

सभापती महोदय, मुंबई शहराची वाहतुकीची व्यवस्था बघितली तर सन 2009,2010 व 2011 या तीन वर्षात आज पर्यंत 50815 लोकांना दारु पिऊन वाहन चालवत असतांना अटक झ ाालेली आहे. त्यातील 29000 लोकांना शिक्षा झालेली आहे व यातून 6,36,830 रुपये दंड वसूल करण्यात आलेला आहे. मुंबईच्या वाहतुकीची व्यवस्था करण्यासाठी आपल्याकडे 3,225 पोलीस आहेत. सुट्टीवर गेलेल्या पोलिसांची संख्या वजा केली तर मुंबईची वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी आपल्याकडे केवळ 2900 पोलीस आहेत. 2900 पोलिसांकडून दंडही वसूल होऊ शकतो, कारवाईही होते. त्यामुळे ही जी काही संख्या दिलेली आहे त्याचा ताळमेळ बसत नाही.

सभापती महोदय, मुंबई पोलिसांकडून आपल्या सर्वांच्या अपेक्षा भरपूर आहेत परंतु या अपेक्षांची पूर्तता करीत असतांना त्यांच्यासाठी जास्तीत जास्त फंड उपलब्ध करुन देणे, आधुनिकीकरण करणे व पोलिसांचे नितीधैर्य व मनोधैर्य वाढविण्यासाठी जे काही करता येण्यासारखे असेल ते करण्याची गरज आहे. चांगले काम केल्यानंतर पोलिसांची पाठ थोपटली नाही तर या पोलीस फोर्स कडून आपण चांगल्या कामाची अपेक्षाही करु शकत नाही. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

----------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : माननीय सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी म.वि.प.नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी एका ज्वलंत प्रश्नाकडे आपल्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधणार आहे.

एडस या रोगाचे एकमेव वैशिष्टय असे आहे की, तो होऊ न देणे हा एकमेव पर्याय आहे. तो झाल्यानंतर मृत्यूची वाट पाहणे हा दुसरा पर्याय आहे. तसेच भ्रष्टाचाराचे आहे. भ्रष्टाचार होऊ न देणे हा सर्वात चांगला व जालीम उपाय आहे. मी बीड जिल्ह्यातील संभाव्य 200 कोटी रूपयाच्या भ्रष्टाचाराकडे सरकारचे लक्ष वेधणार आहे.

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : मी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना सांगू इच्छितो की, बीडमधील संभाव्य भ्रष्टाचार असा उल्लेख आपण केला आहे. तो आजच्या अंतिम आठवडा प्रस्तावाचा विषय नाही.

प्रा.सुरेश नवले : नगरविकास विभागाचा उल्लेख अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये आहे.

**तालिका सभापती** : नगरविकास विभागाचा उल्लेख असला तरी तो मुंबईशी संबंधित आहे. त्याचा बीड जिल्ह्याशी संबंध नाही.

प्रा.सुरेश नवले : नगरविकास, गृहनिर्माण आणि गृह याविभागांशी संबंधित आजचा अंतिम आठवडा प्रस्ताव आहे.

**तालिका सभापती** : आपण अंतिम आठवडा प्रस्तावाच्या विषयाला धरूच बोलावे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मी शिक्षक आहे. त्यामुळे विषयाला धरूनच बोलणार आहे. आपण मला सहकार्य कराल अशी अपेक्षा होती. बीड शहरामध्ये मल्टीपर्पज माध्यमिक शाळा आहे. तिचे स्थलांतर झालेले आहे. त्या शाळेची साडे पाच एकर जमीन आहे. दहा हजार रूपये फूट असा त्या जमिनीचा आज भाव आहे. किमान 200 कोटी रूपयांची ही जमीन आहे. बस स्टँडच्या अगदी समोर ही जमीन आहे. श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अगदी जवळ आहे. मूळ जमीन महसूल खात्याची आहे. पण ती सध्या जिल्हा परिषदेच्या ताब्यात आहे. या शाळेच्या बाजूला सागर हाईटस नावाचा प्रचंड मोठा मॉल आहे. एखादी सुंदरी असावी पण तिच्या पायात पादत्राण नसावे अशी या मॉलची स्थिती आहे. मॉल आहे पण पार्किंग झोनच नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

पार्किंग झोन नसल्यामुळे लगत असणारी माध्यमिक शाळेची जागा पार्किंग झोनच्या उपयोगासाठी वापरण्यासंबंधीचा प्रस्ताव नगरपालिकेने शासनाकडे पाठविला आहे. सदर जागा पार्किंग झोन म्हणून आरक्षित करावी असा प्रस्ताव शासनास सादर झाला आहे. सागर हाईटस मॉल माननीय मंत्री महोदयांचा आहे. मी नोटीस दिलेली नसल्यामुळे त्यांचे नाव घेत नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ ST/ पूर्वी श्री.ओटवणेकर . . . . 15:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

जसा एखादा बगळा नदीच्या किनारी डोहाकडे वाट पाहात बसलेला असतो तशा प्रकारे जे लोक त्यावर टपून बसलेले आहेत त्यांच्यापासून जर आपण वाचविले तर शासनाच्या 200 कोटी रुपयांचा भूखंड शासनाच्या ताब्यात राहू शकेल. एवढ्याच एका मुद्याचे विस्तारीकरण करुन आपण मला बोलण्याची उदार अंत:करणाने संधी दिली त्याबद्दल मी आपल्या अंत:करणाला आणि आपल्याला धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मी माननीय गृह मंत्र्यांना सांगू इच्छितो की, नुकतेच आपण अबू जुंदालला पकडण्यामध्ये यशस्वी झालो. अबू जुंदाल हा बीडचा आहे हे स्पष्ट झाल्यानंतर या अतिरेक्यांना खतपाणी घालणारी ही जी अवलाद आहे ती महाराष्ट्रातीलच आहे यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब करण्याचे काम अबू जुंदालच्या माध्यमातून झाले. एक गोष्ट मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, कसाबसोबतच्या ज्या 9 लोकांना आपण यमसदनाला पाठविले त्या सगळ्यांच्या हातामध्ये भगवा धागा बांधलेला होता. पाकिस्तानातून जे 10 अतिरेकी आले होते त्या सर्वांच्या कपाळावर भगवे तिलक लावले होते. त्याच्या पाठीमागे त्यांचा काय उद्देश होता ? त्यातील काही लोकांना मराठी बोलता येत होते. त्या हॉस्पिटलमध्ये त्यांनी विचारले की तू कोण आहेस, कशासाठी आला आहेस, तुझे कोण ॲडमिट आहे ? त्याने असे अस्खलित मराठीमध्ये विचारले. याच्या मागे त्यांची नेमकी काय भूमिका होती ? सिध्दिविनायक मंदिरासमोर भगवा धागा खरेदी करुन त्यांनी त्यांच्या हातावर भगवा धागा कशासाठी बांधला होता ? या गोष्टींचा जर आपण थोडा अभ्यास केला तर तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अंतुले साहेब यांनी जी विधाने केली होती ती विधाने यांचा भगवा धागा, भगवा टिका यामध्ये काही मिळतेजुळते होते का असा प्रश्न पडतो.

सभापती महोदय, माझ्या हातामध्ये "हू किल्ड करकरे - भारतातील दहशतवादाचा खरा चेहरा" या नावाचे पुस्तक आहे. हे पुस्तक लिहिणारे श्री. मुश्रीफ हे आपल्याकडे जे माननीय मंत्री महोदय आहेत त्यांचे भाऊ आहेत असे मला वाटते. हे महाशय माजी पोलीस महानिरीक्षक होते. श्री. अंतुले जे बोलले त्याप्रमाणे श्री. मुश्रीफ यांनी सुध्दा या पुस्तकामध्ये हेच दाखविण्याचा प्रयत्न केला आहे की, हेमंत करकरे यांचा जो मृत्यू झाला तो अतिरेक्यांनी केलेला नाही तर तो आम्ही घडवून आणला. मी या पुस्तकातील काही ओळी मुद्दाम वाचून दाखवितो. त्यांनी घटनाक्रम दिलेला आहे. त्यांनी असे लिहिले आहे की, "वरील घटनाक्रमावरुन हे स्पष्ट दिसून येते की, करकरे यांना टाइम्स ऑफ इंडिया इमारतीच्या बाजूच्या गल्लीत पाठवून दिल्यानंतर व त्यांना कामटे व साळसकर हे दोन अधिकारी त्या गल्लीतील कामा हॉस्पिटलच्या मागील गेटजवळ येऊन मिळाल्यानंतर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ D/ ST/ KTG

श्री. रामदास कदम .....

एसबी ऑफीसच्याजवळ गोळीबार करुन त्याला तिकडे जाण्यास भाग पाडण्यात आले व ते एसबी ऑफीसची गल्ली व रंगभवन गल्ली यांच्या जंक्शनवर आल्याबरोबर मेट्रो सिनेमाजवळ लाल रंगाच्या गाडीत संशयीत अतिरेकी असल्याची बातमी कंट्रोल रुमवरुन प्रसारित करण्यात आली. यामागील उद्देश अगदी स्पष्ट होता की, ही बातमी मिळताच करकरे, कामटे, साळसकर यांच्यासारखे जांबाज व धाडसी अधिकारी तिकडे नक्कीच जातील व ते हजर असलेल्या ठिकाणाहून म्हणजे एसबी ऑफीसपासून मेट्रो सिनमाकडे जाण्याचा जवळचा मार्ग म्हणजे रंगभवन गल्लीतून जाणे हाच आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

अशारितीने हेमंत करकरे व त्यांच्या इतर सहकाऱ्यांना अत्यंत पध्दतशीरपणे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवत शेवटी रंग भवन जवळ पाठविण्यात आले व तेथे दडी मारुन बसलेल्या अतिरेक्यांनी त्यांना कोंडीत पकडून त्यांची अत्यंत क्रूरपणे हत्या केली. यातून मुश्रीफ यांना नेमके काय सांगावयाचे आहे ते स्पष्ट होत आहे.

सभापती महोदय, आपण लवकर घंटा वाजविता. त्यामुळे मला आपली भीती वाटते. आपण आता घंटा वाजविली तर मी बाहेर जाऊन सांगेन की, मराठा समाजाच्या आमदारास मराठा समाजाचे श्री.मेटे यांनी भाषण लवकर संपविण्यासाठी खाली बसविले. मी आपल्यासोबत येत नाही म्हणून आपण मराठा समाजाच्या आमदारावर कसा अन्याय करीत आहात ते बाहेर सांगेन.

श्री.आर.आर.पाटील : बोलणारे सदस्य कोणत्या समाजाचे आहेत हे पाहून सभापती वेळ देत नाहीत. ही चर्चा अधिक वेळ चालू राहिली तरी हरकत नाही, सन्माननीय सदस्यांची इच्छा असेल तर या चर्चेला मी आज उत्तर देणार नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना आज राष्ट्रगीत सुरु होईपर्यंत भाषण करावयाचे असेल तर तेवढा वेळ बोलण्याची त्यांना आपण परवानगी द्यावी.

**तालिका सभापती ( श्री.विनायक मेटे )** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मराठा समाजाचा नामोल्लेख करुन जे वक्तव्य केले आहे ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, दिल्लीमध्ये उर्दू भाषेतून, इस्लामच्या तत्वानुसार फार्योस मीडिया या प्रकाशक संस्थेकडून हे पुस्तक छापले गेले आहे. हे पुस्तक कोठे, कोणी, कसे छापले ? दिल्लीत उर्दू भाषेत छापण्यासाठी त्यांना पैसे कोणी दिले ? हे पुस्तक छापण्यामागचा उद्देश काय होता, त्याची चौकशी झाली तर अधिक स्पष्टता येईल. मुश्रीफ यांचीही चौकशी झाली पाहिजे. कारण हे महाशय माजी पोलीस महानिरीक्षक होते, त्यांनी शासनाकडून पगार घेतलेला आहे. माजी पोलीस महानिरीक्षकांनी आपल्याच सहकाऱ्यांवर संशय व्यक्त करुन जणू काही हिंदुंनीच त्यांना मारलेले आहे असे दर्शविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्याचा मी निषेध करतो व त्यांची चौकशी शासनाकडून केली जाईल अशी अपेक्षा बाळगतो.

2...

NTK/ ST/ D/ D/ KTG/

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, हिंदू हे अतिरेकी आहेत असे भासविण्याचे काम चालू आहे. जर कसाबला जिवंत पकडले नसते तर हे काम हिंदूंनीच केले आहे हे असे दिसले असते. ओंबळे यांना आम्ही सॅल्यूट मारलेला आहे. त्यांचे आम्ही आभार मानलेले आहेत. पण कसाबला जिवंत पकडले नसते तर हा हमला हिंदुंनी केला आहे यावर शिक्कामोर्तब झाले असते. कारण त्या मृतांच्या अंगावर सिध्दिविनायकाचा टिळा, धागे बांधल्याचे आढळले होते. त्यांच्याकडे सापडलेल्या वस्तू सातारा व सांगली जिल्ह्यातील होत्या. म्हणून मी असे विचारु इच्छितो की, मेलेले 9 जण कोण होते ? ते 9 जण महाराष्ट्रातीलच होते असा माझा संशय आहे. त्यांना चांगले मराठी बोलता येत होते. त्यांच्या जवळ सिम कार्ड कोणत्या ठिकाणचे होते ते मंत्री महोदयांनी तपासून पहावे. हे कृत्य हिंदूंनी घडविले असा टाहो फोडायचा. श्री.अंतुले यांनी हा प्रकार हिंदूंनीच केला असे ताबडतोब स्टेटमेन्ट केले.

2008 मधील मालेगावच्या प्रकरणातील आरोपी रामजी कलसंगा याच्या भावाच्या घरी दिलीप पाटीदार नावाचा माणूस भाडेकरु म्हणून राहत होता. त्या पाटीलला ए.टी.एस.ने मध्य प्रदेश येथून आणले. आज 4 वर्षानंतरही त्या पाटीदारचा पत्ता लागलेला नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ 16:05

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने एक निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे सीबीआयने महाराष्ट्रातील अेटीसवर गुन्हा दाखल करण्यासाठी आपल्याकडे परवानगी मागितलेली आहे. या संबंधातील कागदपत्रे मी माननीय गृह मंत्र्यांकडे देत आहे. कुणाला तरी हाताशी धरुन हिंदूना अतिरेकी ठरवून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न सुरु आहे काय असा प्रश्न निर्माण होतो.

दिनांक 24.10.2008ला अेटीएसच्या अधिका-यांनी चतुर्वेदी या आरोपीला चौकशी करण्यासाठी मध्यप्रदेशमध्ये नेले. त्याला इंडिया बुल्स या कंपनीच्या विमानातून नेण्यात आले. इंडिया बुल्स ही कॉंग्रेसमधील एका नेत्याची कंपनी आहे. अेटीएसच्या अधिका-यांनी कॉंग्रेसच्या नेत्याचे विमान कशासाठी वापरले ? त्या विमानातून कोण कोण गेले, केव्हा गेले, कधी गेले याची सर्व माहिती माझ्याकडे आहे. विमानातून जाताना चतुर्वेदीचे नाव "संग्रामसिंग" असे बदलले होते. दिनांक 24.10.2008 रोजी विमान मध्यप्रदेशला गेले आणि 25.10.2008 रोजी कुलकर्णींना घेऊन आले. एक अधिकारी मागच्या विमानातून आला. हिंदूंना खोट्या गुन्ह्यामध्ये अडकविण्याचा प्रयत्न झालेला आहे. कॉंग्रेस (आय)च्या एका मुस्लिम पुढा-याने, जो दिल्लाला मोठा सल्लागार आहे, त्याने आपल्या कंपनीचे विमान अेटीएसच्या अधिका-यांना कशासाठी दिले ? विमान किती वाजता गेले, कोणत्या तारखेला गेले, कोणत्या कंपनीचे विमान होते,विमानामध्ये कोण कोण होते यासंबधीची सर्व माहिती मी देतो. अंतुलेनी स्टेटमेंट केले आहे. हे अतिरेकी इकडे येऊन हाताला भगवा धागा बांधून, डोक्याला टिळा लावून लोकांना गोळया घालतात. हे कशासाठी ? तेव्हा या प्रकरणी माननीय गृहमंत्र्यांनी लक्ष घालावे अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, चतुर्वेदी याने जेलमध्ये असताना जे शपथपत्र केलेले आहे त्याची देखील प्रत मी आपणास देतो. "मला 2008मध्ये या विमानातून मध्यप्रदेशला घेऊन गेले." असे त्याने शपथपत्रात सांगितलेले आहे. अशा पध्दतीने महाराष्ट्रामध्ये हिंदूना बदनाम करण्याचा प्रयत्न झालेला आहे. मधल्या काळामध्ये असेही बोलले जात होते की हिंदू अतिरेकी आहेत, हिंदू अतिरेकी आहेत. तेव्हा या बाबतीत मंत्री महोदयांनी लक्ष घालावे.

सभापती महोदय, अबू जुंदाल हा बीड मधील असेल हे तुमच्या आमच्या ध्यानीमनी देखील नव्हते. 9 लोकांची जी प्रेते होती त्यापैकी एकाही माणसाचे नातेवाईक हा मेलेला माणूस आमचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

आहे, भाऊ आहे, मुलगा आहे असे सांगायला पुढे आला नाही. पाकिस्तानातून कसाबच्या वडिलांनी सांगितले आहे की, कसाब हा त्यांचा मुलगा आहे. परंतु मेलेले 9 जण हे आमचे कोणी तरी आहेत हे सांगण्यासाठी कोणीही पुढे आले नाही. तेव्हा हे मेलेले 9 जण नेमके कोण आहेत, ते कोठून आले, ते लोकांना गोळया घालत असताना त्यांना हातामध्ये भगवा धागा बांधायला कोणी लावले, कपाळावर टिळा लावायला कोणी सांगितले या संबंधीची चौकशी आपल्या ताब्यामध्ये आलेल्या अबु जुंदाल याच्याकडे करावी, जेणेकरुन काही गोष्टी अधिक स्पष्ट होतील. म्हणून या बाबतीत मंत्री महोदयांनी अधिक लक्ष घालावे अशी माझी त्यांना विनंती आहे. "हू किल्ड करकरे", भारतातील दहशतवादाचा खरा चेहरा, ही जी विपर्यास करणारी पुस्तके लिहिली गेली आहेत त्याची देखील चौकशी व्हावी.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घरांच्या संदर्भात आमचे गट नेते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भाष्य केले. मला आपल्या माध्यमातून सरकारला विचारावयाचे आहे की, दीड लाख गिरणी कामगारांना शासन मोफत घरे देणार आहे की नाही ? या संदर्भात सरकारचा हेतू स्पष्ट होणे आवश्यक आहे. झोपलेल्या माणसाला जागे करता येते,परंतु झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करता येत नाही. सरकारने सांगितले की, गिरणी कामगारांना घरे बांधून देण्यासाठी आमच्याकडे जागा नाही. त्यासाठी समिती नेमली. आपण मला विचारले जागा द्या, मी आपणास जागा दाखविली. मुंबईतील गिरणी कामगारांना न्याय देण्यासाठी आम्ही काही जागा दाखविल्या. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी तपासून पाहतो असे सांगितले. मी पुन्हा येथे सांगत आहे की, हिरानंदानी प्रकरणात न्यायालयाचे आदेश आल्यानंतरही आपण हिरानंदानीला ठाणे येथे 120 एकर जागा दिली. या जागाचे एका दिवसामध्ये पैसे भरण्यात आले. एका दिवसामध्ये सात-बाराचे उतारे देण्यात आले. मी या संदर्भातील पूर्ण फाईल माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविली आहे. "आपणास अशा पध्दतीने जागा देता येत नाही, हे चुकीचे होत आहे" असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्ह्याधिकाऱ्यांनी दिलेले रिमार्क्स मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविले आहेत. हिरानदांनीने शासनाला फसविले असताना पुन्हा त्यांनाच जागा का दिली ? तेव्हा माझी शासनाला विनंती आहे, हिरानंदानीला दिलेली 120 एकर जागा काढून घ्यावी आणि त्या जागेवर मुंबईतील गिरणी कामगारांसाठी घरे बांधावीत.

सभापती महोदय, अंधेरी येथील लोखंडवाला येथे 40 एकर जागा दिलेली आहे. ही जागा कशासाठी दिली ? आपणास गिरणी कामगारांसाठी जागा मिळत नाही असे सरकार सांगत आहे तर मग त्यांनी या सर्व जागा काढून घेऊन त्या जागेवर गिरणी कामगारांसाठी घरे बांधावीत. गिरणी कामगारांमुळे आम्ही आज या सभागृहात बसलो आहोत. संयुक्त महाराष्ट्राचा लढा गिरणी कामगारांनी दिला नसता तर मुंबई महाराष्ट्राला मिळाली नसती आणि मुंबई महाराष्ट्राला मिळाली नसती तर मुंबईतील या विधिमंडळामध्ये आपण बसला नसता, मी बसलो नसतो. गिरणी कामगारांच्या त्यागामुळे आपल्याला मुंबई मिळाली, महाराष्ट्र मिळाला, त्यांच्यासाठी जागा नाही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

असे म्हणायला सरकारला काहीच वाटत नाही. एका बाजूला सरकार बिल्डरांच्या घशात जागा घालत आहे तर दुसऱ्या बाजूला गिरणी कामगारांच्या घरांसाठी जागा नाही असे सांगत आहे हे बरोबर नाही.

सभापती महोदय, आकृति बिल्डरला 100 एकर जागा दिली. शिवालिकला 140 एकर जागा दिली. या सर्व जागा कोणाच्या आहेत ? हिरानंदानीला कांदिवली येथे 110 एकर जागा दिली. सरकार या सर्व जागा बिल्डरांच्या घशात घालत आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी 105 हुतात्म्यांनी बलिदान दिले, गिरणी कामगारांनी लढा दिला त्यांच्या कुटुंबीयांसाठी जागा नाही असे सरकार सांगत आहे. (बेल वाजविण्यात येते ). मी अजून पंधरा मिनिटे बोलणार आहे. मला अजून अनेक मुद्दे मांडावयाचे आहेत. आपण मला बोलण्याची संधी दिली नाही तर मी येथून निघून जाईन.

**तालिका सभापती ( श्री.विनायक मेटे )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही अडीच तासाची चर्चा आहे. माननीय विरोधी पक्ष नेते 50 मिनिटे बोलले. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते 20 मिनिटे बोलले. सत्ताधारी पक्षातील फक्त दोनच सदस्यांनी पाच -पाच मिनिटे भाषणे केलेली आहेत. विरोधी पक्षातील आणखी काही सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. तेव्हा आपण दोन मिनिटांमध्ये आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आणखी पंधरा मिनिटे बोलणार आहे. आपण मला बोलण्याची संधी देणार नसाल तर मी निषेध करुन निघून जाईन. मी उत्तरासाठी देखील थांबणार नाही.

**तालिका सभापती** : सभागृहाचे कामकाज असे चालत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी या सभागृहात नवीन नाही. मला सभागृहांच्या नियमांची माहिती आहे.

**तालिका सभापती** : आपण ज्येष्ठ सदस्य आहात. ज्येष्ठ सदस्यांनी सभागृहाच्या परंपरा आणि नियम पाळले पाहिजेत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रस्तावासाठी माननीय सभापतींनी अडीच तासाची वेळ ठरवून दिलेली आहे. तेव्हा त्या वेळेतच आपण ही चर्चा संपविली पाहिजे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी अजून 15 मिनिटे बोलणार आहे..(अडथळा)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, आपण गेल्या 20 मिनिटांपासून बोलत आहात. आपणास बोलण्यासाठी कमी वेळ दिलेला नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी अतिशय थोडक्यात माझे मुद्दे मांडणार आहे. सदरचे भूखंड शोधण्यासाठी समिती नेमली होती. ती समिती कशासाठी हवी ? सर्व भूखंडांची माहिती सरकारकडे उपलब्ध आहे. या सरकारने म्हाडाचे 62 भूखंड मंत्र्यांच्या घशामध्ये घातले आहेत, त्या मंत्र्याच्या घशातून भूखंड काढा. ते भूखंड गिरणी कामगारांच्या घरासाठी उपलब्ध करुन द्यावेत. आपण सरकारचे भूखंड, म्हाडाचे भूखंड, जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारितील भूखंड, मंत्र्यांच्या आणि आमदारांच्या घशामध्ये घालता आहात, बिल्डरांच्या घशामध्ये घालता आहात. गिरणी कामगारांच्या घरांसाठी मात्र जागा नाही असे सांगता आहात. गिरणी कामगारांना आम्ही घरे देऊ शकत नाही असे सरळ सांगून टाका. ही बाब शासनाने गांभीर्याने घ्यावी.

सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी एका गोष्टीचे या ठिकाणी स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नुकतीच या बाबत आकडेवारी जाहीर केलेली आहे. अनेक नोकरशहा आणि राजकीय नेत्यांची भ्रष्टाचाराबाबत चौकशी करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती शासनाला केलेली आहे. परंतु सरकारच्या परवानगी विना केसेस पडून आहेत. लाचलुचपत विभागाने वर्ग 1च्या 84 अधिकाऱ्यांची चौकशी करावयाची आहे म्हणून शासनाकडे परवानगी मागितली आहे. परंतु सरकारकडून त्या संदर्भात अद्यापही परवानगी देण्यात आलेली नाही. माननीय गृह राज्यमंत्री महोदय, आपण अशा भ्रष्टाचारी मंत्र्यांना आणि अधिकाऱ्यांना पाठिंबा देत आहात. लाचलुचपत विभागाने आम्हाला चौकशी करण्यासाठी परवानगी द्यावी म्हणून अनेक स्मरणपत्रे सरकारला पाठविली आहेत. सरकार चौकशी करण्यासाठी परवानगी का देत नाही,अडचण काय आहे, आपणाला काही मिळाले आहे काय ? वर्ग-2 च्या अधिकाऱ्यांची 144 प्रकरणे पडून आहेत. वर्ग 1 च्या अधिकाऱ्यांची 84 प्रकरणे देखील पडून आहेत. प्रलंबित प्रकरणात कोणकोणत्या मंत्र्यांचा समावेश आहे, कोणकोणत्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे, त्यांची नावे देखील मी या ठिकाणी सांगू शकतो. तुमच्याकडे यादी उपलब्ध आहे काय, नसेल तर मी त्यांची नावे सांगण्यास तयार आहे. तुमच्याकडे यादी उपलब्ध आहे तर तुम्ही चौकशीसाठी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

परवानगी का देत नाही या गोष्टीचा खुलासा झाला पाहिजे.

महोदय,मंत्र्यांच्या यादीमध्ये माजी आदिवासी मंत्र्यांचे देखील नाव आहे. ती व्यक्ती तुमचीच आहे. अकोल्याचे तत्कालीन पालिका आयुक्त श्री.लक्ष्मीकांत देशमुख, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्री. अशोक लाल, माजी आयुक्त करुण श्रीवास्तव, महसूल विभागाचे तत्कालीन अपर सचिव वैजनाथ लटके, सिडकोचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.व्ही.एम.लाल, नाशिकचे तत्कालीन अपर जिल्हाधिकारी कुशाभाऊ शिनगारे, जळगावचे तत्कालीन उप जिल्हाधिकारी इक्बाल तडवी, रेशीम उद्योग संचालनालयाचे नागपूरचे संचालक डॉ.लक्ष्मीकांत कलंत्री, यांचा नावाचा या यादीत समावेश आहे. नोटीस न दिल्यामुळे मी राजकीय नेत्याचे नाव घेऊ शकत नाही. लाचलुचपत विभाग 2002 पासून या राजकीय नेत्यांची आणि अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी परवानगी देण्यात यावी म्हणून सातत्याने मागणी करीत आहे. लाचलुचपत विभागास चौकशी करण्याची परवानगी किती दिवसात देण्यात येईल या बाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा. ही चौकशी केली तर 5 मंत्री ताबडतोब घरी बसतील. भ्रष्टाचारी मंत्री घरी बसले तर सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांना मंत्री होण्याची संधी प्राप्त होऊ शकेल. या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर आरोप पत्र दाखल करण्यासाठी सरकारची परवानगी लागते, ती परवानगी सरकारने तत्काळ द्यावी, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, या सदनामध्ये सरकारने जमिनींच्या बाबतीत केलेले किती घोटाळे काढावेत हेच कळत नाही. आदर्शप्रमाणेच आणखी एक घोटाळा कांदिवलीमध्ये झालेला आहे. कांदिवली येथील कल्पतरु बिल्डरला डिफेन्सची जागा दिलेली आहे. डिफेन्सची ही जागा सरकार बिल्डरला देतेच कशी हा माझा प्रश्न आहे. कांदिवलीमधील हा दुसरा आदर्श घोटाळा झाला आहे त्याचा खुलासा शासनाने करावा. या प्रकरणाची सी.बी.आय. चौकशी करावी अशी मागणी सैन्यातील अधिकाऱ्यांनी केली होती. सभापती महोदय, मराठीमध्ये "तळे राखी तो पाणी चाखी " अशी म्हण आहे परंतु येथे तर सगळेच पाणी चाखलेले आहे. सरकारी जागा विकून टाकणार आहात काय ? कांदिवली येथील कल्पतरु बिल्डरला दिलेल्या जागेची नेमकी काय परिस्थिती आहे याबाबतचा खुलासा शासनाने येथे करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, कॅगच्या अहवालामध्ये 10 मंत्र्यांवर ठपका ठेवण्यात आलेला आहे. परंतु केवळ भुजबळ यांचे नांव आले. त्यांच्या बाकीच्या संस्थांची नांवे आली. केवळ भुजबळ साहेबांचेच नांव कसे काय आले ? बाकीच्या मंत्र्यांची नांवे का आली नाहीत ? नितू मांडके, सुभाष घई यांना भूखंड दिलेले आहेत. डॉ.डी.वाय.पाटील यांच्याबद्दल मी बोलणार नाही. वनमंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या संस्थेने 5 कोटींचा भूखंड लाटला परंतु गेल्या सहा वर्षापासून तो पडून आहे. आदर्श, साईप्रसाद, आशीर्वाद अशा संस्थांनी स्वस्तात सरकारी भूखंड लाटले आहेत. पुणे,ठाणे आणि नाशिक येथे 100 कोटींचे भूखंड न्यायाधीशांना देण्यात आले परंतु त्यावर 45 वर्षात घरे बांधण्यात आली नाहीत. याबाबतीत शासन काय करीत आहे ? नाशिक आणि ठाण्यात जे भूखंड दिले त्यावर 17 वर्षात काहीही बांधकाम झलेले नाही. नाशिक जिल्हयात मालेगावच्या महात्मा गांधी विद्यामंदिर या संस्थेला 1957 मध्ये भूखंड दिला परंतु गेल्या 54 वर्षात त्याठिकाणी कसलेही बांधकाम झाले नाही. सभापती महोदय, म्हाडामध्ये 324बोगस अर्जांची छाननी झाली त्यामध्ये 91 लोकांवर एफआयआर दाखल करण्यात आला. चौकशीसाठी पोलीस स्टेशनला बोलाविले असताना म्हाडाचे अधिकारी त्याठिकाणी जात नाहीत. या लोकांनी डुप्लीकेट पत्ते देऊन दलालांच्या मार्फत घोटाळा केला आहे. या लोकांवर किती दिवसात कारवाई होणार आहे ? महाराष्ट्र सदनाच्या बांधकामाबाबतचा किस्सा मी याठिकाणी सांगणार नाही. त्याची खालच्या सदनात चर्चा झालेली आहे.

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, सिडकोचे जे प्लॉट दिलेले आहेत त्याची सुध्दा चौकशी चालू आहे. कोर्टाने निर्णय दिला त्याची अंमलबजावणी कधी होणार आहे आणि कशी होणार आहे याचे उत्तर शासनाने द्यावे. कोणी हे प्लॉट पुढा-यांच्या घशात धातले ? मंत्र्यांनी आणि पुढा-यांनी सिडकोचे प्लॉट सोडले नाहीत, म्हाडाचे प्लॉट सोडले नाहीत, जिल्हाधिका-यांच्या अखत्यारितील सोडले नाहीत, महापालिकेला सोडले नाही..........

नतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

गिरणी कामगारांना कायमस्वरुपी घरे देण्यासाठी शासनाकडे जागा नाही. सभापती महोदय, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष यांचा मुलगा आणि आमदार कासावार यांचा मुलगा यांना डोंगरगाव येथे 265 एकर जागा शासनाने दिलेली आहे. माझ्याकडे असलेली कागदपत्रे मी शासनाकडे सुपूर्द केल्यानंतर थातुरमातूर कारवाई केली जाईल, किरकोळ दंड आकारला जाईल. मंत्रालय इमारतीला आग लागल्यामुळे या प्रकरणाची कागदपत्रे जळून नष्ट झाली असली तरी माझ्याकडे कागदपत्राच्या प्रती उपलब्ध आहेत. डोंगरगावचा जमीन घोटाळा लक्षात घेऊन महाराष्ट्र काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षाच्या मुलाला दिलेली जागा परत घेतली जाईल काय? या जागेचे मूळ मालक ठाकरे कुटुंबीय आज भूमिहिन झालेले आहेत. मुळात ही जागा आरक्षणाखालील आहे. या जागेवर कोट्यवधी रुपयांचे सागाचे वन उभे आहे. अशी जागा शासन नाममात्र किंमतीला देऊ शकते काय? मी जी प्रकरणे उपस्थित केली आहेत त्या संदर्भात जनता शासनाला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही. मला या कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सभापती महोदय, आपल्याकडून न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मागासवर्गीयांच्या वसतीगृहातील अनुसूचित जातीचे 80 टक्के आरक्षण रद्द करण्यात येणे

मु.शी.: मागासवर्गीयांच्या वसतीगृहातील अनुसूचित जातीचे 80 टक्के आरक्षण रद्द करण्यात येणे याबाबत माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे निवेदन.

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "मागासवर्गीयांच्या वसतीगृहातील अनुसूचित जातीचे 80 टक्के आरक्षण रद्द करण्यात येणे" या विषयासंबंधी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावास अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढील निवेदन करीत आहे.

**तालिका सभापती** (श्री.विनायक मेटे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईमध्ये लीजवर दिलेल्या शासकीय भूखंडाचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग करुनही 50 टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे

**मु.शी.**: मुंबईमध्ये लीजवर दिलेल्या शासकीय भूखंडाचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग करुनही 50 टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, डॉ. रणजित पाटील व श्री. नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु .....

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी असून प्रामुख्याने मी आज फक्त नक्षलवाद या विषयावरच माझे विचार मांडणार आहे.

महोदय, ज्यावेळेस गडचिरोली आणि नक्षलवादाचा विषय मी सभागृहात उपस्थित करते तेव्हा प्रत्येक वेळेस माझ्या भाषणात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जातो, याची मला खंत वाटते. गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व माननीय गृह मंत्र्यांनी घेतले त्यावेळेस खरे तर आम्हाला आनंद झाला होता. आम्हाला तेव्हा असे वाटले होते की, आता गडचिरोलीतील नक्षलवाद कमी होईल व आदिवासींना दिलासा मिळेल. पण त्यानंतर सुध्दा पोलिसांवर नक्षलवाद्यांनी अटॅक केला, नक्षलवाद्यांनी बॉम्बस्फोट करुन पोलिसांच्या गाडी उडविली अशा बातम्या येतात तेव्हा मात्र आदिवासींनाच नक्षलवादी ठरवून जेलमध्ये टाकले जाते. आतापर्यंत माझ्या माहितीप्रमाणे नक्षलवाद्यांच्या कोणत्या नेत्याला पकडले असेल अशी स्थिती नाही.

महोदय, कालच आमच्या आलापल्ली येथील कार्यकर्त्यांनी सांगितले की, आमच्या भागात उंच आणि गोरे असलेले नक्षलवादी, ज्यांच्यामध्ये सहा महिला व सहा मुले आहेत, हे लोक बंदुका घेऊन सीमेवर फिरत होते. आमचे आदिवासी तर रंगाने काळे आहेत. मग अशा परिस्थितीत पोलिसांच्या नजरेला हे गोरे असलेले 12 लोक का पडत नाहीत हा खरा प्रश्न आहे. अशा

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

परिस्थितीत जर या 12 लोकांनी पोलिसांवर अटॅक केला तर पोलीस मात्र आमच्या आदिवासींना पकडतात. अशा प्रकारे पोलिसांची व शासनाची मानसिकता नक्षलवाद कमी करण्याची आहे की आदिवासी कमी करण्याची हे समजत नाही, याचाही विचार करणे आवश्यक आहे. मी सभागृहात वारंवार नक्षलवाद्यांनी केलेल्या अत्याचाराचे गाऱ्हाणे मांडत असते, त्यांनी केलेल्या अन्यायावर बोलत असते पण अजूनही या आदिवासींची नक्षलवाद्यांच्या तावडीतून सुटका होत नाही व त्यांना न्यायही मिळत नाही, यावरुन राज्यात व देशात लोकशाही शिल्लक आहे की नाही अशी शंका येते.

महोदय, आज या दोन्ही जिल्ह्यांमध्ये तर असे चित्र दिसत आहे की, नक्षलवाद्यांच्या दहशतीखालीच हे जिल्हे वावरत आहेत आणि अशीच स्थिती राहिली तर हे राज्याचे दुर्दैव म्हटले तरी वावगे ठरणार नाही. याला आम्ही राज्य विकसनशील आहे, हे राज्य सहनशील आहे असे म्हणणार नाही कारण 139 ग्राम पंचायतींच्या निवडणुका आमच्याकडे घोषित झाल्या. त्यापेकी 132 गावांमध्ये अजून एकही अर्ज भरला नाही. मला माहीत आहे की मला या प्रश्नाचे उत्तर काय मिळणार आहे ? आजही 95 टक्के ग्राम पंचायतींमध्ये उमेदवारीचे अर्ज भरलेले नाहीत, कोणीच अर्ज भरण्यास पुढे येत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे नक्षलवाद्यांनी घोषणा केली की आमच्या पध्दतीने वागावयाचे नसेल, आम्ही सांगितलेल्या कार्यक्रमानुसार वागायचे नसेल तर आम्ही जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी दिली, त्यामुळे कोणीच पुढे येत नाही. शासन मात्र यातून आदिवासींना वाचविण्यासाठी, त्यांचे सांत्वन करण्यासाठी व त्यांना लोकशाहीचे महत्व पटवून देण्यासाठी कोणता कार्यक्रम घेत आहे हे खरे तर आज सांगण्याची गरज निर्माण झाली आहे.

मागील काळात माननीय गृह मंत्र्यांनी आमच्या गडचिरोलीच्या संदर्भात त्या भागात एक बैठक घेतली होती. आम्ही ज्या आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी भांडतो, नक्षलवाद्यांविरुध्द भांडत असतो त्याच नक्षलवाद्यांच्या संदर्भात बैठक होत असताना आम्हाला त्या बैठकीसाठी निमंत्रित केले जात नाही. का तर आम्ही सत्य परिस्थिती सांगतो म्हणून, की आदिवासींसाठी भांडत असतो म्हणून की नक्षलवाद्यांच्या विरोधात भांडतो म्हणून ? आम्हाला बैठकीसाठी बोलावले जात नाही याचे दु:ख नाही कारण त्यासाठी किती लढावे हे आम्हाला माहीत आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या 39 गावांत गेल्या पाच वर्षात कोणत्याच निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे त्या गावाचा कारभार

....3



PFK/ KTG/ D/ 16:30

श्रीमती शोभा फडणवीस ....

प्रशासकाच्या माध्यमातून चालविला जात आहे, एकही उमेदवार निवडणुकीसाठी उभे राहण्यास तयार नाही, त्यांची नावे मी वेळेअभावी वाचून दाखविणार नाही. पण अशा प्रकारे दहा दहा वर्षे निवडणुका होत नसतील आणि प्रशासकाच्या माध्यमातून काम चालत असेल तर आपण सांगितल्याप्रमाणे आवश्यक भेटी दिल्या जातात की नाही याचे हिशेब शासन वेळोवेळी घेत असते काय, हा खरा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, एटापल्ली भागातील 50 टक्के गावांची यादी तपासणीसाठी दिली, त्याचा अहवाल शासनाकडे आला. त्यानुसार या भागात किती ठिकाणी रस्त्यांची कामे झाली, किती लोकांचे व्यवहार झाले याचा हिशेब मिळाला पाहिजे. एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत नसतील तर याला लोकशाही म्हणावे की ठोकशाही असा प्रश्न या निमित्ताने निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. नक्षलवाद्यांच्या बंदुकीच्या धाकाने जनता निवडणुकीचे फॉर्म भरण्यासाठी पुढे येत नसेल तर हे राज्याचे सर्वात मोठे अपयश आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्रीमती शोभा फडणवीस....

तुम्ही लोकशाही जिवंत ठेवू शकला नाहीत हे तुमचे सर्वात मोठे अपयश आहे. आदिवासी जनतेला संरक्षण देण्याची लायकी या शासनाची नाही असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, गोंदिया जिल्हयातील सालेकसा येथील ग्रामपंचायत नक्षलवाद्यांनी जाळली, रेकॉर्ड जळाले परंतु त्या ठिकाणची राख उचलण्यासाठी कोणताही अधिकारी गेला नाही. तीन दिवस त्या ठिकाणी सचिव किंवा सदस्य जात नसेल तर त्याला काय म्हणावयाचे ? किती तालुक्यातील किती ग्रामपंचायतीच्या लोकांनी फॉर्म भरले याची माहिती या ठिकाणी मी देणार नाही परंतु सगळयात गंभीर बाब अशी आहे की, 139 ग्रामपंचायतीमधील 132 ग्रामपंचायतीमधील सदस्यांनी अर्जही भरले नाहीत, त्या ठिकाणी निवडणुका होऊ दिल्या नाहीत, परंतु या ठिकाणी राजीनाम्याचे सत्र मात्र मोठया प्रमाणात सुरु आहे. त्या ठिकाणच्या 324 लोकप्रतिनिधींनी राजीनामे दिलेले आहेत. आमच्या सन्माननीय गृहमंत्र्यांनी येथील जनतेला सांगितले होते की, तुम्ही ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाग घ्या, फॉर्म भरा. परंतु एकाही ग्रामपंचायतीमधील लोकांनी माननीय गृहमंत्र्यांच्या घोषणेला प्रतिसाद दिला नाही. याचा अर्थ असा आहे की, त्यांना वाटते प्रशासन आमचे संरक्षण करु शकत नाही, आम्हाला नक्षलवाद्यांपासून वाचवू शकत नाही.

आदिवासी म्हणतात पोलीसवाले आम्हाला मारतात परंतु ते जीवंत मारत नाहीत. नक्षलवादी मात्र गोळया घालून, कुऱ्हाडीने जीवंत मारतात. एका सरपंचाने राजीनामा दिला नाही म्हणून त्याचा कुऱ्हाडीने खून करण्यात आला, उपसरपंचानी राजीनामा दिला नाही म्हणून त्याला भरचौकात बेदम मारहाण करुन मारुन टाकले व या लोकांचे प्रेत रस्त्यावर टाकून दिले. या ठिकाणी नक्षलवाद्यांची इतकी अमानुष, राक्षसी प्रवृत्ती थैमान घालत आहे. "राजकारण सोडा नाही तर मरायला तयार व्हा." असे नक्षलवाद्यानी स्पष्टपणे आवाहन केलेले आहे. अशा पध्दतीने आवाहन दिल्यामुळे नक्षलवादी सामान्य जनतेला नोकरीवर जाऊ देत नाही, कामावर जाऊ देत नाहीत, मुलांना काम करु देत नाही. नक्षली चळवळीत सामील व्हावे यासाठी घरातील मुलांना जबरदस्तीने ओढले जात आहे. तरुणांना 5-5 हजाराचे आमिष दाखवले जात आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्हयातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

पालकांनी 3500 मुलांना बाहेरच्या जिल्हयात शिक्षणासाठी पाठविले आहे. नक्षलवाद्यांवर आपण सारखे बोलत असतो परंतु उपाययोजना मात्र काहीही करत नाही. गडचिरोलीसाठी स्पेशल ॲक्शन प्लॅन आणला परंतु आपण कोणता स्पेशल ॲक्शन प्लॅन राबवू शकला आहात, किती अधिकारी दिले, किती पदे रिक्त आहेत ? गडचिरोलीतील अनेक पदे आजही रिक्त आहेत. पोलीस मेला की, आदिवासी मेला असे आमचे समीकरण झालेले आहे. आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी, उपाययोजना करण्यासाठी शासनाकडून या ठिकाणी कोणताही स्पेशल ॲक्शन प्लॅन राबविला जात नाही. 30 टक्के सुध्दा स्पेशल प्लॅन राबविला जात नाही. एखाद्या गावात संध्याकाळी एखादा माणूस मारला गेला तर त्या रात्री त्या गावात पोलीस जात नाहीत. दुसऱ्या दिवशी नऊ वाजले तरी पोलीस बघायला जात नाहीत. दूरध्वनी, कॅम्प असून त्याचा काही एक उपयोग नाही. पोलिसांना केवळ पोसण्याचे काम केले जाते परंतु आदिवासींना आम्ही संरक्षण देऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. गडचिरोली जिल्हयाला महाराष्ट्रातून बाहेर काढावे की काय अशी मानसिकता शासनाची झालेली आहे असे मला खेदाने म्हणावे लागत आहे.

सभापती महोदय, गडचिरोलीमध्ये इरिगेशनचे प्रकल्प करण्यास शासनाला कोणती अडचण होती ? 1977 पासून 1983 पर्यंत एकही प्रकल्प पूर्ण केला गेला नाही. कोणत्याही आदिवासीला शासनाने मदत केलेली नाही. आदिवासी लोक आजही कुडाच्याच घरात राहतात, आजही त्या ठिकाणच्या महिला अर्धवस्त्रात आहेत, आजही त्या ठिकाणची मुले अर्धपोटी आहेत. शासनाने कोणते कुपोषण कमी केले आहे ? कोणत्या आदिवासींना शासनाने न्याय दिलेला आहे ? आदिवासींच्या नावाने बजेटमध्ये केवळ 9 टक्क्याची तरतूद केली जाते परंतु त्यातील एक टक्काही रक्कम गडचिरोलीतील आदिवासींसाठी खर्च केली जात नाही. जो काही खर्च होतो तो नॉन अकौंटेबल खर्च होतो. या ठिकाणी पैसा दिला जातो तो नक्षलवाद्यांच्या विरोधासाठी दिला जातो, परंतु त्या पैशाचे पुढे काय होते हे आम्हाला सांगता येणार नाही.

मी माननीय गृहमंत्र्यांना सांगू इच्छिते की, या ठिकाणच्या जनतेचा जेवढा राग नक्षलवाद्यावर आहे तेवढाच राग पोलिसांवरही आहे, तेवढाच राग लोकप्रतिनिधींवरही आहे. एखाद्या दिवशी ही जनता बंदुकीने कोणालाही

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

उडवायला मागेपुढे पाहणार नाही अशी या ठिकाणची वस्तुस्थिती आहे. आदिवासी जनतेचे अशाच प्रकारे बळी जाणार असतील तर आपल्याही लोकांचे बळी जाण्यास वेळ लागणार नाही एवढाच इशारा या निमित्ताने देऊन मी माझे दोन शब्द संपवते.

धन्यवाद.

-----------------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता मंत्रिमहोदयांच्या उत्तराला सुरूवात करायची काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आजचा अधिवेशनचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना बोलण्यासाठी आपण संधी द्यावी. त्या पाच मिनिटामध्ये आपले विचार मांडतील.

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी लांबलचक भाषणे करू नयेत. विधानसभेच्या सभागृहामध्ये 2-3 मिनिटांमध्ये आपले भाषण आटपावे लागते. त्यामुळे सन्मानीय सदस्यांनी वेळेची मर्यादा पाळूनच आपले विचार व्यक्त करावेत.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) :सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी म.वि.प.नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव आणला त्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

मुंबईतील शासकीय जमिनी तसेच मुंबई महानगरपालिकेच्या जमिनी अनेक संस्थांना अनेक कारणांसाठी अल्पदराने दिलेल्या आहेत. या जमिनी 99 वर्षाच्या लिजवर देण्यात आलेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या जमिनी, मुंबई महाहनगरपालिकेच्या जमिनी, म्हाडाच्या जमिनी अनेक संस्थांना देण्यात आल्या आहेत. म्हाडाचे 67 भूखंड कोणाला दिले आहेत याची माहिती सभागृहाला दिली पाहिजे. व्यावसायिक कारणांसाठी अनेकांना जागा कायम स्वरूपी देण्यात आली आहे. त्याबाबत कोणीही चौकशी करीत नाही.

33 (7) या नियमाखाली 15 टक्के घरे मुंबई महानगरपलिकेला देणे आवश्यक असते. ही घरे प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी वापरता येतात. ही घरे मुंबई महानगरपालिकेला दिली जात नाहीत. सगळे फायदे मात्र बिल्डरला दिले जातात. मी येथे शिवडी लेबर कॅम्पचे उदाहरण देणार आहे. या लोकांनी योजनेला विरोध केला नाही. परंतु, या लोकांना धडा शिकविण्यासाठी अधिकाऱ्यांनी पोलिसांना बोलावून बुलडोझर चालवून सर्व कारवाई केली. एसआरए प्रोजेक्टच्या जमिनी वर मोठ मोठे टॉवर्स उभे राहिले आहेत. आज गरीबांसाठी घरे नाहीत. त्याची चौकशी केली तर संपूर्ण प्रकरण बाहेर येईल. तेव्हा आपण याची चौकशी करणार आहात काय ? शासकीय जमिनींसंबंधी खुले आम व्यवहार चालले आहेत. त्याची देखील चौकशी करणार आहात काय ? आज मुंबईत मध्यमवर्गीयांना घर घेणे अशक्य झाले आहे.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

अनधिकृत बांधकामासंबंधी देखील मला बोलायचे आहे. आज अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणावर होत आहेत. आज पदपथावर झोपडीदादा महापालिकेचे अधिकारी, पोलीस यांच्या संगनमताने अनधिकृत बांधकामे होत आहेत. पूर्वी 50 हजार रूपयाला झोपडी विकायचे. आता एक लाख रूपयाला झोपडी विकली जाते. मुंबईतील कर भरणारा मध्यमवर्गीय आहे त्याला मात्र घर विकत घेणे अशक्य झाले आहे. ह्या सगळयांची चौकशी आपण करणार आहात काय ? एअर पोर्ट ऑथॉरिटीच्या जमिनीवर व आसपास देखील झोपड्या आहेत. तेथील लोकांना तुमच्या झोपड्या विकून टाका अशा प्रकारच्या धमक्या पोलीस देत आहेत. मी आपल्याला हिरानंदानी या बिल्डरचे उदाहरण देते. पोलीस स्टेशन सुद्धा हिरानंदानी बिल्डरने बांधून दिले आहे. अनेक ठिकाणी पोलीस अधिकारी, शासकीय अधिकारी आणि महापालिकेचे अधिकारी यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. अनधिकृत बांधकामासंबंधी कारवाई करण्यासंबंधीची तक्रार करतो तेव्हा पोलीस बळ मिळत नाही असे सांगितले जाते. ज्यांची घरे बुलडोझर चालवून तोडण्यात येतात त्यांना शिक्षा होते. महापालिकेचे अधिकारी, ज्युनिअर इंजिनिअर्स हे अनधिकृत बांधकामामध्ये सामील असतात. तेव्हा त्यांच्यावर कारवाई का करत नाही ?

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

त्यामुळे श्री. गायकवाड यांना असे वाटते की, मोठ्या प्रमाणावर दबाव येतो आणि या दबावामुळे खोटी मोजणी करुन या संदर्भामध्ये केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. ही खोटी मोजणी होती. नंतर कोर्टाने ती मोजणी खोटी असल्याचे मान्य केले आहे याकडे मी लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, आमच्या प्रस्तावामध्ये काही जमिनींच्या संदर्भात उल्लेख आहे. ज्या जमिनी सरकारने चांगल्या हेतूने दिल्या त्या न वापरता पडलेल्या आहेत. पुण्यामध्ये ही बाब महालेखापालांच्या निदर्शनालाही आली आहे. त्यामध्ये डिस्ट्रीक्ट जज्ज सोसायटी सर्व्हे क्रमांक 18, कर्वे नगर, 34,500 चौरस मीटर जागेचे वाटप 19 मे, 1965 रोजी झाले आणि त्या जमिनीचे बाजार मूल्य 50 कोटी रुपये आहे. अजूनही ती जमीन वापरात आलेली नाही. भारती विद्यापीठ, गट क्रमांक 35, लोहगाव, 19,200 चौरस मीटर जागेचे वाटप 3 नोव्हेंबरला केले. त्या जमिनीचे बाजार मूल्य 4.80 लाख रुपये आहे. डिफेंस पर्सोनल सोसायटीला 2005 मध्ये जमीन मिळाली. त्या जमिनीचे बाजार मूल्य 4.65 कोटी रुपये आहे. ती जमीन तशीच पडलेली आहे. त्रिमूर्ती आदिवासी गृहनिर्माण सोसायटीला 2001 मध्ये जमीन मिळाली. त्या जमिनीचे बाजारमूल्य 82 लाख रुपये आहे. ती जमीन तशीच पडलेली आहे. वापरात नसणाऱ्या या ज्या वेगवेगळ्या जमिनी आहेत त्या संदर्भामध्ये महालेखापालांनी ही जमीन सरकारजमा करावी अथवा त्याचा मोबदला वसूल करावा अशी सूचना केलेली आहे त्याकडे मी लक्ष वेधत आहे.

त्याबरोबरच जे वाळू माफिया आहेत, जे मुरुम माफिया आहेत त्या संदर्भात सांगू इच्छिते. पिंपरी या ठिकाणी खड्डेच खड्डे आहेत. त्या ठिकाणी असे चित्र दिसते की, दररोज रात्री 9.00 ते पहाटे 4.00 पर्यंत जेसीबी, 25 पेक्षा अधिक ट्रक आणि डम्परच्या सहाय्याने मुरुम चोरी चाललेली आहे. दैनिक सकाळ मधील बातमी आहे. अनेक वृत्तपत्रांनी त्याची दखल घेतलेली आहे. या मुरुम चोरीच्या संदर्भात पाहणी केली तेव्हा असे लक्षात आले की, इको फ्रेंडली घरांची योजना ज्या भूखंडावर होणार होती त्या ठिकाणी ही मुरुम चोरी सातत्याने चाललेली आहे. हा चोरीचा मुरुम कोठे जातो याचा माग काढला असता असे लक्षात आले की, महापालिकेच्या वतीने चिखली आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

काळेवाडी या बीआरटी रस्त्याचे काम खाजगी कंत्राटदाराकडून वेगात चालू आहे त्या रस्त्यावर भराव टाकण्यासाठी पिंपरी चिंचवड मधूनच माती मुरुम चोरीला जातो. नव्यानेच एमआयडीसी पोलीस ठाणे झालेले आहे त्याच्या शेजारचा एक मोठा खड्डा बुजविण्यासाठी सुध्दा या मुरुमाचा भराव टाकण्यात आलेला आहे आणि पोलिसांना त्याचा थांगपत्ता नाही.

सभापती महोदय, यामध्ये क्रिमिनल ऑफेन्सपर्यंत जाण्याच्या अगोदर ज्या अयोग्य स्वरुपाच्या घटना घडतात त्याच्या संदर्भात उल्लेख करीत असताना मला सांगावयास पाहिजे की उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुण्यातील 29 युएलसी जमीन घोटाळ्यांची एका बाजूला सीआयडीमार्फत चौकशी सुरु असतानाच युएलसी अधिकाऱ्यांनी डी.वाय.पाटील संस्थेला नाहरकत प्रमाणपत्र दिले आणि या बाबत माहिती मिळताच नगरविकास खात्याने युएलसी अधिकाऱ्यांना नोटीस बजावून खुलासा मागितला. नगरविकास विभागाकडून कारवाई होण्याच्या भीतीने युएलसी अधिकाऱ्यांनी आपली चूक सुधारुन डी.वाय.पाटील संस्थेला यूएलसी आदेश रद्द केल्याची सूचना केली. पिंपरी चिंचवड महापालिकेला सुध्दा या विषयी कळविण्यात आले. मात्र महापालिकेने त्याकडे दुर्लक्ष करुन एक महिन्यात डी.वाय.पाटील संस्थेच्या बांधकाम आराखड्याला मंजुरी दिली. या जागेवर संस्थेने बांधकाम करुन एका मोठ्या नेत्यांच्या नावाने इंटरनॅशनल स्कूल सुरु केलेले आहे आणि त्या ठिकाणी विद्यार्थी शिकत आहेत. त्यामुळे आपण जे अंमलबजावणी करणारे लोक आहोत त्यांच्याकडूनच जर असे दुर्लक्ष होत असेल तर अशा प्रकारच्या घटना आपल्याला वारंवार होताना दिसतील.

सभापती महोदय, मी गृह विभागाचे दोन मुद्दे मांडून माझे भाषण संपविणार आहे. एक मुद्दा लैला खानच्या संदर्भात आहे. तिच्याबद्दल आम्हाला फार मोठी आत्मियता आहे अशातील भाग अजिबात नाही. प्रश्न असा आहे की, मिसिंग झाल्याची जी तक्रार तिच्या वडिलांनी दीड वर्षापूर्वी दिली होती त्या बाबतीत पोलिसांनी काय केले, त्यावर पुढे कारवाई का झाली नाही ? दीड वर्षापूर्वी तिच्या वडिलांनी सांगितले होते की, घरातील हे सगळे लोक मिसिंग आहेत. जर त्याची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

डॉ. नीलम गोऱ्हे .....

खातरजमा झाली असती तर एखादवेळी या गोष्टीचा तपास लवकर लागला असता असे निश्चितपणे वाटते. अशी जी हायप्रोफाईल रॅकेट्स चालविली जातात त्या संदर्भात बोलावयाचे झाले तर लैला खान प्रत्यक्षामध्ये भारतीयच आहे पण ती पाकिस्तानी अभिनेत्री आहे अशा पध्दतीने सर्व माध्यमांमधून वातावरण निर्मिती होत असल्यामुळे आणि ती पाकिस्तानी आहे असे म्हटले तर भरपूर प्रसिध्दी मिळते म्हटल्यावर येथील अभिनेते-अभिनेत्री यांच्यामध्ये सुध्दा या पध्दतीने नेक्सस तयार झालेला दिसतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी डॉ.मनिषा दामाणी या निरपराध व्यक्तीला जळगांवमध्ये बेड्या घालून नेण्यात आले होते. त्यांना ज्या अधिकाऱ्यांनी बेड्या घातल्या त्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली. डॉ.मनिषा दामाणी यांनी सकृतदर्शनी गुन्हा केलेला नाही या संदर्भात तेथील डॉक्टरांच्या संघटनांनी व सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी वस्तुस्थिती मांडलेली आहे. म्हणून डॉ.मनिषा दामाणी यांच्यावरील खटले तपासून मागे घेण्यात यावेत अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, डॉ.सुदाम मुंडे प्रकरणातील सहआरोपी अंगद केंद्र यांनी काल रात्री आत्महत्या केली आहे. त्यांचा मृतदेह सापडलेला आहे. त्यांनी कशा प्रकारे आत्महत्या केली आहे, तो गुन्हा कशा प्रकारे सिध्द होणार आहे, काल परळीमध्ये खूप मोठा जमाव जमला होता. अमुक लोकांवर मुद्दाम आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे गुन्हे दाखल केल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही. हा गुन्हा सिध्द व्हावा व अशा कुप्रथा थांबाव्यात असे मंत्री महोदयांनाही वाटत असेल. त्यामुळे आमची आपल्याकडून निश्चित अपेक्षा आहे. माननीय उप सभापतींनी मघाशी रांगणेकर यांचे उदाहरण दिले ते मी ऐकले आहे. रांगणेकरताईंचा फ्लॅट रिकामा करुन घेण्यास आपण कशी मदत केली ते सांगितले आहे. त्यामुळे बरेच लोक त्यांच्या कामासाठी आपल्याला प्रत्येक जिल्ह्यात व प्रत्येक शहरात बोलवतील. आपण लोकांना सहकार्य करालच अशी मी अपेक्षा करते आणि माझे भाषण संपविते.

---------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात नियम 59 अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी अनेकदा मायनिंगचा विषय सभागृहात मांडलेला आहे. दोडामार्ग तालुक्यात मायनिंग या विषयाच्या अनुषंगाने गुंड प्रवृत्ती निर्माण झालेली आहे. मी मागील अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित केला होता. दि.7 जानेवारी रोजी शासनाला सादर झालेल्या अहवालानुसार राज्यमंत्री महोदयांनी फेर तपासणीचे आदेश दिले. त्यानंतर फेर तपासणी झाल्यानंतर दि.24 मे रोजी अहवाल सादर झाला. मंत्री महोदयांनी त्या अहवालाच्या अनुषंगाने 15 दिवसात कारवाई केली जाईल असे दूरदर्शनच्या प्रतिनिधीला सांगितले होते. शासनाला मायनिंगसंबंधी दोन अहवाल प्राप्त झाले आहेत. त्या दोन्ही अहवालांमध्ये जादा उत्खनन झाल्याचे निष्पन्न झाले होते. एवढेच नव्हेतर बाजूच्या जागेमध्ये उत्खनन झाल्याचे दिसून आले. तरीही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. ती होण्याची गरज आहे. या मायनिंगमुळे त्या भागात गुंड प्रवृत्तीला, गुंडगिरीला सुरुवात झालेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना महसूल कायद्यानुसार कारवाई करण्याचा अधिकार आहे. पण 6 महिन्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर झाल्यानंतर ते कोणतीही कार्यवाही करीत नाहीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:00

श्री. परशुराम उपरकर...

हा प्रकल्प कुणाच्या राजकीय आशीर्वादावर उभा आहे हे सांगण्याची आवश्यकता आहे.

मी आता निवृत्त होत आहे. गेली 6 वर्षे मी या सभागृहामध्ये रमेश गोवेकर यांच्या संदर्भात माहिती विचारत आहे. ती माहिती मला अद्याप मिळाली नाही. रमेश गावेकर हे खरोखर बेपत्ता झाले की त्यांचा अंत झालेला आहे हे सभागृहाला समजणे गरजेचे आहे. रमेश गोवेकर प्रकरण सीआयडीकडून सीबीआयकडे सोपविण्यात आले. परंतु सीबीआयला देखील या प्रकरणाचे धागेदोरे मिळाले नाहीत. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी अंकुश राणे नावाची व्यक्ती मयत झाली. या प्रकरणी सीआयडीने तपासणी केली. परंतु गुन्हेगार सापडले नाहीत. जिल्ह्यामध्ये खून पाडणा-या, माणसांना बेपत्ता करणा-यांचा शोध पोलिसांना लागत नाही ही चिंतेची बाब आहे. या दोन प्रकरणांचा तपास करण्यामध्ये गृह विभागावर कुणाचा तरी दबाव आहे का अशा प्रकारची शंका मला येते. तेव्हा रमेश गोवेकर आणि अंकुश राणे यांच्या मारेक-यांचा शोध केव्हा लागेल हे गृहमंत्र्यांनी सांगावे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये एखाद्या विषयावर भाषण करण्यासाठी किंवा एखाद्या प्रस्तावावर भाषण करण्यासाठी सन्माननीय सदस्य आतूर असतात. त्या विषयावर भाषण करण्याची संधी आपल्याला मिळेल म्हणून या सभागृहामध्ये ते शांत चित्ताने बसलेले असतात. परंतु कधी कधी असे होते की, वेळे अभावी सन्माननीय सदस्यांना एक-दोन वाक्यात, अतिशय थोडक्यात भाषणे करावी लागतात.

...नंतर श्री. अजित...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..

आपण येथे अतिशय उदार अंत:करणाने सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देत आहात. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, एका प्रस्तावावर एका सदस्याला दोन वेळा भाषण करता येते काय ? सन्माननीय सदस्य व विधानसभेचे तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री.रामदास कदम यांनी या ठिकाणी अतिशय आक्रमकपणे भाषण केलेले आहे. एकाच प्रस्तावावर एका सदस्याला दोन वेळा भाषण करता येत असेल तर आम्ही देखील भाषण करण्यास तयार आहोत. तेव्हा मी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याबाबत आम्हाला अवगत करावे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांना एका प्रस्तावावर एकदाच बोलता येते. दुसऱ्यांदा बोलता येत नाही. तेव्हा आता मी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांना बोलण्याची परवानगी देत आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 259 अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 07 मिनिटांनी 30 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

-----

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

श्री.सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव या सभागृहात उपस्थित केलेला आहे. त्या प्रस्तावास पाठिंबा देण्यासाठी व त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांनी गृह विभागाशी संबंधित मुद्दे उपस्थित केलेल आहेत.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल....

सभापती महोदय, याठिकाणी चर्चा झाली तरी बरीचशी शहरातील बाबींविषयी चर्चा झाली. खेडयामध्ये जर पहावयाचे असेल तर सांगली,पुणे,लातूर,बीड या जिल्हयामध्ये लोकांनी खसखस पेरली. मला माहीत आहे की, गावामध्ये 18 लिटर पिंपामध्ये जरी दारु गाळायची असेल तर बीट हवालदाराला विचारल्याशिवाय कोणीही हिंमत करणार नाही. असे असेल तर 3/4 वर्षे 50-50 आणि 100-100 एकरामध्ये खसखस पिकविली जात असेल तर त्या काळामध्ये पोलीस कोठे होते आणि काय करीत होते याचे उत्तर शासनाने द्यावे. पोलीस खात्याला या गोष्टी माहीत नाही असे होणार नाही. पोलीस खात्याला बरोबर घेऊन भागीदारीमध्ये ही खसखस लावली गेली. पैसे घेणारा गेला पळून आणि शेतकरी बसला अडकून. मी गृहखात्याला विनंती करणार आहे की, या खात्यामध्ये किती भ्रष्टाचार चालला आहे ते शोधून काढा. संपूर्ण शेतामध्ये जरी खसखशीचे पीक लावले तरी तुमचे लोक त्यांना संरक्षण देऊ लागलेले आहेत. पैशाचे काय खेळ चालले आहेत ते एकदा जरा बघा.

सभापती महोदय, ज्या ज्या ठिकाणी शेतक-यांनी खसखस पिकविली त्याबाबतीत कुणीतरी आवाज उठविला, कुणी तरी लावून दिली आणि कोणाच्या तरी पोटात दुखले म्हणून हे उघड झाले. उधड झाल्यानंतर ज्या शेतक-यांना हकनाक जेलमध्ये टाकले त्याचा दोष काय ? त्याने हिंमत का केली तर शेतीमध्ये काहीच शिल्लक रहात नाही असे दारिद्रयाचे जीवन जगण्यापेक्षा आणि लिंबाच्या झाडाला कास-याने फाशी घेण्यापेक्षा दोन दिवस का होईना चांगले जगू दोन पैसे मिळतील या आशेने त्याने खसखस लावली आहे. तुम्ही जेवढया शेतक-यांना जेलमध्ये घातले, जेवढया शेतक-यांवर खटले दाखल केले तेवढेच त्या पोलीस स्टेशनच्या अंतर्गत जे पोलीस असतील त्यांच्यावर खटले दाखल करा. कृषी अधिकारी आणि पोलीस दोघांवरही खटले दाखल करा. महसूल खात्याची मजा आहे. दरवर्षी शेतक-याने कोणते पीक घेतले याचा रिपोर्ट महसूल खात्याला द्यावा लागतो तो रिपोर्ट आंतरपिकाचा नसतो. ज्यांनी चोरी केली त्यांना फासावर जाऊ द्या.खालच्या स्तरावरील कर्मचा-यांनी चुका केलेल्या आहेत, 3/3 वर्षे 7/12 च्या उता-यावर पीक पेरा लिहावयाचा आहे त्या ठिकाणी खसखस ऐवजी ज्वारी लावली असे दाखविले.

2..

श्री. सय्यद पाशा पटेल....

आपले राज्य जर पाकिस्तानच्या बॉर्डरवर राहिले असते तर या सगळया तलाठयांनी मिळून निम्मे राज्य पाकिस्तानच्या शेतक-यांच्या नावावर केले असते. फक्रु साब, करीम साब, लाला साब अशी नावे लिहिली असती. तुकाराम, सखाराम गेले असते. हे काय चालले आहे त्याची भानगड नीट तपासून बघणे गरजेचे आहे.

नंतर श्री.भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:45

श्री.पाशा पटेल....

शेतामध्ये काम करणा-या मजुरांवर पोलिसांकडून गुन्हे दाखल केले जात आहेत. माझ्या गावात 100 मजूर आहेत. ते 100 मजूर मालकाच्या शेतात राबायला गेले नाही तर संध्याकाळी त्यांच्या घरातील चूल पेटत नाही. त्यांचा चुलीचा प्रश्न आहे. आज काम केले नाही तर चूल पेटणार नाही. त्या मजुराला शेतात खुरपायचे काम आहे, तुडवायचे काम आहे, उधळायचे काम आहे याची काहीही माहिती नसते. त्या शेतातील मजुरांना सुध्दा तुम्ही सोडले नाही.

सभापती महोदय, माझी गृह राज्यमंत्री महोदयांना विनंती आहे, ते तरुण तडफदार आहेत. त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे. प्रत्येक समाजाची नैतिकता वेगळी असू शकते. मी ज्या समाजातून आलो आहे, ज्या गावातून आलो आहे त्या गावातील सर्व लोकांमध्ये मी प्रगल्भ मानला जातो. माझ्या गावातील शेवटच्या माणसाचे दु:ख तुम्ही ऐकले तर तुम्ही या ठिकाणी बसणार नाही. काही दिवसापूर्वी माझ्या तालुक्यातील एका दोन मुलींच्या आईचा खून पाडण्यात आला. त्या मुलींच्या बापाला मी सांगितले की, पोलिसांना कळवा. त्या बापाने मला सांगितले, मला दोन लेकरे आहेत. त्यामुळे मला पोलिसांना सांगायची इच्छा नाही. आठ दिवसांनी विरोधातला समाज खवळला. त्या लेकरांना त्रास द्यायला सुरुवात केली. मी पोलीस अधिकाऱ्याला फोनवरुन सांगितले. कोराळी गावामध्ये दोन मुलींच्या आईला मारुन टाकले आहे, तुम्ही या प्रकरणात लक्ष घाला. उत्तर काय यावे? आठ दिवस अगोदर सांगितले असते तर आम्ही नक्की शिक्षा केली असती. आठ दिवस होऊन गेल्यामुळे आम्ही त्याला काही मदत करु शकत नाही. याचा अर्थ आठ दिवसामध्ये पोलीस अधिकाऱ्यांना कोणकोण भेटले याची मला माहिती नाही. त्या मुलींच्या बापाची अवस्था पाहिली तर तुमचे मन हेलावल्याशिवाय राहणार नाही. तो माझ्या गावातील शेतकरी संघटनेचा एक कार्यकर्ता आहे.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे वाईट वाटते. मी आमदार झालो त्यामुळे त्याला वाटले होते की, आपला आमदार सभागृहात भाषण करणारा माणूस आहे. कदाचित याला सांगितले तर ज्याने माझ्या पत्नीचा गळा आवळला त्याला शिक्षा झाली असती. परंतु शिक्षा झाली नाही. पोलीस अधिकाऱ्याशी मी फोनवरुन खडसावून बोलल्यानंतर चौकशीचे चक्र सुरु झाले. पोलिसांनी दुसरा एक प्रकार सुरु केला. शेतकरी संघटनेच्या दुसऱ्या एका कार्यकर्त्याला सांगितले की, अमुक अमुक मर्डर केसमध्ये तुझे पण नाव आले आहे. तो गरीब माणूस आहे. तो माझ्याकडे

..2..

श्री.पाशा पटेल....

आला. जे जे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आहेत, कुठे ना कुठे थोडा वास नसला तरी काही उकरुन काढता येते का असा प्रकार सुरु झाला आहे. मी खरे बोलत आहे. परंतु माझ्या कार्यकर्त्यांना अशा प्रकारे धमक्या देणे सुरु झाले आहे.

सभापती महोदय, दु:ख फार मोठे आहे. योगायोगाने बोलण्याची संधी मिळाली म्हणून सांगतो. या सभागृहात बसलेल्या लोकप्रतिनिधींच्या शब्दाला काही किंमत आहे का? आयुष्याची राखरांगोळी करुन प्रतिनिधी म्हणून या सभागृहात येतात. आयुष्याची 30 ते 40 वर्षे एका विषयासाठी खर्च करुन या सभागृहात पोहोचावे लागते. या सभागृहाचा प्रतिनिधी म्हणून खालच्या अधिकाऱ्यांना काही सांगितल्यानंतर तो अधिकारी आमच्या शब्दाला किंमत देत नाही.......

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल ......

तर या लोकशाहीला काही अर्थ उरलेला आहे काय ? मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, दुसऱ्या अन्य खात्याचे काही झाले तरी मी समजू शकतो पण आपल्या गृह विभागात "ध" चा "मा" झ ाला तर मात्र एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. अशा चांगल्या खात्याचे आपण मंत्री आहात, आपल्याला खूप मोठा विषय दिलेला आहे, सर्व काही बरोबर आहे, आपण काही हलका माणूस नाही तर आपल्याला डॉ. डी.वाय.पाटील सारख्या मोठ्या माणसाचा वारसा आहे, त्यांचे चिरंजीव आहात आपण, या खात्याचा कार्यभार एखाद्या बारीक सारीक माणसाकडे आला तर तो घर वगैरे बांधण्याच्या नादात दोन पैसे तरी घेऊ शकतो पण तुमच्या वाट्याला घराची सोय आहे, गाड्यांची सोय आहे, एक रुपया जरी घेतला नाही तरी आयुष्यभर राजासारखे राहू शकाल एवढे सर्व आहे. फक्त आपण एकच करा की एखाद्याचा बंदोबस्त करा, आपली उंची आहे त्यापेक्षा जास्त वाढल्याशिवाय राहणार नाही, म्हणून असा काही तरी चमत्कार करावा अशी विनंती मी परमेश्वराकडे आणि आपल्याला देखील करतो.

महोदय, या सभागृहातून निवृत्त होत असताना आपण स्वत: निरोप समारंभात बोलत असताना मी सांगितले होते की, बाबा खरे की, दादा खरे, त्यावर आपण म्हणाला की "डावखरे" अशा प्रकारे आपल्याला लगेच कोटी करायला सुचते याचे मला कौतूक वाटते. असे आपल्याला वेळेवर सूचते त्यामुळे वरचे खूष व खालचेही खूष, एवढे सर्वांना खूष करणारा एकमेव गब्रू माणूस म्हणजे आपले माननीय उप सभापती हे आहेत. मी आपल्याला साष्टांग दंडवत करतो आणि खरे तर माझी बोलण्याची इच्छा नसताना आपण जाता जाता मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी आपण आदेश दिल्यानुसार बोललो व जे बोललो ती माझ्या मनातली खदखद होती, त्याचा गैरसमज करुन घेऊ नये.

महोदय, मंत्री महोदय मघाशी म्हणाले की, आता यानंतर देखील पालक मंत्री म्हणून आपणच आहात. मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, माझे मटक्याचे दुकान नाही, दारुचे दुकान नाही, घासलेटचा हप्ता मी मागत नाही, मटक्यावाल्यांकडून चहा पीत नाही.......अडथळा....... शाळा असली तरी आपल्याला आमच्या शाळेसाठी रस्ता करुन द्यावा लागणार आहे, मी येथून निवृत्त झालो तरी माझे घोंगडे अडकलेलेच आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल ......

महोदय, या सभागृहाने मला जे भरभरुन प्रेम दिले ते सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य, पीठासीन अधिकारी व पत्रकार, खरे तर पत्रकारांमुळे मी आज जिवंत आहे. सभागृहात जरी न्याय मिळाला नाही तर आपण मला न्याय दिला. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब कितीही रागावले तरी लाईन दाखविण्यासाठी ते मदत करतात. आजपर्यंत मी जे आयुष्य जगलो त्याच्या आधारावर या सहा वर्षात सभागृहात भाषणे केली व त्यामुळे शासनाने अनेक निर्णय सुध्दा घेतले व मला न्याय दिला त्याबद्दल पुन्हा एकदा आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र.

----------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XX OF 2012**

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.)

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (ग्राम विकास राज्यमंत्री) : महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि. क्र.20-मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि. क्र.20 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, राज्यातील 67 ग्राम पंचायतींना पूर्वी जकात आकाली जात होती आणि सन 1999 मध्ये ती रद्द करण्यात आली. त्यासाठी अनुदान देण्याची पध्दत सुरु केली होती. यादृष्टीने दरवर्षी या 67 ग्राम पंचायतींना जकात देत होतो. राज्यातील सर्व ग्राम पंचायतींना भविष्यकाळात उत्पन्नाचा स्त्रोत वाढण्याची संधी या विधेयकाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देत आहोत, एवढेच या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.जुन्नरे........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : माननीय मंत्री महोदयांनी विधेयक मांडतांना विधेयक का आणले गेले याचा पूर्ण खुलासा केला नाही. विधेयकाच्या उद्देश व कारणातील परिच्छेद (1) मध्ये असे म्हटले आहे की, "ग्रामपंचायत अधिनियम, 1958 (1959 चा मुंबई 3) यामध्ये 2000 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 6 याद्वारे सुधारणा करण्यात येण्यापूर्वी, राज्यातील जवळपास 67 ग्रामपंचायती आपापल्या स्थानिक क्षेत्रांमध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यांसाठी होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर जकात वसूल करीत असत. राज्यातील उद्योगांच्या विकासाला चालना देण्याच्या आणि मालाची मुक्त ने-आण सुनिश्चित करण्याच्या हेतूने, उक्त जकात वसूल करण्याची पध्दत दिनांक 5 जुलै,1999 पासून बंद करण्यात आली होती. जकात बंद केल्यामुळे होणारे नुकसान भरुन काढण्यासाठी, राज्य शासनाकडून उक्त ग्रामपंचायतीना सन 2011-2012 पर्यंत सहायक अनुदान दिले जात होते."

उद्देश व कारणाच्या परिच्छेद (2) मध्ये असे म्हटले आहे की, "राज्य शासनाच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, जकात हा अशा ग्रामपंचायतींचा महसुलाचा मुख्य स्त्रोत होता आणि तो बद केल्यामुळे त्या ग्रामपंचायतीच्या प्रशासनावर व विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे."

सभापती महोदय, विधेयक मांडत असतांना कायद्याच्या प्रत्येक शब्दाला महत्व असते. विधेयकामध्ये आपण 67 ग्रामपंचायतीचा उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्रात साधारणत: साडेसात ते आठ हजार ग्रामपंचायती आहेत. खरे म्हणजे सर्वांसाठी समान तरतूद असली पाहिजे. 67 ग्रामपंचायतीला जकात होती ती रद्द करुन संपूर्ण ग्रामपंचायती एकाच पातळीवर आणल्या. जकात रद्द केली ती त्या उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून नाही तर धोरण म्हणून करण्यात आलेले आहे. आता ग्रामपंचायतींना जकात नाही.

उद्देश व कारणाच्या तिसऱ्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, "राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि मालाची मुक्त-ने-आण सुनिश्चित करण्यासाठी आणि ग्रामपंचायतींना प्रशासनाकरिता व विकासाकरिता पुरेसा निधी उपलब्ध व्हावा यासाठी विवक्षित

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते......

नागरी आणि अधिसूचित ग्रामीण क्षेत्रामध्ये वसूल करण्यात येणाऱ्या स्थानिक संस्था कराच्या धर्तीवर, ग्रामपंचायतींना आपापल्या स्थानिक क्षेत्रांमध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यांसाठी होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर स्थानिक पंचायत कर वसूल करण्याचा अधिकार प्रदान करणे शासनास इष्ट वाटते. "

सभापती महोदय, 73 वी घटना दुरुस्ती ही संपूर्ण देशासाठी आहे. घटना दुरुस्तीचा विषय संपूर्ण देशासाठीचा होता व त्यामध्ये महाराष्ट्रातीलही काही ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, महानगरपालिका आल्या होत्या.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ जुन्नरे.. 18:00

श्री.दिवाकर रावते...

सर्वांना समान अधिकार दिला आहे. मला तो दिवस अजूनही आठवत आहे. अर्थसंकल्पाचा शेवटचा दिवस होता. अर्थसंकल्पाला मान्यता द्यायची होती. आम्ही रात्री 11.30 वाजेपर्यंत सभागृहात बसलो होतो. शेवटचा विषय संपला होता. राष्ट्रगीत म्हणायचे होते. तत्पूर्वीच आदरणीय सभापती महोदयांनी अर्ध्या-तासासाठी सभागृहाची बैठक स्थगित केली. तेव्हा आम्हाला काहीच कळले नाही. रात्रीचे 12.00 वाजण्यास 5 मिनिटे कमी असताना माननीय अर्थमंत्री आले व त्यांनी व्हॅट लावण्यासंबंधीची सभागृहात घोषणा केली. व्हॅट मंजूर करून राज्याला लागू करायचा होता. हे सर्व झाल्यानंतर सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली. त्यावेळी अशी घोषणा करण्यात आली होती की, व्हॅट लागू झाल्यानंतर सर्व कर रद्द करण्यात येतील. फक्त मुंबई महानगरपालिकेचा जकात कराचा टप्पा सोडला तर, इतर सर्व महानगरपालिका, नगरपालिकांचा जकात कर रद्द करीत आहोत. जकात कर रद्द केल्यामुळे संभाजी नगर, नागपूर, नांदेड महानगरपालिकांनी फटाके वाजविले. व्यापाऱ्यांचा जकात रद्द झाल्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचा तर व्यापाऱ्यांनी जरीपटका देऊन, मिरवणूक काढून जंगी सत्कार केला होता. मोठी रोषणाई केली होती. हे सर्व माननीय राज्य मंत्री श्री.भास्करराव जाधव यांना माहिती आहे. जकातीच्या ठेक्यावरून होणारी मारामारी हा वेगळा विषय आहे.

ग्रामीण भागासाठी व्हॅट लावल्यानंतर त्यांना अनुदान देणे, आर्थिक सक्षम करणे ही शासनाची जबाबदारी आहे असे घटनेने म्हटले आहे. 73 वी घटना दुरूस्ती झाली. संविधानातील अनुच्छेद 244 छ हा पंचायतींच्या शक्ती, प्राधिकार आणि जबाबदाऱ्या या संबंधातील आहे. त्यात मी जात नाही. अनुच्छेद 243 ज पंचायतींची कर लादण्याची शक्ती आणि पंचायतीचा निधी या संबंधातील आहे. यात असे नमूद करण्यात आले आहे की, "राज्य विधानमंडळ, कायद्याद्वारे, त्या कायद्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे तशा कार्यपद्धतीनुसार आणि तशा मर्यादांच्या अधीनतेने तसे कर, शुल्क, पथकर आणि फी आकारण्यास, वसूल करण्यास आणि विनियोजित करण्यास पंचायतींना प्राधिकृत करू शकेल." हा आपला अधिकार आहे. या अधिकारांतर्गत हे विधेयक आपण आणले आहे. "तशा प्रयोजनांसाठी आणि तशा शर्तीच्या आणि मयार्दांच्या अधीनतेने राज्य शासनाने आकारलेला, वसूल केलेला तसा कर, शुल्क, पथकर आणि फी पंचायतीकडे अभिहंस्तांकित करू शकेल." "राज्य शासनाच्या एकत्रीकृत निधीतून पंचायतींना सहायक अनुदान देण्याची तरतूद करू शकेल."

श्री.दिवाकर रावते...

आता आपण व्हॅट गोळा करीत आहात. त्यावेळी आपण सदनाच्या माध्यमातून सर्व कर पद्धतीला अभय दिले होते. तेव्हा सांगितले होते की, आम्ही आपले सगळे करू देऊ. आपणास व्हॅटमधून वाटा देऊ. ज्यावेळी व्हॅट लावला त्यावेळी केंद्र सरकारने राज्य शासनाला आश्वासन दिले होते की, आपल्या अर्थसंकल्पामध्ये व्हॅट लावल्यामुळे तूट आली तर ती केंद्र सरकारच्या निधीतून भरून काढण्यात येईल. महाराष्ट्रातील व्यापार उद्योग प्रचंड आहे. त्यामुळे आपण जमा केलेला व्हॅट हा जास्त आल्यामुळे केंद्र सरकारला तो भरून देण्याचा प्रश्नच आला नाही. आपल्याला तूट आलीच नाही. आपण व्हॅटमुळे पुढे गेलो. आता अशी परिस्थिती आहे की, शासन कायद्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करीत आहे. त्यावेळी अर्थ मंत्री श्री.जयंतराव पाटील होते. त्यांनी रात्री पावणे बारा वाजता प्रस्ताव मांडला होता, हे त्यांना आठवत असेल. व्हॅटद्वारे जमा होणारा कर आपणाला राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना, पंचायत समित्यांना द्यायचा होता. संविधानाच्या अनुच्छेद 243 ज मध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, "राज्य शासनाच्या एकत्रीकृत निधीतून पंचायतींना सहायक अनुदान देण्याची तरतूद करू शकेल, अनुक्रमे पंचायतीद्वारे किंवा पंचायतीच्या वतीने मिळालेला सर्व पैसा जमाखाती टाकण्याचा आणि तेथून तो काढून घेण्याच्या प्रयोजनार्थ निधी स्थापन करण्याची तरतूद करू शकेल." हा विषय निधी संबंधातील झाला.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

माझे असे म्हणणे आहे की, आपण 1999 मध्ये जकात रद्द केली आहे, त्यामुळे तो विषय संपला आहे. आता 2012 सुरु असून या गोष्टीला 13 वर्षे झालेली आहेत. मग शासनाला असा एकाएकी कोणता साक्षात्कार झाला की ज्यामुळे 13 वर्षानंतर फक्त एवढ्याच ग्राम पंचायतींच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाला आहे. पण तसे नाही तर निधीचा प्रश्न महाराष्ट्रातील सर्वच्यासर्व ग्राम पंचायतींना समान लागू झाला पाहिजे असा माझा घटनात्मक दावा आहे.

सभापती महोदय, 246 कलमाप्रमाणे सांगावयाचे तर 45 वर्षाचा कालावधी, त्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या समान आहेत. पण तुम्ही 12-13 वर्षानंतर, दर तीन वर्षांनी अनुदान बंद झाल्या नंतर, या संबंधातील परिस्थिती लक्षात आल्यानंतर ताबडतोब एक वर्षाने पूर्वलक्षी प्रभावाने जर काही केले असते तर मी समजू शकतो. पण 13 वर्ष झाल्यानंतर शासनाला एकदम 43 ग्राम पंचायतींचा पुळका का आला ? मग महाराष्ट्रातील इतर ग्राम पंचायतींच्या उत्पन्नाच्या बाबतीत पुळका का आला नाही? मग त्या ठिकाणी होणाऱ्या व्यापार उदिमाबाबत जर असा कर लावावयसाचा असेल तर तो महाराष्ट्रातील सर्वच ग्राम पंचायतींमध्ये लागू झाला पाहिजे आणि महाराष्ट्रातील सर्वच ग्राम पंचायतींना आर्थिक सक्षमीकरणासाठी बळ मिळाले पाहिजे. घटनेप्रमाणे फक्त 83 जणांना मिळत होते. पण बाबा आदमकाळी त्यांचे प्रत्येकाचे उत्पन्न वेगवेगळे होते. मराठवाड्यामध्ये निजामाचे वेगवेगळया पध्दतीचे कर होते. परंतु त्याचे विश्लेषण करावयास गेलो तर प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये, प्रत्येक ठिकाणी वेगळया पध्दतीने कर लावण्यात आले होते. परंतु आपण ते सर्व संपुष्टात आणून ते समान पातळीवर आणले. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, या घटना दुरुस्तीमुळे महाराष्ट्रातील सगळया ग्राम पंचायतींना समान पातळीवर घेण्यात आले असेल तर तुम्हाला या विधेयकामध्ये 83 ग्राम पंचायतींना नव्हेतर सर्व ग्राम पंचायतींच्या बाबतीत हे लागू करावयास पाहिजे. या विधेयकामध्ये असे नमूद केले आहे की,"राज्यातील जवळपास 67 ग्राम पंचायती आपापल्या स्थानिक क्षेत्रामध्ये उपभोग, उपयोग आणि विक्री यासाठी होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर स्थानिक पंचायत कर वसूल करण्याचा अधिकार प्रदान करणे शासनास इष्ट वाटते." याठिकाणी "स्थानिक पंचायत कर" असे म्हटलेले आहे आणि तो घटनेप्रमाणे महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ग्राम पंचायतीकरता आहे आणि तसा तो सर्व ग्राम पंचायतींना लागू झाला पाहिजे असा येथे महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, एकतर हे करणार असाल तर सर्वांसाठी करावे आणि आता 12-13 वर्षा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

नंतर 83 चा मुद्दा लागू होत नाही. तसेच 67 ग्रामपंचायतींचा विषयाच्या बाबतीत असे झाले आहे याबाबत 13 वर्षानंतर एकदम एकाएकी झोपेत आठवण झाली काय ? असे होऊच शकत नाही.

सभापती महोदय, जर या कराचे स्वागत करावयाचे असेल आणि ग्रामीण भागातील ग्राम पंचायतींचे आणखी सक्षमीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करावयाचा असेल तर या करामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ग्रामपंचायतींना उपयोग झाला पाहिजे. आम्हाला याबाबतीत उप सूचना मांडण्याचा अधिकार आहे, आपण आम्हाला संधी देतच नाही. सकाळी विधान सभेमध्ये विधेयक मंजूर झाल्यानंतर दुपारी विधान परिषदेमध्ये विधेयक आणल्यानंतर ते चर्चेला घेतले जाते. आम्ही आपला सन्मान करतो, कारण सरकारचे काम झाले पाहिजे. पण आमचे विचार मांडण्याचे जे अधिकार आहेत, या माध्यमातून विविध भागातील, विविध संस्थांच्या बाबतीत संरक्षण निर्माण करण्याच्या बाबतीत अधिकार प्रदान केलेले आहेत ते तुम्ही आम्हाला वापरुच देत नाही. आज सकाळी सभागृहामध्ये आल्यानंतर समजले की, आजच्या कामकाज पत्रिकेवर तीन विधेयके दाखविण्यात आली आहेत. आम्ही नेहमी अगोदर विधेयक वाचतो. पण जर ते वाचावयास मिळाले नाही तर ऐन वेळेस भाषण करण्यासाठी उभे राहिल्यानंतर आम्ही सरकारला सांगणार की, आता तुम्हालाच 67 ग्रामपचायंतींसाठी तरतूद करावयास पाहिजे. त्यामुळे हा विषय गंभीर स्वरुपाचा होतो.

सभापती महोदय, प्रत्येक वेळी 8 दिवसाचे, 10 दिवसाचे, 15 दिवसाचे अधिवेशन असते आणि त्यातील प्रत्यक्ष 10 ते 15 दिवस हे कामकाजाचे असतात आणि बाकीचे उर्वरित दिवस असेच जातात. त्यामुळे खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील कायद्यामध्ये अमूलाग्र, विचारपूर्वक बदल करण्यासाठी विधीमंडळाच्या माध्यमातून आम्हाला जे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे, ते वापरताच येत नाही ही शोकांतिका आहे. एकदा झाले, दोनदा झाले, तीन वेळा झाले, मी समजू शकतो.पण आता हे सवयीचे झालेले आहे.सन्माननीय सदस्यांना विधेयकाची प्रत दिल्यानंतर त्याबाबत विचार करण्यासाठी किमान 48 तास तरी देणार आहात की नाही, आम्हाला उप सूचना मांडावयाच्या असतील तर त्यासाठी काही वेळ देणार आहात की नाही ? पण तसे काहीच होत नाही.

सभापती महोदय, विधान परिषदेचे दु:ख असे आहे की, आम्ही एखादे विधेयक मंजूर केले किंवा नामंजूर केले तरी ते पुन्हा विधान सभेमध्ये पाठवावे लागते. त्याठिकाणी एकदा अशी परिस्थिती निर्माण झाली की, तेथील अधिवेशन संपल्यानंतर पुन्हा येथे खास अधिवेशन भरविण्याची





श्री.दिवाकर रावते . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

वेळ आली होती नाहीतर ते विधेयक पुढील अधिवेशनामध्ये मांडावे लागले असते. या सगळया तांत्रिक बाबींची जबाबदारी ही विधी मंडळाचे संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या विभागाची आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मी माननीय सभापतींकडे रडगाणे गाणार. आम्ही कोणाकडे जावयाचे ? मंत्र्यांचा प्रश्नच येत नाही. देशात प्रत्येक विधिमंडळामध्ये संसदीय कार्य मंत्र्यांचे पद असते. लोकसभेमध्ये संसदीय कार्य मंत्रीपद अतिशय समर्थपणे हाताळले जाते. ते बॉलींगचे, बॅटींगचे इतर भरपूर उद्योग करतात. तरी सुध्दा त्या ठिकाणी सर्व व्यवस्थित असते. या ठिकाणी मात्र आम्हाला कधी तरी भडंग खावयास घालतात. एक पिशवी 50 आमदार. त्यांना असे वाटते की, हेच आमचे सुनियोजन झाले. पण असे नसते. आम्ही या ठिकाणी कामकाज करण्यासाठी येतो.

हे विधेयक अतिशय गंभीर आहे. हे विधेयक घटनाबाह्य आहे असे माझे मत आहे. माननीय मंत्री महोदय उठून सांगतील की, आम्हाला विधी खात्याने दिले आहे. काही वेळा अशी दुर्दैवी परिस्थिती निर्माण होते की, आम्ही विधिमंडळामध्ये काहीही मंजूर करावयाचे, मग कोणी तरी न्यायालयात जातो आणि न्यायालयामध्ये तो कायदा विचित्रपणाने समोर येतो. या विधिमंडळामध्ये दोन-तीन विधेयके अशी मंजूर झाली की ज्या बाबतीत आम्ही चर्चेचा आग्रह धरला होता पण चर्चा करु दिली नाही. सावकारी बंदीचे विधेयक तुमचे आमचे सर्वांचे आहे. सरकारच्या यशाचा किंवा अपयशाचा तो विषय नाही. प्रत्येक आमदाराला ग्रामीण भागामध्ये हे सर्व बघावे लागते. ते विधेयक तीन वेळा परत आले. अजूनही ते मान्य झालेले नाही. फायर ॲक्टच्या बाबतीत सुध्दा तसेच झाले. त्या संदर्भात मी दिल्लीपर्यंत पत्रव्यवहार केला होता. त्यानंतर 80 पानांचे विधेयक या ठिकाणी आले. माननीय श्री. टोपे साहेब त्यावेळी त्या खात्याचे मंत्री होते. त्यावेळी मी अजीजीने म्हणालो होतो की, हे 80 पानांचे अत्यंत महत्वाचे विधेयक आहे, यावर मला चर्चा करावयाची आहे, यावर चर्चा होणे आवश्यक आहे. पण ते विधेयक पाच मिनिटांमध्ये मंजूर झाले. आज फायर ॲक्टची काय ताकद आहे ते मंत्रालय जळाल्यानंतर सुध्दा कळलेले नाही. जो फायर ॲक्ट झालेला आहे त्या कायद्याप्रमाणे किमान पाच सहा अधिकारी आणि कर्मचारी घरी जावयास पाहिजे होते. पण कोणालाही काही झालेले नाही. मग तो कायदा कशासाठी केला ? मुंबईच्या प्रत्येक इमारतीमध्ये भयानक परिस्थिती आहे. ते आम्ही कधी मांडणार, कधी बोलणार ? आपण बोलू देत नाही.

सभापती महोदय, भारतीय राज्य घटनेप्रमाणे पंचायती राज संस्थांचा अमुलाग्र अधिकार आहे. ही कल्पना स्व. राजीव गांधी यांची होती. आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी. दोन गोष्टींच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. दिवाकर रावते .....

बाबतीत स्व. राजीव गांधी यांनी या देशामध्ये क्रांती केली. त्याचा सन्मान आपण केलाच पाहिजे. एक म्हणजे त्र्याहत्तरावी घटना दुरुस्ती करुन ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेपासून शेवटी बसलेल्या फाटक्या धोतरातील माणसाला सुध्दा ग्रामसभेत बोलून माझ्या गावात काय पाहिजे हे सांगण्याचा अधिकार दिलेला आहे. ही साधी गोष्ट नाही. माझ्या मुलाला शिक्षण मिळत नसेल तर तो उभे राहून बोलू शकतो. ग्रामसभेमध्ये महिलांकरिता वेगळी सभा आहे. ग्रामसभेने महिलांचे ऐकले पाहिजे, त्यांनी काही ठराव केले असतील तर त्या ठरावांना मान्यता दिली पाहिजे, जर मान्यता दिली नाही तर मान्यता का देत नाही याचे स्पष्टीकरण गावाने दिले पाहिजे. एवढे सामर्थ्य या घटनादुरुस्तीमध्ये आहे. ही घटनादुरुस्ती स्व. राजीव गांधी यांनी केली. आपण माहिती तंत्रज्ञानाबाबत बोलतो. त्या क्षेत्रातील क्रांती स्व. राजीव गांधी यांनी आणली. तुम्ही तुमच्या नेत्यांचा आदर करणार की नाही हा प्रश्न यातून निर्माण झालेला आहे. कायद्यामध्ये जर एखादी उणीव असेल तर मोठ्या मनाने ती मागे घ्यावी आणि नेत्यांना जे अभिप्रेत आहे ते करण्याकरिता आम्ही पुन्हा प्रयत्न करु असे सांगितले पाहिजे. उणिवा दाखविणे हे सभागृहाचे काम आहे. कायदे करण्यासाठी आपण बसलेलो आहोत. माझे असे म्हणणे आहे की, 13 वर्षानंतर विधेयक आणून त्यात केवळ 62 गावांच्या बाबतीत विचार करणे गैर आहे. सर्व गावांना हा अधिकार दिला पाहिजे.

सभापती महोदय, घटनेच्या परिच्छेद 243 (छ) मध्ये असे म्हटले आहे की, "संविधानाच्या तरतुदींच्या अधीन राहून राज्य विधिमंडळ कायद्याव्दारे पंचायतींना स्वराज्य संस्था म्हणून कार्य पार पाडणे शक्य व्हावे या दृष्टीने त्यांना आवश्यक असतील तसे अधिकार व प्राधिकार देऊ शकेल." त्याच्या अंतर्गत आम्ही या ठिकाणी काम करण्यासाठी उभे आहोत. घटनेच्या अंतर्गत हे काम करावयाचे आहे. घटनेच्या परिच्छेद 243 (झ) मध्ये असे म्हटले आहे की, "आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करण्यासाठी वित्त आयोग गठीत करेल." आपण ते केले का ? घटनेच्या परिच्छेद 243 (झ) मध्ये म्हटल्या प्रमाणे हे आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकनच आहे आणि त्यासाठी आपण हे विधेयक आणले आहे. मग हे 62 गावांच्या बाबतीतच का ? अशा प्रकारचा आयोग आपण निर्माण केला होता का आणि त्या आयोगाचे असे म्हणणे आहे का, कोणाच्या म्हणण्यानुसार फक्त 62 गावांचा विषय आला ? घटना तशी परवानगी देत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या विधिमंडळामध्ये या विधेयकाला मान्यता देण्यासाठी घटना मला परवानगी देत नाही. सभापती महोदय, आपण आम्हाला शपथ देता. घटनेच्या अधीन राहून मी सर्व काम करीन. अशा प्रकारची शपथ घेतली असल्यामुळे मी येथे उभा आहे. घटनेच्या अधीन राहूनच सभागृहात कामकाज चालविले पाहिजे असे आपल्यावरही घटनेने बंधन घातलेले आहे. शासनाला जो काही कायदा करावयाचा आहे तो घटनेला अनुसरुन करावा, घटनेची तोडमोड करुन कायदा करु नये. घटनेमध्ये बसवून कायदा आणला पाहिजे असे शासनावर बंधन आहे.

सभापती महोदय, घटनेच्या अनुच्छेद 243 (झ) मध्ये असे नमूद केले आहे की, "राज्याचा राज्यपाल, संविधान अधिनियम, 1992 याच्या प्रारंभापासून शक्य होईल तेथवर एक वर्षाच्या आत आणि त्यानंतर प्रत्येक पाचवे वर्ष समाप्त होण्याच्या वेळी, पंचायतींच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करण्यासाठी आणि पुढील बाबींच्या संबंधात राज्यपालांकडे शिफारशी करण्यासाठी एक वित्त आयोग स्थापन करील." शासनाने अशी काही कार्यवाही केलेली आहे का ? 62 गावांच्या संदर्भात शासनाला स्वप्न पडले आहे का ? 1999 साली बंद केलेल्या जकातीमुळे तेथे अडचण झाली आहे, त्यामुळे तिकडच्या व्यापाऱ्यांनी आणलेल्या मालाच्या उलाढालीतून त्यांना जकातीतून जे उत्पन्न मिळत होते. त्याच पध्दतीचे उत्पन्न त्यांना पुन्हा मिळाले पाहिजे. म्हणून स्थानिक पंचायत कर घेण्याला मुभा दिली जात आहे का ? माझे असे म्हणणे आहे की, स्थानिक पंचायत कर जरुर सुरु करावा. परंतु तो राज्यातील सर्व ग्रामपंचायतींसाठी सुरु करावा. मंत्री महोदय विधानसभेमध्ये तशी उपसूचना मंजूर करुन घेऊ शकतील. हे सर्व करीत असताना घटनेच्या अनुच्छेद 243 (झ) मध्ये सुचविल्याप्रमाणे वित्त आयोग गठित करण्याच्या निर्णयाप्रत हे शासन आले आहे काय ? आले नसेल तर कृपा करुन मंत्री महोदयांनी हे विधेयक मागे घ्यावे.

या विधेयकामध्ये या सभागृहात दुरुस्ती करता येत नाही. या विधेयकात विधानसभेमध्ये दुरुस्ती करावी लागेल. आपण कितीही आम्हाला सांगण्याचा प्रयत्न केला तरी हे घटनाबाह्य विधेयक आहे असे माझे ठाम मत असल्यामुळे मी या विधेयकाच्या बाजूने उभा राहू शकत नाही. मी घटनेच्या अधीन राहून काम करण्याची शपथ घेतली असल्यामुळे मला अभिप्रेत असलेली ही

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते....

घटना आहे. मंत्री महोदयांना आमचे म्हणणे मान्य नसेल तर राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांना आपल्यासमोर मत मांडण्यास पाचारण करावे. जेणे करुन या विषयासंबंधी अधिक ज्ञान प्राप्त होईल. मी कायद्याचा विद्यार्थी नसल्यामुळे मी यासंबंधी अज्ञानी आहे, मला घटना अशी समजलेली आहे. हे विधेयक विधी खात्याकडून तयार होऊन आलेले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, हे विधेयक बरोबर आहे. माझे असे म्हणणे आहे की, त्यांचे म्हणणे बरोबर नाही. त्यामुळे आता ॲडव्होकेट जनरल यांनीच त्यावर मत दिले पाहिजे. अन्यथा, मी 500 ग्रामपंचायतींना कोर्टात जाण्यास भाग पाडीन. या 62 गावांकरिता हा कर सुरु केला जात असेल तर 500 ग्रामपंचायतीत तो सुरु करण्याची मागणी तुम्ही करावी असे मी त्यांना सांगेन. घटनेत नमूद केल्याप्रमाणे वित्त आयोग स्थापन केला असता आणि त्यांच्या अहवालानुसार कार्यवाही केली असती तर मी काही म्हटले नसते. पण हे घटनाबाह्य विधेयक आहे.

सभापती महोदय, या सभागृहात हे विधेयक प्रस्तुत करणेही अयोग्य आहे असे माझे मत आहे. या विधेयकावरील चर्चा आपण आपल्या अधिकारात थांबवावी. आपल्याला तो अधिकार आहे आणि घटनादत्त बंधनही आहे. तसे आपण करावे अशी मी आपल्याला विनंती करतो. या विधेयकातील तरतुदीनुसार त्या ग्रामपंचायतींसाठी तरतूद करता येते. या विधेयकासाठी विधी खात्याने मत दिलेले आहे. यापूर्वी अनेकदा विधी व न्याय खात्याने चुकीचे मत दिल्याची उदाहरणे समोर आलेली आहेत. मी घटनाबाह्य काम करु शकत नाही असे मी नम्रपणे सांगतो. विधिमंडळानेही अशा प्रकारचे काम करु नये असे नम्रपणे मांडतो.

ग्रामपंचायतींना सक्षम करण्यासाठी कर वसुलीची परवानगी जरुर द्यावी, ही आनंदाची गोष्ट आहे. काही योजनांसाठी त्यांच्याकडे 10 टक्केही वर्गणी नसते, या करामुळे ती रक्कम ते भरु शकतील. या निधीतून गटाराच्या योजना, पाणी पुरवठ्याच्या योजना राबवू शकतील. मंत्री महोदयांनी हे सूचविले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पण ते सर्व ग्रामपंचातींसाठी करावे. हे विधेयक केवळ 62 ग्रामपंचायतींसाठी आणले असल्यामुळे मी या विधेयकाच्या बाजूने उभा राहू शकत नाही असे नम्रपणे सांगतो आणि येथेच थांबतो. जय हिंद.

---------

यानंतर श्री.शिगम....

अग्रमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:20

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012चे वि.स.वि. क्रमांक 20 - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 67 ग्रामपंचायती संबंधातील निर्णय 2000 सालामध्ये घेण्यात आला. जकात रद्द करुन आर्थिक सहाय्य देण्याच्या संदर्भातील तो विचार होता. सन्माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील हे अनेक वर्षे राज्याचे वित्तमंत्री होते. त्यांनी व्हॅट आणला. व्हॅट आणत असताना इतर कोणतेही कर असणार नाहीत, जकात असणार नाही असे त्यांनी सांगितले...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी वित्त मंत्री असताना माझ्या संपूर्ण करियरमध्ये व्हॅट लावल्यावर जकात काढू असे आश्वासन दिलेले नाही. मी असे सांगितले होते की, सेल्स टॅक्सचे स्लॅब जाऊन एकच व्हॅल्यू ॲडेड टॅक्स येईल. देशामध्ये व्हॅटच्या निमित्ताने सर्व राज्यांचे सेल्स टॅक्स समान व्हायला लागले तर आपले एक पाऊल पुढे पडेल. आपल्याला अंतिमत: एकाच टॅक्सकडे जायचे आहे. व्यापा-यांना आणि इतर सर्वांना अनेक टॅक्स भरायला लागू नये हे याचे पहिले पाऊल आहे. जेव्हा जीएसटी येईल ते अंतिम पाऊल असेल असे मी त्यावेळी सांगितले होते.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी खुलासा केलेला आहे. विधेयकाच्या उद्देश आणि कारणामध्ये असे नमूद केलेले आहे की, "राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी, मालाची मुक्त ने आण सुनिश्चित करण्यासाठी..." जकात लावल्यामुळे राज्यातील औद्योगिक विकासाला चालना मिळेल या मताशी मी सहमत होऊ शकत नाही. Octroi is worst form of collection of tax. एकीकडे महानगरपालिकांची जकात रद्द व्हावी अशी मागणी होत असताना आपण ग्रामपंचायतीच्या संदर्भात जकात लावण्याचा प्रयत्न केला तो योग्य आहे असे मला वाटत नाही. इतर कोणत्या राज्यामध्ये ग्रामपंचायती जकात वसूल करतात हे सभागृहाला सांगितले तर बरे होईल. इतर कोणत्याही राज्यामध्ये नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये जकात घेतली जात नाही. असे असताना आपण लहान लहान गावामध्ये जकात लावण्यासंबंधी हे विधेयक आणलेले आहे त्या पाठीमागे काय हेतू आहे, हे विधेयकाच्या उद्देश आणि कारणामध्ये स्पष्ट होत नाही. आपण 67 ग्रामपंचायतींना किती सहाय्यक अनुदान देत होता, या ग्रामपंचायतीनी पुन्हा जकात लावण्यासाठी आपणाकडे मागणी केली होती का, अशी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

एकूण किती गावे आहेत याचा अभ्यास केलेला आहे काय ? ज्या प्रमाणे अ, ब, क, ड नगरपालिका आहे त्या प्रमाणे ग्रामपंचायतींची अ, ब, क, ड अशी वर्गवारी केलेली काय, अ वर्ग ग्रामपंचायत म्हणजे 10 ते 15 हजार किंवा 20 ते 25 हजार लोकसंख्या असलेली गावे, अशा पध्दतीने अभ्यास केला असता तर अधिक बरे झाले असते.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी संविधानातील अनुच्छेदाचा या ठिकाणी उल्लेख केला. मी त्यादृष्टीने अभ्यास केलेला नसल्यामुळे घटनेच्या संदर्भात मी काही बोलणार नाही. महानगरपालिकामध्ये एका टोकापासून दुस-या टोकापर्यन्त एस्कॉर्ट फी घेतली जाते. हायवेवर जी गावे आहेत त्यांची एस्कॉर्ट फी कशी वसूल करणार हा देखील प्रश्न आहे. पाच-पाच दहा-दहा कि.मी. अंतरावर गावे आहेत. हे विधेयक माननीय मंत्री महोदयांना देखील फारसे आवडले असेल असे मला वाटत नाही. आपण पाणीपुरवठ्याच्या संदर्भात अधिकार दिलेले आहेत. त्या बाबतीत मला काही म्हणायचे नाही.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

परंतु या विधेयकाचा पुन्हा एकदा अभ्यास करुन या विधेयकाचा नेमका किती फायदा होणार आहे हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, 11 (क) मध्ये म्हटले आहे की, "उपभोग, उपयोग किंवा विक्री यांसाठी होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर कर". हा जो कर लावण्यात आलेला आहे त्या बाबत पूर्ण अभ्यास केल्यानंतर जकात लावण्याचा विचार करावा अशी विनंती मी माननीय मंत्री महोदयांना करीत आहे.

सभापती महोदय, व्हॅट आल्यानंतर कोणताही कर लागणार नाही अशी सर्व संबंधितांना जाणीव होती. माननीय मंत्री श्री.जयंत पाटील हे किती युक्तीवादाने बोलतात याची मला कल्पना आहे. ते कधीही शब्दात सापडणार नाही. पण हेतू अत्यंत महत्वाचा होता. व्हॅट आल्यानंतर कोणताही टॅक्स लागणार नाही. एन्ट्री कर लागणार नाही, जकात कर लागणार नाही, अगदी उत्पादन शुल्क कर देखील लागणार नाही अशी चर्चा त्यावेळी झाली होती. आपण कदाचित ते बोलला नसाल. सभापती महोदय, या विधेयकाचा अभ्यास करुन पुन्हा हे विधेयक आणल्यास चांगले होईल, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 20- मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा ) विधेयक 2012 या विधेयकाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन 1999 मध्ये 182 नगरपालिकांची जकात कर रद्द करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये ग्रामपंचायतीला जकात कधीच लावण्यात आली नव्हती. जर ग्रामपंचायतींना जकात होती तर 182 नगरपालिकांची जकात रद्द झाली ती पुन्हा सुरु करणार आहात काय, त्यासाठी वेगळे विधेयक आणणार आहात काय ? ग्रामपंचायतीला अनुदान देणे अशक्य आहे म्हणून त्यांना त्याचा सोर्स उपलब्ध व्हावा यासाठी जकात लावण्यात येत आहे. ज्या महानगरपालिकांमध्ये स्थानीय कर लावला आहे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आंदोलन सुरु आहे. असे असताना छोट्या गावांमध्ये आपण नव्याने ऑक्ट्रॉय लावत आहात हे बरोबर नाही.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी येथे मांडलेला मुद्दा बरोबर आहे. काही ठिकाणी गावे इतकी जवळ जवळ आहेत की त्या गावांमध्ये पाच किलोमीटरचे अंतर सुध्दा नाही. तेव्हा आपण हा कर लावल्यानंतर त्याची अंमलबजावणी कशी करणार आहात ? त्या गावांतील व्यवसाय किती मोठा आहे, त्यातून किती मोठ्या प्रमाणावर कर गोळा होणार आहे आणि त्यातून गावाचा सर्व कारभार सुरळीत चालणार आहे काय याचा देखील विचार झाला पाहिजे. यातून नवीन आंदोलनाला एक विषय मिळणार आहे. या जकातीमधून फार मोठा महसूल मिळेल असे मला वाटत नाही. ग्रामपंचायतीला ऑक्ट्रॉय लावणे म्हणजे त्या गावातील व्यापार संपविण्याच्या दृष्टीने हालचाली करण्यासारखे आहे. तेव्हा या विधेयकाला विरोध करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 20- मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा ) विधेयक 2012 या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी एका वेगळ्या मुद्याकडे लक्ष वेधत आहे. काही कारणांनी 67 गावांमध्ये जकात होती आणि ती युती शासनाच्या काळात बंद करण्यात आली. आता ती पुनर्जीवित करण्यासाठी येथे विधेयक आलेले आहे.

सभापती महोदय, विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये नमूद केलेले आहे की, "ग्रामपंचायतीच्या प्रशासनावर व विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे." विकासावरील प्रतिकूल परिणाम आम्ही समजू शकतो, परंतु प्रशासनावरील प्रतिकूल परिणाम हे अतर्क आहे. हे कारण समर्थनीय वाटत नाही..

सभापती महोदय, आपण 67 गावांना पुनर्जीवित करीत आहोत. परंतु तेथे कोणती अनिवार्य परिस्थिती निर्माण झाली ज्यामुळे आपणास हे विधेयक आणावे लागले. त्या ग्रामपंचायतीने व्यक्तीगत मागणी केली होती काय, असेल तर कोणत्या कारणासाठी केली आहे याचा उल्लेख उद्देश आणि कारणे यामध्ये करण्यात आला असता तर बरे झाले असते. परंतु दुदैवाने तसा उल्लेख आलेला नाही, कदाचित असा उल्लेख करणे शासनास महत्वपूर्ण वाटले नसेल. आपण सामान्य माणसांच्या खिशातून पाणीपट्टी, घरपट्टी, शिक्षण कर, शेतसारा इत्यादी कर घेतो. आता आपण 67 गावातील लोकांच्या खिशातून जकात कर काढत आहोत. ज्या हेडसाठी हा पैसा काढत आहोत त्याचा विनियोग कुठे करणार आहोत त्याचाही येथे उल्लेख करण्यात आलेला नाही. कोणती अनिवार्य परिस्थिती निर्माण झाली ज्यामुळे हे विधेयक आणावे लागले त्याचाही कोठे उल्लेख नाही. जेव्हा आपण नवीन कर प्रस्तावित करतो तेव्हा सामान्य माणसाच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के कर प्रत्यक्ष रुपाने घेणार आहोत आणि त्या मोबदल्यात आपण त्यांना काय देणार आहोत याचाही खुलासा नवीन करप्रणालीमध्ये येण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

आम्ही जो कर घेणार आहोत, त्या कराचा हिशोब देण्यासाठी आम्ही बांधील नाही. अशी बेजाबदार वक्तव्ये करण्यात येणार असतील तर भावी पिढीसाठी ती निश्चितपणे चुकीची ठरेल. शासनाकडून या संदर्भात चुकीचा संदेश जाऊ नये म्हणून या गोष्टीचा खुलासा या विधेयकात करण्यात आला असता तर बरे झाले असते. या विधेयकाचा फेरविचार व्हावा अशा प्रकारची सूचना करतो आणि या विधेयकावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते,अरुण गुजराथी, चंद्रकांत पाटील,भगवान साळुंखे यानी या विधेयकाच्या अनुषंगाने जे मुद्दे या सभागृहात उपस्थित केलेले आहेत, त्या मुद्यांची मी पुनरावृत्ती करणार नसून काही नवीन मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, एका बाजूला चिंता करीत आहोत की, राज्यातील उद्योग बाहेर राज्यात जात आहेत. मी हरियाणा, उत्तरांचल या राज्यांमध्ये जाऊन पाहिले की, त्यांनी फार मोठया औद्योगिक वसाहती विविक्षित अशा व्यवसायांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. मग त्यात केमिकल्स असतील किंवा विविध स्वरुपाचे उद्योग असतील यांना त्या शासनाने प्रोत्साहन दिलेले आहे. आजच सकाळी नियम 93 चे निवेदन प्राप्त झाले. पुणे येथील 6 एसईझेड यांनी स्वत:च प्रस्ताव मागे घेण्यासाठी सरकारकडे विनंती केली आहे. 6 एसईझेड मान्य झाले होते, 586 प्रस्तावांना मान्यता मिळाली, परंतु या संदर्भात शासनाचे धोरण मध्येच बदलले. शासनाचे धोरण बदलल्यामुळे 20 एसईझेड यांनी महाराष्ट्रातून काढता पाय घेतला आहे. त्यामध्ये 15 विशेष क्षेत्रांनी माघार घेतली. जागतिक मंदी, जमीन भूसंपादनाच्या कामात येण्याऱ्या अडचणी, बाजारपेठेतील चढउतार अशा मुख्य अडचणी सरकारने सांगितलेल्या आहेत. हिंदी चित्रपटामध्ये एखादा स्मृतीभंश झालेला हिरो असतो, तो अचानक उठून विचारतो की, मैं कहाँ हू. मुझे कुछ मालुम नही हैं. एसईझेड च्या बाबतीत शासनाची अशीच परिस्थिती आहे. व्हॅट सारखे एक कॅट याची जबाबदारी शासनाने ग्रामपंचायतींवर टाकलेली आहे. शासनाने 67 गावांची निवड केलेली आहे, त्या गावांची निवड करण्यासाठी कोणते निकष लावले आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतींकडून शासनाकडे मागणी येईल की, हा कर लावण्याची आम्हाला देखील परवानगी देण्यात यावी. अशी त्यांच्याकडून मागणी आली तर त्यात काहीही चुकीचे नाही. शासनाने सांगितले होते की, आम्ही ग्रामपंचायतींना सहायक अनुदान देणार होतो. परंतु शासन सहायक अनुदानही देण्याचे बंद करणार आहे. या गोष्टीची त्या विभागातील व्यापारांना आणि त्या भागातील उद्योजकांना माहितीच दिलेली नाही, या 67 गावांना कर लावणार आहात, परंतु त्या गावातील लोकांनी, व्यापाऱ्यांनी, पुढचे नियोजन केले असेल शासनाने त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिलेले नाही.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

सभापती महोदय, सन्माननीय तत्कालिन अर्थमंत्री श्री.जयंतराव पाटील यांनी सांगली येथे शेकडो व्यापाऱ्यांच्या परिघदा घेतल्या. त्यांनी व्यापाऱ्यांच्या परिषदा घेतल्या म्हणून सांगली, सातारा, कोल्हापूर येथे मोठमोठ्या व्यापाऱ्यांनी त्यांचा सत्कार केला. त्या व्यापाराना सांगितले की, आम्ही तुमच्यावरील जकात रद्द करणार आहोत, असे सांगून सांगली महानगरपालिकेत सर्व पॅनल निवडून आणले. माननीय आबासाहेबांच्या एकाही माणसाला तिकिट दिले गेले नाही. तेथे पूर्ण पॅनल निवडून आल्यानंतर परत जकात लावली. आता पुन्हा ग्रामपंचायतींवर कर लावता आहात.

श्री.आर.आर.पाटील : सांगलीमध्ये आमचा वेगळा गट नाही. ते आणि आम्ही सर्व एकत्र आहोत. मी कोणासाठीही व्यक्तीशः तिकिट मागतले नाही, कोणाची शिफारस केली नव्हती. मी तेथे प्रचाराला गेलो नव्हतो. त्या पॅनेलला जनतेने निवडून दिले. त्यावेळी आपण आमच्या बरोबर होतात...

श्री.दिवाकर रावते : तुम्ही कोणासाठी तिकीट मागितले नाही, कोणाची शिफारस केली नाही, तुम्ही प्रचाराला गेला नव्हता. तुम्हाला तेथे कोणी सहारा दिला नाही, म्हणून तेथे गेला नाहीत. आपण सभागृहात सत्य माहिती सांगितली व ती माहिती ऑन रेकॉर्ड दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या त्यांच्या पक्षाचे काम करीत आहेतच. ते काम करीत असताना इतर पक्षाच्या बाबतीत त्या डॉक्टरेट करीत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या बाबतीत जगजाहीर आहे. दिल्ली पासून गल्लीपर्यंत माहिती असताना आम्हाला संशोधन करण्याची गरज काय आहे.

श्री. आर.आर.पाटील : आपण आमच्या बरोबर होतात. तुमच्या सारखे नेते तेथे उपस्थित असताना माझ्या सारख्याने तेथे जाणे बरोबर नव्हते. जेथे आपण असाल, तेथे मी जात नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : माननीय आबासाहेब, आपण एवढे जिव्हारी लावून घेऊ नका. अजून पुढे निवडणुका आहेत. सभापती महोदय, महाराष्ट्रातून मोठ मोठे उद्योग राज्याबाहेर जात आहेत. या गोष्टीस शासन पूर्णपणे जबाबदार आहे. यासंदर्भात 2000 मध्ये धोरण ठरविले होते, ते का

4...



ABG/ प्रथम श्री.अजित 18:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

बदलण्यात आले, त्याचे कारणमिमांसा न देता तुम्ही 67 गावांमध्ये मनमानी करीत असाल तर ती गोष्ट योग्य नाही. या करामुळे गावांगावांमध्ये दुही निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे विधेयक परत घ्यावे अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केली आहे. परंतु शासनाची एकूण रणनिती पाहिली तर परिस्थिती अवघड दिसते आहे. सभापती महोदय श्री.डावखरे साहेब, आपण चेअरवर बसलात की, आम्ही वेळेची मर्यादा पाळत असतो.

यानतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, आपण सभापतीपदी आहात म्हणजे आम्ही मर्यादा पाळतो. माझी आपल्याला विनंती आहे की, दरवेळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी तीच तीच भाषणे आणि तोच तोच त्रागा करावा लागतो. त्यापेक्षा विधेयक सदनात कसे आणायचे याची कार्यपध्दती ठरवा.
महाराष्ट्रामध्ये यशदा आहे. पुण्याला परिषद घेतली. हजारो सरपंच आहे. परंतु केवळ 67 गावांना बाजूला काढले. मला म्हणतांना वाईट वाटते की शासनाने सरपंचांना एवढया प्रेमाने बोलाविले त्याच दिवशी मला वाटले की ग्रामपंचायतींना आज काही तरी धोका होणार. तुमचा हेतू चांगला असेल असे मी मनाला समजावत होते. एका बाजूला जाहीर केले की सरपंचांना विधान परिषदेवर घेणार की जे पुढे प्रत्यक्षात शक्य होणार नाही. किमान लोकांची अशी फसवणूक तरी करु नका अशी मी विनंती करते. जे काही सांगावयाचे आहे ते स्पष्ट सांगावे. शासन 67 ग्रामपंचायतींना फेवर करणार आहे. ज्या ग्रामपंचायतींना फेवर करावयाचे आहे त्यांना करा परंतु आजच्या घडीला 67 ग्रामपंचायती कोणत्या आहेत याची माहिती आजच्या आज पटलावर ठेवा.उद्यापासून सगळया ग्रामपंचायती आम्ही करणार होतो असे स्वत:हून सांगतील. कृपाकरुन एका बाजूला स्थानिक स्वराज्य संस्था नष्ट करण्यासाठी केद्र शासनाने प्रस्ताव दिला होता त्यावेळी राज्य शासनाने सांगितले की, महाराष्ट्रात त्रिस्तरीय रचना असावी. त्याकरिता राज्य सरकारचे आम्ही आभारी आहोत. परतु अशी विधेयके आणत असतांना एका बाजूला वॅट, दुस-या बाजूला जकात तिस-या बाजूला ग्रामपंचायतीचा कर यामधून महाराष्ट्रातील आर्थिक परिस्थितीची शासन धुळधाण करीत आहे आणि स्वत:च्या पायावर स्वत:च कु-हाड मारुन घेत आहे याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. धन्यवाद.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी, सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे आणि सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपली मते व्यक्त केली,भावना व्यक्त केल्या.

पहिल्या प्रथम 67 गावे कोणती आहेत ती मी सदनाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. ही माहिती दिल्यावर सर्वसाधारणपणे गावांचे स्वरुप आणि उद्दिष्ट सदस्यांच्या लक्षात येईल. ठाणे जिल्हयातील खर्डी, दळखंड,मोखावणे. नाशिक जिल्हयातील देवळा, घोटी.,कसबे- वणी दिंडोरी तालुक्यात आहे आणि बोलठाण नांदगाव तालुक्यात आहे. अहमदनगर जिल्हयात शेवगाव, बेलापूर ,वांबोरी आणि पारनेर. धुळे जिल्हयात साक्री तालुक्यातील पिंपळनेर आणि सिंदखेडा तालुक्यातील नरडाणा.नंदुरबारमध्ये अक्कलकुवा. जळगावमध्ये बोदवड,वरणगाव,मुक्ताईनगर फत्तेपूर, शेंदुर्णी, कु-हा,चांगदेव. पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील नीरा. सातारा जिल्हयात लोणंद,कोरेगाव आणि शिरवळ. सोलापूर जिल्हयात अकलूज,नातेपुते,वैराग आणि मोहोळ. लातूर जिल्हयात औराद आणि शहाजनी,.नागपूर जिल्हयातील कन्हान आणि रायगड जिल्हयातील 36 गावे अशा एकूण 67 गावांचा यामध्ये समावेश आहे. सांगली जिल्हयातील एकही गाव नाही. जवळपास नाही तर 67 गावेच आहेत. 36 रायगड जिल्हयातील आणि उरलेली सगळी याची बेरीज 67 आहे. नेमका आकडा 67 आहे. जवळपास शब्द विधेयकात आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये फार वर्षापासून जकात कर आहे. जकात कर रद्द व्हावा म्हणून वेगवेगळया स्वरुपाची आंदोलने झाली याची मला जाणीव आहे. जकात करामुळे भ्रष्टाचाराला फार मोठा वाव मिळतो म्हणून जकात कर नको म्हणून यापूर्वीच्या अनेक सरकारांनी वेळोवेळी घेण्याचा प्रयत्न केला.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील........

आपल्या महाराष्ट्रामध्ये 1999 साली ज्यावेळी अ, ब व क नगरपालिकांचा जकात कर काढण्याचा निर्णय झाला त्यावेळी या 67 ग्रामपंचायतींचा देखील जकात कर काढण्याचा निर्णय झाला. आपल्या राज्यामध्ये 67 ग्रामपंचायती आणि त्या नगरपालिका यांना तत्कालीन सरकारने असे सांगितले होते की, आम्ही पुढील पाच वर्षे तुम्हाला कॉम्पेन्सेशन देऊ. त्यानंतर तुम्ही तुमच्या पायावर उभे राहिले पाहिजे. स्वत:च्या पायावर उभे राहणे म्हणजे एखादी गोष्ट ठरल्यानंतर ती तशीच होते असा अनुभव आपल्याला या संदर्भात आला नाही. पाच ऐवजी 12 वर्षे उलटून गेली. महाराष्ट्रातील या 67 ग्रामपंचायतींना पर्यायाने आपले उत्पन्न वाढविण्याचा वेगळा मार्ग शोधता आला नाही. पुन्हा या सर्व 67 ग्रामपंचायतींनी मागणी केली की, आम्हाला पर्यायी उत्पन्न वाढविण्यासाठी दुसरा काही मार्ग मिळाला नाही, त्यामुळे शासनाने नुकसानभरपाई द्यावी. मधल्या काळात पाच वर्षाची कमिटमेंट होती, ती सरकारने 12 वर्षे पाळली. राज्य सरकारने या 67 ग्रामपंचायतींना दरवर्षी निधी दिला.

सभापती महोदय, या ग्रामपंचायती फार मोठ्या स्वरुपाच्या आहेत. तेथील कर्मचारीवर्ग मोठ्या प्रमाणात आहे. कारण उत्पन्न अधिक असल्यामुळे त्या गावातील ग्रामपंचायतींनी त्या गावाला अनेक सुविधा देऊ केलेल्या होत्या. माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.विजयसिंह मोहिते-पाटील या ठिकाणी बसलेले आहेत. ते अकलूज ग्रामपंचायतीचे सरपंच होते. त्या गावातील विकासाच्या योजना आणि गावातील लोकांना देऊ केलेल्या सुविधा पाहिल्या तर खचितच इतर गावांपेक्षा त्या सुविधा उत्तम आणि जास्त आहेत. या अधिक सुविधा देण्याची व्यवस्था करताना त्यांना ताकद कुठून आली? अशा प्रकारचा जकात कर ती ग्रामपंचायत पूर्वी गोळा करीत होती. त्यातून ही ताकद प्राप्त झाली होती असे मी म्हणेन. जकात कर बंद झाल्यानंतर सरकारने गेली 12 वर्षे या ग्रामपंचायतींना पर्याय म्हणून आर्थिक मदत करण्याची भूमिका घेतल्यानंतर आज लक्षात आले की, त्यांना पर्यायी उत्पन्नाची व्यवस्था निर्माण करता आली नाही. कोणत्याही शहराच्या किंवा वस्तीच्या उत्पन्नाचा स्त्रोत अचानक बंद झाला तर ती वस्ती बकाल होते. त्या गावात नवीन संकटे तयार होतात. ते गाव नव्या बकालतेकडे न्यायचे नसेल, ताकद द्यायची असेल तर उत्पन्नाचा नवा पर्याय देण्याची आवश्यकता होती. महाराष्ट्रातील अ,ब व क नगरपालिकानंतर ज्या ग्रामपंचायती आहेत त्यांना नवीन उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध करुन देण्याची गरज आपल्याला आजही जाणवते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील........

सभापती महोदय, कालच माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत माननीय विधानसभा अध्यक्ष यांच्या दालनात एक बैठक पार पडली. त्या बैठकीचा उद्देश हाच होता की, ग्रामपंचायतीत होणारी विविध प्रकारची बांधकामे, नव्याने निर्माण होणारे प्रश्न या संदर्भात मार्ग काढण्यात यावा. हे खरे आहे की, नगरपालिका सोडून उर्वरित ग्रामपंचायतींची लोकसंख्या देखील 50 ते 60 हजारापर्यंत पोहोचली आहे. पुण्यासारख्या शहराजवळ किती तरी मोठ्या ग्रामपंचायती आहेत. त्यातील काही ग्रामपंचायतींची लोकसंख्या लाखापेक्षा जास्त आहे. तेथे नगरपालिका केली पाहिजे. अशा मोठया ग्रामपंचायतींचे उत्पन्नाचे साधन पाणीपट्टी, घरपट्टी या पलीकडे नाही. अतिशय मर्यादित असलेल्या उत्पन्नातून नागरी सुविधा चांगल्या प्रमाणात न दिल्यामुळे त्या गावांमध्ये रोगराई वाढते, गावातील लोकांवर शारीरिकदृष्ट्या परिणाम होतो किंवा सुविधा नसल्यामुळे नवी संकटे त्या गावात येऊ लागली आहेत. म्हणून आपल्याला महाराष्ट्रातील कोणत्याही वस्त्या आर्थिकदृष्ट्या व्यवस्थित राहिल्या पाहिजेत यासाठी मदत करण्याची आवश्यकता होती.

या 67 ग्रामपंचायतींमध्ये पूर्वी जकात कर लावण्याची पध्दत होती.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...............

त्यांनी जकात चांगल्या गोळा केला व त्याचा वापरही चांगला केला पण अशा प्रकारे एकदम स्टॉप करणे योग्य नाही म्हणून त्यांना नवीन पर्याय उपलब्ध करुन द्यावा यासाठी ही सुधारणा आणली आहे. या सुधारणेच्या माध्यमातून आपण गावाच्या बाहेर उभे राहून कर गोळा करण्यासाठी परवानगी देतो अशातला भाग नाही. पण ज्याला आपण स्थानिक पंचायत कर म्हणतो तसेच होणार आहे. तो व्यवस्थित होईल याची काळजी घ्यावी लागेल. कारण जकातीतून जे दुष्परिणाम जाणवतात आणि दंड द्यावा लागतो ते दुष्परिणाम व ग्रामीण भागातून कोणत्या ग्राम पंचायतींना कोणत्या वस्तूंवर किती दराने कर आकारावयाचा यासंबंधीचा उल्लेख नियमात करणार आहोत. येथे या 67 ग्राम पंचायतींचा प्रश्न सोडवावा म्हणून हे पाऊल शासनाने टाकलेले आहे. त्या गावातील लोकांना त्या कराची झळ बसणार नाही, व्हॅट रुपाने हे कलेक्शन करण्याची व्यवस्था होईल, जसे एलबीटी बाबत आपण प्रयत्न करतो तशाच पध्दतीने कर गोळा करण्याचे काम यात करावे लागणार आहे.

मी या निमित्ताने सभागृहाला इतकेच सांगू इच्छितो की, या नवीन पर्यायानुसार महानगर पालिकेमध्ये एलबीटी सारखा टॅक्स येऊ लागला, कोल्हापूरला देखील हा प्रयत्न केला आहे. शेवटी जकात रद्द करा असे म्हटल्यानंतर महानगर पालिकेसारख्या क्षेत्रात लाखो लोक एकत्रित येतात व त्यांच्या नागरी सुविधांसाठी आपल्याला पर्यायी व्यवस्था केली पाहिजे आणि त्यासाठीच या प्रश्नात अनेक प्रश्न निर्माण झाले, त्यामुळे फार मोठा गुंता निर्माण झाला, याची जाणीव आहे. त्यामुळे जाणीवपूर्वक या गावांना पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे, हा मोठा जटिल प्रश्न आहे. आपल्याला भारतीय घटनेत अगोदर सेस लागू करण्याचा अधिकार आहे आणि साधारणपणे भारतीय घटनेच्या 243 (एच) नुसार विधिमंडळ ग्राम पंचायतींना टॅक्स किंवा सेस लावण्याचा आणि वसूल करण्याचा अधिकार आहे आणि 124 मध्ये इतर करांची यादी असून आपण त्यात हा कर ॲड करीत आहोत. तसेच कलम 1 (अ)(अ) हा ॲडिशनल ॲड करीत आहोत. ते म्हणजे स्थानिक नवीन पंचायत कर याचे अधिकार ग्राम पंचायतींना देतो आणित्यासाठी नियम करुन कोणत्या दराने ही वसुली करावयाची किंवा कोणत्या वस्तूंवर किती दर लावणार व हे करीत असताना त्याचा त्रास नागरिकांना होणार नाही याची काळजी घेतली जाईल. मधल्या काळात या

....2

श्री. जयंत पाटील ........

ग्राम पंचायती अडचणीत आल्या होत्या त्यांनाही या माध्यमातून मदत होईल म्हणून ही भूमिका शासनाने जाणीवपूर्वक घेतली व ही दुरुस्ती सभागृहासमोर आणली आहे.

महोदय, राज्यात या एकूण 67 ग्राम पंचायती होत्या त्यांनी कशा प्रकारे हे काम करावे यासाठी नियम करण्यात येत आहेत व त्यातून कोणत्या वस्तूंवर किती टक्के कर आकारणी करावयाची यासंबंधीची स्पष्टता करण्यात येईल. पूर्वीच्या काळात शासनाकडून ही चूक झालेली आहे की या ग्राम पंचायतींना जकात कर लावण्याचे अधिकार दिले तर हा कर अतिरिक्त असण्याची शक्यता आहे. एखाद्या ग्राम पंचायतीला उत्पन्न वाढविण्याचा अधिकार असला तरी आणि त्यांनी ठरविले की आपल्या गावात हा एलपीटी लावून कराच्या माध्यमातून उत्पन्न वाढवावे, तर अशा ग्राम पंचायतींना तशी परवानगी देता`यईल, त्या अनुषंगाने आपण हे रुल्स तयार करणार आहोत. यात आपल्याला फक्त एलपीटी इन्सर्ट करावयाचे आहे. ज्यांच्या माध्यमातून 67 ग्राम पंचायतींना हा अधिकार मिळणार आहे. तसेच रुल्स जे तयार करणार आहोत त्याची व्याप्ती सर्व ग्राम पंचायतींना लागू होऊ शकते. यासंबंधीचे रुल्स जे तयार करण्यात येणार आहेत त्यात यासंबंधीची व्याख्या स्पष्ट होईलच. प्रामुख्याने 67 ग्राम पंचायतींचा प्रश्न सोडविण्याची ही भूमिका असून ही सुधारणा त्यासाठीच आणलेली आहे व ही जनरलाईज्ड स्वरुपाची असणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

महाराष्ट्रातील इतर ग्रामपंचायतींनी उत्पन्न वाढीसाठी कर बसविण्याची परवानगी द्या अशी मागणी केली तर अशा ग्रामपंचायतींना कर बसविण्याची परवानगी या विधेयकाच्या माध्यमातून दिली जाणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सरकारच्या विचार क्षमतेचा स्थिती या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी मांडलेली आहे. 67 ग्रामपंचायतींची 12 वर्षापूर्वीची लोकसंख्या, विस्तार किंवा विकासाची पध्दत जी होती त्यामध्ये 12 वर्षानंतर निश्चितच फरक पडलेला असेल. परंतु या 12 वर्षाच्या कालावधीत इतर ग्रामपंचायतींचीही लोकसंख्या किंवा विस्तार झाला असेल त्या ग्रामपंचायतीही या 67 गावांबरोबर आल्या असतील तर अशा सर्व गावांसाठी आम्ही हा कायदा करीत आहोत केवळ 67 गावांसाठीच नाही असा उल्लेख या विधेयकामध्ये यावयास पाहिजे होता परंतु तो आलेला नाही. खरे म्हणजे या विधेयकात व्याख्याच करण्यात आलेली नाही. आम्हाला कर लावा असे तुम्हाला कोण सांगेल ? "आ बैल मुझे मार" असे कोण करणार आहे ? आपण जकात बंद केली परंतु अकोला महानगरपालिकेला पुन्हा जकात सुरु करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी ज्या 62 गावांचा उल्लेख करण्यात आलेला त्या गावांसारखीच इतर गावांची परिस्थिती निर्माण झाली तर त्यांनाही आपण 67 गावांसारखाच न्याय लावणार आहात काय ? बाकीच्या गावांनी मागणी केली तर त्यांच्या मागणीचा नक्कीच विचार केला जाईल अशी माहिती येथे देण्यात आलेली आहे. परंतु कर प्रणाली अशी लावली जात नसते. कर लावतांना अशी बाब मी कोठेही बघितलेली नाही.

माननीय मंत्री महोदय आपण अर्थमंत्री म्हणून काम केलेले आहे. आम्हाला हा कर लावा, तो कर लावा अशी कोणी मागणी केलेली आहे काय ? तेथे काही ट्रक अडवायचे नाही, गाडया तपासावयाच्या नाहीत, फक्त हिशोब तपासावयाचे आहेत व तेवढे उत्पन्न ग्रामपंचायतींना द्यावयाचे आहे. आपण कर लावण्याच्या विरोधात असतो. परंतु ग्रामीण भागामध्ये विकासाची किती गरज आहे याची आम्हा सर्वांना माहिती आहे. ग्रामीण भागात योजना सुरु करावयाची असेल तर 10 टक्के लोकवर्गणी सुध्दा जमा होत नसते. केंद्राच्या योजना राबवितांना त्यांना हिस्सा दिला जात नाही. पाणी आहे परंतु विजेचे बील भरता येत नसल्यामुळे गांवाना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

पिण्याचे पाणी पुरवता येत नाही अशी ग्रामीण भागाची परिस्थिती आहे. नियमांच्या तरतुदीमध्ये गावांचा उल्लेख आपल्याला करता येत नाही त्यामुळे यासंदर्भात सर्वसाधारण तत्व कायद्यानुसार तयार करावे लागणार आहे. कायद्यान्वये अंमलबजावणी केली जात असते. कर लावतांना अशी बाब मी कोठेही बघितलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारचे सूत्र असूच शकत नाही असे माझे ठाम मत आहे. या विधेयकाच्या माध्यमातून आपल्याला जर फायदा द्यावयाचाच असेल तर संपूर्ण ग्रामीण भागाला देण्यात यावा अशी माझी सूचना आहे. आपल्याजवळ बहुमत आहे त्यामुळे बहुमताच्या जोरावर तुम्ही सर्व काही रेटून नेणार आहात याची आम्हाला कल्पना आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे म्हणणे बऱ्याच अंशी योग्यही आहे. हा प्रश्न का निर्माण झालेला आहे याचे मी मघाशी स्पष्टीकरण दिलेले आहे. महाराष्ट्रातील ज्या 67 ग्रामपंचायती आहेत त्या सर्व ग्रामंपचातींना कर लावावा असेही या विधेयकात म्हटलेले नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

सभापती महोदय, 67 ग्रामपंचायती संबंधी हा प्रश्न आला आहे. सन्मानीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सरसकट सर्वांना पैसे द्यावेत हे जे सांगितलेले ते अगदी बरोबर आहे. हा कर ऑप्शनल असावा असा देखील विचार आहे. आपण रूल्स करणार आहोत. 10 हजार लोकसंख्ये पेक्षा जास्त असलेली ग्रामपंचायत असेल किंवा पाच हजार लोकसंख्ये पेक्षा जास्त ग्रामपंचायत असेल तर त्यांना अशी तरतूद करायची काय ? 1999 साली 67 ग्रामपंचायतींचा जकात कर आपण रद्द केला आहे. त्यापूर्वी जकात कर लागू होता. त्या ग्रामपंचायतींचा आत पुन्हा सर्व्हायव्हलचा प्रश्न निर्माण झाला आहे. या ग्रामपंचायतींना आपण सतत 12 वर्षे अनुदान देत आलो आहोत. ते अनुदान वेळेवर न मिळाल्यामुळे त्यांच्या समोर देखील प्रश्न निर्माण झाले आहेत. या सर्व प्रश्नावर पडदा पाडण्यासाठी आपण ऑप्शन दिलेला आहे. त्या ग्रामपंचायतीने स्थानिक पंचायत कर लावला तर त्यांची गरज ते त्यातून भागवतील असा त्यातील मुद्दा आहे. कर म्हटल्यावर थोडीशी शंका मनात असू शकेल याबद्दल माझ्या मनात देखील शंका नाही.

सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी मांडलेला मुद्दा माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. सगळीकडे जाऊन कर भरावा लागू नये अशी लोकांची अपेक्षा असते. करांचे संकलन पारदर्शी नसेल तर त्याची किंमत लोकांना मोजावी लागते. सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांची ही सुरूवातीपासून मागणी आहे. जकातीला योग्य पर्याय काढला पाहिजे ही गेल्या 10-12 वर्षा पासून सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांची मागणी आहे. दुसऱ्या बाजूला हे मान्य केले पाहिजे की, नगरविकास विभागाने LBT चा ऑप्शन लोकांसमोर आणला. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील व माननीय मंत्री श्री.सतेज पाटील यांच्या गावामध्ये यावर देखील फार मोठ्या प्रमाणावर रिॲक्शन आली. त्यामुळे कर अधिक स्मुथली भरला, फारशी तोशिस न लावता भरला तर अशा करांचे स्वागत होते याची मला जाणीव आहे. ज्यावेळी व्हॅट आणला त्यावेळी राज्यातील बऱ्याच व्यापारी संघटनांशी मी चर्चा केल्या. हा कर दोन्ही बाजूने एकमताने मान्य करण्यात आला. सेल्स टॅक्स सारखी अनेक वर्षाची व्यवस्था थांबवून आपल्या राज्यात व्हॅट आणला. हळूहळू तो स्थिर देखील झाला. आज देशात गुडस अँड सर्व्हिसेस टॅक्स ही संकल्पना तयार होत आहे. मागच्या केंद्रीय अर्थसंकल्पात वित्त मंत्री श्री.प्रणव मुखर्जी यांनी सांगितले होते की, गुडस



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

अँड सर्व्हिसेस टॅक्स लावू. हा टॅक्स लागू केल्यानंतर उत्पन्न कमी होईल अशी भीती वाटल्यामुळे अनेक राज्यांनी नुकसान भरपाई मागितली. त्यामुळे ही प्रक्रिया काही काळासाठी पुढे जाईल असे मला वाटते. व्हॅटमध्ये जकात कर मर्ज करावा अशी मागणी मी केंद्र शासनाला महाराष्ट्र शासनाच्या वतीने केली होती. ही मागणी मी त्यावेळच्या केंद्रीय वित्त विभागाच्या एम्पॉवर समितीमध्ये केली होती. परंतु, त्याचे बर्डन हे जास्त होते. त्यामुळे ते आपल्याला शक्य झाले नाही. महाराष्ट्रातील मुंबई महानगरपालिकेचा जकात कर असेल किंवा अन्य महानगरपालिकांचा जकात कर असेल त्याची रक्कम ही फार मोठी आहे. विकासासाठी लागणारा पैसा गोळा करण्याचे जे ऑप्शन्स आहेत त्यातील संधी त्या गावांसाठी निर्माण करणे गरजेचे आहे. हा कर का लावत आहे हे मी स्पष्ट केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांच्या मताशी मी सहमत आहे. त्यांचा विधान परिषदेतील आजचा शेवटचा दिवस आहे. हीच भूमिका त्यांनी विधानसभेत 12 वर्षापूर्वी देखील मांडली होती. तीच भूमिका ते येथे मांडत आहेत. या मुद्याबाबत ते विरोधी पक्षा बरोबर असले तरी देखील मी पण आपल्या सोबत आहे हे विसरू नका. या बिलासोबत आपण सर्वजण असण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या बिलाला आपण सर्वांनी मान्यता द्यावी आणि संमत करावे अशी विनंती मी सभागृहाला करतो.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : आता मी प्रश्न मतास टाकतो.

अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे ("होय"चे आवाज) प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" म्हणावे . . ..

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी विभाजन मागतो.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

(यानंतर विभाजनाची घंटा वाजविण्यात आली.)

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

( विभाजनाची घंटा वाजल्यानंतर आणि अनुकूल/प्रतिकूल मोजणी झाल्यानंतर )

**सभापती** : विभाजनाचा निकाल असा आहे.

अनुकूल : 22

प्रतिकूल : 6

प्रश्न संमत झाला.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ प्रोसीजर आणि पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन सुध्दा आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी फक्त एकट्याने बसून पोल मागितला.

श्री. दिवाकर रावते : मी सुध्दा बोललो.

श्री. आर. आर. पाटील : एकट्या सदस्याने बसून 'पोल' असे म्हटल्याबरोबर आम्ही बघत होतो की, माननीय सभापतींनी कोणतेही निर्देश दिलेले नव्हते तोपर्यंत बेल वाजविण्यास सुरुवात झाली. पोलच्या बाबतीत नेमकी काय प्रोसीजर आहे, हे आम्हाला कळले पाहिजे. यामध्ये माननीय सभापतींना त्यामध्ये काही से आहे की नाही ? कोणी एका सदस्यांनी 'पोल' असे म्हटले तर माननीय सभापतींच्या संमतीशिवाय बेल वाजू शकते का ? माननीय सभापतींचे निदेश नको का, माननीय सभापतींचे आदेश नको का ? अशा घटनेमध्ये माननीय सभापतींनी निदेश दिले होते का ? आपण नंतर निदेश दिले हे आम्हाला मान्य आहे परंतु अगोदर बेल कशी वाजली हे जाणून घेण्याचा आम्हाला हक्क आहे. त्या बाबतीत आपण निर्णय दिला पाहिजे.

**सभापती** : माननीय मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी पॉइन्ट ऑफ प्रोसीजरच्या दृष्टीने जो मुद्दा मांडला तो संसदीय दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. आपण सांगितले की, एका सन्माननीय सदस्याने 'पोल' असे म्हटले.

डॉ. दीपक सावंत : विरोधी पक्षातील आम्ही सर्व सदस्य पोल असे म्हणालो. आपण रेकॉर्ड तपासून घ्यावा.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले की, एका सदस्याने 'पोल' असे म्हटल्यानंतर त्या बाबतीत सन्माननीय सभापतींनी निर्णय घेतला का आणि पोलची बेल कशी वाजली ? एक महत्वाची बाब अशी आहे की, एका सदस्याने जरी पोलची मागणी केली तरी पोल द्यावा असा नियम आहे. सन्माननीय मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या बाबतीत मी रेकॉर्ड बघतो आणि आजच आपल्याला निर्णय देण्याची व्यवस्था करतो.

विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन 2012 चे वि.स. वि. क्रमांक 20 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 20 संमत झाले आहे.

----

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) व नागपूर शहर महानगरपालिका (निरसन) विधेयक

**L. A. BILL NO. LV OF 2011**

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 AND TO REPEAL THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.)

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 55, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्यासाठी आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 निरसित करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 55, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्यासाठी आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 निरसित करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचा कारभार तीन कायद्यान्वये चालतो. मुंबई महानगरपालिकेचा कारभार हा मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 नुसार, नागपूर महानगरपालिकेचा कारभार हा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 नुसार आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 याद्वारे महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांचा कारभार चालतो. अशाच प्रकारे महसुली विभागाचेही तीन वेगवेगळे कायदे होते. वऱ्हाड प्रांत, मध्य प्रदेश प्रांत या भागांसाठी वेगवेगळे कायदे होते. मध्यंतरीच्या काळात महाराष्ट्र महसूल अधिनियम, 1966 असा एक कायदा अस्तित्वात होता. महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, 1999 असा एक कायदा होता आणि कुळ कायदा सुध्दा राज्यातील वेगवेगळ्या भागात होता. नंतरच्या काळामध्ये महसूल विभागाचा एकत्रित कायदा करण्यात आला. तशा प्रकारचे राज्यात 3 कायदे आहेत. परंतु

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भास्कर जाधव....

हे 3 कायदे एकत्रित करता येत नाहीत. मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 या कायद्याला अनन्यसाधारण महत्व आहे. या कायद्यात एज्युकेशन कमिटी, इम्प्रुव्हमेन्ट कमिटी, ट्रान्सपोर्ट व इलेक्ट्रिसिटी सप्लायची व्यवस्था आहे. मुंबई महानगरपालिका ही राज्यातील एकमेव महानगरपालिका आहे. या महानगरपालिकेतर्फे विद्युत पुरवठा केला जातो. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेचा कायदा वेगळाच ठेवावा लागणार आहे. म्हणून नागपूर शहर व महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांसाठी एकच कायदा असावा अशी तरतूद आहे.

नागपूर ही राज्याची उपराजधानी आहे. या कायद्यातून नागपूर हा शब्द जाणार असल्यामुळे विदर्भाच्या अस्मितेलाच हात लावला जात आहे. विदर्भावर अन्याय केला जात आहे असेही बोलले गेले. पण नागपूर महानगरपालिका वगळता विदर्भातील सर्व नगरपालिकांचा कारभार महाराष्ट्र नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 अन्वये चालतो. त्यासाठी वेगळे नाव नाही. तरी देखील नागपूरच्या अस्मितेचा प्रश्न उपस्थित केला जातो. मी सन्माननीय सदस्यांना असे सांगू इच्छितो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 असे या कायद्याचे नाव आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:15

श्री. भास्कर जाधव...

आता "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949" हा नवीन कायदा होणार आहे. जसे "नागपूर" नाव जाईल तसे "मुंबई प्रांतिक" हे नाव देखील जाईल. त्यामुळे कुणाची अस्मिता दुखवावी किंवा कुणाच्या भावनेशी खेळावे अशा प्रकारचे शासनाचे धोरण नाही. महाराष्ट्र राज्याच्या कायद्यामध्ये समानता आणावी, हा मॉडेल ॲक्ट व्हावा असा सर्वंकष विचार करुन हा कायदा आणलेला आहे. या विधेयकावर विधानसभेमध्ये सांगोपांग चर्चा देखील झालेली आहे. या ठिकाणी देखील तशी चर्चा होऊ नये असे माझे म्हणणे नाही. परंतु या विधेयकाच्या संदर्भात जे काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते त्यासंबंधी सविस्तर उत्तर दिलेले आहे. तेव्हा सभागृहाने हे विधेयक एकमताने संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011चे वि.स.वि. क्रमांक 55 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2011चे वि.स.वि. क्रमांक 55 संमत झाले आहे.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक

**L. A. BILL NO. LXVII OF 2011**

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011चे वि.स.वि. क्रमांक 67 मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011चे वि.स.वि. क्रमांक 67 मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या 4176 प्रॉपर्टीज आहेत. या प्रॉपर्टीज एका सदहेतुने कुणाला भाड्याने, कुणाला लिजने विकसित करण्याकरिता दिल्या गेल्या. त्यानंतर त्या लोकांनी त्या प्रॉपर्टी विविध लोकांना हस्तांतरित केल्या. म्हणजे ज्या एका सद्हेतूने त्यांना त्या प्रापर्टीज मिळाल्या होत्या त्याचा त्यांनी दुरुपयोग केला आणि त्यामधून खूप मोठ्या प्रमाणावर त्यांना आर्थिक लाभ झाला. परंतु महानरपालिकेला काही फायदा झाला नाही.

मध्यंतरी महानगरपालिकेने 22 जून 1993 साली एक ठराव करुन ट्रान्स्फर फी घेण्याचा निर्णय केला. त्या निर्णयास एका गृहस्थाने कोर्टामध्ये चॅलेंज केले.

...नंतर श्री. अजित....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

पीएलआय दाखल केली. त्यावेळी कोर्टाने सांगितले की, अशी वसुली करण्याचा अधिकार कायद्याने घ्यावा लागेल किंवा लीज ट्रान्सफर करण्यासाठी आयुक्ताला किंवा महानगरपालिकेला परवानगी असल्याची तरतूद कायद्यामध्ये करावी लागेल. तेव्हा आपण कायद्यामध्ये तशी तरतूद केली नाही तर आपणास वसुली करता येणार नाही म्हणून आपण ही तरतूद केली आहे. दरम्यानच्या काळात महानगरपालिकेने 450 कोटी रुपये वसूल केले होते आणि त्यामध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाली म्हणून आपण तरतूद केली की, अशा प्रकारची लीज अन्य व्यक्तीला ट्रान्सफर करायची असेल तर ती ट्रान्सफर करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या पूर्व परवानगी शिवाय ट्रान्सफर करता येणार नाही. जे अन्य कर आकारावयाचे आहेत त्याचे पूर्ण अधिकार लोक नियुक्त बॉडीला दिलेले आहेत.

सभापती महोदय, आपल्या प्रॉपर्टीचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवणे, प्रॉपर्टीजी पुन्हा एकदा मोजदाद करणे या संदर्भातील रुल्स करताना शासनाने महानगरपालिकेला काही गाईड लाईन्स द्याव्यात अशा प्रकारच्या सूचना करण्यात आल्या. शासन महानगरपालिकेला निश्चितपणे सहकार्य करणार आहे. तेव्हा हे विधेयक एकमताने मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 67- मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक 2011 यावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या विधेयकाची थोडक्यात माहिती दिलेली आहे. आजपर्यंत नगरविकास विभागाची जेवढी विधेयके आली त्यावर आपण चर्चा केली. परंतु ती विधेयके धोरणात्मक व विकासात्मक होती आणि ती आम्हाला समजत होती. त्या विधेयकामध्ये कोणते अडथळे आहेत ते आम्ही विचारत होतो.

सभापती महोदय, हे विधेयक आताच आम्हाला देण्यात आले. हे विधेयक आम्ही वाचलेले देखील नाही. परंतु या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले त्यावर आम्ही विश्वास ठेवतो. या विधेयकामुळे मुंबईमध्ये कोणती उलथापालथ होईल हे मी सांगू शकत नाही. नंतर त्यामध्ये काही अडचणी आल्या तर त्या बाबत जरुर विचार करावा. आम्हाला हे विधेयक आताच देण्यात आल्यामुळे आम्हाला ते वाचायला देखील मिळाले नाही एवढेच मला निदर्शनास आणावयाचे आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 67- मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक 2011 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी विधेयक मांडताना मुंबईतील 4167 प्रॉपर्टीज वेगवेगळ्या व्यक्तींकडे आहेत आणि त्या त्यांनी सबलेट केलेल्या आहेत असे सांगितले. माझ ी एवढीच विनंती आहे की, अशा प्रकारच्या प्रॉपर्टीज पुन्हा ताब्यात घेणार नाहीत याची सरकार शाश्वती देईल काय ? कारण बऱ्याच वर्षापासून ते तेथे राहत आहेत. तसेच आपण त्यांच्याकडून जो अधिमूल्य घेणार आहोत त्याचे प्रमाण साधारणत: किती असेल याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी एवढी सूचना करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 67- मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक 2011 यावर माझे विचार मत मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, काळाच्या दृष्टीने विचार करता हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. या विधेयकामुळे मुंबई महानगरपालिकेला निश्चितपणे फायदा होणार आहे. 1993 पासून पूर्वलक्षी प्रभावाने हे शुल्क लागू होणार आहे. त्यामुळे संबंधितांवर बराच मोठा बोजा पडणार आहे. परंतु हा मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील विषय आहे. अशाप्रकारची दुरुस्ती पुणे महानगरपालिका आणि अन्य मोठ्या महानगरपालिकांमध्ये देखील करावी अशी विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करते.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्र.67- मुंबई महानगरपालिका ( सुधारणा व विधिग्राह्यीकरण ) विधेयक 2011 या वर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत आणि डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले विचार मांडले.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी आश्वासित करु इच्छितो की, हे विधेयक आणण्यामध्ये कोणताही राजकीय हेतू नाही किंबहुना मुंबई महानगरपालिकेला मदत करणे हाच हेतू आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी विचारले की, आपण जी कर आकारणी करणार आहात त्याचे प्रमाण किती राहणार आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, हा पूर्ण अधिकार महानगरपालिकेला आहे. हा कर ठरविण्याचा अधिकार आयुक्तांना नाही. स्टॅन्डींग कमिटी, इम्प्रूव्हमेंट कमिटी, महासभेमध्ये जो कर ठरवतील त्याची आकारणी करण्याचा अधिकार फक्त आयुक्तांना आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पुणे महानगरपालिकेला असा कर लावता येईल काय या बाबत विचारणा केली. पुणे महानगरपालिकेकडून तशी मागणी आल्यास शासनाला विचार करावा लागेल. मध्यंतरी महाराष्ट्र सरकारने सर्वच नगरपालिकांकरिता निर्णय घेतला होता की, त्या कायद्याचे नाव मला आता आठवत नाही. परंतु सर्वच नगरपालिकांच्या बाबतीत विचार करावा अशा प्रकारचा उद्देश ठेवायला काही हरकत नाही. कारण या प्रॉपर्टीज कोणाकडेही हस्तांतरीत आहेत आणि त्याचा फायदा स्थानिक स्वराज्य संस्थांना होत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना विचारात घेण्यासारखी आहे आणि त्याबाबत शासनाकडून निश्चितपणे पावले उचलली जातील.

सभापती महोदय, या प्रॉपर्टीज वर्षानुवर्षे त्यांच्याकडे राहिलेल्या असल्यामुळे त्या प्रॉपर्टीज परत घेणे सोपे नाही.

सभापती महोदय, माझ्या उत्तराने सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले असेल असे मी समजतो. तेव्हा हे विधेयक एकमताने संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व खंड 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 67 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 67 संमत झाले आहे.

---------

यानंतर श्री.गिते..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## वि.स.वि.क्रमांक 26 बाबत

**सभापती** : आता सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 26 चर्चेला घेण्यात येईल. माननीय महसूल मंत्र्यांनी विधेयक मांडावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सदर विधेयक मांडण्यासच मला हरकत घ्यावयाची आहे. या राज्यात एखादा कायदा अस्तित्वात नसेल तर त्या कायद्यातील कलमाचा आधार घेऊन नवीन कायदा तयार करुन तो विधिमंडळात मंजूर करता येतो का असा माझा मूलभूत हरकतीचा मुद्दा आहे. तो कायदा अस्तित्वात नसताना ते कायद्याचे कलम कसे होऊ शकते असा माझा मूलभूत मुद्दा आहे. त्यामुळे हे विधेयकच या सदनात मांडता येणार नाही असे माझे मत आहे. या सदनामध्ये दोन वर्षापूर्वी लॅन्ड सिलींग ॲक्ट रिपील झाला. त्या संदर्भात मोठे महाभारत घडले याची सर्वांना माहिती आहे. तो कायदा रद्द करु नये म्हणून मी एकटा विरोध करीत होतो. त्यावेळेला तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख होते. त्यांनी देखील आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. या विषयाच्या संदर्भात त्यावेळी सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक बोलाविण्यात आली होती. त्यावेळी दीड ते दोन तास चर्चा चालली. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या तरतुदी वाचून दाखविल्या होत्या. बहुमताने विधेयक मंजूर झाले आणि तो कायदा या राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात रद्द झाला. जो कायदा देशात, महाराष्ट्रात अस्तित्वात नाही, अशा कायद्याचे कलम या कायद्यात टाकून विध्येयक सभागृहासमोर आणलेले आहे.

महोदय,या विधेयकाच्या प्रकरण एक मधील (ग) मध्ये असे नमूद केले आहे की, खरेदीदार हा महाराष्ट्र शेतजमीन ( जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, 1961 अन्वये अनुज्ञेय असलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करणार नाही. बऱ्याच शेतकऱ्यांकडे हजारो एकर जमीन आहे. आपल्याकडे अर्बन सिलींग ॲक्ट रद्द झालेला आहे. त्या रद्द झालेल्या कायद्यानुसार अशा प्रकारचे कलम नवीन कायद्यामध्ये काल आपण उद्देश आणि कारणे मधील भाग रद्द केला. तो कायद्याचा भाग नाही.

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते......

आज कायद्याचा असा भाग आलेला आहे. तो घटनात्मकदृष्टया अयोग्य आहे. जो कायदा देशामध्ये अस्तित्वात नाही, महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात नाही अशा प्रकारच्या कायद्यानुसार जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीला जमिनीची खरेदी विक्री करण्याबाबतची तरतूद येते अशा वेळी कायद्याचे स्वरुप निर्माण होऊ शकत नाही. मी मंत्रीमहोदयांना याबाबतीत दोष देणार नाही. अधिकारी ज्यावेळी विधेयक तयार करतात त्यावेळी उघडया डोळयांनी का करीत नाहीत, कायदा काय आहे हे का बघत नाहीत असा आमचा प्रश्न आहे. याच सभागृहामध्ये आम्ही जो कायदा रद्द केला जो देशाने रद्द केला त्या कायद्याला अनुसरुन जमीन मालकाला खरेदी-विक्री करता येणार नाही अशा कायद्याचे कलम त्याच्यामध्ये अंतर्भूत केले जाते त्यावेळी ते अयोग्य असते त्यामुळे असे विधेयक या सदनामध्ये आणणेच अयोग्य आहे त्यामुळे ते मंजूर किंवा नामंजूर करावे असा विषय उपस्थित होत नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे आणि त्यावर आपण निर्णय द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कूळ कायदा हा 1948 साली तयार करण्यात आला. त्याचबरोबर याच कालखंडामध्ये मोठे जमीनदार होते, ज्यावेळेस कुळाची जमीन होती त्याला मालक केल्यानंतर त्याला विक्री करण्याच्या संदर्भात विक्री करतो त्यावेळी जमीन धारणा अधिनियम 1961 त्याच्याप्रमाणे कमाल जमीन धारण करणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनीची विक्री होत असेल त्यावेळी जो खरीददार आहे त्याची जमीन कमाल जमीन धारणेच्या बाहेर जाऊ नये एवढाच त्यामधील भाग आहे.

सभापती महोदय, लॅन्ड सिलींगचा ॲक्ट अस्तित्वात आहे. अर्बन लॅन्ड सिलींगच्या बाबतीत निर्णय झालेला आहे. 2008 सालात रद्द केलेला कायदा हा अर्बन लॅन्ड सिलींग ॲक्ट आहे. या बिलात ॲग्रीकल्चर लॅन्ड सिलींगच्या संदर्भातील उल्लेख आहे. उल्लेख अत्यंत स्पष्ट आहे आणि त्यात कोणत्याही प्रकारची अडचण नाही. शासनाने अर्बन लॅन्ड सिलींग ॲक्ट रद्द केलेला आहे. ॲग्रीकल्चर लॅन्ड सिलींग कायदा आज अस्तित्वात आहे. सदस्यांनी उल्लेख केलेला आहे त्याप्रमाणे कुळाचा माणूस जमीन विक्रीसाठी निघाल्यानंतर खरीददार आहे त्याची जमीन लॅन्ड सिलींगपेक्षा जास्त होता कामा नये याची काळजी घ्यावी एवढेच त्यामध्ये सूत्र आहे. अस्तित्वात असलेल्या कायद्यासंबंधीच सुधारणा आलेली आहे. माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत मी खुलासा केलेला आहे.

......2

**सभापती** :  यामध्ये दोन भाग आहेत. एक म्हणजे महाराष्ट्र नागरी कमाल जमीन धारणा कायदा होता  तो आता अस्तित्वात नाही. कूळ वहिवाट कायदा अस्तित्वात आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, याच्यामध्ये तीन भाग आहेत. मुंबई कूळवहिवाट जमीन म्हणजे आजही मुंबई शहरामध्ये ज्याचे एनए झालेले नाहीत ते प्लॉट. आताचे एमएमआरडीए म्हणता येईल. लॅन्ड सिलींग ॲक्ट त्याला लागू होता. अर्बनमधील जमिनीला हा कायदा लागू आहे.मुंबई कूळवहिवाट जमीन म्हणजे काय ते शासनाने स्पष्ट करावे. कायदा चांगलाच आहे. मी कायद्याच्या योग्यायोग्यतेबद्दल बोलतच नाही.

नंतर श्री. भोगले

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा मुद्दा विचारात घेता प्रथमदर्शनी लक्षात येते की, शहरातील जमिनी अर्बन लॅण्ड सिलिंग ॲक्टखाली होत्या, तो कायदा 2008 मध्ये आपण रद्द केला आहे. कुळ वहिवाटीच्या ज्या जमिनी आहेत, त्या संपूर्णपणे ॲग्रीकल्चर सिलिंग ॲक्ट अंतर्गत येतात. तो कायदा आजही अस्तित्वात आहे. कुळ जमीन विकत असताना त्याच्याकडे मर्यादेपेक्षा जादा जमीन असणार नाही ही तरतूद आहे. कुळ वहिवाट जमीन कायदा 1948 साली अस्तित्वात आला.

श्री.दिवाकर रावते : मुंबई कुळ वहिवाट कायद्यामध्ये कोणत्या जमिनींचा समावेश होतो?

श्री.बाळासाहेब थोरात : शहरातील जमिनी अर्बन लॅण्ड सिलिंग ॲक्ट अंतर्गत येतात. या कायद्यांतर्गत ग्रामीण भागातील आणि शेत जमिनींचा समावेश होतो, हे अत्यंत स्पष्ट आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन, हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL No.XXVI OF 2012.**

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1948, THE HYDERABAD TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1950 AND THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS (VIDARBHA REGION) ACT, 1958.)

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26- मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1948; हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1950 आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, 1958 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26- मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1948; हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1950 आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, 1958 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये नमूद केल्याप्रमाणे जे मोठे जमीनदार होते ते व्यक्तीश: शेतजमीन कसत नव्हते. त्या जमिनी कसणाऱ्या कुळांना आपण हक्क दिल्यानंतर जमिनीची विक्री करण्यासाठी सरकारकडून परवानगी घ्यावी लागत होती. आता परवानगीची आवश्यकता भासणार नाही. 40 पट शेतसारा भरल्यानंतर त्याचे कागद तयार होतील. नझूल आणि सरकारी जमिनीबाबत यापूर्वीच निर्णय घेतला आहे. त्या विधेयकाबाबत सर्वांनी सहकार्य केल्यानंतर ते विधेयक सभागृहात मंजूर झाले आहे. दोन दिवसापूर्वी ग्रामीण भागातील जमिनींना एन.ए.ची परवानगी देण्याबाबतचे विधेयक मंजूर झाले होते. त्याच धर्तीवर हे एक चांगले विधेयक आणून नागरिकांना आणि शेतकऱ्यांना मदत करण्याचा शासनाचा मानस आहे. सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.....3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कुळ कायद्याप्रमाणे कुळाला अधिकार देऊन 50 वर्षे झाली. या विधेयकामुळे कुळ मालक होणार असे नाही, ते यापूर्वीच मालक झालेले आहेत. ज्यांनी कुळाचे पैसे भरले ते मालक झाले. कायद्यामध्ये आता अनेक तरतुदी केलेल्या आहेत. आता कुळाने जमीन विकली तर ती त्याच्या मालकीची जमीन विकली असे नियमन करणारा हा कायदा आहे असा माझा समज आहे.

सभापती महोदय, यातील महत्वाचा टप्पा म्हणजे उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे की, 'जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वमंजुरी घेण्याच्या प्रक्रियेमुळे जमिनीच्या हस्तांतरणास उशीर होतो आणि परिणामत: कुळास अडचणींना तोंड द्यावे लागते. ही बाब विचारात घेता आणि अशा जमिनींच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सोपी आणि अधिक सोयीस्कर करण्याच्या दृष्टीने शासनास मुंबई कुळवहिवाट शेतजमीन अधिनियम, 1948 याच्या कलम 43 च्या पोट कलम (1) मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये जेथे जमीन खरेदीच्या किंवा विक्रीच्या दिनांकापासून दहा वर्षाचा काल लोटला असेल अशा जमिनीच्या बाबतीत विवक्षित शर्तीना अधीन राहून जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीची आवश्यकता काढून टाकणे आणि त्या प्रयोजनासाठी उक्त कलम 43 मध्ये यथोचितरित्या सुधारणा करणे इष्ट वाटते.' ही खरी मेख आहे. दहा वर्षाच्या कालावधीचा निर्णय कोणी द्यायचा? जमिनीचा व्यवहार झ ाला किंवा नाही ती जमीन त्याच्याकडे दहा वर्षापासून आहे असा दाखला दिला तर तो टायटलचा भाग होईल. जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी नको हे बरोबर आहे. परंतु जमीन विक्री करण्यासाठी दहा वर्षाची अट घातली आहे. सरसकट जमिनीचा व्यवहार करो किंवा न करो त्याला परवानगी दिली म्हणजे मालकी हक्काचे टायटल त्याच्याकडे असणार आहे. त्याची तरतूद करणे किंवा त्याची तपासणी करणे हा विषय पुढे उपस्थित होणार नाही, ही तरतूद या कायद्यामध्ये कुठे दिसून आली नाही.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

ती तरतूद नियमात करावी लागेल आणि ऑन लाईन जाहीर करावे लागेल. तसेच प्रत्येक कुळाला तो त्या जमिनीचा मालक झाला असा दाखला द्यावा लागेल. सध्याच्या परिस्थितीत तो त्या जमिनीचा मालक झाला हे स्पष्ट करणारी तरतूद नाही, याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, मोठमोठ्या जमीनदारांकडे पूर्वीच्या काळात खूप कुळे होती, अशा सर्व कुळांना त्यांचा हक्क आपण कलम 32 (प) प्रमाणे दिला व त्यानुसार ही कुळे त्या जमिनीचे मालक झाले. पण ते या जमिनीचे मालक असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येत होते पण त्याच्या 7/12 वर मात्र नियंत्रित सत्ता प्रकार असा शेरा देण्यात येत होता. तसेच त्याला फेरफारही येत होता. त्या फेरफाराच्या माध्यमातून किती वर्षे झाली हे समजू शकते. जवळपास 50 ते 60 वर्षापूर्वी पासून ही कुळे मालक झालेली आहेत. असे असताना सुध्दा जी कुळे मालक झालेली आहेत त्यांना नियंत्रित सत्ता प्रकार अशा शेऱ्यामुळे त्यांची जमीन विक्री करावयाची असेल तर जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊन पूर्व परवानगी घ्यावी लागत होती. हा त्रास व हेलपाटे त्या कुळे असलेल्या शेतकऱ्याला होऊ नये व ही बाब महसूल विभागाच्या लक्षात आली की आपण या शेतकऱ्याला त्याची जमीन विकण्याची परवानगी नाकारीत नाही मग त्याला परवानगीसाठी त्रास का द्यावयाचा, हा उद्देश ठेवला. तसेच यात आपण त्या शेतकऱ्याला खरेदी विक्रीच्या व्यवहारानंतर 10 वर्षांची अट ठेवलेली आहे. असे असले तरी अशी कुळे जाहीर करण्याची प्रक्रिया आता कमी झ ालेली आहे त्यामुळे या कुळे असलेल्या शेतकऱ्यांना यातून दिलासा मिळणार आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाल.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्र. 26 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्र.26 संमत झाले आहे.

----- ( नंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईमध्ये लीजवर दिलेल्या शासकीय भूखंडाचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग करुनही 50टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे

**मु.शी.**: मुंबईमध्ये लीजवर दिलेल्या शासकीय भूखंडाचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग करुनही 50टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, डॉ. रणजित पाटील व श्री. नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु......

श्री. आर.आर.पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला आहे त्यावर सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी जे विचार मांडले आहेत त्याबाबतीत मी थोडक्यात उत्तर देण्यासाठी उभा आहे. विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मी सुरुवातीलाच उत्तर न देता शेवटी उत्तर देणार आहे. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी उपस्थित केलेल्या नक्षलवादाच्या संदर्भात ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याबद्दल मी सुरुवातीलाच उत्तर देणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस येथे उपस्थित नाहीत परंतु तरीही मी त्यांच्या बाबत दिलगिरी व्यक्त करतो. नक्षलवादाच्या संदर्भात मी आश्वासन दिले होते की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी राज्यामध्ये नक्षलवादाचा जो गंभीर प्रश्न उभा राहिला आहे त्याचा मुकाबला करण्यासाठी आपल्याला ज्या काही उपाययोजना करावयाच्या आहेत त्यासंदर्भात दोन्ही सभागृहातील गट नेत्यांची एक बैठक हे अधिवेशन संपण्यापूर्वी आयोजित केली जाईल अशा पध्दतीचे आश्वासन मी दोन्ही सभागृहामध्ये दिले होते व त्यासंदर्भात बैठकही बोलावण्यात आली होती. नक्षलभागामध्ये वेळोवेळी जे काम करतात तसेच नक्षलवादाचा प्रश्न सुटावा अशी ज्यांची

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

प्रामाणिक इच्छा आहे यासंदर्भात गटनेत्यांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती परंतु त्या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना बोलावण्याचे राहून गेल्याबद्दल मी पुन्हा दिलगिरी व्यक्त करतो. ज्या दिवशी ही बैठक आयोजित करण्यात आली होती त्या दिवशी माननीय उध्दवजी ठाकरे यांचे लीलावती हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन होणार असल्यामुळे त्या दिवशी शिवसेनेचे गट नेतेही त्या बैठकीला येऊ शकले नव्हते. या बैठकीला विरोधी पक्ष नेते तसेच गट नेते उपस्थित होते परंतु ज्यांना आम्ही बोलावू शकलो नव्हतो, तसेच या प्रश्नाच्या संदर्भात ज्यांची सूचना करण्याची इच्छा आहे त्यांच्या बरोबर लवकरच बैठक आयोजित केली जाणार आहे. सर्व नक्षलग्रूप एकत्र येऊन लोकशाही सिस्टीमच्या विरोधात लढत आहेत. ते जर एकत्र येत असतील तर लोकशाही व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या सगळयांनीच आपले प्रश्न बाजूला ठेवून त्यांच्या विरुध्द एकत्र येऊन लढण्याची आवश्यकता आहे. त्यांच्याशी आपल्या पोलीस दलाने शस्त्र घेऊन लढण्याची आवश्यकता आहे. ते ज्या आयडीयालॉजीचा वापर करीत आहेत त्याच विचाराचा वापर आपणही करुन त्यांना उत्तर देण्याची आवश्यकता आहे. केवळ हा प्रश्न बंदुकीने संपणार नाही, तर ते जे विचार व्यक्त करीत आहेत त्या विचारांना विचारानेच उत्तर देणे, जे प्रश्न ते त्या लोकांपर्यंत नेत आहेत त्याला विकासाने उत्तर देणे आपल्याला भाग आहे. आपल्याला त्यांच्याशी अनेक अंगानी ही लढाई लढावी लागणार आहे. परंतु एक गोष्ट मात्र मी विनम्रपणाने सांगू इच्छितो की, ही एक अवघड लढाई आहे. एक वेळ परकीय शत्रू बरोबर लढणे सोपे असते परंतु ज्यावेळी आपल्यातलेच ग्रुप फुटून पोखरायला सुरुवात करतात त्यावेळी त्यांच्याशी लढणे हे अनेक बाजूने अवघड असते. निरापराध गोरगरीब आदिवासींचे शेल्टर घेऊन ते पोलिसांवर बेधुंदपणे गोळीबार करतात. पोलीस दलातील तसेच सीआरपीएफ मधील आपले जवान त्यामध्ये शहीद होत आहेत. पोलिसांनी त्यांच्यावर फायरींग केले व नक्षलवाद्यांनी शेल्टरसाठी वापरलेली एखादी महिला किंवा लहान मूल मृत्यू पावले तर आपल्या सर्व यंत्रणा टीकेचे लक्ष बनतात. नक्षलला सपोर्ट करणाऱ्या बाहेर ज्या एनजीओज आहेत, त्यांच्या ज्या वेगवेगळया संघटना आहेत त्या पोलिसांच्या विरोधात बदनामीची मोहीम आखतात अशाही गोष्टी छत्तीसगड व महाराष्ट्रात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

घडलेल्या आहेत. राज्यातील नक्षलवादाच्या संदर्भात मी एवढेच सांगेन की, माननीय पंतप्रधांनानी बोलावलेल्या बैठकीमध्ये छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी परखडपणे सांगितले होते की, "तुम्हाला महाराष्ट्रातील नक्षलवाद संपुष्टात आणावयाचा असेल तर तुम्हाला छत्तीसगड मधील नक्षलवाद पहिल्यांदा संपवावा लागेल."

सभापती महोदय, आपल्या दृष्टीने राज्याच्या सीमा असतात. परंतु नक्षलवाद्यांच्या दृष्टीने ते दंडकारण्य असते. इकडचे नक्षली तिकडे व तिकडचे नक्षली इकडे येत असतात. त्यांना राज्याच्या सीमा नाहीत तर त्यांच्या दृष्टीने तो झोन असतो. आपल्यापेक्षा छत्तीसगडची परिस्थिती खूपच कठीण बनलेली आहे. त्यामुळे या पुढील काळात नक्षलची लढाई केवळ एकटया महाराष्ट्रालाच लढून उपयोगाची नाही तर सेंट्रल फोर्सच्या मदतीने आंध्र प्रदेश, छत्तीसगड व महाराष्ट्र राज्याने एकत्रित लढाई लढावी लागणार आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ जुन्नरे.. 19:50

श्री.आर.आर.पाटील..

सभापती महोदय, हा गंभीर स्वरूपाचा प्रश्न असल्यामुळे तो लक्षात घेऊनच मागील दोन वर्षामध्ये आपण पोलीस दलाची संख्या जवळ जवळ 2600 ने वाढविली आहे. गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आपण कर्मचारी आणि अधिकारी नेमलेले आहेत. स्थानिक उमेदवारांना जास्तीत जास्त नोकऱ्या कशा मिळतील याची दक्षता गृह विभागाने घेतलेली आहे. आपण मोठ्या प्रमाणावर पोलिसांची संख्या वाढविली आहे. तसेच केंद्र शासनाच्या पाच बटालियन्स त्या परिसरामध्ये मिळालेल्या आहेत. आज पोलीस बळाचा संख्येच्या दृष्टीने विचार केला तर ती चांगली आहे हे सहज दिसून येईल. हे सर्व करीत असताना स्थानिक लोकांचा पाठिंबा मिळविणे हे देखील महत्त्वाचे आहे. जो पर्यंत स्थानिक लोक पाठबळ देत नाहीत, नक्षल चळवळीला विरोध करीत नाही तो पर्यंत बाहेरच्या फोर्सेसने लढाई जिंकणे खूप कठीण असते. त्या परिसरातील लोकांची देखील नाराजी आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, आम्हाला विकासाची संधी मिळत नाही. आम्ही वीज, रस्ते, आरोग्य अशा नागरी सुविधांपासून दूर आहोत. आपले राज्य देशातील विकसनशील राज्य म्हणून ओळखले जाते. असे असताना नैसर्गिकदृष्ट्या संपन्न असलेला गडचिरोली जिल्हा विकास कामामध्ये खूप पाठीमागे राहिला आहे. येथील परकॅपिटा उत्पन्न कमी आहे. साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. दारिद्र्य रेषेखालील राहणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जनता जे प्रश्न उपस्थित करीत आहेत त्यात खूप तथ्य आहे. गडचिरोली जिल्ह्याला निसर्गाने समृद्धी दिली आहे. पण गेल्या 50 वर्षाच्या काळात विकास कामासाठी आपल्या यंत्रणा, धोरणे, निर्णय कमी पडलेले आहेत. त्यामुळे विकास कामांमध्ये हा जिल्हा महाराष्ट्रात सर्वात शेवटच्या क्रमांकावर राहिला आहे. जशी आपली धोरणे कारणीभूत ठरली त्याप्रमाणे त्या भागातील नक्षलांचे अस्तित्त्व सुद्धा तो भाग विकासापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरला आहे. पोलिसांची संख्या वाढविण्या बरोबरच सर्व राजकीय पक्षांनी एकत्रित येऊन या भागात लोकशाही प्रक्रिया सुरू करण्यासाठी तसेच विकासकामांना मोठ्या प्रमाणावर चालना देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या सहाय्याने मदत केली पाहिजे. मी येथे वानगी दाखल काही उदाहरणे सांगतो. या भागातील संपर्क वाढविण्याच्या दृष्टीने गोदावरी, इंद्रावती, प्राणहिता या नद्यांवर अनुक्रमे 186, 150 आणि 90 असे मिळून 426 कोटी रूपयांचे मोठे पूल घेण्याचे मंजूर केले आहेत. त्यापैकी दोन पुलांची कामे प्रत्यक्षात सुरू झालेली आहेत.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

सभापती महोदय, खरे विश्लेषण कुठे तरी व्हायला पाहिजे. देशात वन कायदा लागू केल्यामुळे आदिवासींच्या मनात तीव्र भावना निर्माण झाल्याची दिसून येत आहे. पिढ्यानपिढ्या हे लोक वनामध्ये जंगलाच्या सहाय्याने शांततेने जीवन जगत होते. वनांचे रक्षण केले पाहिजे म्हणून त्यांच्या जीविताचा हक्क काढून घेतला गेला.  आमची वने असताना आम्हाला परके ठरवतात ही भावना त्यांच्यात वाढीस लागली. त्यांच्या भावना लक्षात घेऊन संसदेने वन हक्क जमिनीचे पट्टे देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. जे आदिवासी वनामध्ये अतिक्रमण करून जमीन कसत असतील त्या जमिनी त्यांच्या नावावर केल्या पाहिजेत अशा प्रकारची भूमिका संसदेने स्वीकारली. आपल्याकडे प्रशासकीय यंत्रणा अपुरी आहे. अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत. असे असले तरी सुद्धा 30 हजार आदिवासींना वनहक्क जमिनीचे पट्टे देण्याचे काम गडचिरोलीमध्ये झाले आहे. महाराष्ट्रातील अनेक प्रगतिशील जिल्ह्यांना पाठीमागे टाकून नक्षलप्रभावी गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक काम झाले आहे, हे मी विनम्रपणे सदनाच्या निदर्शनास आणत आहे.

750 गावांना सामुदायिक वनहक्क पट्टे देऊन देशातील कुठल्याही जिल्ह्या पेक्षा गडचिरोली जिल्ह्यामध्ये अधिकचे काम झाले आहे. त्यांच्यासाठी चांगले निर्णय घेतले आहेत. ते अंमलात आणण्यासाठी अलीकडच्या काळात निश्चित प्रयत्न झाला आहे. अतिदुर्गम भागात रस्ते, पुलांचे जाळे विणण्यासाठी 612 कि.मी.चे रस्ते करण्याचा 207 कोटी रूपयांचा कार्यक्रम त्या भागात राबविण्यास सुरूवात झाली आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

सभापती महोदय, छत्तीसगढ आणि गडचिरोली या दोन भागामध्ये आणखी संपर्क वाढावा म्हणून दोन राज्यांच्या सीमेवरुन एक गारलँण्ड रोड प्रकल्प हाती घेण्याचे ठरविले आहे आणि केंद्र शासनाने याला तत्वत: मान्यता दिलेली आहे. राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या वेगवेगळया 17 योजना आहेत. यामध्ये लोकांनी आपल्यापर्यंत न येता प्रशासन लोकांच्या दारामध्ये जाईल, घरामध्ये जाईल आणि लोकांना या योजनांचा लाभ उपलब्ध करुन देईल अशी आम्ही भूमिका स्विकारलेली आहे. याचा परिणाम म्हणून वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून 1 लाख 88 हजार लाभार्थींना प्रत्यक्ष फायदा मिळेल यादृष्टीने निर्णय घेण्यात आलेला आहे.संजय गांधी निराधार योजनेपासून बाकीच्या योजनांमध्ये जवळजवळ 1 लाख 88 हजार व्यक्तींना प्रत्यक्षात लाभ झालेला असून याबाबतीत खूप मोठ्या प्रमाणात काम झालेले आहे म्हणजे केले तर होऊ शकते हे मी या एकाच निर्णयाच्या बाबतीत सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्फत दवाखाने चालविले जात होते पण तेथे डॉक्टरांची वानवा होती. दुर्गम भागामध्ये डॉक्टर्स् जात नव्हते,गोरगरीब माणसे दवाखान्यामध्ये जात नव्हती. गरोदर माता आणि लहान मुलांचे मृत्यू यामध्ये गडचिरोली जिल्हा हा ॲव्हरेजमध्ये पाठीमागे होता. पण मी आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना खात्रीने सांगतो की, त्याठिकाणी मोबाईल व्हॅन उपलब्ध करुन दिल्यामुळे इन्स्टीट्युशनमध्ये येऊन डिलीव्हरी करण्याचे प्रमाण हे महाराष्ट्र राज्याच्या ॲव्हरेज इतके आणण्यामध्ये तेथील प्रशासनाला यश आले आहे. मातांच्या मृत्यूचे प्रमाण आणि बालमृत्यूचे प्रमाण सुध्दा राज्याच्या ॲव्हरेजमध्ये आणण्यामध्ये प्रशासन यशस्वी ठरलेले आहे. खरे म्हणजे अनेक वेळा चांगल्या कामाचे मूल्यमापन होत नाही, मात्र जर एखादी घटना घडली तर मग सगळ्यावरच पाणी फिरते आणि तेथे काहीच होत नाही अशा पध्दतीचे वातावरण केले जाते.

सभापती महोदय, एक विद्यापीठ काढण्यासाठी बराच खर्च येतो हे माहिती असताना सुध्दा गोंडवाना विद्यापीठ स्थापन केले असून ते सुरु देखील झालेले आहे.पण मध्यंतरी एक भीतीदायक प्रक्रिया सुरु झाली होती. अनेक लोकप्रतिनिधी उठून कदाचित नक्षलवाद्यांच्या भितीने किंवा विकास कामाच्या आग्रहासाठी त्या परिसरात राजीनामे देत होते. त्यावेळी जवळजवळ 41 सरपंचांनी राजीनामे दिले होते.याबाबतीत तेथील जिल्हाधिकारी यांनी पोलीस अधिक्षकांशी संपर्क साधल्यावर आणि तेथील विकास कामांची हमी दिल्यावर 25 सरपंचांनी आपले राजीनामे मागे घेतले असून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

लोकशाही प्रक्रियेनुसार परत काम करण्यास सुरुवात केली आहे. नक्षलवादी ज्याप्रमाणे दबावाचे काम करीत आहेत त्याप्रमाणेच त्याला लोकशाही पध्दतीने उत्तर देण्याचे काम प्रशासकीय यंत्रणेमार्फत केले जात आहे. मला निश्चितपणे खात्री आहे की, सर्व गटनेत्यांनी ज्या सूचना दिल्या आहेत त्या लक्षात घेऊन त्या भागाच्या विकासासाठी, सुरक्षिततेसाठी एक प्रोग्रॅम बनविण्यात येईल जेणेकरुन आपल्याला नक्षलवाद्यांना चांगल्या प्रकारे तोंड देता येईल.

सभापती महोदय, विधान सभेमध्ये याबाबतीत गट नेत्यांनी चांगल्या सूचना केल्या असून आपण या सर्व प्रश्नाच्या बाबतीत राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाहिले पाहिजे. तसे पहावयास गेले तर मी त्या जिल्ह्याचा पालक मंत्री आहे. त्याठिकाणी वेगवेगळया राजकीय पक्षाचे लोक देखील चांगल्या प्रकारे सहकार्य करीत आहेत. पण त्याठिकाणी ज्या काही त्रुटी आहेत आणि त्यासंदर्भात देखील आम्हाला काही निर्णय घ्यावे लागतील. तेथील तरुणांमध्ये नाराजी असून त्यांचे म्हणणे आहे की, अन्य भागामध्ये जाऊन नोकऱ्या मिळविण्याची क्षमता व कुवत आमच्यामध्ये नाही. आम्ही मेरीटमध्ये टिकत नाही हे आम्हाला मान्य आहे. पण किमान आमच्या भागातील नोकऱ्या तरी आमच्यासाठी ठेवाव्यात. यावर्षी या जिल्ह्यामध्ये शिक्षकांची भरती झाली असून 61 शिक्षकांची पदे भरण्यात आली. पण तेथे 25 डी.एड.कॉलेज असताना सुध्दा याबाबत राज्य स्तरावर जी धोरणे ठरविलेली आहेत,त्यामुळे त्या जिल्ह्यातील एकाही शिक्षकाची निवड होऊ शकली नाही. त्याठिकाणी बाहेरचे उमेदवार नेमण्यात आले. एकतर ते बाहेरचे उमेदवार दुर्गम भागामध्ये जाऊन नोकऱ्या करण्यास तयार नाहीत. तेथे गेल्यापासून बदलीसाठी प्रयत्न केले जातात, कारण संबंधितांना येथील लोकांच्याबद्दल जिव्हाळा नाही. त्यांना सुरक्षिततेबाबत अडचणी आहेत आणि स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत. आज बाहेरुन जाणारे जे लोक आहेत, त्यांची संख्या लक्षात घेतली तर तेथे इंडस्ट्री नाही आणि शासकीय नोकऱ्यातील स्पर्धेमुळे व कोर्टाच्या निर्णयामुळे राज्यस्तरीय यादी तयार करीत असल्याने स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . . .

श्री. आर. आर. पाटील .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस आता सभागृहात उपस्थित नाहीत. मी सांगू इच्छितो की, लवकरच नक्षलग्रस्त भागासाठी तेथील स्थानिक लोकांनाच नोकरीत प्राधान्य मिळेल असे स्वतंत्र निवड मंडळ करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेला जाईल की ज्यामुळे स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळू शकतील. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी पोटतिडिकीने नाराजी व्यक्त करीत मुद्दे उपस्थित केले. त्या आता सभागृहात उपस्थित असत्या तर त्यांनीही समाधान व्यक्त केले असते. पण मी उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या मी नम्रपणाने लक्षात आणून देईन की, या अधिवेशनात मागील दहा-बारा दिवसांच्या कामकाजामध्ये तसे बघावयास गेलो तर वेगवेगळ्या मुद्यांवर, वेगवेगळ्या प्रश्नांच्या बाबतीत गृह खात्यावर चर्चा झाली होती. त्यामुळे मी असे मानत होतो की, हे पहिले अधिवेशन असे होईल की ज्या अधिवेशनात गृह खात्यावर विरोधकांमार्फत किंवा इतर कोणामार्फत चर्चा उपस्थित केली गेली नाही. पण माझा अंदाज चुकला. जर गृह खात्यावर चर्चा झाली नाही तर अधिवेशन झाले असे माध्यमानांही वाटणार नाही, आपल्यालाही वाटणार नाही आणि मला सुध्दा वाटणार नाही. त्यामुळे ही चर्चा होणे म्हणजे तुमच्या माझ्या दृष्टीने आणि माध्यमांच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये ज्या अनेक घटना घडत असतात त्या घटनेचा धागा पकडून पोलिसांना आणि प्रसंगी गृह मंत्र्यांना धोपटायला एक चांगला मार्ग असतो. कोठे ना कोठे काही गोष्टी मागेही घडत होत्या, आजही घडत आहेत. भविष्यामध्ये सुध्दा त्या घडणार नाहीत, अगदी कोठेही चोरी होणार नाही, एकही मर्डर होणार नाही, कोणी अनैतिकपणे वागणार नाही, कोठेही दरोडा पडणार नाही ,अशी हमी आजपर्यंत कोणी देऊ शकले नाही. ज्या राज्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आम्ही तशा पध्दतीचे आयडियल राज्य करुन दाखवू असे सांगितले जाते ती राज्ये सुध्दा या गोष्टींच्या बाबतीत मागे नाहीत. त्या ठिकाणी सुध्दा हे प्रकार घडत आहेत.

सभापती महोदय, आज कन्व्हीक्शनचा रेट कमी आहे म्हणून एनसीआरबीच्या आकड्यांचा उल्लेख करण्यात आला. पॅरोलवरील कैदी फरार आहेत त्याचेही आकडे सन्माननीय सदस्यांनी या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

ठिकाणी सांगितले. ज्या ठिकाणी कमतरता आहे तेवढेच नेमके आकडे विरोधी पक्ष नेत्यांच्या नजरेतून सुटले नाहीत. ज्या ठिकाणी राज्य थोडे कमी पडले, यंत्रणा कमी पडली तेवढेच त्यांनी बरोबर पीकअप केले. पण ज्या ठिकाणी राज्याने अतिशय प्रभावीपणाने कामगिरी केलेली आहे त्या आकड्यांकडे मात्र त्यांचे का दुर्लक्ष झाले हे मलाही समजत नाही. काही चुकीचे आकडे बघताना, चुकीचे म्हणण्यापेक्षा ज्या त्रुटी आहेत, ज्या ठिकाणी उणिवा आहेत ते आकडे बघताना जेथे आपल्या यंत्रणांनी खूप चांगले काम केले आहे असे दोन-चार प्रमुख आकडे जरी बघितले असते तरी कदाचित आपण अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला नसता.

सभापती महोदय, एनसीआरबीने जे आकडे घोषित केलेले आहेत त्यामध्ये जर बघितले तर राज्यात खुनांच्या संख्येमध्ये 38 ने घट आहे. खुनाच्या प्रयत्नामध्ये 23 ने घट आहे. चोरीमध्ये 2736 ने घट आहे. घरफोडीमध्ये 288 ने घट आहे. आर्थिक गुन्ह्यांमध्ये 1186 ने घट आहे. मी सगळे आकडे सांगत नाही पण एक ते पाच गुन्ह्यांमध्ये 2600 गुन्ह्याने आपल्या राज्यामध्ये घट आहे. आपल्याही अभिमान वाटेल अशी एक गोष्ट सांगतो. देशामध्ये जी मोठी 53 शहरे आहेत त्यामध्ये गुन्हेगारीच्या बाबतीत आपल्या मुंबई शहराचा 44 वा क्रमांक आहे. जी मोठी शहरे आहेत त्यामध्ये महिलांच्या बाबतीत, मुलांच्या बाबतीत, ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत सर्वात सुरक्षित शहर मुंबई आहे. मुंबईच्या ज्या अनेक अभिमानाच्या बाजू आहेत त्यामध्ये मुंबईची सुरक्षितता ही सुध्दा आपल्याला अभिमान वाटावी अशी गोष्ट आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, आज जी चर्चा झालेली आहे त्यातील सर्व मुद्यांना मी उत्तर देण्याची आवश्यकता नाही. 2008 सालापासून सभागृहातील वेगवेगळ्या चर्चांना मी दिलेली उत्तरे प्रोसिडिंगमधून वाचले तर आजच्या एकाही मुद्याबाबत मी उत्तर देण्याची आवश्यकता नाही. सभापती महोदय, सभागृहाचा असा एक नियम आहे की, एखाद्या प्रश्नावर चर्चा झाली असेल तर पुढील अधिवेशनाच्या कालावधीत तो प्रश्न पुन्हा चर्चेला घेऊ नये. तसेच एखाद्या प्रश्नासंबंधी दोन्ही सभागृहांमध्ये किती वेळा चर्चा करावयाची याचाही कधी तरी विचार करुन नियम तयार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

गृह विभागाच्या प्रश्नांवरील चर्चांना उत्तरे देऊन देऊन मी कंटाळलो आहे. पण विरोधी पक्ष नेते बदलले की, त्याच तावाने त्याच गोष्टींबाबत आरोप सुरु होतात. 2008 सालापासून ज्या घटना घडल्या आहेत त्यासंबंधी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांकडून तेच तेच आरोप केले जातात. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना त्याच त्याच घटनांवर चर्चा करावी लागते याबद्दल मी समाधान व्यक्त करीन. याचा अर्थ स्पष्ट आहे की, या शासनाने राज्यात नवीन घटना घडू दिलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांचाही नाईलाज झाला आहे. जर नव्या घटना घडल्या असत्या तर त्यांना जुन्या घटनांवर चर्चा करता आली नसती. (अडथळा) नवीन घटना घडल्या असत्या तर 2006 सालातील जुंदालच्या प्रकरणाचा उल्लेख केला नसता. नवीन घटना घडू दिल्या जात नसल्यामुळे विरोधकांना जुन्याच घटनांवर चर्चा करावी लागत आहे.

सभापती महोदय, पोलिसांनी कोणकोणत्या गोष्टींवर कॉन्सन्ट्रेट करावयाचे ? तो बाथरुमला गेला होता, कोणत्या खोलीत गेला होता. पोलिसांनी पाठलाग करुन 26 किलो आरडीएक्स पकडले. त्यातून महाराष्ट्राचे व गुजरात राज्याचे चांगले संरक्षण केले. मुख्य उद्देश बाजूला ठेवून तो इकडे गेला होता, तिकडे गेला होता, दिल्ली पोलिसांकडे कसा गेला असे मुद्दे उपस्थित करण्यात आले. परंतु त्या पोलिसांना काही माहिती मिळाली होती. अनेक सेंट्रल एजन्सीज आहेत, त्यांचा सभागृहात मी उल्लेख करणे योग्य होणार नाही. त्या एजन्सीने त्याला पकडून चौकशी केली. पण त्यावेळी राज्याच्या पोलिसांवर टीका करण्यात आली. महाराष्ट्राच्या पोलीस दलाकडे त्याला सुपूर्द केले जात नाही. याचे कारण असे की, महाराष्ट्रातील तुरुंग सेफ नाहीत.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.आर.आर.पाटील...

मी विनोदाने असे म्हटले होते की, महाराष्ट्रातील तुरुंग सेफ नसते तर कसाबला येथे ठेवले नसते. सगळयात मोठ्या अतिरेक्याला ज्या यंत्रणा सांभाळू शकतात, त्यामुळे त्यालाही सुरक्षित ठेवणे अवघड नाही. सुरक्षिततेच्या कारणास्तव त्याला महाराष्ट्राच्या पोलिसांकडे दिले नाही या आरोपात काही तथ्य नाही. त्याचा तपास पूर्ण झाल्याबरोबर कोर्टाने त्याला आपल्या ताब्यात दिलेले आहे. राज्याचे पोलीस त्याची संपूर्ण चौकशी करतील, ए.टी.एस.कडून चौकशी केली जाईल. क्राईम ब्रॅन्च चौकशी करील. 2006 साली आरडीएक्स आणताना त्यावेळी कोण सहभागी होते, स्थानिक कोण होते, जर्मन बेकरीत स्फोट करताना त्याचा कोणता रोल होता, 26/11 च्या घटनेमध्ये त्याचा कोणता रोल होता या सर्व गोष्टींची चौकशी केली जाईल. इतर राज्यांमध्ये घडलेल्या घटनांसाठी त्यांना त्याची आवश्यकता असेल तर कोर्टाच्या निर्णयानुसार त्या राज्यांच्या ताब्यात त्याला द्यावे लागेल आणि तशी कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे.डे.हत्या प्रकरणांचीही चर्चा केली. माझ ी त्यांना एवढीच विनंती आहे की, आपल्या देशामध्ये घटनेला अनुसरुन ज्या यंत्रणा तयार केलेल्या आहेत त्याच्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. देशात न्याय व्यवस्था निर्माण केलेली आहे, कायदे मंडळ निर्माण केलेले आहे. कार्यकारी मंडळ केलेले आहे. या तिन्ही संस्थांनी एकमेकांच्या हक्कांवर अतिक्रमण करता कामा नये. कोणत्याही प्रश्नावर चर्चा करण्यासाठी दोन्ही सभागृहे सार्वभौम असली तरी जे विषय न्यायप्रविष्ट आहेत त्या विषयांवर शक्य तो चर्चा होऊ नये असा संसदीय लोकशाहीतील महत्वाचा निकष आपण सर्वांनी अंमलात आणण्याची आवश्यकता आहे. जे.डे.हे वरिष्ठ पत्रकार होते. त्यांचा खून झाल्यानंतर पोलिसांना आपल्यावरील आरोप घालविण्यासाठी दुसऱ्या एका पत्रकाराला अटक केली असा पोलिसांवर हेत्वारोप झाला. मंत्रिमंडळात व सभागृहात धोरणात्मक निर्णय घेतले जातात. परंतु पोलिसांनी एखाद्या गोष्टीचा तपास कसा केले हे तपासून पाहण्यासाठी न्यायालयाची व्यवस्था केलेली आहे. ते निर्दोष होते असे सांगण्यासाठी त्यांचे अनेक वकील 8-8 महिने कोर्टामध्ये त्यांची बाजू मांडत आहेत. कोर्टाने पोलिसांच्या तपासावर का विश्वास ठेवला याचाही बारकाईने विचार केला पाहिजे. म्हणून ज्या बाबी न्यायप्रविष्ट आहेत. त्यावर कमीत कमी चर्चा झालेली चांगली असते. त्यांची जी काही बाजू आहे ती त्यांचे वकील मांडू शकतात. त्यात एखादा वकील कमी पडत असेल.

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 20:10

श्री. आर.आर.पाटील...

आपणही आपल्या वतीने एखादा वकील नेमू शकता. माननीय विरोधी पक्षनेत्यांना तीही संधी आहे. जेथे न्याय मागितला पाहिजे तेथे जाऊन न्याय मागण्याचा जरुर अधिकार आहे. मी या केसच्या बाबतीत इतकेच सांगू इच्छितो की, खूप मोठ्या प्रमाणात टीक होत असताना पोलिसांनी घाईगडबडीने कोणतीही कृती केली नाही. पुराव्याच्या आधारे अटक केलेली आहे. आमच्याकडचे सर्व पुरावे पोलिसांनी न्यायालयापुढे ठेवलेले आहेत. काही ऑब्जेक्शन्स असतील तर त्या बाबतीत जरुर न्यायालयात जाता येईल. न्यायालयाचा निर्ण्य आमच्यावर बंधनकारक राहील.

सभापती महोदय, पोलीस भरतीच्या संदर्भात काही जिल्ह्यांमध्ये समांतर आरक्षणामुळे काही लोकांवर अन्याय झाला अशी भावना काही सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्याचे पालन करणे आपल्याला बंधनकारक आहे. मी सांगू इच्छितो की, देशातील कोणत्याही राज्यापेक्षा अधिक पारदर्शीपणा ठेवून, कोठेही भ्रष्टाचार होऊ न देता, अत्यंत चांगल्या पदतीने आपल्या राज्यामध्ये पोलीस भरती प्रक्रिया पार पाडलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या पोलीस भरतीची बारकाईने माहिती घ्यावी. कोर्टाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली नसती तर तो कोर्टाचा अवमान झाला असता आणि अधिकारी तुरुंगात गेले असते. कोर्टाच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक होते.

सभापती महोदय, अजूनही डान्स बार सुरु आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. कायदा केल्यानंतर सर्वच गुन्हे बंद होतात असा अर्थ काढणे चुकीचे ठरेल. 302 कलम असून देखील खून होतात. पण या कायद्यामुळे काही जरब बसत असते, पोलिसांना कारवाई करण्याचे अधिकार प्राप्त होत असतात. 2009 पासून डान्सबारच्या संदर्भात 305 गुन्ह्यांची नोंद झाली आणि 2427 लोकांना अटक करुन कोर्टासमोर उभे केले.

सभापती महोदय, सीसीटीव्हीच्या संदर्भात विलंब झाला अशी सन्माननीय सदस्यांनी तक्रार केली. त्यामध्ये थोडेसे तथ्य आहे. अलीकडच्या काळात कोणतीही गोष्ट करायला सुरुवात केली की भ्रष्टाचार झाला, भ्रष्टाचार झाला असे दुस-या बाजूने लोक ओरडायला लागतात. त्यामुळे निर्णय घेणा-या यंत्रणा नाऊमेद होतात. निर्णय घेऊन बदनाम होऊन वर्तमानपत्राच्या रकान्यामध्ये जाण्यापेक्षा सावकाश निर्णय घेणे चांगले असे शहाणे लोक म्हणू लागले आहेत.या लोकांना नाऊमेद

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

कोणी केले ? तर आपणच या लोकांना नाऊमेद केले. आजच्या एका वर्तमानपत्रामध्ये "वायरलेसच्या सेटमध्ये 25 कोटीचा भ्रष्टाचार"अशी बातमी आलेली आहे. मी या बाबत माहिती घेतली. खरेदीची किंमत 8 कोटी रु. आहे. 8 कोटी रु.च्या खरेदीमध्ये 25 कोटी रु.चा भ्रष्टाचार कसा काय होऊ शकतो ? रेडकू मोठे असू शकते ? परंतु जन्माला आल्या बरोबर ते म्हशीपेक्षाही मोठे कसे काय असू शकते. 8 कोटी रु.च्या खरेदीमध्ये 25 कोटी रु.चा भ्रष्टाचार कसा काय होईल ? मी या बाबत माहिती घेतली.

शासनाने खरेदीचे टेंडर काढले होते आणि लोएस्ट माणसाला ते टेंडर दिले होते. शासनाची परवानगी मागण्यासाठी फाईल आली होती आणि ती फाईल देखील जळाली. त्यामुळे ना कोणती खरेदी झाली, ना कोणाला वर्कऑडर देण्यात आली. तरीही भ्रष्टाचार झाला, भ्रष्टाचार झाला अशी ओरड केली जाते. म्हणजे कोणी खरेदी करुच नये अशा प्रकारचे वातावरण विनाकारण निर्माण केले जाते. लोकशाहीमध्ये एक सोय आहे ती म्हणजे कोणावरही भ्रष्टाचाराचे आरोप करता येतात. भ्रष्टाचार सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. या पुढच्या काळामध्ये आम्ही तुमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले किंवा तुम्ही आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले तर नुसते आरोप करुन उपयोगाचे नाही तर भ्रष्टाचार सिद्ध होणारे पुरावे संबंधित यंत्रणांना दिले पाहिजेत. अजून खरेदी झ ाली नाही, वर्कऑर्डर दिली नाही तरी देखील भ्रष्टाचार, भ्रष्टाचार अशी ओरड करणे योग्य आहे काय ? मी सीसीटीव्ही कॅमे-याच्या बाबतीत एवढेच सांगेन की, ॲडव्होकेट जनरलचा सल्ला आम्ही घेतलेला आहे. त्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. अत्यंत पारदर्शीपणा ठेवून आणि कोणताही घोटाळा होणार नाही याची दक्षता घेऊन ही खरेदी पार पडेल. ही खरेदी लवकर होईल यादृष्टीने आमचा प्रयत्न राहील.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पुणे येथील ओकूड हाऊसिंग सोसायटीची तक्रार केली. ओकूड सोसायटीमध्ये काही अधिकारी आहेत. स्टॅम्प पेपरवर 30 नोव्हेंबरला करार झालेला आहे तर स्टॅम्प पेपर 6 डिसेंबर रोजी खरेदी केलेला आहे. म्हणजे करार अगोदर झाल्याची तारीख आहे तर स्टॅम्प नंतर खरेदी केल्याची तारीख आहे. तेव्हा अशा लोकांना पाठिशी घालण्याची आमची इच्छा नाही. हा तपास सी.आय.डी.कडे सोपविला जाईल आणि तीन महिन्याच्या आत या घटनेचा पूर्ण तपास केला जाईल.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले त्या सर्वच मुद्यांची उत्तरे देण्याची काही आवश्यकता नाही. परंतु मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना इतकेच सांगू इच्छितो की, आपले पोलीस दल खूप सक्षमपणे काम करीत आहे. ते कुठेही नाउमेद होणार नाही याची दक्षता आपण सर्वांनी मिळून घेतली पाहिजे. केंद्र सरकारने घोषित केलेल्या आकडेवारीनुसार सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून या राज्यातील महिला, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, लहान मुले, वयोवृध्द नागरिक, लोकांची मालमत्ता, या बाबतीत आपल्या राज्याकडे पाहिले जाते. पोलिसांची ही प्रतिमा कायम ठेवण्यासाठी मी स्वत: प्रयत्नशील राहीन. राज्यातील पोलीस दल कायदा व सुव्यवस्था सक्षमपणे राखण्यास यशस्वी होईल या गोष्टीची मी खात्री देतो.

सभापती महोदय, पोलिसांनी नेमके कोणते काम करावे हे आपल्या व्यवस्थेने सांगितले पाहिजे. मध्यंतरी एका इन्स्पेक्टरने कारवाई केली नाही म्हणून न्यायालयाने ताशेरे ओढले. त्या इन्स्पेक्टरने कारवाई केली नाही म्हणून आंदोलने झाली. जळगावमध्ये कारवाई केल्या बरोबर सर्व दवाखाने बंद करण्यात आले आणि हे सर्व होण्याचे कारण म्हणजे एनजीओमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना, पोलिसांना आणि डॉक्टरांना सुध्दा या कायद्याची पूर्ण माहिती नाही. त्यामुळे कोणीही उठतो आणि सांगतो पोलिसांनी कारवाई केली पाहिजे, पोलिसांनी कारवाई का केली नाही ? आपण पोलिसांचे अधिकार समजून घेतले पाहिजेत. पोलिसांना देखील त्यांचे अधिकार कोणते आहेत हे माहीत नाही. कारण हे कायदे करुन अनेक वर्षे झालेली आहेत. आपण प्रत्येक ठिकाणी पोलीस उभा करु लागलो तर सर्व सेवा ठप्प होतील म्हणून पोलिसांनी काय करावे, काय करु नये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

हे कायद्याने ठरवून दिलेले आहे. या बाबतीत पोलिसांना व डॉक्टरांना प्रशिक्षित करण्यासाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येतील. पोलिसांच्या कार्यकक्षा कोणत्या आहेत आणि जेथे जाणे आवश्यक आहे तेथे गेलेच पाहिजे याबाबतही पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येईल.

सभापती महोदय, जळगावमधील घटनेबाबत तेथील शिष्टमंडळ मला भेटले. त्यांचा कोणताही दोष नसेल आणि केवळ पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत म्हणून ते परत कसे घ्यायचे अशी भूमिका न घेता त्या बाबतीत वस्तुनिष्ठ निर्णय घेतले जातील. जर गुन्हे मागे घेण्याची आवश्यकता असेल तर तशी कृती केली जाईल आणि लावलेले गुन्हे कमी पडत आहेत असे तपासात आढळून आले तर आणखी गुन्हे लावले जातील. परंतु कायद्यातील तरतूद तपासून कारवाई केली जाईल. या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील डॉक्टर्सनी नाहक भीती बाळगण्याची आवश्यकता नाही. परंतु त्यांनी भ्रूण हत्या टाळल्या पाहिजेत आणि कायद्याचे पालन केले पाहिजे. जे डॉक्टर्स चांगल्या हेतूने काम करतात त्यांनी पोलिसांना घाबरण्याचे काहीही कारण नाही. जेथे कायद्याप्रमाणे काम सुरु आहे तेथे पोलीस आपणाला त्रास देणार नाही या गोष्टीची हमी मी डॉक्टर्सना देतो. जळगावच्या प्रकरणामध्ये मी स्वत: लक्ष घालतो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भाषणात अभ्यासपूर्ण मुद्दे मांडले आहेत. त्या सर्व मुद्द्यांचा लेखी खुलासा करण्याची मी हमी देतो. तसेच ज्या मुद्द्यांची लेखी उत्तरे देता येण्यासारखी नाहीत अशा मुद्द्यांची उत्तरे खाजगी चर्चेत देण्याची ग्वाही देतो.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांचा या सदनातील आजचा शेवटचा दिवस आहे. ते पुन्हा या सदनात लवकर यावेत, अशी मी त्यांना शुभेच्छा देतो. परंतु ते बाजूला राहून विकास कामांच्या गोष्टी पूर्ण करणे त्यांना शक्य होईल असे मला वाटत नाही. त्यांना पक्षाने पुन्हा संधी मिळाली असती बरे झाले असते. सन्माननीय सदस्य राज्यातील शेतकऱ्यांचे नेते असूनही त्यांच्यावर या सभागृहातच अन्याय होताना आम्ही पाहिले आहे.

सभापती महोदय, मी नम्रपणे विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, सत्ताधारी आघाडीतील दोन्ही पक्ष अनुभवी आहेत. भांडतील सुध्दा फायद्यासाठी आणि एकत्र येतील सुध्दा फायद्यासाठी. हे आम्ही आमच्यासाठी करु. तुमच्या फायद्यासाठी करायला आम्हाला वेळ नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांना राहिलेल्या प्रश्नांची उत्तरे लेखी कळविली जातील. अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. तुम्ही या अधिवेशनामध्ये खसखस सतत आणण्याचा प्रयत्न केला. पण माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विचारावे, या देशातील तरुण पिढी बरबाद होणे योग्य आहे का? त्या शेतकऱ्यांना जर माहिती नसेल, ते इनोसन्ट असतील तर आम्ही जरुर शोध घेऊ. पण आता ही बाब न्यायप्रविष्ठ आहे. आज सरकार या बाबतीत काय करु शकते ते आम्ही पाहू. तो ॲक्ट केंद्र शासनाचा आहे. खसखस असेल, अफू असेल, ड्रग्ज तयार करण्यासाठी जी पिके तयार केली जातात याबद्दल काही देशामध्ये फाशीची शिक्षा दिली जाते. आपल्या देशामध्ये ती शिक्षा नाही हे आपण आपले भाग्य मानले पाहिजे. अन्यथा सरकार काही करु शकले नसते आणि आपण प्रश्न सुध्दा मांडू शकला नसता. जे शेतकरी आहेत ते इनोसन्ट आहेत का हे आम्ही तपासून बघू. जर ते इनोसन्ट असतील आणि खसखस म्हणूनच पिकवित असतील, आपण तसे सांगत आहात परंतु पोलीस तपासमध्ये तसे कुठे आढळून आले नाही हेही मी आपल्याला सांगतो. ते खसखस म्हणूनच पिकवित होते, त्याची बोंडे विकली जात होती की वेगळ्याच कामासाठी वापरली जात होती ही सर्व तपासातील माहिती आहे. अनेक जिल्हयामध्ये खसखस पिकविताना लोक सापडले आहेत.

मी या निमित्ताने एवढेच सांगतो की, जरुर शेतकऱ्यांच्या अडचणी असतील म्हणून कोणी विष तयार करणार नाही. शेतकरी हा अन्नदाता आहे. ज्याचा तुम्हा आम्हाला अभिमान आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

शेतकरी कधीच विषदाता नव्हता. हे विष आपण तरुण पिढीसाठी उपलब्ध करुन देणे हे अत्यंत चुकीचे आहे. लोक चुकलेले आहेत. काय करता येईल या दृष्टीने आम्ही कायदेशीर बाबी तपासून घेऊ. माननीय विरोधी पक्षनेत्यांना या निमित्ताने गृहखात्याची आठवण झाली. जाणीवपूर्वक ही चर्चा उपस्थित करुन कदाचित आमच्यामध्ये बॅलेन्स ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला असावा. गृहनिर्माण किंवा नगरविकास यापैकी एकाच खात्याचे मुद्दे उपस्थित केले तर आमच्याच खात्याची चर्चा का केली जाते असा त्या खात्याचा समज होऊ नये म्हणून दोघांचाही बॅलन्स ठेवण्याचे काम त्यांनी ज्या पध्दतीने केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, आज माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी व अन्य सन्माननीय सदस्यांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी, महसूल विभागाच्या शासकीय जमिनी विविध कारणासाठी देतो. त्या बाबतीत होणारा शर्तभंग आणि इतरही काही प्रश्न या प्रस्तावाच्या बाबतीत या सभागृहात उपस्थित केलेले आहेत. शासनाने पहिल्यापासून निर्णय घेतलेला आहे त्याप्रमाणे राज्यातील शासकीय जमिनी सामाजिक, शैक्षणिक आणि धर्मादाय प्रयोजनाकरिता देत आलेलो आहोत. हे धोरण आपण जाणीवपूर्वक स्वीकारलेले आहे. सदर जमिनी सवलतीच्या दरामध्ये देत आलेलो असल्यामुळे अनेक सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था,धर्मादाय संस्था आज उभ्या राहिल्या आहेत ही बाब कोणाला नाकारता येणार नाही. राज्यात त्या संस्थांनी अत्यंत चांगल्या प्रकारचे काम निश्चितपणे केलेले आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 20:25

श्री. बाळासाहेब थोरात...

सभापती महोदय, शैक्षणिक संस्थांप्रमाणे रुग्णालये, खेळांची मैदाने, सहकारी संस्था या सर्व संस्थांना शासनाच्या जमिनी दिलेल्या आहेत . या सर्व शासकीय जमिनी विविध संस्थांसाठी दिलेल्या आहेत त्यामध्ये घातलेल्या अटी व शर्ती यांचा भंग होऊ नये तसेच वापरासंबंधी बदल करु नये ही अपेक्षा साहजिकपणे शासनाची आहे. तसेच विनापरवाना हस्तांतर करु नये अशीही शासनाची अपेक्षा आहे. जर काही बदल करावयाचे असतील तर बदल करण्यासाठी ज्या तरतुदी आहेत त्यापध्दतीने ते बदल केले पाहिजेत ही अपेक्षा आहे. हे सर्व करीत असताना दोन गोष्टींबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. मुंबईमध्ये जिमखान्याकरिता ज्या जमिनी दिलेल्या आहेत विशेषत: मरीन ड्राईव्ह परिसरात ज्या जमिनी दिलेल्या आहेत त्या प्रामुख्याने स्पोर्ट ॲक्टीव्हीटीकरिता दिलेल्या आहेत. त्या व्यतिरिक्त त्यांना इतर प्रयोजनाकरिता या जमिनी वापरता येतात परंतु त्यासाठी काही निर्बंध आहेत. त्यासाठी जिल्हाधिका-यांची परवानगी घ्यावी लागते तसेच त्यासाठी शुल्कसुध्दा आकारले जाते हे मी या निमित्ताने निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, वर्ल्ड ट्रेड सेंटरचा उल्लेख केला. हे सेंटर शासनाच्या जमिनीवर उभे राहिले आहे. त्यामध्ये काही करार आहेत. त्या अटीचे आणि शर्तीचे पालन केले आहे किंवा नाही हे तपासून पाहिले जाईल. अनधिकृत उत्पन्न घेतले जात असेल तर त्याचा हिस्सा शासनाला मिळाला किंवा नाही हीसुध्दा चौकशी केली जाईल.एक महत्वाचा मुद्दा या निमित्ताने विरोधी पक्ष नेत्यांनी केला त्याचा ऊहापोह मी मुद्दाम करणार आहे. लॅन्ड ऑडिट झाले पाहिजे तसेच मुंबई शहराचे लॅन्ड ऑडिट झाले पाहिजे असेही त्यांनी सांगितले. आपण अनेक जमिनी विविध संस्थांना आणि व्यक्तींना दिलेल्या आहेत त्याचे आजचे स्वरुप काय आहे, शासनाच्या अटी आणि शर्तीचे पालन केले आहे किंवा नाही, काही वेगळे तेथे झालेले आहे काय याचे ऑडीट व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, फक्त मुंबई नाही तर संपूर्ण राज्यातील शासकीय जमिनी आहेत मग त्या भाडेपट्टयाने अथवा कब्जा हक्काने अगर कोणत्याही कारणासाठी दिलेल्या असतील त्या सर्वाची माहिती एकत्र करीत आहोत. आज नाशिक आणि कोकण विभागाची माहिती पूर्णपणे एकत्रित केलेली आहे. बाकी महसूल विभागाचे काम सुरु आहे. येत्या तीन महिन्यात ही सर्व माहिती एकत्र करावयाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4Y-2

श्री. बाळासाहेब थोरात...

ही माहिती एकत्र केल्यानंतर जमिनी कोणत्या पध्दतीने दिल्या, देतांना अटी व शर्ती काय होत्या , त्याचे पालन झाले किंवा नाही त्यामध्ये बदल केलेले आहेत काय हे सर्व बदल अपडेट करुन वेबसाईटवर टाकले जाणार आहेत. जिल्हयाच्या ठिकाणी वेबसाईटवर हे संकलन टाकले जाणार असून ते जनतेला पाहण्यासाठी खुले राहणार आहे. सीएस कंपनीला सॉफ्टवेअर तयार करण्याची जबाबदारी दिलेली आहे. हे संकलन तीन महिन्यात पूर्ण होईल. शासकीय जमिनीची सद्यस्थिती काय आहे याची माहिती नेहमी करिता सर्वासाठी खुली राहील. त्यामध्ये जे शासकीय उत्पन्न असते ते येईल आणि एक शिस्त ठेवली जाईल. या जमिनीच्या वाटपासंदर्भातील धोरणामध्ये काही बदल करीत आहोत. तो प्रस्ताव अंतिम टप्यामध्ये असून येत्या तीन महिन्यात शासकीय जमिनीच्या वाटपासंबंधीचे नवीन धोरण आपण मंजूर करुन घेत आहोत आणि त्या दृष्टीने विभागाची तयारी सुरु आहे.

सभापती महोदय, जमिनीवरील अतिक्रमणाचा मुद्दा विरोधी पक्ष नेत्यांनी मांडला. ठाणे जिल्हयातील 14 तालुक्यातील 6919 अतिक्रमणे आतापर्यत दूर केलेली आहेत. शर्त भंगाच्या संदर्भातील मुद्दा माननीय सदस्या डॉ.गो-हे यांनी उपस्थित केला. ओकवुडचा संदर्भ या खात्याशी संबंधित नाही. परंतु शर्तभंगातील प्रकरणातील संपूर्ण यादी संकलित करीत आहोत.मध्यंतरी महालेखापालावरील अहवालाच्या संदर्भात चर्चा होत असतांना या मुद्यावर चर्चा झालेली आहे. ती पुन्हा करावी अशी अपेक्षा नाही. शर्तभंग या बाबतीत शासन काळजी घेत आहे. डॉ. गो-हे यांनी पिंपरी- चिंचवड प्राधिकरणा-या हद्दीतील मुरुम चोरीचे प्रकरण मांडले आहे. त्याची चौकशी करण्यात येईल आणि त्यामध्ये काही गैर घडले असेल तर दंडात्मक कारवाई करण्यात येईल हे या निमित्ताने सांगू इच्छितो.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात....

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी कांदिवली येथील निओ फर्म कंपनीला दिलेल्या शासकीय जमिनीबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे. ही जमीन महाराष्ट्र शासनाच्या मालकीची होती. ती आपण लॅण्ड लॉक म्हणून ठेवली होती. त्यामध्ये संरक्षण विभागाच्या जमिनीची सुध्दा चर्चा होत होती. या संपूर्ण जमिनीची शासनामार्फत मोजणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये संरक्षण खात्याची जमीन सुध्दा मोजावी लागणार आहे. ती मोजणी शासनाच्या खर्चाने केली जाईल. तुमच्या भागातील जमीन मोजण्याची परवानगी द्यावी अशी विनंती त्यांना केलेली आहे. त्यामुळे हा प्रश्न दूर होणार आहे.

सभापती महोदय, या व्यतिरिक्त त्यांनी शर्ती भंगाचे अनेक प्रश्न मांडले. त्या संदर्भात निश्चितपणे चौकशी सुरु आहे. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी बीड येथील प्रश्न मांडला आहे. महसूल विभागाच्या जागेच्या संदर्भातील फाईल पुढे येत आहे. ती फाईल निर्णयाला येईल त्यावेळी माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले त्याचा निश्चितपणे विचार केला जाईल. त्याची नोंद घेण्यात आली आहे. महसूल विभागाच्या जमिनीच्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते आणि इतर माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत त्यांचा निश्चितपणे विचार होईल आणि या निमित्ताने एक चांगल्या प्रकारची चर्चा घडवून आणल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सभागृहाची दिलगीरी व्यक्त करतो. मी आज सकाळी महामहिम राष्ट्रपती महोदयांच्या शपथविधी कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी दिल्ली येथे गेलो होतो. लवकर परत येण्याची अपेक्षा होती. परंतु विमानामध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मला परत यायला विलंब झाला. तरी देखील चर्चेच्या निमित्ताने माननीय सदस्यांनी जे काही मुद्दे मांडले आहेत त्या मुद्यांची नोंद माझ्या सहकाऱ्यांनी घेतली होती. विशेषत: नगरविकास आणि गृहनिर्माण विभागाच्या संदर्भातील मुद्यांची नोंद घेण्यात आली असून मी त्या मुद्यांबाबत स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, मला असे सांगण्यात आले की, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणामधून अनेक विषयांना स्पर्श केलेला आहे. तसेच माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, किरण पावसकर, रामदास कदम, परशुराम उपरकर, प्रा.सुरेश नवले, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे आणि इतर माननीय सदस्यांनी महत्वपूर्ण विचार मांडले आहेत. माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी बहुधा त्यांच्या टर्मचे शेवटचे भाषण केले असावे. मी अपेक्षा करतो, त्यांची या नंतर खालच्या सदनात किंवा पुन्हा या सदनामध्ये भेट होईल. मी सर्व माननीय सदस्यांना त्यांनी अतिशय महत्वाचे मुद्दे उपस्थित केल्याबद्दल धन्यवाद देतो. त्यातील काही महत्वाच्या मुद्यांना मी या ठिकाणी स्पर्श करणार आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी पनवेल येथील 15 सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या सिडकोच्या भूखंडाबद्दल तक्रार केली आहे. सदरचे भूखंड केंद्र शासनाच्या माझगाव डॉक लिमिटेड या प्राधिकरणाला देण्यात आले होते. अपेक्षा होती की, ते भूखंड त्यांनी स्वत: विकसित करावेत. तसे न करता त्यांनी आपल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हे भूखंड हस्तांतरित केले आणि त्याची परवानगी सिडकोकडे मागण्यात आली. त्यावेळी सिडकोने तशी परवानगी दिली. ही बाब नंतर निदर्शनास आली की, हे नियमबाह्य कृत्य झाले आहे. त्या प्रकारचा लेखा आक्षेप घेण्यात आला. माझगाव डॉक लिमिटेड हे केंद्र शासनाचे प्राधिकरण आहे. त्याबाबत काय करायचे याची चर्चा सुरु झाली. त्यामुळे आता प्रचलित धोरणानुसार वाटप नियमारोध करण्याकरिता एक प्रस्ताव सिडकोने शासनाकडे दोन महिन्यांपूर्वी प्रस्तुत केला आहे. त्यावर आणखी माहिती मागविण्यासाठी प्रस्ताव परत केलेला आहे. त्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण........

सभापती महोदय, मुंबईत जी पंचतारांकित हॉटेल्स आहेत त्यांना जादा किंवा अमर्यादित एफ.एस.आय.देता येतो.  त्यातील सी.आर.झेड.मधील भूखंडांना सी.आर.झेड.चे नियम का आड येत नाहीत अशी विचारणा करण्यात आली आहे.  त्यामध्ये विसंगती असल्यामुळे मला सभागृहात स्पष्ट केले पाहिजे.  1967 चे सी.आर.झेड.नियम आहेत ते आता सुध्दा हॉटेल इमारतींना लागू आहेत. 1991 चे नियम लागू नाहीत.  कारण सी.आर.झेड.नियम ज्या तारखेला लागू झाले त्या तारखेपूर्वी एक दिवस आधीचे नियम लागू होते.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ......

हॉटेलला एफएसआय देण्याबाबत काहीच निर्बंध नाहीत, कितीही एफएसआय देता येतो, फक्त बीएमसी त्यासाठी पायाभूत सुविधा देऊ शकेल की नाही यासाठी त्यांची एनओसी घ्यावी लागते, त्यानंतर पर्यावरण विभागाकडे हा प्रस्ताव पाठवावा लागतो. यामध्ये थोडी विसंगती झालेली आहे, त्याची चर्चा केंद्र सरकारशी करावी लागेल.

महोदय, भिवंडी मधील अनधिकृत गोदामांच्या बाबतीत येथे मुद्दा उपस्थित करण्यात आला. एमएमआरडीए क्षेत्रात ही गोदामे येत असल्याने त्या ऑथॉरिटीकडून रितसर नोटीसेस देण्यात आल्या व त्यातील काही अनधिकृत गोदामे निष्कासित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भिवंडी परिसरातील ज्या 51 गावांमध्ये ही गोदामे आहेत त्या क्षेत्रात एकूण 192 अनधिकृत गोदामे दिसून आली, त्यापैकी 51 गोदामांना नोटिसेस दिल्या असून 25 गोदामांबाबत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व एका गोदामाचे बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे. त्याचबरोबर येथे गोदामांची गरज आहे हे एमएमआरडीएच्या लक्षात आले त्यामुळे डेव्हलपमेंट रुल्समध्ये बदल करण्याचाही विचार सुरु आहे.

महोदय, म्हाडामधील गैरव्यवहाराच्या संदर्भात सभागृहात मुद्दा उपस्थित झाला. त्यासंदर्भात मी वस्तुस्थिती निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मुंबई उपनगरातील मागाठणे भागात एका भूखंडाच्या वाटपाच्या संदर्भात जी अनियमितता झालेली आहे त्यासंदर्भात म्हाडाचे तत्कालीन कार्यकारी अधिकारी व आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करुन दि. 13.12.2011 रोजी ही कार्यवाही प्रस्तावित केली आहे. या प्रकरणात प्राथमिक चौकशीच्या आधारे संबंधितांचा खुलासा मागवून उचित कारवाई करण्यात येईल. त्यासाठी आणखी दि. 5.3.2012 रोजी आवश्यक कागदपत्रे मागविण्यात आली, पुन्हा त्यातील काही कागदपत्रे आलेली नाहीत असे लक्षात आल्यामुळे प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांनी दि. 19.6.2012 रोजी पाठपुरावा केला व पुढील पाठपुरावा देखील त्यांच्यामार्फत चालू आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी गिरणी कामगारांचा अत्यंत असलेल्या महत्वाचा व जिव्हाळ्याचा प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबद्दल मला असे वाटते की गिरणी कामगारांना त्यांची हक्काची घरे मिळाली पाहिजेत. या अनुषंगाने आपल्या सर्वांच्या सहकार्याने

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ......

अनेक बैठका घेण्यात आल्या. तसेच गटनेत्यांच्या बरोबरही बैठका झाल्या, संघटनांच्या बरोबर काही बैठका झाल्या. मागील दोन तीन अधिवेशनात त्याबद्दलची सद्य:स्थिती सभागृहात अवगत करुन दिली होती की, मुंबईत गिरण्यांची कोणकोणत्या भागात किती किती किती जमीन आहे, त्यासंदर्भात रुल 58 अंतर्गत निर्णयही झाला होता व उच्च न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केले, ते योग्य की अयोग्य यामध्ये मी जाणार नाही पण जितक्या जमिनी मिळाल्या त्या जमिनीवर घरे बांधून ती घरे गिरणी कामगारांना द्यावीत, असा स्पष्ट निर्णय आपल्या सर्वांबरोबर झालेल्या बैठकीत झाला. गिरणी कामगारांच्या काही संघटनांनी त्या निर्णयाला मान्यता दिली तर एक दोन संघटनांनी विरोध केला. यासाठी एकूण 1.48 लाख गिरणी कामगारांकडून अर्ज प्राप्त झाले होते, त्या सर्वांनाच घरे मिळण्यासाठी जमीन उपलब्ध होऊ शकणार नाही हे आपणा सर्वांनाच माहीत आहे म्हणून पहिल्या टप्प्यात आपण 6900 घरे बांधली व ती हस्तांतरित करण्यासाठी सोडत काढण्यात आली. म्हाडाची सोडत पध्दती अत्यंत विश्वासार्ह असून त्यासाठी देखील काही गिरणी कामगार संघटनांनी सहकार्य केले तर काहींचा विरोध होता. अशा प्रकारे ज्या ज्या गिरण्यांची जमीन ताब्यात मिळाली त्या गिरणीच्या आवारात जितकी घरे बांधली तेथे त्याच गिरणीत काम करणा-या कामगारांसाठी सोडत काढली.

महोदय, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत जे हुतात्मे झाले त्यांच्या कुटुबीयांना घरे द्यावीत, असा निर्णय देखील शासनाने घेतला. पण त्यासाठी आतापर्यंत फक्त 10 नावे प्राप्त झाली असून त्यापैकी 2 लोकांना घरे देण्याचा निर्णय झालेला आहे. इतरांचा शोध चालू आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने त्यांची माहिती मिळाली तर ती शासनाकडे द्यावी. जेणेकरुन त्यांनाही घरे देण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला असल्याने ती घरे त्यांना देता येतील. बाजारभाव खूपच जास्त असल्याची जाणीव आपणा सर्वांनाच आहे पण तरी देखील या लोकांना परवडतील अशाच या घरांच्या किंमती आपण ठरविल्या व त्या कमी आहेत. या घरांच्या किंमतीच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करण्यात आली व त्यानंतर या किंमती कमी करण्याचा निर्णय झाला. याचे कारण म्हणजे संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान देणारा हा घटक आपल्या राज्यासाठी फार महत्वाचा आहे व या घटकांना मुंबईत उभे करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असाही

....3



PFK/ पूर्वी श्री. भोगले....... 20:35

श्री. पृथ्वीराज चव्हाण ......

शासनाने विचार केला. पण दरम्यानच्या काळात घरे वाटपाच्या संदर्भात कोणी तरी कोर्टात याचिका दाखल केली असल्याने हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. लवकरच त्याचा निर्णय लागल्यानंतर ही घरे वाटप करण्यात येतील.

यानंतर श्री. जुन्नरे .......

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण .......

यामध्ये एकंदर 7 हजार घरे आहेत. काही ठिकाणी जमीन मिळाली असून काही ठिकाणी जमीन मिळण्यास विलंब लागत आहे. या जमिनीवर म्हाडानेच घरे बांधावी का, म्हाडाने ही घरे बांधली तर त्याचा दर किती ठरवावा, या बाबत विचार सुरु आहे. दर ठरल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल. परंतु, बांधण्यात आलेली 7 हजारे घरे संबंधितांना वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या संदर्भातील बरीच प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या संदर्भातील कोर्टाचा आक्षेप निरसित झाल्यानंतर ही घरे त्वरित हस्तांतरीत करण्यात येतील. या संदर्भात महसूल मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली आहे. उर्वरित लोकांना घरे मिळतील का, असा आक्षेप घेण्यात आला होता. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये घरांसाठी फारशी जागा उपलब्ध होऊ शकणार नाही, असे वाटते. त्यामुळे मी यासंदर्भात माहिती मागविली आहे. घरांसाठी आतापर्यंत 1 लाख 48 हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. हे अर्ज कोणाचे आहेत, याबाबत मी ज्यावेळी चौकशी केली, तेव्हा मला अशी माहिती मिळाली की, एकूण अर्जांपैकी 81 हजार अर्ज मुंबई व मुंबई उपनगरातून आले आहेत. हे सर्व लोक आजही येथेच राहतात व मुळात ते मुंबईतीलच आहेत. ठाणे जिल्हयातून साधारणत: 12 हजार, सातारा जिल्हयातून 13 हजार 500, कोल्हापूर जिल्हयातून 11 हजार 500, रत्नागिरी जिल्हयातून 4 हजार 500, सिंधुदुर्ग जिल्हयातून 6 हजार 600, पुणे जिल्हयातून 5 हजार 800 व इतर जिल्हयातून हजार, पाचशे लोकांनी घरासाठी अर्ज केले आहेत.

शासनाच्या माध्यमातून एमएमआरडीए रिजन व ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्हयातील कामगारांना गृहनिर्माण संस्थेसाठी त्या त्या जिल्ह्यात जमीन देण्याबाबतचा विचार करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, परवडणारी घरे बांधण्याच्या कार्यक्रमाला पूर्वी रेंटल हाऊसिंग म्हटले जात असे. आता ॲफॉरडेबल हाऊसिंग म्हटले जाते. महसूल मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये गिरणी कामगारांचेही काही प्रतिनिधी आहेत. या समितीच्या आतापर्यंत दोन बैठकाही झाल्या आहेत. ज्या ठिकाणी उपलब्धता असेल त्या ठिकाणी लवकरात लवकर जमीन उपलब्ध करुन दिली जाईल व त्या जमिनींवर म्हाडाऐवजी गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या माध्यमातून लॉटरी काढून प्लॉट पाडता येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.पृथ्वीराज चव्हाण .......

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी गिरणी कामगारांच्या घरांच्या किमतीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. मी सांगू इच्छितो की, किमतीच्या संदर्भात निर्णय झाला असून 7 लाख 50 हजार रुपये किंमत ठरविण्यात आली आहे. या संदर्भात जो निर्णय झालेला आहे त्यामध्ये आता बदल होणार नाही. आपल्यालाला ट्रान्झीट ॲकोमोडेशनसाठीही घरे द्यायची आहेत. आज बाजारात घरांच्या किमती किती आहेत, याची आपल्या सर्वांना माहिती आहे. भाडे तत्वावरील घरांची योजना 5 लाख रुपयांची आहे. त्यामध्ये अजून काय करता येईल, यासंदर्भात विचार सुरु आहे. या योजनेचे स्वरुप बदलण्याचा आमचा प्रयत्न असून रेटंल हाऊसिंगऐवजी ॲफॉरडेबल हौसिंग करुन या योजनेचा समावेश त्यामध्ये करण्याचा निर्णय कमिटी घेईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी म्हाडा व बीएमसीला 33 टक्के घरे देणे आवश्यक असतांना विकासक घरे देत नाहीत, असा मुद्दा उपस्थित केला होता. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, 33 टक्के घरे द्यावयाची नसून 33 टक्के जमीन द्यायची आहे. म्हाडाला मिळालेल्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या घरांपैकी निम्मी घरे गिरणी कामगारांसाठी व निम्मी घरे ट्रान्झीट कॅम्पसाठी देण्यात येतील.

सभापती महोदय, अनाधिकृत बांधकामाचा मोठा व्यापक प्रश्न आहे. अनधिकृत बांधकामांबाबत जबाबदारी निश्चित करण्याबाबतचे विधेयक नुकतेच संमत करण्यात आले आहे. हे विधेयक माननीय राष्ट्रपती महोदयांकडे गेल्या वर्षभरापासून मंजुरीसाठी प्रलंबित होते. आता या विधेयकाला माननीय राष्ट्रपती महोदयांनी नुकतीच मान्यता दिलेली आहे. त्यामुळे अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात जबादारी निश्चित करता येईल. नगरपालिका क्षेत्रात मुख्याधिकारी आणि महापालिका क्षेत्रात प्राधिकृत अधिकारी अनधिकृत बांधकामांना जबाबदार ठरविले जाणार आहेत. तसेच पोलिसांचीही जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. जबाबदारी निश्चित करण्याबाबतच्या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर अनाधिकृत बांधकामांना निश्चितच आळा बसेल, अशी मला आशा आहे.

यानंतर श्री. भारवि....

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी बीड जिल्ह्यातील मल्टीपर्पज शाळे संबंधातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. जिल्हा परिषदेने 1 जून 2009 रोजीच्या ठरावान्वये ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. जिल्हा परिषदेने आक्षेप घेतला होता असे येथे निवेदन करण्यात आले होते ते खरे नाही. तरी देखील ही बाब तपासली जाईल हे मी येथे सांगू इच्छितो.

येथे जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्यातील काही मुद्यांना मी स्पर्श केला आहे. राहण्याकरिता परवडणारी घरे हा आज महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. एका बाजूला औद्योगिकीकरण सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला मॉल संस्कृती येत आहे. श्रीमंत आणि उच्चभ्रू लोकांच्या सेवा होत आहेत. मात्र, सामान्य माणसाला राहण्यासाठी घर मिळत नाही. त्यामुळे गृहनिर्माण धोरणात विस्तृत रूपाने विचार करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. यातून अतिरिक्त जमीन मिळवून म्हाडाच्या माध्यमातून विकास करण्याच्या अनेक योजना शासनाच्या विचाराधीन आहेत. येथे जे प्रश्न विचारण्यात आले त्यातील काही प्रश्नांना स्पर्श करण्याचा मी येथे प्रयत्न केला आहे.

मी काही दिवसांपूर्वीच मुंबईतील सर्व पक्षीय आमदारांची बैठक घेतली होती. ही बैठक 9 तास चालली होती. या बैठकीमध्ये 350 मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. बहुतेक मुद्दे हे गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाशी संबंधित होते. या बैठकीचे मिनिटस् काढण्यात आले असून ते संबंधितांना पाठविण्यात आले आहेत. त्यात काही चूक किंवा एखादा मुद्दा राहिला असेल तर तो देखील कळवावा. आमच्याकडे ATR तयार आहे. काही दिवसातच मी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर मधील सर्वपक्षीय आमदारांची स्वतंत्र बैठक अधिकाऱ्यां समवेत घेऊन चर्चा करणार आहे.

एक मुंबई गोष्ट खरी आहे की, मुंबई वरील ताण कमी केला पाहिजे. या उद्देशाचे मी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना विनंती केली की, मुंबईत आज जमीन किती आहे, झोपड्या किती आहेत, किती कुटुंबे झोपड्यात राहतात हे कळवावे. त्यांनी अचूक प्राथमिक माहिती दिली आहे. जवळ जवळ साडे चौदा लाख झोपडपट्टी कुटुंबीयांची नोंद आपल्याकडे आहे. जवळ जवळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

37 स्क्वेअर किलो मीटर म्हणजे 3700 हेक्टर जमीन झोपड्यांनी आच्छादित आहे. त्यामध्ये काही आरक्षण आहे. आरक्षण बाजूला काढल्यानंतर किती जमीन पुनर्निर्माणाकरिता उपलब्ध होईल हे देखील सांगितले आहे. एका हेक्टरमध्ये 500 सदनिका अशी घनता धरली तर जास्तीत जास्ती किती पुनर्निर्माण करता येईल याबाबतची आकडेवारी समोर आली की, ती मी आपणा सर्वांच्या समोर बैठकीमध्ये ठेवीन. यासाठी नियमामध्ये बदल करावा लागेल काय ? हे देखील पाहिले पाहिजे. शक्यच नसेल तर आपण प्रत्येकाला दिवास्वप्न दाखविणे उचित ठरणार नाही. साडेचौदा लाख झोपडपट्टीत राहणारी कुटुंबे, 37 स्क्वेअर कि.मी. झोपडपट्टीने आच्छादिलेली एकूण जमीन, त्यावर असलेले आरक्षण हे सर्व बाजूला काढून कशा प्रकारे आपल्याला विकास करता येईल याबद्दल विचार करायचा आहे.

क्लस्टर डेव्हलपमेंटला प्राधान्य देण्याचा देखील विचार आहे. त्यामुळे चांगल्या प्रकारचे लेआऊट होऊ शकेल. एका इमारतीमध्ये सगळ्या सुविधा देता येत नाहीत. त्यामुळे त्याला कसे प्रोत्साहित करायचे याचा देखील विचार सुरू आहे.

आपण सर्वांनी येथे मुद्दे उपस्थित केल्या बद्दल पुन्हा एकदा सर्वांना धन्यवाद देतो आणि आपली रजा घेतो जय हिंद जय महाराष्ट्र.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वेळ अधिक झाला असल्यामुळे मी फक्त 2-3 मुद्दे मांडतो. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी म्हटले की, नेहमीच गृह विभागावर चर्चा का घेण्यात येते. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, सन्माननीय सहकारी मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील हे आपली खाती चांगल्या पद्धतीने चालवत असल्यामुळे त्या खात्यांवर चर्चा होत नाही. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे खाते नीट चालत नाही म्हणून चर्चा होते. वर्तमानपत्रात आलेल्या रेडकूवर विरोधी पक्षातील कोणीही सन्माननीय सदस्य बोलले नाही. आजच्या बातमीला धरून कोणीही आरोप केला नाही. 26/11 चा हल्ला होऊन चार वर्षे झाली आहेत. चार वर्षात सी.सी.टीव्हीची खरेदी होऊ शकत नाही याला काय म्हणायचे.? आपला दणका सन 2001 पासून आम्ही पहात आहोत. त्याचे काय झाले ते माहीत नाही. आपला दणका कमी झाला आहे. कालच माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब दणक्यात म्हणाले की, मी लढायला तयार आहे. तसा दणका आपण थोडा दाखविला तर ज्याची गरज आहे त्यातील थोडे तरी होईल असे मला वाटते.

आम्ही जुने विषय घेतले आहेत असे नाही. जुंदाल या आरोपीला अटक केलेली आहे. त्याचा संबंध आमदार निवासाशी होता. तो विषय आम्ही काळजीपोटी मांडला आहे. टीका म्हणून मांडला नाही. एवढेच नव्हे तर त्या मंत्र्यांवर दोषारोप देखील केला नाही. उलट आम्ही सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असणारा मुद्दा अत्यंत संवेदनशीलपणे मांडला आहे. राजकारण करण्याच्या दृष्टीने आम्ही तो मुद्दा मांडलेला नाही. दहा वर्षे क्राईम डिपार्टमेंट असणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे देखील सांगितली आहेत. त्याबाबत आपण नंतर उत्तर द्याल हे मी गृहीत धरतो.

श्रीमती उषा दांडेकर या वयोवृद्ध महिलेच्या प्रकरणात माननीय उप सभापतींनी निदेश दिले होते. समाजाला कायद्याचे राज्य आहे असे वाटले पाहिजे. सर्व नियमाने करून सुद्धा त्या वयोवृद्ध महिलेला घर मिळवून देण्यात आपण हतबल असाल तर मग हे राज्य कायद्याचे आहे असे कसे म्हणायचे? तेव्हा याबाबत ठोस कारवाई आम्हाला अपेक्षित आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

तर मग हे कायद्याचे राज्य कसे ? याबाबतीत ठोस कारवाईची अपेक्षा आहे. याठिकाणी माननीय महसूल मंत्र्यांनी जिमखान्याचा उल्लेख केला. पहिला कार्यक्रम 50 हजार आणि पुढचा कार्यक्रम 25 हजार, पण ते दीड-दीड कोटी भाडे घेत आहेत आणि 50 हजारामध्ये चटावरच्या श्राध्दाप्रमाणे ते उरकून टाकत आहे. माझे असे म्हणणे आहे की, तुम्ही त्या तुलनेमध्ये पैसे घ्यावेत. परंतु तुम्ही त्यांना जे संरक्षण देत आहात, ते देता कामा नये. माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटल्या प्रमाणे माझगाव डॉक मधील कर्मचाऱ्यांना सोसायट्या देताना जे तेथील कर्मचारी नाहीत ते देखील सभासद झालेले आहेत. त्यामुळे खाजगी बिल्डर हे नावाला 2-4 कर्मचाऱ्यांना घेऊन बाकीच्या बाहेरील कर्मचाऱ्यांना सभासद करुन जागा देत आहेत, ते होता कामा नये. या अनुषंगाने मुद्दा मांडला आहे याची तपासणी केली पाहिजे एवढेच या निमित्ताने सांगावयाचे आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी लिलावती हॉस्पिटलमध्ये जाऊन श्री.उद्धवजी ठाकरे यांच्या तब्येतीची चौकशी केली. त्यांना आम्ही आश्वासित केले की, तुम्ही भ्रष्टाचाराच्या विरोधात लढत रहा, तुम्हाला कोणी हालवू शकत नाही.त्यामुळे ते विजयी स्वरुपात आल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

-----

. . . .5 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: एकाधिकार खरेदी योजना पुन्हा सुरु करण्याबाबतची सद्यस्थिती

मु.शी:: एकाधिकार खरेदी योजना पुन्हा सुरु करण्याबाबतची सद्यस्थिती यासंबंधी माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे निवेदन

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

. . . .5 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती

**मु.शी.** : राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती

यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.पृथ्वीराज चव्हाण (माननीय मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, आज पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.आपण हे पावसाळी अधिवेशन असे म्हणत असलो तरी देखील राज्यावर आलेल्या दुष्काळाच्या सावटामुळे आपल्या सगळयांच्या तोंडचे पाणी पळालेले आहे. आपण सलग दोन वर्षे टंचाईच्या परिस्थितीचा मुकाबला करीत आहोत. माननीय पंतप्रधान यांनी देखील संपूर्ण देशातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा नुकताच आढावा घेऊन राज्याशी समन्वय साधण्यात येत असल्याचे सांगितलेले आहे. देशात सरासरीपेक्षा 22 टक्के पाऊस कमी झाला असून माननीय पंतप्रधान यांनी या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी सर्व संबंधित मंत्रालयांना आणि राज्यांना तयारीत रहाण्याचे निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्र राज्यापुरते बोलावयाचे तर 2011 पासून सुरु झालेल्या दुष्काळी उपाययोजना राज्यात अद्यापही सुरु असल्याने आता पुढील काळासाठी काही तात्पुरत्या आणि काही दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची आणि त्याबाबत निश्चित धोरण तयार करण्याची आवश्यकता वाटते आणि सरकार याचे संपूर्ण नियोजन करीत आहे.

सभापती महोदय, पाणी हा भविष्य काळातील सर्वात कळीचा मुद्दा ठरणार आहे. हा प्रश्न केवळ महाराष्ट्रापुरता किंवा देशापुरता मर्यादित नाही तर तो जागतिक प्रश्न झालेला आहे आणि दिवसेंदिवस त्याचे गांभीर्य वाढणार आहे. वाढती लोकसंख्या, मोठ्या प्रमाणात होणारे नागरीकरण, प्रदूषण आणि पर्यावरणाचा बिघडलेला तोल, पाण्याचा बेसुमार वापर, निसर्गाचे बदललेले चक्र, जागतिक तापमानातील वाढ अशी अनेक कारणे याच्या मुळाशी आहेत.

ताज्या आकडेवारीनुसार (24 जुलै) राज्यात सरकारी 79 टक्के पाऊस पडला आहे. राज्या तील एकूण 355 तालुक्यांपैकी 199 तालुक्यांमध्ये 75 टक्के पेक्षा कमी पाऊस झाला आहे. 25 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडलेल्या तालुक्यांची संख्या 8 आहे. 61 तालुक्यात 25 ते 50 टक्के पाऊस पडला आहे. 50 टक्क्यांपेक्षा कमी पर्जन्यमान असलेल्या तालुक्यांची संख्या 69 एवढी आहे.

पेरणीचा हंगाम संपत आला तरी 102 तालुक्यात 50 टक्के पेक्षा कमी पेरण्या झाल्या आहेत.तसेच



असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

राज्याच्या बऱ्याचशा भागात टंचाई सदृश्य परिस्थिती आहे. ऑगस्ट महिन्यात निसर्ग साथ देईल आणि महाराष्ट्रात सर्वत्र चांगला पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. तथापि पावसाने दुर्दैवाने दगा दिला तर पहिल्या टप्प्यात करावयाच्या उपाययोजनांची संपूर्ण तयारी सरकारने केलेली आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

मदत व पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगरावजी कदम यांनी या संदर्भात सभागृहात यापूर्वी माहिती दिली आहेच. महात्मा फुले जल व भूमी अभियान, वैरण विकास कार्यक्रम, शेततळी, विदर्भ सिंचन योजना, सुक्ष्म सिंचन योजना, शेततळ्यांचे अस्तरीकरण, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली रोजगार उपलब्ध करुन देणे आणि एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाखाली पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करणे इत्यादी कार्यक्रमांवर 2 हजार 685 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याचे शासनाने ठरविले आहे.

सभापती महोदय, आपल्याला जी काही दीर्घकालीन उपाययोजना करावयाची आहे त्यामध्ये पाण्याचा थेंब न् थेंब जमिनीत जिरविण्याला आमचे प्राधान्य राहील. जास्तीत जास्त प्रमाणावर पावसाचे पाणी अडवून, जिरवून खरिपाची पिके वाचविणे हे आमचे पहिले उद्दिष्ट आहे. खरीप हंगामातील तूट रब्बी हंगामात भरुन काढण्यासाठी आपल्याला शर्थीचे प्रयत्न करावे लागतील. या शिवाय पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत संरक्षित करुन त्यांचे बळकटीकरण करण्यात येईल. चाऱ्याच्या उत्पादनाची वाढीव व्यवस्था करण्यात येईल. रोजगार निर्मिती कशा प्रकारे करता येईल, याचे नियोजन करण्यात येईल. याशिवाय टँकरव्दारे पाणी पुरवठा, चारा डेपो तसेच पिकांच्या नुकसान भरपाईवर खर्च वाचविणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची आमची पूर्ण तयारी आहे.

मात्र सद्याची टंचाई परिस्थिती आणि संभाव्य दुष्काळसदृश परिस्थिती यांचा मुकाबला करायला सरकार आणि प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना राबविणारे सरकार म्हणून अशा संकटाच्या परिस्थितीत प्रत्येकाला पिण्याचे पाणी पुरविणे आणि चारा पुरवून मौल्यवान पशूधन वाचविणे, हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. सध्या राज्यात 7 जिल्ह्यांमध्ये एकूण 289 चारा डेपो सुरु असून आतापर्यंत साडेसहा लाख टन चारावाटप करण्यात आले आहे. यावर आतापर्यंत जवळजवळ 170 कोटी रुपये खर्च झाला आहे. नाशिक, अहमदनगर, सातारा, सांगली या चार जिल्ह्यात जनावरांच्या 31 छावण्या सुरु असून त्यामध्ये 24 हजार जनावरे आहेत. यावर आतापर्यंत 8 कोटी 12 लक्ष रुपये खर्च झाला आहे. हा चालू खर्च आहे. कोकण वगळता अन्य पाच

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पृथ्वीराज चव्हाण ......

महसुली विभागांमध्ये 1650 गावे, 6061 वाड्यांमध्ये 2126 टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे.

अर्थात या सगळ्या तात्पुरत्या उपाययोजना आहेत, याची आम्हाला जाणीव आहे. या सगळ्या दुष्टचक्रातून सुटका व्हावी यासाठी कायमस्वरुपी आणि दीर्घकालीन उपाय राबविणे आवश्यक आहे. यादृष्टीने सरकारने पावलेही उचलली आहेत आणि याचे काटेकोर नियोजनही केले आहे. पूर्णतेच्या शेवटच्या टप्प्यात असलेले जलसिंचन प्रकल्प त्वरेने पूर्ण करुन जलसंजयक्षमता वाढविणे, कालव्यांचे जाळे वाढविणे, सूक्ष्मसिंचनाला प्रोत्साहन देणे, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण, हायड्रो फॅक्चरिंग, पुनर्भरण, 10 हजार अतिरिक्त शेततळी तयार करणे व अस्तरीकरण करणे, पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जागीच जमिनीत जिरविण्यासाठी सिमेंट बंधारे बांधण्याचा धडक कार्यक्रम हाती घेणे, कमी पाणी लागणाऱ्या वाणांना प्रधान्य देणे, पिकपध्दतीत (क्रॉप पॅटर्न) बदल करणे असे अनेक उपक्रम हाती घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. या वर्षी या सर्व कामांसाठी चालू आर्थिक वर्षात सुरुवातीच्या अंदाजाप्रमाणे किमान आणखी 500 कोटी रुपयांचा निधी लागेल असा अंदाज आहे. त्याचबरोबर माननीय पंतप्रधानांशी चर्चा करुन राज्य सरकारला केंद्राकडून जी मदत मिळेल त्याचाही पूर्णपणे अभ्यास करुन लवकरात लवकर त्याचाही प्रस्ताव पाठविण्यात येईल.

एकंदरीत टंचाईची परिस्थिती गंभीर असली तरी या संपूर्ण परिस्थितीवर सरकारचे बारकाईने लक्ष आहे. दररोज बैठका होत आहेत. परिस्थिती अधिक वाईट झाल्यास तात्पुरत्या, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचे काटेकोर नियोजन सरकारने केले आहे. कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांना याची झळ पोहचू दिली जाणार नाही, पिण्याचे पाणी, अन्नधान्य आणि जनावरांना चारा कमी पडू दिला जाणार नाही, याची खात्री मी देतो. आवश्यकता वाटल्यास केंद्र सरकारकडे आणि माननीय पंतप्रधानांकडे आपण सर्व मिळून जाऊन निधी मागण्याचा प्रस्ताव पाठविला जाईल. याबद्दल चर्चा चालू आहे. या संदर्भात जेव्हा नियोजन पूर्ण होईल तेव्हा विरोधी पक्ष नेते आणि सर्व गटनेत्यांची बैठक घेऊन पुढे कार्यवाही करण्यात येईल.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला निवेदनावर प्रश्न विचारावयाचा नाही. यामध्ये सर्व भयानकता आली. आता आपण आकस्मिकता निधी 225 कोटी रुपये केला त्याप्रमाणे रक्कम काढता येईल पण तेवढ्याने भागणार नाही. आपल्याला माननीय पंतप्रधानांनी बोलविले, आपले विमान थोडे उशिराने आले पण आपण या ठिकाणी आल्यानंतर दोन हजार कोटी रुपये मिळाल्याची घोषणा करणार असे आज आम्हाला प्रामाणिकपणे वाटले. आज खरोखर ती गरज आहे. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी जे घोषित केले त्यापेक्षा फक्त 50 कोटी रुपयेच ॲडिशनल आहेत आणि बाकीचे दरवर्षी खर्च होणारेच पैसे आहेत. हे पैसे आपण नव्याने दिलेले नाहीत. या दुष्काळाशी लढाई करण्यासाठी निधीची गरज आहे. आपण शब्दांचे भरपूर वाटप केले, भरपूर योजना सांगितल्या. या योजना पूर्ण करण्यासाठी शेजारी बसलेल्या दादांनी जो निधी द्यावयास पाहिजे त्याची काहीही घोषणा केलेली नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

म्हणजे शासनाने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली हेच त्यातील वास्तव आहे. आज अधिवेशन संपल्यानंतर शेतकऱ्यांच्या हातात भोपळा मिळाला आहे दुसरे काही मिळाले नाही हेच आमच्या निदर्शनास आलेले आहे. इतकेच मला नोंदवावयाचे होते.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, जनावरांच्या चाऱ्यासंबंधी सर्व सन्माननीय सदस्य चिंता व्यक्त करीत असतात. जनावरांना ज्वारी, बाजरी व मक्याच्या पिकासाठी चारा मिळतो. ज्वारी व बाजरीचा पेरा वाढण्यासाठी शासन शेतकऱ्यांना अनुदान देणार आहे काय ? शेतकरी चारा कोठून आणणार, चारा पेरल्याने चारा तयार होत नाही. ज्वारी पेरली की माणसांना ज्वारी खाण्यासाठी मिळते, जनावरांना चारा मिळतो आणि शेतीला खत मिळते. ही प्रवृत्ती वाढण्यासाठी शेतकऱ्यांना सरळ अनुदान द्यावे अशी मी विनंती करतो.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये सविस्तर उपाययोजना निश्चित करणे शक्य नाही. शासन कोणकोणत्या मुद्यांना प्राधान्य देत आहे ते मी सांगितले आहे. अनेक ठिकाणी परिस्थिती गंभीर आहे. त्या परिस्थितीचे अवलोकन सुरु आहे. एकूण 2,685 कोटी रुपये कशा प्रकारे खर्च केले जाणार आहेत त्याबाबत मी निवेदन केलेले आहे. आता मी ज्या नवीन योजना सांगितल्या आहेत त्यासाठी किमान 500 कोटी रुपये लागतील. त्यासाठी डिटेलमध्ये प्लॅनिंग केले जाईल. त्यासाठी कदाचित अधिक पैसे लागण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवावा लागतो, त्यानंतर केंद्र सरकारची राज्यात टीम येते. त्यासाठी शासनाचे प्रयत्न चालू आहेत. केंद्र सरकारकडून मदतीची घोषणा केल्यानंतरही पैसे उशिरा येतात. परंतु केंद्र सरकारकडून पैसे आल्यानंतरच खर्च करु अशी शासनाची भूमिका नाही. या कामासाठी बिलकूल पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत.

सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी मी निवेदनात उल्लेख केलेला आहे. फॉडर डेव्हलपमेंट प्रोग्रॅम रब्बी हंगामासाठी घेतला जातो, खरीप हंगामासाठी घेत नाही. पण जेथे जेथे पाणी उपलब्ध असेल तेथे मोठ्या प्रमाणात तो प्रोग्रॅम घेतला जाणार आहे. तालुकानिहाय प्रोग्रॅम घेण्याची योजना आहे. प्रत्येक विभागाला पिण्याच्या पाण्यासाठी,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चाऱ्यासाठी, हिरवा चारा निर्माण करण्यासाठी इमर्जन्सी प्लान तयार करण्यास सांगितले होते. त्यानुसार प्रत्येक विभागातील जिल्हानिहाय प्लान तयार झालेला आहे. मी लवकरच विभागीय स्तरावर बैठका घेणार आहे. प्रत्येक विभागाने तयार केलेला इमर्जन्सी प्लान मी पाहणार आहे. त्यामध्ये अस्तरीकरणाची कामे असतील, सिमेंट बंधाऱ्याची कामे असतील. त्यासाठी यापूर्वी काही तरतूद केली होती. या सर्व तरतुदीचा उपयोग केला जाईल. यातील फिलॉसॉफी अशी आहे की, शासनाला तात्पुरत्या उपाययोजना तर कराव्याच लागतील. पुढील काळात जो काही पाऊस पडेल त्याचा प्रत्येक थेंब वापरला पाहिजे अशा प्रकारचा त्यात बदल करावा लागेल.

अमरावती येथून नाल्याच्या व ओढ्याच्या खोलीकरणाची मागणी करण्यात आली होती. तो प्रयोग फार यशस्वी झाला आहे. तसेच शिरपूर पॅटर्न शासनासमोर आहे. सातारा जिल्ह्यात सिमेंट बंधारे बांधल्यामुळे त्याचाही चांगला उपयोग झालेला आहे. त्यामुळे सगळया प्रकारे उपलब्ध पाण्याचे व्यवस्थित व्यवस्थापन करुन, हिरव्या चाऱ्याचे व्यवस्थापन करुन सध्याचे जनावरांचे डेपो चालू ठेवून, सीडच्या कार्यक्रम आहे, त्याबाबत अतिशय योग्य उपाययोजना केलेली आहे. ती योजना केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे. त्या योजनेसाठी केंद्र सरकारकडून पैसे मिळतील त्यासाठी त्यांच्याबरोबर चर्चा चालू आहे. केंद्र सरकारकडे गेल्यानंतर शासनाला लगेच मदतीचा चेक दिला जातो असे कधी होत नाही. आपल्याला माहीत आहे की, केंद्र सरकारच्या आपत्ती निवारणाच्या पध्दतीनुसार केंद्र सरकारकडून राज्यात टीम येते, ती टीम पाहणी करते आणि त्यानंतर मदतीची रक्कम जाहीर केली जाते. तरी सुध्दा केंद्र सरकारकडून रक्कम येण्याची राज्य शासन कधी वाट पहात नाही. शासन असे सर्व प्रयत्न करणार आहे. मी या सभागृहाला असे आश्वासन देऊ इच्छितो की, राज्यात कितीही गंभीर दुष्काळ पडला तरी राज्य सरकार शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी मागेपुढे पाहणार नाही. सरकारमधील माननीय उप मुख्यमंत्री हे देखील बिलकूल मागेपुढे पाहणार नाहीत. आपण सर्वजण मिळून या दुष्काळाला निश्चितपणे तोंड देऊ आणि पुढील काळात पाऊस पडला नाही तरी अशी परिस्थिती राज्यात पुन्हा येऊ नये यासाठी शासनाकडून जरुर प्रयत्न केले जातील, एवढेच मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

---------

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सत्र काळातील कामकाजाचा आढावा

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषद द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपलेले आहे. दिनांक 9 जुलै, 2012 ते दिनांक 25 जुलै, 2012 पर्यंतच्या या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा मी आता सदनासमोर ठेवतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण बैठकांची संख्या - | 13 | - | एकूण कामकाज - | 100 तास |
| मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ | | - | 45 मिनिटे | |
| अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ | | - | 2 तास 45 मिनिटे | |
| प्रत्यक्षात झालेले कामकाज | | - | 96 तास 30 मिनिटे | |
| रोजचे सरासरी कामकाज | | - | 7 तास 30 मिनिटे | |

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 21:05

सभापती...

तारांकित प्रश्न

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 3332, कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 2925

स्वीकृत प्रश्न 1145 - सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न 81

नियम 93च्या सूचना -

प्राप्त झालेल्या सूचना 105, स्वीकृत सूचना 57, निवेदन झालेल्या सूचनांची संख्या 39

लक्षवेधी सूचना -

प्राप्त झालेल्या सूचना 993, मान्य झालेल्या सूचना 302, चर्चा झालेल्या सूचना 38

विशेष उल्लेखाच्या 109 सूचना मांडण्यात आल्या.

नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा - प्राप्त झाल्या 11, मान्य झाल्या 10, चर्चा झाल्या 5

नियम 46 अन्वये निवेदने - 4

शासकीय विधेयके - संमत 16 (परिषद 4, सभा 12)

अशासकीय ठराव - 2

शासकीय ठराव - 1

नियम 260 अन्वये 4 प्रस्तावावर चर्चा झाली.

अर्धा-तास चर्चा - प्राप्त झाल्या 97, मान्य झाल्या 73, चर्चा झाली 10

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी खालील घोषणा करतो.

"राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 10 डिसेंबर 2012 रोजी, विधान भवन, नागपूर येथे घेण्यात यावे."

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 21:05

**पृ.शी./मु.शी.**: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढील प्रमाणे संदेश आला आहे.

"मी के. शंकरनारायणन् महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन याद्वारे बुधवार, दिनांक 25 जुलै 2012 रोजी होणा-या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्ती बरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

(रात्री 09.08 वाजता सत्र संस्थगित झाले.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही